# सत्याग्रह व स्वराज्य

★

अप्पासाहेब पटवर्धन

१८८०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ७३०६

REFBK-0006835

ग्राम-सेवा-मंडळ, वरधा

★

"श्री अप्पासाहेब पटवर्धन मूळचे प्रोफेसर असल्यामुळें त्यांच्या हातून अेव्हांना किती तरी लिखाण व्हावयास पाहिजे होतें। पण सेवा-कार्यातच सर्व वेळ घालविण्याचा त्यांचा संकल्प असल्यामुळें, त्यांनीं आजवर फक्त मौलिक अशीं दोन च पुस्तकें लिहिलीं आहेत। पहिलें "सेवा-धर्म" आणि दुसरें हें। दोन्ही ग्रंथांची शैली मुरलेल्या विचारकाच्या आणि लोकसेवकाच्या स्वभावाची द्योतक आहे। येथें प्रसादही आहे आणि संयमही आहे। आत्म-विश्वास आहे आणि तटस्थता आहे। स्वतःला काय म्हणावयाचें आहे त्याची लेखकाला स्पष्ट कल्पना आहे आणि वाचकांना देखील सर्व कांहीं स्पष्ट करून देण्याचें सामर्थ्य त्याच्या लेखणींत आहे।"

—का० का०

★

# सत्याग्रह व स्वराज्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 28950 वि: विविध
क्रमांक 9306 नों: दि: 1-5-48

लेखक

आप्पासाहेब पटवर्धन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
6639

REFBK-0006835

जानेवारी १९४७ ] [ किंमत ३ रु०

प्रकाशकः—

राधाकृष्ण बजाज

मंत्री, ग्राम-सेवा-मंडळ, वरधा.

मुद्रक :—

वल्लभदास जाजू,

मॅनेजिंग एजन्ट,

श्रीकृष्ण प्रिं. व. लि., वरधा.

# दो शब्द

जिन्होंने मेरे ख्यालोंका स्वतन्त्र रूप से विचार किया है, अैसे थोडे साथिओंमें से अप्पासाहेब पटवर्धन अेक हैं। मेरे परिचय में कअी बरसों से हैं। जैसा विचार वैसा ही वर्तन रखते हैं। अिसलिअे अुनके लेखों का वजन काफी रहता है। अिस पुस्तक को मैंने पढा है— सबका सब तो नहीं; अितनी फुरसद नहीं है। मराठी का मेरा ज्ञान बहुत थोडा है। बोल तो सकता ही नहीं। लेखों का सार समझ लेता हूँ। अैसी हालत में अिस पुस्तक में जो-कुछ लिखा है सब मेरा ही ख्याल है, अैसा कहने का साहस मैं नहीं कर सकता। लेकिन अितना अवश्य कह सकता हूँ कि अुसमें और मेरे ख्यालों में काफी साम्य है। अप्पासाहेब को मेरे प्रमाण-पत्र की दरकार हो ही नहीं सकती। अुनके विचारों की जड भले मेरे ख्याल हों, लेकिन जो पूंजी अुन्होंने अिकट्ठी की है, सो अुनकी निजी है। अिसलिअे, अिस पुस्तक की कीमत बहुत बढती है। पाठक-गण भी अधिक पाअेंगे। और अपना स्वतन्त्र विचार कर सकेंगे।

श्रीरामपुर,
पूर्वबंगाल.
२४।११।४६

मो. क. गांधी

# राष्ट्रीय जीवनांतील अहिंसा

१९३० सालची गोष्ट आहे। सरकारनें गांधीजींना राजकीय कैदी म्हणून यरवडा जेलमध्यें ठेवलें होतें। त्यांना तेथें अेकटें अेकटें वाटूं नये म्हणून त्यांच्याजवळ राहण्यासाठीं साबरमती जेलमधून माझी तेथें रवानगी करण्यांत आली। सगळा वेळ महात्माजींचेबरोबर मी अेकटाच। ते माझेकडे मराठी वाचत असत। रोज किती किती तास सूत कातीत असत। याच वेळीं त्यांनीं नव्या प्रकारचा चरखा तयार केला, त्याला आतां 'यरवडा चक्र' म्हणतात। सकाळ संध्याकाळ आंगणांतच फिरत असतांना मी त्यांना तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न विचारीत असें। अेकदा कांहीं गुंतागुंतीचीं अुदाहरणें देअून त्यांना मीं अहिंसेविषयीं विचारलें। तेव्हां ते कांहींसे त्रासून म्हणाले, "अहिंसेचा तूं स्वतंत्रपणें विचार केला पाहिजेस; माझ्या द्वारा तुला अहिंसेचें दर्शन झालें असो, पण आतां ती तुझी स्वतःची श्रद्धा झाली आहे; प्रत्येक गोष्टींत माझा च अर्थ स्वीकारण्याचें कारण नाहीं। अहिंसेचें मला अेक-प्रकारें दर्शन होअील, तुला निराळ्या प्रकारें होअील। तुझी जशी जीवन-निष्ठा असेल, तुझा जसा जीवनानुभव असेल, तसा तुला अहिंसेचा साक्षात्कार होअील। सगळ्याच बाबतींत आंधळेपणानें माझा निर्णय घेअून चालणें बरोबर नव्हे।" (त्यांचे तंतोतंत शब्द आज मला आठवत नाहींत पण वरील आशयाचें च त्यांचें अुत्तर होतें)

मी त्यांना म्हणालों, "बापूजी, मीं अंध अनुयायी होअीन अशी मुळींच भीति नाहीं। मी आपलेकडे आलों त्यापूर्वींच माझी जीवन-दृष्टि

चढून गेलेली होती। आतां नव्या सांच्यांत मी बसूं म्हटलें तरी बसूं शकत नाहीं। आपलेकडून अहिंसेची दीक्षा मिळाल्यामुळें माझें जीवन-दर्शन डोळस झालें, हें जरी खरें असलें तरी आपल्या चाकोरींतून जाण्याचा प्रयत्न करून देखील मला तो साधला नाहीं। आपली कुठलीच गोष्ट पटल्यावांचून मीं घेतली नाहीं। अंध अनुयायी होतों म्हटलें तरी होणें सोपें नाहीं।

"पण आपला जीवमान असे तोंपर्यंत निरनिराळया प्रसंगीं आपण अहिंसा कशी काय लागूं करूं शकतां, हें सर्व समजून घेण्याची संधि मी काय म्हणून सोडावी? नुसत्या व्याख्येनें अहिंसेचें आकलन होत नाहीं म्हणून अनेक प्रत्यक्ष किंवा काल्पनिक प्रसंग आपलेपुढें मांडून त्या त्या प्रसंगीं अहिंसा-परायण मनुष्यानें कसें वागावें, याचें उत्तर आपल्या तोंडून मला हवें आहे। मग त्यावर मी स्वतंत्रपणें हवा तसा विचार करीन।"

माझ्या उत्तरानें त्यांचें समाधान झालें। ते म्हणाले, "तसें असेल तर हरकत नाहीं;" आणि मग त्यांनीं माझ्या अहिंसा-विषयक अनेक प्रश्नांना सविस्तर उत्तरें दिलीं।

अहिंसा हें कांहीं तर्काच्या चौकटींत बसलेलें तात्त्विक दर्शन नसून ती एक जीवन-दृष्टि आहे। या दृष्टीच्या प्रेरणेनें अहिंसा-परायण अशीं अनेक जीवन-दर्शनें बनूं शकतात।

मूळ वैदिक धर्म देखील अहिंसा-परायणच होता। त्याला सर्वत्र मैत्रीची दृष्टि हवी होती। गाईला त्यानें 'अघ्न्या' ठरविलें होतें। अहिंसेनेंच मोक्ष मिळतो असा त्याचा सिद्धान्त होता–(अहिंसन् सर्व भूतानि न पुनरावर्तते)। तरीहि तेथें 'अन्यत्र तीर्थेभ्यः' असा त्याला अपवाद करावासा वाटला!

या नंतर भगवान् बुद्धांनीं 'अ-वेरा'चें ( वैर-त्यागाचें ) अहिंसा-दर्शन जगापुढें मांडलें । त्याच काळीं भगवान् महावीर स्वामींनीं 'अहिंसा परमो धर्मः' म्हणून आपलें अेक तपःप्रधान निराळेंच अहिंसा-दर्शन जगाला दिलें, आणि त्यांतूनच जीव-दयेचा प्रवाह वाहूं लागला । ख्रिस्ती धर्मांत देखील अ-प्रतीकाराची अहिंसा सांगितली आहे । त्यांत हि क्वेकर संप्रदायांतील लोकांची किंवा रशियांतील डुखोबार लोकांची अहिंसा निराळेंच अुत्कट रूप धारण करते। खाद्य पदार्थांत पशु, पक्षी, मासे, साप, किडे कांहीं हि न सोडणारे चिनी लोक हि अहिंसेचें पालन करतात आणि जोराच्या श्वासोच्छ्वासानें हवेंतील अदृश्य जंतूंना त्रास होअूं नये म्हणून तोंडावर पडदी लटकावणारे श्रमणहि अहिंसेचें पालन करतात । युरोप अमेरिकेमधील पॅसिफिस्ट लोकांमध्यें देखील अहिंसेचे कितीतरी प्रकार आहेत ।

हल्लींच्या युगांत गांधीजींनीं प्रथम राजकीय लढ्यांत आणि नंतर जीवनाच्या सर्व अंगोपांगांमध्यें अहिंसेचें अनुशीलन कसें करावें याचें सविस्तर शास्त्र प्रत्यक्ष वस्तुपाठाच्याद्वारा जगापुढें मांडलें आहे ।

गांधीजींच्या या जीवन-व्यापी अहिंसा-दृष्टीचें स्वरूप अितकें कांहीं नवीन आहे, कीं यांतून कितीतरी निरनिराळीं स्वयंपूर्ण आणि कार्यकारी अहिंसादर्शनें उत्पन्न होणार आहेत ।

श्री रिचर्ड ग्रेग चें 'पावर ऑव्ह नॉन्व्हायलन्स' पुष्कळांनीं वाचलें असेल । श्री किशोरिलालभाअी मश्रूवाला यांचें हल्लीं लिहिलेलें पुस्तक हि पुष्कळांच्या वाचनांत आलें असेल । महात्मा गांधी आणि त्यांच्या आश्रमांतील आश्रमवासी यांनीं अहिंसेवर कितीतरी लिहिलें आहे । कांहीं लोक तर म्हणतील कीं या सर्व लोकांनीं जें जें म्हणून कांहीं लिहिलें

आहे, तें सर्व अप्रत्यक्षपणें अहिंसाधर्मावरील भाष्य च आहे। अहिंसेचें प्रत्यक्ष विवेचन करणारे गांधीजींचे अनेक लेख अेकत्र करून नवजीवन प्रकाशन मंदिरानें त्याचें अेक निराळें पुस्तकच तयार केलें आहे।

श्री आप्पासाहेब पटवर्धन मूळचे प्रोफेसर असल्यामुळें त्यांच्या हातून अेव्हांना किती तरी लिखाण व्हावयास पाहिजे होतें। पण सेवा-कार्यांतच सर्व वेळ घालविण्याचा त्यांचा संकल्प असल्यामुळें, त्यांनीं आजवर फक्त मौलिक अशीं दोन च पुस्तकें लिहिलीं आहेत। पहिलें "सेवा-धर्म" आणि दुसरें हें। दोन्ही ग्रंथांची शैली मुरलेल्या विचारकाच्या आणि लोकसेवकाच्या स्वभावाची द्योतक आहे। येथें प्रसादही आहे आणि संयमही आहे। आत्म-विश्वास आहे आणि तटस्थता आहे। स्वतःला काय म्हणावयाचें आहे त्याची लेखकाला स्पष्ट कल्पना आहे आणि वाचकांना देखील सर्व कांहीं स्पष्ट करून देण्याचें सामर्थ्य त्याच्या लेखणींत आहे।

मूळ पुस्तकाचें नांव "अहिंसा आणि स्वराज्य" असें ठेवलें होतें। पुढें तें बदलून "सत्याग्रह आणि स्वराज्य" असें केलें आहे। अहिंसेच्या राजकीय बाजूचा अूहापोह येथें केला असल्यामुळें पुस्तकाच्या नांवांत 'स्वराज्य' शब्द आला आहे तो योग्यच आहे। राजकीय अहिंसेचा मुख्यतः अर्थ होतो 'अहिंसक प्रतिकार'। म्हणून च आप्पासाहेबांनीं मूळ नांवांत फेरफार करण्याचें ठरविलें असावें। तरी हि मला वाटतें कीं "अहिंसा आणि स्वराज्य" हें नांवच या पुस्तकाला अधिक अन्वर्थक आहे।

आजकालच्या चर्चेंत अहिंसा म्हणजे केवळ जीव-दया असा अर्थ कोणी करीत नाहीं। अहिंसा म्हणजे अहिंसक जीवन-दृष्टि आणि तदनुरूप जीवन-परिवर्तन आणि सर्वोदयकारी समाज-व्यवस्था।

या कल्पनेप्रमाणें अहिंसा म्हणजे जीवनांतील सर्व महत्त्वाचे प्रश्न सोडविण्याची गुरुकिल्ली। अुग्र प्रसंगीं वापरावयाची निर्वाणींची अहिंसा म्हणजे च सत्याग्रह। आतां आपण हेंही ध्यानांत घेतलें पाहिजे कीं सत्याग्रह-शक्तीनें आपण जें मिळवलें असेल तें जर कायम टिकवावयाचें असेल तर आपली समाज-व्यवस्था देखील अहिंसा-मूलक च असली पाहिजे; अथवा असें हि म्हणतां येईल कीं अहिंसा-मूलक समाजांत जें न्याय्य ठरेल आणि अहिंसक समाजांत जें सुखानें दाखल करतां येईल तें च सत्याग्रहाच्या जोरावर आपल्याला मिळवतां येईल।

आपल्याला अहिंसेचा विचार तीन प्रकारें करावा लागणार आहे। अेक प्रतिकारात्मक अहिंसा, दुसरी रचनात्मक अहिंसा आणि तिसरी समन्वयसाधक अहिंसा। जीवन-कलह, दुर्बळांची पिळवणूक आणि वर्ग-विग्रह यानीं घेरलेल्या समाजांत कदाचित् अहिंसेला प्रतिकारात्मक रूपांतच प्रथम प्रगट व्हावें लागतें। तेजस्वी आणि निर्वाणींचा प्रतिकार करूनहि स्वतःची माणुसकी सांभाळतां येतें, शत्रूशीं मैत्री स्थापन करणें जड जात नाहीं आणि सगळा प्रतिकारात्मक लढा अुभय पक्षीं कल्याणकारी होअू शकतो हे अहिंसेचे गुण नजरेंत भरल्यानंतर च सामान्य मनुष्य अहिंसेची कदर करूं लागतो आणि सत्याग्रही व्यक्तीचें नेतृत्व स्वीकारतो।

अेवढें झालें म्हणजे मग सत्याग्रही वृत्तीला पोषक होअील अशी सर्वोदयकारी अहिंसक समाज-रचना घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू करतां येतात।

या प्रयत्नांत च आपण अुचनीच भाव दूर करूं शकतो। परस्पर-विरोधी भासणाऱ्या भिन्न तत्त्वांमध्यें तडजोड अुत्पन्न करण्याचें शास्त्र आपल्या

हातीं लागतें आणि शेंवटीं साप मुंगसांप्रमाणें वैर वाळगणाऱ्या समाजामध्यें देखील समन्वय, अेकरूपता, अेकहृदयता आणि अेकप्राणता—अुत्पन्न करणें शक्य आहे या गोष्टीवर विश्वास बसूं लागतो। समन्वयकारी अहिंसा ही अहिंसेची सर्वोच्च पायरी आहे। स्वतंत्रता, समता आणि बंधुता या मांगल्याच्या तीन पायऱ्या गांठल्या म्हणजे च अद्वैताच्या अेकतेच्या क्षेत्रांत प्रवेश करण्याची पात्रता आपल्यांत येते।

केवळ हिंदू-मुसलमानांत च नव्हे तर चीन आणि जपानमध्यें, काळ्या आणि गोऱ्यामध्यें, रशियन आणि अमेरिकन लोकांमध्यें, भ्रातृभाव आणि समन्वय-मूलक अेकता स्थापन करण्याची किमया केवळ अहिंसेंत च आहे। अहिंसा हें शुभंकरी आत्मशक्तीचें च दुसरें नांव आहे। सत्याग्रह ही तिची पहिली विभूति आहे, समता ही दुसरी आणि समन्वय ही तिची सात्त्विकतम श्रेष्ठ विभूति आहे। या समन्वयांतून च अहिंसेची अभयरूपी द्विविध विभूति प्रगट होणार आहे। मीं कुणाला भिअूं नये आणि मला कोणीं भीअूं नये अशी दुहेरी वृत्ति सिद्ध झाली म्हणजे अभय सिद्ध झालें असें म्हणतां येअील। हें अभय ज्याला साधलें त्याच्या सहवासानें जगांतील वैरभाव हळूं हळूं वितळून जाणार आहे। तसें झालें म्हणजे 'अहिंसा-प्रतिष्ठायां तत्-संनिधौ वैर-त्यागः' हे सूत्र चरितार्थ कसें होतें हें जगाला पटावयाचें आहे।

हीच गोष्ट श्री. आप्पासाहेबांनीं आपल्या खुबीदार शब्दांत या पुस्तकांत मांडली। आहे ते म्हणतात—

"हिंदूमुसलमानांनीं परस्परांविषयीं निर्बल बनलें पाहिजे। निर्बल हे तंतोतंत तुल्यबल असतात च। परस्परांविषयीं निर्बल बनणें हा च अेकत्र

नांदण्याचा सोनेरी नियम आहे। पति-पत्नी, पिता-पुत्र हे परस्परांविषयीं निर्बल असतात। भाऊ भाऊ किंवा शेजारी शेजारी परस्परांविषयीं निर्बल असतात, तोंपर्यंत च अेकत्र नांदूं शकतात। हें निर्बल बनणें म्हणजे नेभळें बनणें नव्हे, तर सोशीक, जागरूक व योजक बनणें; प्रेम, आपुलकी व न्याय यांची कास धरणें; आत्म-संशोधन करणें व दुसऱ्याबद्दल सबूरी धरणें; दुसऱ्याच्या व्यक्तित्वाबद्दल आदर बाळगणें। हिंदूमुसलमानांना परस्परांबद्दल वाटणारा परकेपणा व अ-विश्वास हें च साऱ्या अनर्थांचें मूळ आहे। प्रत्येकाला भीति वाटते, 'दुसरा मला चिरडून टाकील'। अ-विश्वासाच्या नजरेनें पाहूं लागलें म्हणजे साऱ्या च वस्तु अुलट्या दिसूं लागतात। द्वैत कल्पिलें म्हणजे द्वैत घडून येतें।

"तुम्ही निराळे आणि आम्ही निराळे या ताटातुटीवर, म्हणजेच दुहीवर हिंसा आधारलेली असते। ताटातुटींतून अविश्वास व भय, व भयांतून हिंसावृत्ति निर्माण होते। स्वराज्य-निष्ठा म्हणजे परस्पर-निष्ठाच होय।"

पुस्तकाचा प्रारंभ काँग्रेसच्या धोरणाच्या मीमांसेपासून सुरू केला आहे; यामुळें पुस्तकांतील साऱ्या चर्चेला राजकीय स्वरूप आलें आहे व तें अिष्टच आहे। महाराष्ट्रांत नेहमींच राजकीय चर्चा चालत असते। त्या चर्चेंतील मुद्द्यांनाच येथें अुत्तरें दिलीं गेलीं आहेत। त्यांतूनच अहिंसेची सर्व मीमांसा ग्रंथकारांनीं विस्तारलेली आहे। आजकाल महाराष्ट्रांत आणि इतर प्रान्तांत रचनात्मक कार्यक्रमाचीं शिबिरें चालत असतात तेथें अध्ययन करण्यासाठीं आप्पासाहेबांचा हा ग्रंथ पाठ्यपुस्तक म्हणून पुष्कळ वर्षेंपर्यंत वापरला जाणार यांत शंका नाहीं। प्रांजल मराठी शैलीचा नमूना म्हणून देखील हें पुस्तक सर्वत्र वापरलें गेलें पाहिजे।

अहिंसक समाज-रचनेची जेव्हां जेव्हां गोष्ट होते तेव्हां तेव्हां समाज-सत्तावादी स्वतःचे सिद्धान्त पुढें करून कधीं अहिंसेविषयीं शंका उठवतात, कधीं कधीं वर्ग-कलहाचे तत्त्वज्ञान सार्वभौम असल्याचा निर्वाळा देतात। संपत्तीच्या वांटणीचा प्रश्न अुठवून अपरिग्रहाची आणि विश्वस्तपणाची हेटाळणी करतात। त्या सर्वांच्या या नव्या हल्ल्याला अुत्तरादाखल अेक निराळेंच पुस्तक लिहिलें पाहिजे। सशस्त्र प्रतिकार आणि निःशस्त्र प्रतिकार अेवढींच दुपक्षी चर्चा ज्या वेळीं चालत असे, त्या काळचा सर्व वादविवाद प्रस्तुत ग्रंथांत संक्षेपानें आणि मुद्देसूदपणें आला आहे। पण आज हिंदुस्थानची राजकीय भूमिका बदलली आहे। जगांतील अितर देशांप्रमाणें येथें हि समाजसत्तेचें वातावरण हळूंहळूं मूळ धरूं लागलें आहे।

समाजसत्तेच्या विरुद्ध 'ट्रस्टीशिप'ची भूमिका मांडली जाते। गांधीजींनीं या 'ट्रस्टीशिप'ला व्यापक स्वरूप देअून तिचा पुरस्कार केला, पण जगांतील भांडवलशाही, साम्राज्यशाही आणि नोकरशाही या वरील 'ट्रस्टीशिप'च्या कल्पनेला कोठेंच थारा देअीनात। थोड्या लोकांचें हृदय-परिवर्तन होणें शक्य आहे, स्वाभाविक आहे। सर्वच समाजाचें हृदय-परिवर्तन करणें कठिण असलें तरी अशक्य नाहीं। पण समाज म्हणतो कीं मूठभर भांडवलवाल्यांच्या भलेपणावर आम्हीं विसंबून काय म्हणून रहावें ! समजा, सर्व भांडवलवाल्यांच्या हृदयाचें परिवर्तन झालें तरी समाजसत्ता स्थापण्याच्या अैवजीं आज आहे तसलीच समाज व्यवस्था कायम ठेवणेंच बरें, असें म्हणण्याअितकें आजच्या व्यवस्थेंत कांहीं खास फायदे आहेत का ?

समाजसत्तेच्या भूमिकेवरून देखील 'अहिंसा आणि सत्य'-मूलक समाज-व्यवस्था चालवतां येअील किंवा नाहीं ?

अशा लोकांना सामान्य जनसमाज विचारतो "समाजसत्ता स्थापन झाल्यास समाजांत कोणकोणच्या अडचणी अुत्पन्न होतील याची आम्हांला प्रथम कल्पना द्या। तुमच्या समाजसत्तावादी राज्यव्यवस्थेंत व्यक्ति-स्वातंत्र्याला अवकाश असेल किंवा नाहीं ? तुमच्या समाज-व्यवस्थेंत लग्न-संस्था आणि परस्पर-निष्ठा या टिकणार आहेत किंवा नाहींत ?"

अहिंसावादी म्हणतो—"मनुष्य आत्मिकरीत्या स्वतंत्र असणें च अिष्ट आहे। 'हें विश्वचि माझें घर, अैसी जयाची मति स्थिर, किंबहुना चराचर, आपण चि जाला' अशा भूमिकेवर पोहोंचलेल्या आध्यात्मिक जीवनांत 'व्यक्तिवाद का समाजवाद' असें द्वैत च अुरत नाहीं। धनशक्ति आणि जनशक्ति या समाजनियंत्रित असोत, आत्मशक्ति मात्र, नेहमीं अ-नियंत्रित च, स्व-नियंत्रित च, असणार"।

आजचें जग म्हणतें - "तुमचा आत्म-वाद, तुमचें अहिंसा-तंत्र, आणि तुमची अहिंसा-मूलक समाज-रचना आम्हांला आकर्षक वाटतात, पण आम्हांला समजत नाहींत, पटणें दूरच राहिलें ! यासाठीं तें सर्व आम्हांला आमच्या नित्य व्यवहाराच्या परिभाषेंत मांडून दाखवा। आमच्या जीवनांत आम्हांला काय काय फेरफार करावे लागतील, तें सर्व आम्हांला समजावून सांगा।"

हें सर्व आतां कोणींतरी केलें पाहिजे। यापुढें अध्यात्म-वादानें आणि अहिंसा-सिद्धान्तानें जुन्या चाकोरींतून जातां कामा नये। आजकाल लोकप्रिय होअूं पाहणाऱ्या नव्या परिभाषेंत आतां आपल्याला बोलतां आलें पाहिजे।

कांहीं लोक विचारतात कीं अहिंसा हल्लींच्या समाज रचनेंतच अुत्तम पेरतां येईल का समाजसत्ता कोठल्यांना कोठल्या रूपांत स्थापन

झाल्यानंतर तींत अहिंसेची पेरणी करणें सोंपें जाओील ? ध्येय समाजसत्तावादाचें आणि त्याचें साधन म्हणून मार्ग चोखाळावयाचा अहिंसेचा, हेंच कदाचित् आजच्या समाजाला मानवेल। याहि सर्व गोष्टींची चर्चा यापुढें झाली पाहिजे।

"सत्याग्रह व स्वराज्य" यासारखें सुंदर, मुद्देसूद आणि व्यवस्थित पुस्तक मिळाल्यामुळें आपण आग्रह कां करूं नये कीं "अहिंसक समाज आणि समाजसत्तावाद" या नांवाचें पुस्तक आप्पासाहेब यांच्याच लेखणींतून आपल्याला मिळालें पाहिजे ?

**वरधा,**
गीताजयंती, मोहर्रम
५-१२-१९४६

**काका कालेलकर**

# प्रकाशकीय

ह्या सुंदर ग्रंथाचें प्रकाशन अंगावर घेतांना आनंद तर खूप झाला, पण लवकरच आपण ‘प्रथमं बुद्धि-लक्षणम्’ गमावल्याचें आढळून आलें। हा आढळ संपाच्या वावटळीमुळें द्वितीय बुद्धि-लक्षण जें ‘आरब्धस्य अन्त-गमनम्’ तें हि दुरापास्त झालें तेव्हां च झाला। पांच महिन्यांत पहिले पांच फॉर्म मोठ्या मुश्किलीनें छापून झाले। त्यानंतर छपाई बेमुदत तहकूब झाली। वारंवार तगादा लावून हि आणि पुढें काम होत नसल्यास झालें तेवढें काम तरी परत करा अशी निर्वाणीची भाषा वापरून हि, मुद्रकांनीं देतों देतों म्हणून उदंड आश्वासनें मात्र दिलीं, काम केव्हां च दिलें नाहीं। दुसऱ्या मुद्रणालयांत काम द्यायचें तर चालू टाईप मिळेना। त्यामुळें अगतिकता ( Impasse ) निर्माण झाली। अखेर भिन्न टायपांत पुस्तक पूर्ण करण्याचा निर्णय घेतला। अप्पासाहेबांनीं थोर मनानें अनुज्ञा दिली। नागपूरहून झालें होतें तेवढें काम मिळविलें आणि वर्ध्यास तें पूर्ण केलें।

पुस्तक तर पूर्ण झालें। लेखकानें आजारी असून निवेदन तांतडीनें तयार करून पाठविलें, पण गांधीजींच्या दोन शब्दांसाठीं आणि काकासाहेबांच्या प्रस्तावनेसाठीं तें अडलें। गांधीजींनीं पूर्वबंगालमधें निर्वाण मांडलें असतांना ‘दोन शब्दा’ साठीं त्यांना तगादा लावण्याची कल्पना च करवत नव्हती। आणि काकासाहेब तर नित्य-प्रवासी ! ‘तस्मात् लोकेषु ते विद्वन् न भवेद् भ्रमतः पदम्’ असा कोण्या दक्षानें त्यांना शाप दिला, कोणास ठाऊक ! लिहायला घेतलेली प्रस्तावना त्यांनीं दिल्ली, श्रीरामपुर, शिलांग करून च लिहिली आणि लगेंच पुन्हां मुंबई-मद्रासकडे रवाना झाले। स्वाभाविक च त्यामुळें प्रस्तावनादिक मिळायला आणि

मुद्रांकित व्हायला यथेच्छ काळ लागला। 'तुका म्हणे येथें न चले तांतडी' हें च शेंवटीं तात्पर्य निघतें। प्रकाशकांना हा अनुभव नित्याचा असला तरी वाचकांसाठीं तो नमूदून ठेवतों।

अशा प्रकारें, अति विलंबानें कां होईना, अनेक अंतराय तरून हें प्रकाशन 'पार पडत' आहे। तें 'साजेरें करणें' दुसऱ्या आवृत्तीवर सोंपवून

न्यून तें पुरतें। अधिक तें सरतें
करूनि घेआवें हें तुमतें। विनवित असें

गोपुरी, वरधा
ख्रिसमस
१-१-१९४७

कुन्दर दिवाण

# विषयानुक्रम


| अनुक्रम | नांव | | पृष्ठें |
|---|---|---|---|
| (१) | दो शब्द | ... महात्मा गांधी | १— |
| (२) | राष्ट्रीय जीवनांतील अहिंसा | ...काकासाहेब कालेलकर | २—११ |
| (३) | प्रकाशकीय | ... ... | १२— ३ |
| (४) | विषयानुक्रम | ... ... | १४— |
| (५) | लेखकाचें निवेदन | ... ... | १— ४ |
| (६) | काँग्रेस व अहिंसा | ... ... | १—१९ |
| (७) | 'अहिंसा परमो धर्मः' | ... ... | १९—३१ |
| (८) | अहिंसेचे धागेदोरे | ... ... | ३२—७५ |
| (९) | अहिंसेची चढण | ... ... | ७६-१०७ |
| (१०) | साधक बाधक चर्चा | ... ... | १०८-११७ |
| (११) | स्वराज्याचा मार्ग : नैतिक दृष्टि | ... | ११८-१३७ |
| (१२) | स्वराज्याचा मार्ग : व्यावहारिक दृष्टि | ... | १३८-१५४ |
| (१३) | अहिंसेच्या मर्यादा | ... ... | १५५-१७८ |
| (१४) | अहिंसेचा कार्यक्रम | ... ... | १७९-२३९ |
| (१५) | अहिंसेचीं इतर क्षेत्रें | ... ... | २४०-२४८ |
| (१६) | शुद्धि-पत्रक | ... ... | १— ४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
वि: ..........
क्रमांक .......... नों: दि: ..........

# लेखकाचें निवेदन

मीं हें पुस्तक स्वेच्छेनें तर खरेंच परंतु अत्यंत संकोचानें व भीत भीत प्रसिद्धीस दिलें. यांतील विषय वादग्रस्त आहे व माझीं मतें व विधानें अगदीं वज्रलेप, न बदलणारीं, आहेत असें नाहीं. हस्त-लिखित लिहून झाल्याला आतां सुमारें अडीच वर्षें झालीं. या मुदतींत हि अनुभवानें या लिखाणांतील कांहीं विधानें बदलण्याची आवश्यकता जाणवूं लागली आहे. तथापि या बदलत्या जगामध्यें असें होत च रहाणार, असें म्हणून माझे अर्धेकच्चे हि विचार सुज्ञ वाचकांपुढें मांडण्याचें धाडस मी करीत आहें.

मुळांत मीं हे विचार स्वतःचें मन हलकें करण्यासाठीं लिहून काढले, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मी कबूल करतों, कीं ऑगस्ट '४२ च्या प्रचंड उठावणीला सुरवातीपासूनच जें कांहीं अंशीं गुप्ततेचें व कपटाचें वळण मिळालें, व त्या पायीं त्या तेजस्वी चळवळीची सुद्धां जी तेवढ्या प्रमाणांत कुचंबणा झाली, ती पाहून माझ्या मनाला फार क्लेश झाले. मी बावरल्यासारखा झालों. त्यांतून मी अद्याप हि पूर्ण मुक्त झालेला नाहीं. या मनःस्थितींत '४४ सालच्या एप्रिल ते जून मध्यें हिंडलग्याच्या तुरुंगामध्यें मीं हें लिखाण केलें. अवचित सुटका झाल्यानें अपुरा राहिलेला कांहीं भाग बाहेर आल्यानंतर कसाबसा पुरा केला.

माझ्या विनंतीवरून अनेक सन्मान्य मित्रांनीं हस्त-लिखित वाचून काढलें व कित्येक मूल्यवान् सूचना केल्या. त्या सूचनांचा मीं उपयोग हि केला. कित्येक मित्रांच्या अभिप्रायांचा मात्र माझेवर कांहीं परिणाम झाला नाहीं.

कांहीं म्हणाले, "तुमचें विवेचन एरवीं ठीक आहे, परंतु सत्याग्रहाच्या मार्गानें स्वराज्य कसें मिळणार त्याची खात्री पटविणारें नाहीं."

मी हें जाणूनच होतों. माझ्या स्वतःच्या लेखणीची निर्बलता तर खरीच परंतु मला वाटतें हिंसे-अहिंसेसारखे मूलभूत प्रश्न केवळ युक्तिवादानें सुटणारे हि नाहींत. त्यांचा उलगडा अखेरीस ज्याच्या त्याच्या स्वाभाविक प्रकृतीला अनुसरूनच घडत असतो. मात्र तशा तऱ्हेनें निपजणारी निष्ठा स्थिर व दृढ होण्यास युक्तिवादाचा उपयोग होतो. माझ्या लिखाणाचा उपयोग माझे स्वतःचे अस्पष्ट विचार स्पष्ट करण्यास झाला. सहधर्मीयांशीं सह-विचाराचें तें साधन होईल. निबंध-लेखनानें स्वतः विद्यार्थ्याला फायदा होतो तसा गुरुजनांनाहि निबंधांवरून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा अंदाज मिळतो. या माझ्या लिखाणावरून आमच्या पुढाऱ्यांना हि एका सामान्य कार्यकर्त्याची सत्याग्रहाच्या मार्गाविषयीं काय समजूत आहे, तें समजल्यानें योग्य ती उपाय-योजना करण्याचें सुचेल. भिन्न-मार्गीयांना किंवा तटस्थांनाहि भिन्न भिन्न विचारसरणींचें अंतरंग जाणून घेणें फायद्याचेंच असतें.

आणखी कांहीं मित्र म्हणाले, "तुम्हीं आपल्या लिखाणांत जागो-जाग धार्मिक व नैतिक तत्त्वांवर भर देऊन खूप विस्तार केला आहे, तें तुमचें चऱ्हाट कोण वाचणार ? त्याची कोणाला जरूर पडली आहे ? राजकीय कार्यकर्ते स्वराज्य-संपादनाचा विचार व्यावहारिक दृष्टीनें च करणार इ."

परंतु त्या बाबतींतही मी निगरगट्ट आहें. राजकारणाकडे मी पारमार्थिक दृष्टीनेंच पाहूं इच्छितों. त्याची मला लाज वाटत नाहीं. तीच खरी दृष्टि आहे या विषयीं मला तिळमात्र शंका नाहीं. विशेषतः देशाच्या स्वातंत्र्यासाठीं जेव्हां आपण परम त्यागाला तयार होतो तेव्हां आपली दृष्टि पारमार्थिक च असते—किंवा असली पाहिजे. परम त्याग हा परम अर्थाच्या प्राप्तीसाठींच करण्यांत शहाणपणा आहे. ज्यांना राजकारणांत परमार्थ आणणें मान्य नाहीं त्यांनीं "स्वातंत्र्यासाठीं मृत्यूलाहि कवटाळा"

म्हणण्यांत क्षणिक ईर्ष्या म्हणजे स्वतःची भूल तरी आहे किंवा इतरांची भुलावणी आहे.

या पुस्तकांतील लिखाणामध्यें कोणाहि व्यक्तीचा किंवा गटाचा उणेपणा काढण्याची, दोष देण्याची किंवा निंदा करण्याची यत्किंचित् हि कल्पना माझ्या मनामध्यें नाहीं. तरी हि मांडणीच्या दोषामुळें किंवा अनवधानामुळें कोणाच्या भावना दुखावण्यासारखा कांहीं मजकूर किंवा शब्द-प्रयोग या लिखाणांत राहून तर गेले नसतील, अशी मला राहून राहून धास्ती वाटते; व म्हणूनच हें लिखाण प्रसिद्ध करण्याची मला भीति वाटते. तसें कोठें झाल्यास तो माझा हेतु नाहीं, ती माझी गफलत आहे असें समजून वाचकांनीं मला क्षमा करावी.

लेखनापासून प्रसिद्धीदरम्यानच्या अडीच वर्षांत हिंदुस्थानच्या राजकारणामध्यें फारच बदल झाला आहे. संभव आहे कीं पूर्ण स्वातंत्र्यासाठीं इंग्रजाशीं लढा देण्याची अतःपर आवश्यकताच पडणार नाहीं. तसें झालें व त्या पायीं या पुस्तकाच्या प्रकाशनांतील मुख्य हेतुच विफल झाला तर ती आनंदाचीच गोष्ट आहे. अशा तऱ्हेनें मुख्य हेतु बाजूला राहिला तरी या लिखाणांतील विचारसरणी नित्याच्याहि खासगी व सार्वजनिक जीवनाला उपयोगीं पडूं शकेल.

गांधीजींनीं गेल्या २५।३० वर्षांमध्यें हिंदुस्थानला जो मार्ग दाखवून दिला व ज्या मार्गानें हिंदुस्थानानें एवढी प्रगति केली त्या मार्गाचें च या पुस्तकांत विवेचन करण्यांत आलेलें आहे. तथापि तो मार्ग जसा व ज्या प्रमाणांत मला समजला व पटला त्याप्रमाणें त्याचें येथें विवेचन केलें असल्यानें यांतील विचार माझे समजावे, गांधीजींचे नाहीं किंवा अन्य कोणाचे नाहीं. किंवा त्यांतील सार गांधीजींच्या देणगीचें

आहे व न्यूनें माझीं स्वतःचीं आहेत. या माझ्या कृतीला अन्य अधिकारी व्यक्तींची प्रस्तावना मागण्यांचा हि मला संकोचच वाटत होता म्हणून मी तो प्रश्न प्रकाशकांवर सोंपविला. त्यांनीं मागणी करतांच श्री. काकासाहेब कालेलकरांनीं माझ्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याचें लगेच मान्य केलें तें अपेक्षितच होतें. परंतु त्याउपरांत खुद गांधीजींचें या पुस्तकाला आशीर्वचन मिळालें, हा त्याचा भलताच गौरव झाला असें मला वाटत आहे.

पुस्तक लिहून झाल्यानंतर बऱ्याच काळानें छापायला देण्याच्या प्रसंगीं त्याच्या नांवाचा प्रश्न उद्भवला. प्रथम मीं "अहिंसा व स्वराज्य" नांव देऊन टाकलें. पहिलीं ऐंशीं पानें छापून निघाल्यानंतर छपाईचें काम अटकून पडलें आणि पुनः सुरू होईपर्यंत आणखीहि कित्येक महिने लोटले. मध्यंतरीं मला वाटलें कीं गांधी-प्रणीत स्वराज्य-मार्गाचें वर्णन करण्यास अहिंसेपेक्षां सत्याग्रह हाच शब्द अधिक यथार्थ आहे. अहिंसा ही तारतम्याची बाब असल्यानें तिच्यामध्यें तडजोडीला स्थान असूं शकेल परंतु असत्य किंवा कपट यांचेशीं तडजोड शक्य नाहीं. अहिंसा सत्यनिष्ठेंतून निष्पन्न होते. हा मुद्दा मूळ लिखाणांत व्हावा तितका स्पष्ट झालेला नाहीं. तरी हि—किंवा म्हणूनच—पुढील छपाईत पुस्तकाचें नांव "सत्याग्रह व स्वराज्य" असें मीं, थोडी विसंगतता पत्करूनहि, बदलून घेतलें.

या व अशा अनेक दोषांसह ही माझी कृति '४२ पूर्वींच्या तसेंच '४२ पासून ताज्या दमानें व नव्या उमेदीनें कामाला लागलेल्या असंख्य नव्या स्वराज्य-सैनिकांना अर्पण करून मी मोकळा होतों.

निसर्गोपचार-केंद्र,
पो. उरुळी, (जि. पुणें)
१५-१०-४६

**सीताराम पुरुषोत्तम**
उर्फ
**अप्पा पटवर्धन.**

मराठी ... दा. क्र. ६६८५. ६१३५

# अहिंसा आणि स्वराज्य

## कॉंग्रेस व अहिंसा

गांधीजींची अहिंसा व कॉंग्रेसची अहिंसा यांमध्यें फरक आहे, गांधींची अहिंसा ज्यास्त सूक्ष्म व संपूर्ण आहे तर कॉंग्रेसची स्थूल व नेमस्त आहे, असें कित्येकांना वाटतें. अहिंसा हें कॉंग्रेसचें धोरण आहे तर गांधीजींचा धर्म आहे, असेंही म्हटलें जातें. तरी धर्म व धोरण यांमध्यें भेद कोणता आहे तें जाणून घेणें इष्ट आहे.

**धोरण म्हणजे ?** :—" उपयुक्ततेच्या दृष्टीनें व विशिष्ट देश-काल-परिस्थितीला अनुलक्षून ठरविलेला आचरणाचा नियम " अशी धोरणाची व्याख्या करतां येईल. " ऑनेस्टी इज दि बेस्ट पॉलिसी- " प्रामाणिकपणा म्हणजे अव्वल दर्जाचा धोरणीपणाच होय—या वचना-मध्यें धार्मिक किंवा नैतिक सिद्धान्त म्हणून नव्हे, तर व्यवहारांत यश प्राप्त करण्याच्या दृष्टीनें उपयुक्त म्हणून स्वीकारलेला प्रामाणिकपणाचा नियम असाच, धोरणाचा अर्थ आहे. दुसरा एखादा मनुष्य धर्म किंवा नैतिक सिद्धान्त म्हणून सचोटी पाळील व तिचे व्यावहारिक परिणाम काय होतील याची तो पर्वा करणार नाहीं. त्याला सचोटी युक्त वाटते म्हणून तो ती पाळतो, ती उपयुक्त ही आहे कीं नाहीं हें तो पहात नाहीं. उपयुक्त होईल तर त्याला पाहिजेच आहे, आणि जें युक्त आहे तें उपयुक्तही असणारच. परंतु विशिष्ट परिस्थितींत किंवा प्रसंगीं ते उपयुक्त होणार नाहीं असें दिसलें तरी ऐहिक नुकसान सोसूनही तो सचोटीलाच चिकटून राहील, नुकसानाची पर्वा करणार नाहीं. धोरण-वाला असल्या प्रसंगीं काय करील ? त्यानें आपलें धोरण उलट सुलट दृष्टींनी पूर्ण विचार करून व निरनिराळे संभाव्य प्रसंग लक्षांत घेऊन

आंखलेलें असेल तर तोहि अशा प्रसंगीं चिरकालीन लाभाकडे नजर देऊन तात्पुरतें नुकसान पतकरील व सचोटीच्या धोरणालाच चिकटून राहील. परंतु परिस्थितीमध्यें विशेषच फरक पडला व नवीन परिस्थितीमध्यें सचोटी उपयोगाची नाहीं असें जर त्याला दिसून आलें तर तो तें सोडून देईल, हेंही शक्य आहे. किंवा सचोटीचा बहाणा करूनही तो फसवणूक सुरू करील. एकाद्या दुकानदाराला 'एकच भाव' हें धोरण व्यापाराच्या दृष्टीनें हिताचें वाटून त्यानें तें पतकरलें असेल, तसेंच तो शहाणा, दूरदर्शी व दृढसंकल्पी असेल तर तात्पुरत्या किंवा क्षुद्र फायद्याच्या आमिषाला बळि न पडतां तो 'एकच भावा'चें धोरण टिकवून धरील. तथापि इतर व्यापाऱ्यांनीं कुटिल स्पर्धा चालविल्यास किंवा अनेक गिऱ्हाईकांशीं व वारंवार उलट अनुभव येत गेल्यास तो 'एकच भावा'चें धोरण सोडून गिऱ्हाईक भेटेल त्याप्रमाणें दर बदलण्यास उद्युक्त होईल. आणि ठाम दराचें धोरण मनानें सोडून दिल्यानंतरही 'एकच भाव' ही पाटी तो पूर्ववत् तशीच आपल्या दुकानीं टांगून ठेवील. "मीं एकच भावाचें धोरण सोडून दिलें आहे" अशी तो जाहिरात तर करणार नाहींच, तर उलट आपल्या दुकानीं एकच भाव असतो असाच लोकांचा ग्रह रहावा अशी त्याची इच्छा व खटपट राहील. अशा स्थितींत 'एकच भाव' हें त्या व्यापाऱ्याचें धोरण राहिलें नसून तो त्याचा केवळ कावा होऊन राहील.

**कावा व धोरण**:—कावा व धोरण यांमध्यें फार मोठा फरक आहे. कावेबाज मनुष्याचें धोरण "व्यवहारांत सचोटी कामाची नाहीं" हेंच असतें, मात्र लबाडी सफाईनें व यशस्वी तऱ्हेनें करतां यावी म्हणून, व त्या लबाडीचाच भाग म्हणून, तो सचोटीचा बहाणा करतो. आणि तो सचोटीच्या धोरणाचा बहाणा करील त्याहूनही सचोटीच्या धर्माचा विशेषच बहाणा करील— "असत्य वचन हें

महापाप आहे, नरकाचें साधन आहे, ईश्वराचा द्रोह आहे" यासारखीं वचनेंही तो वेळोवेळीं बोलत राहील!

अशा तऱ्हेनें धोरण हें एका बाजूनें धर्म किंवा नीति यांपासून भिन्न आहे, तर दुसरे बाजूनें कावा किंवा लबाडी यांपासून तें विशेषच भिन्न आहे.

**धर्म व धोरण**:—धर्म व धोरण यांमध्यें दृष्टिभेद असला तरी विरोध नाहीं; उभयतांच्या बाह्य आचरणांमध्यें कसलाच फरक पडण्याचें कारण नाहीं. धर्म–नीतीसाठीं खरें बोलणारा व्यापारी व व्यापारांतील आपली साख वाढावी म्हणून गिऱ्हाइकांचा विश्वास संपादूं इच्छिणारा व्यापारी, हे दोघेही गिऱ्हाइकाशीं सारख्याच सचोटीनें वागतील. त्यांची दृष्टि भिन्न राहील, पण कृति एकच असेल. सचोटी हा धर्म असो किंवा 'दूरदृष्टि स्वार्थ' असो. प्रत्यक्ष आचरणांत त्यामुळें फरक पडत नाहीं. धर्म म्हणजे तरी दूरदृष्टि स्वार्थच आहे. एक सुभाषित आहे:—

धर्मं चरत माधर्मं सत्यं वदत मानृतम् ।
दूरं पश्यत माह्रस्वं परं पश्यत मापरम् ॥

धर्मानें वागा, अधर्म आचरूं नका. सत्य बोला, असत्य बोलूं नका. दूरवर दृष्टि पोंचवा, केवळ जवळच पाहूं नका. केवळ अलीकडेच नको, पलीकडेही पहा.

धर्म म्हणजे दूर दृष्टि, विशाल दृष्टि, अधर्म म्हणजे संकुचित दृष्टि. धर्म म्हणजे शहाणपणा, अधर्म म्हणजे वेडेपणा. धर्म म्हणजे धीर, अधर्म म्हणजे उतावीळ. धर्म म्हणजे मोठेपणा, अधर्म म्हणजे लघुपणा. धर्म म्हणजे उदारता, अधर्म म्हणजे कृपणता. धर्म म्हणजे दृढसंकल्प, अधर्म म्हणजे संकल्प-शिथिलता. धर्म म्हणजे स्थैर्य,

अधर्म म्हणजे चंचलता. धर्म म्हणजे संग्रह, अधर्म म्हणजे उधळपट्टी असाच हा धर्म-अधर्म, नीति-अनीति यांमधील फरक आहे. अनीति = अज्ञान असें समीकरणच सॉक्रेटिसानें प्रतिपादिलें आहे. परमार्थ म्हणजे तरी परम अर्थ, अर्थात् खराखुरा किंवा पुरा स्वार्थच होय.

असें असलें तरी धर्म व धोरण यांत फरक रहातोच. धर्माचें क्षेत्र समग्र जीवन हें आहे. धर्म साऱ्या जीवनाचा साकल्यानें व अंतिम मूल्यांच्या दृष्टीनें विचार करतो. धोरणाची दृष्टि विशिष्ट उद्दिष्टापुरती असते. धर्म युक्तता पहातो, धोरण उपयुक्तता पहातें. धर्माच्या प्रेरणा अनिवार्य व फलनिरपेक्ष असतात, धोरणाच्या प्रेरणा "अमुक फळ साधायचें असेल तर असा वाग" अशा प्रकारच्या सशर्त असतात. धर्म पारलौकिक आहे, तर धोरण ऐहिक आहे. (येथें 'पारलौकिक' शब्द आम्ही "स्वर्ग किंवा नरक यांसारख्या काल्पनिक परलोकांतील सुखदुःखांचा हिशेब करणार" या अर्थानें वापरला नसून "स्थूल इंद्रियगोचर सृष्टीपलीकडे बुद्धिगम्य अशीं अंतिम मूल्यें आहेत या जाणिवेवर आधारलेला" अशा अर्थानें वापरला आहे. या जन्मींच्या कृत्यांचें बरेंवाईट फळ मृत्यूनंतर स्वर्गांत किंवा नरकांत भोगावें लागतें या हिशेबानें केलेलें सदाचरण हें धर्ममूलक म्हणण्यापेक्षां धोरणमूलक म्हणणेंच रास्त होईल.) धर्म आत्मसंतुष्ट असतो तर धोरण हिशेबी असते. धर्म अविचल आहे तर धोरण चंचल नसलें तरी चल आहे. धोरण केव्हां-ना-केव्हां बदलण्याची शक्यता असते, तसेंच तें विशिष्ट परिस्थितीला अनुलक्षून व विशिष्ट स्थल-कालांपुरतें असतें. धोरणी व्यापारी आपल्या एका दुकानीं 'एकच भाव' ठेवील तर दुसऱ्या दुकानीं किंवा कारखान्यांत भिन्न धोरण ठेवूं शकेल. किंवा कांहीं कालानें तो एकच भावाचें धोरण अजीबात सोडूनही देईल.

**काँग्रेसचें धोरण?**:—काँग्रेसचें अहिंसेचें धोरण व गांधीजींचा अहिंसा धर्म यांतील फरक दाखविण्यासाठीं आपण व्यापाऱ्याचा दृष्टान्त घेतला होता त्याचा एवढा वेळ ऊहापोह झाला. आतां आपण मुख्य विषयाकडे वळूंया. परंतु येथें अगोदर असा प्रश्न उद्भवतो कीं गांधींची दृष्टि धार्मिक व काँग्रेसची धोरणी असा फरक करण्यास मुळांत आधार तरी काय आहे?

काँग्रेसच्या घटनेचें पहिलें कलम मूळ इंग्रजींत "दि ऑब्जेक्ट ऑफ् दि इंडियन नॅशनल काँग्रेस् इज् दि अटेनमेंट ऑफ् पूर्ण स्वराज्य (कंप्लीट इंडिपेंडन्स्) बाय दि पीपल ऑफ् इंडिया बाय् ऑल लेजिटिमेट अँड पीसफुल मीन्स्" म्हणजे "सर्व उचित व शांततेच्या उपायांनीं हिंदुस्थानाच्या लोकांनीं पूर्ण स्वराज्य (संपूर्ण स्वातंत्र्य) संपादणें हें हिंदी राष्ट्रीय सभेचें उद्दिष्ट आहे" असें आहे. यावरून कित्येकांचें म्हणणें पडतें कीं पूर्ण स्वराज्य हें काँग्रेसचें साध्य आहे व उचित व शांतिमय उपाय हें केवळ साधन आहे. साध्य प्रमाणांत अविचल आहे, साधनें सोईनुसार बदलण्यास हरकत नसते. अर्थात् शांतिमय उपाय हें काँग्रेसचें धोरण आहे, ध्येय नव्हे. परंतु घटनेंतील शब्दांमध्यें या भाष्याला स्पष्ट आधार नाहीं. त्या ऐवजीं "उचित व शांततेच्या मार्गांनीं मिळणारें स्वराज्य" अर्थात् साधन-विशिष्ट साध्य हेंच काँग्रेसचें उद्दिष्ट कां समजूं नये? वरील भाष्यामध्यें साध्य व साधन हीं एकमेकांपासून अलग ठेवितां येतात व एकच साध्य साधकाच्या मर्जीनुसार निरनिराळ्या साधनांनीं मिळविणें शक्य आहे अशी कल्पना आहे, परंतु ती सयुक्तिक नाहीं.

**साध्य व साधन**:—विद्यार्थ्याला एखादें पाठ्यपुस्तक पाहिजे असेल तर तें साध्य तो भीक, उसनवारी, खरेदी व चोरी या भिन्न साधनांनीं प्राप्त करूं शकेल; व कोणत्याही मार्गानें मिळविलेलें पुस्तक

त्याच्या अभ्यासाला सारखेंच उपयोगी होऊं शकेल, हेंही खरें आहे. परंतु त्याच्या शिक्षणाला सारखेंच उपयोगी होईल असें मात्र नाहीं. आणि त्याच्या भावी जीवनाला तर ते भिन्न मार्ग भिन्न भिन्न दिशा लावून देतील हें उघड आहे. खरोखरी विद्यार्थ्याचें उद्दिष्ट 'पुस्तक' एवढेंच नसून "अभ्यासासाठीं पुस्तक, शिक्षणासाठीं अभ्यास, जीवन-साफल्यासाठीं शिक्षण" असें आहे. मी जेव्हां 'नारायण' अशी हांक मारतों तेव्हां मला त्या नांवाचा कोणीही इसम आल्यास चालेल अशी स्थिति नसते. मला 'नारायण महादेव,' 'नारायण महादेव देसाई' व तोही रहाणार शिरगांव, ता. खेड, हा खेड तालुकाही पुणें जिल्ह्यांतील नव्हे तर रत्नागिरी जिल्ह्यांतील इत्यादि गुणविशिष्ट नारायणच पाहिजे असतो. त्याचप्रमाणें केवळ स्वराज्यानें आमचें भागण्यासारखें नाहीं. त्या स्वराज्याचा पूर्ण बोध होण्यासाठीं 'नारायणाच्या' बापाचा नामोच्चार करावा लागला त्याप्रमाणें स्वराज्याच्या पूर्व पिढीचा नाहीं तरी स्वराज्याच्या संततीचा—हिंदी भांडवलशाही, साम्राज्यशाही व लष्करशाही कीं लोकशाही, समाजवाद व विश्वबंधुत्व त्याचा नामोच्चार करावा लागेल, व तसा तो केला म्हणजे त्या स्वराज्याच्या जनकाचा अर्थात् साधनाचाही सहजींच निश्चय होतो. साध्याचा साकल्यानें विचार केला म्हणजे मग एकाच साध्याचीं अनेक साधनें शक्य रहाणार नाहीं. उचित व शांततेच्या उपायांनीं सिद्ध होणारें स्वराज्य व वाटेल त्या व अनुचित, शांतीच्या वा शस्त्राच्या, मार्गांनीं मिळणारें स्वराज्य हीं स्वरूपतः भिन्नच असणार. एवढ्यासाठींच काँग्रेसनें 'उचित व शांततेच्या मार्गांनीं स्वराज्य मिळविणें' असें साधन-विशिष्ट साध्यच स्वीकारलें असल्यास त्यांत वावगें असें कांहींच नाहीं.

परंतु खुद्द काँग्रेसनें आपलीं साध्य व साधनें वेगवेगळीं पाडून सांगितलेलीं नाहींत, तसेंच तीं साधनें युक्ततेच्या दृष्टीनें पसंत केलीं

कीं उपयुक्ततेच्या, व त्या साधनांचें बंधन कोणत्या परिस्थितीपुरतें किंवा किती अवधीपर्यंत पाळण्याचा इरादा आहे इत्यादि गोष्टींचा अधिकृत खुलासा केलेला नाहीं. त्यामुळें प्रत्येकाला आपापल्या समजुती-प्रमाणें किंवा इच्छेनुसार भाष्य किंवा ओढाताण करतां येते.

भिन्न दृष्टि:—एक म्हणेल, राष्ट्राचें स्वातंत्र्य हें तरी नागरिकाच्या आत्मस्वातंत्र्याचें, मोक्षाचें किंवा परमार्थ-प्राप्तीचें साधन म्हणून इष्ट आहे. स्वराज्यप्राप्ति आत्मप्राप्तीला सहायक व्हायला पाहिजे असेल तर ती शुद्ध, सात्त्विक साधनांनींच साधली पाहिजे. काँग्रेस-घटनेच्या पहिल्या कलमाचा हाच आशय आहे कीं, 'न पापे प्रतिपापः स्यात्.' (२) शिवाय सत्य-अहिंसेच्या पालनाखेरीज जशी आत्मप्राप्ति नाहीं तसेंच खरें व टिकाऊ स्वराज्यही शक्य नाहीं. निर्बल राष्ट्रें व जगांतील साऱ्या राष्ट्रांतील सर्व-सामान्य जनता यांचा जागतिक शांततेच्या प्रस्थापनेखेरीज तरणोपाय नाहीं. भावी स्वतंत्र हिंदुस्थान या जागतिक शांततेचा पुरस्कर्ता व तिच्या स्थापनेंतील अग्रेसर व्हावयाचा असेल तर त्यानें स्वतःचें स्वराज्यही शांततेच्या उपायांनींच प्राप्त केलें पाहिजे. (३) शिवाय हिंदुस्थानासारख्या खंडतुल्य देशावर इंग्लंडसारख्या छोट्या बेटांतील लोक दूरवरून येऊन राज्य चालवूं शकतात तें सर्वस्वीं आम्हा हिंदी लोकांच्या सहकार्यामुळेंच आहे. किंबहुना आम्हीं हें इंग्रजी राज्य जणूं बोलाविलें, वाढविलें, चालविलें व आजही चालवीत आहों. अशा स्थितींत इंग्रजांना दोष देण्यापेक्षां आपण स्वतःचेच दोष सुधारण्याची प्रथम आवश्यकता आहे. आम्ही आपले दोष सुधारले कीं परकी सत्ता आपसुक गळून पडेल.

दुसरा म्हणेल:—काँग्रेस ही राजकीय संस्था आहे. ती धर्म, नीति, अध्यात्म इत्यादि कांहीं ओळखीत नाहीं, किंवा निदान त्यांपासून अलिप्त रहाते. निर्भेळ स्वराज्य हें तिचें उद्दिष्ट आहे.

स्वतंत्र हिंदुस्थान आक्रामक वृत्ति न धरतां जागतिक शांततेसाठींच झटेल. स्वतंत्रता व लोकशाही यांच्या अभिवृद्धीसाठींही सरळ व शांततेचे मार्गच योग्य असतात. म्हणून काँग्रेसनें तशाच मार्गांनीं स्वराज्यासाठीं झटण्याचें ठरविलें आहे. स्वराज्यप्राप्ती नंतर हिंदुस्थानाचें वळण जागतिक शांति व सलोखा यांकडेच असले तरी त्याला स्वतःचें लष्कर ठेवावेंच लागेल व परक्यांच्या आक्रमणाचा सशस्त्र प्रतिकारही करावा लागेल. परंतु सध्यांचें इंग्रजी राज्य हें सुप्रतिष्ठित (कॉन्स्टिटयूटेड) राज्य आहे, आमच्याच खुषी-नाखुषीच्या सहकार्यानें चालत आलेलें आहे. परकी आक्रामकाला जो न्याय लागू पडेल तो सुप्रतिष्ठित सरकाराला लागू करणें उचित नाहीं. आज सुद्धां, आम्ही इंग्रजांचे अंकित असतांना, जपानसारख्या परक्याचें हिंदुस्थानावर आक्रमण होईल तर आम्ही त्याचा, हातीं लागतील त्या शस्त्रांनीं व साधतील त्या, डावपेंचांनीं प्रतिकार करूं; पण चालू सरकारचा सशस्त्र प्रतिकार अशक्यच नव्हे तर अनुचितही आहे. म्हणून काँग्रेस स्वराज्य संपादनार्थ शस्त्रबलाचा आश्रय करूं इच्छीत नाहीं.

तिसरा म्हणेलः—इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानावर प्रस्थापित झालें तें त्यांचें पाशवी बल व त्याचे जोडीला कुटिल कारस्थानें यांचे जोरावरच प्रस्थापित झालें, व आज मितीपर्यंत त्याच गोष्टींच्या आधारें चालू आहे. आमचें सहकार्य हें, पिस्तूल रोखून किंवा चरितार्थाचे अन्य मार्ग रोकून मिळविलेलें आहे. तें गुलामांचें सहकार्य आहे, तें खरें ऐच्छिक सहकार्य नव्हे, तो सरळ जुलूमच आहे. जुलमी सत्तेचा प्रतिकार शस्त्रानें करण्यांत कांहीं अनुचित नाहीं. तसें करण्याचा आम्हांला पूर्ण हक्क आहे. तथापि इंग्रजांचा शस्त्रानें सामना करण्याचें सामर्थ्य आमच्यांत नाहीं व आम्ही पारतंत्र्यांत

असतांना तेवढें सामर्थ्य कधींकाळींही कमाविणें आम्हांला शक्य होणार नाहीं. सत्ताधीश जुलमी सरकार हें शस्त्रबलाच्या चढाओढींत आपल्या दलित प्रजेपेक्षां केव्हांही भारीच असणार. अलीकडच्या शास्त्रीय प्रगतीच्या जमान्यांत तर उभयपक्षांच्या बलाबलांतील ही विषमता अधिकाधिक तीव्रच होत जाणार आहे. अशा स्थितींत दलित प्रजेला शस्त्रमार्गानें बंड करून आपली मुक्तता करून घेण्याची आशाच करायला नको. म्हणून आपण आपली संघटना व बलवृद्धि निराळ्या मार्गानेंच केली पाहिजे. आपापसांत एकजूट व परक्याशीं असहकार व त्याच्या जुलमाचा अहिंसक प्रतिकार हेंच आपलें शक्तिस्थान होय. म्हणून काँग्रेसनें शांततेचा मार्ग विचारपूर्वकच पतकरला आहे.

चौथा म्हणेलः—आम्ही निःशस्त्र असलों तरी आमच्यांत संघटना व एकजूट होईल व त्यागाची तयारी असेल तर आमच्या हिणकस शस्त्रांनिशींही आम्ही शत्रूचा धुव्वा उडवून देऊं शकूं. शस्त्रबलापेक्षां मनुष्यबल–संख्याबळ, एकजूट, दृढनिश्चय, कळकळ, त्यागाची तयारी हीं केव्हांही श्रेष्ठ आहेत. "रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें?"–आजवर अनेक परतंत्र व सकृद्दर्शनीं निर्बल अशा राष्ट्रांनीं सशस्त्र बंडें करूनच आपापलें गमाविलेलें स्वातंत्र्य कमाविलेलें आहे. आपल्याला तेंच केलें पाहिजे, करतां येईल व योग्यवेळीं आपण तें करूंही. परंतु पूर्ण तयारीखेरीज बंड पुकारणें शहाणपणाचें नसतें. पूर्व तयारी ही निमूटपणेंच करावयाची असते. ती तयारी होईपर्यंत काँग्रेसनें स्वीकारलेलें शांततेचें धोरण व चालविलेले सत्याग्रहाचे लुटूपुटूचे लढे हेच समयोचित आहेत. युद्धामध्यें साम, दाम, दंड, भेद इत्यादि सारे उपाय परिस्थितीनुसार योजावे लागतात. तशी वेळ येईल तेव्हां काँग्रेसही पुढें पाऊल टाकील

कदाचित् पांचवाही कोणी म्हणूं शकेल:—शांततेचें धोरण सोडून पुढें पाऊल टाकण्याची संधि येईल त्यावेळीं काँग्रेसला अधिवेशन भरवून व चर्चा करून नवीन ठराव करण्याची शक्यताच रहाणार नाहीं. म्हणून समयज्ञ काँग्रेसजनांनीं योग्य प्रसंगीं काँग्रेसच्या सध्यांच्या मर्यादांचें उल्लंघन स्वतःच्या बुद्धीनें व जबाबदारीनें करण्यास हरकत नाहीं. त्यांची फत्ते झाल्यास काँग्रेसही त्यांचा जयजयकार करील. त्यांचा डाव फसला तर ते कदाचित् काँग्रेस-द्रोहीही ठरविले जातील. परंतु स्वतः त्यांनीं त्याची खंत मानण्याचें कारण नाहीं.

आतांपर्यंत काँग्रेसच्या धोरणाबाबतच्या ज्या पांच भिन्न भिन्न दृष्टि सांगितल्या त्यांपैकीं पहिली साधारणपणें गांधीजी, खान अबदुल-गफारखान व काँग्रेस वर्किंग कमिटीचे राजेंद्रबाबू, प्रफुल्लचंद्र घोष, शंकरराव देव यांसारख्या पुढाऱ्यांची आहे. दुसरी भूमिका ही पं. जवाहरलाल, मौलाना आझाद प्रभृतींची आहे; तिसरी काँग्रेस सोशलिस्टांसारख्यांची असावी. या तिन्ही गटांचें अहिंसेनेंच स्वराज्यार्थ शेंवटपर्यंत झटण्याबाबत एकमत आहे. व तेंच काँग्रेसचें कायम धोरण समजलें पाहिजे. काँग्रेसनें आपण पुढेंही कधींकाळीं अहिंसेचें धोरण सोडून देणार नाहीं असा निर्धार जरी जाहीर केलेला नसला, तरी तो तसा जाहीर करण्याचें प्रयोजन नाहीं; किंबहुना तसें करणें अप्रयोजकपणाचें होईल. काँग्रेस कधींकाळीं आपलें मूलभूत धोरण बदलील अशी शंका घेण्याचें कारणच काय?

आणि समजा काँग्रेसनें आपलें अहिंसेचें धोरण अटल आहे असें जाहीर केलें, तरी तो ठराव काँग्रेसच्या भावी अधिवेशनांवर बंधनकारक कसा होणार? कांहीं वर्षांनंतर काँग्रेसनें बहुमतानें आपलें धोरण बदलण्याचें ठरविलें, किंबहुना पूर्ण स्वराज्याऐवजीं वसाहतीचें स्वराज्यच पसंत केलें, तर त्यावेळच्या बहुमताला आजचा ठराव तरी कसा बांधूं शकेल?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 2/180 दि: 1/2/9/5
क्रमांक ... नों. दि.

चौथ्या व पांचव्या भूमिकांवरील इसम खरे कॉंग्रेसनिष्ठ नव्हेतच; तरीही त्यांना कॉंग्रेसचे सभासद होण्यास नियमानें बंदी करतां यावयाची नाहीं. अनुभवानें, संगतीनें व सरावानें त्यांचाही अहिंसेच्या धोरणावरील विश्वास दृढ होईल अशी उमेद बाळगण्यास हरकत नाहीं.

पहिल्या तीन वर्गांची अहिंसेच्या धोरणामागील दृष्टि भिन्न भिन्न असली, तरी कार्यक्रमाबाबत त्या तिघांहीमध्यें कामचलाऊ एकमत रहाण्यास अडचण पडणार नाहीं. आम्ही कामचलाऊच म्हणतों, कारण दृष्टिभेद आहे. तेथें कार्यक्रमाबाबतही तारतम्यभेद उद्‌भवणें असंभवनीय नाहीं. वृत्तीची छाप कृतीवर पडल्याविना रहात नाहीं: "हृदयीं भरला भाव। ओसंडेचि करांतुनी"॥ तथापि असली भिन्नता परस्परपूरक होऊं शकेल. पहिल्या पक्षाला अहिंसावादाची जन्म-दात्री आई म्हणतां येईल. दुसरा पक्ष हा अहिंसा-बाळाच्या मावशी-प्रमाणें आहे, तर तिसरा त्या बाळाच्या कर्तव्य-तत्पर दाईप्रमाणें आहे. तिन्ही पक्षांच्या जिव्हाळ्यामध्यें फरक पडला, तरी बाळाच्या संगोपना-बाबत तिहींमध्यें विरोध उद्‌भवत नाहीं, तर एकमेकांस मदतच होते.

पहिल्या पक्षाची अहिंसा धर्म-मूलक, दुसऱ्याची राजनीति मूलक, तर तिसऱ्याची युद्धनीति-मूलक आहे.

**मुद्द्याचा प्रश्नः**— गांधीजींचा स्वराज्योत्तर परराष्ट्रीय राजकारणा-मध्येंही अहिंसा चालविण्याचा संकल्प आहे तर जवाहरलालची फक्त इच्छा आहे असा दोहोंमध्यें फरक असला, तरी त्या फरकामध्यें तूर्त तरी बाऊ करण्यासारखें कांहींच नाहीं. गांधीजींची अहिंसा जीवनव्यापी असली तरी अमर्याद नाहीं; तिलाही अनेक मर्यादा आहेत. जीवनाच्या हरेक क्षेत्रांत अहिंसा अधिकाधिक प्रमाणांत आचरण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असला, तरी तूर्त तिचा संपूर्ण अंमल त्यांना अभिप्रेत नाहीं व

शक्यही नाहीं. त्यांच्या स्वराज्यामध्यें पोलीस, मॅजिस्ट्रेट, पीनलकोड, तुरुंग इत्यादि रहाणारच आहेत. तें कसेंही असलें तरी स्वराज्यप्राप्ती-पुरता तरी गांधीजी व इतर काँग्रेसजन यांच्या अहिंसेमध्यें कोणताच फरक पडण्याचें कारण नाहीं. धर्मनीति, राजनीति किंवा युद्धनीति यांपैकीं कोणत्याही भूमिकेवरून कां होईना पण स्वराज्य संपादनार्थ हिंसा वर्ज्य आहे, हें ज्यांना मान्य आहे त्यांच्या राजकीय कार्यक्रमांमध्यें एकरूपता असली पाहिजे. आज सर्व काँग्रेसजनांच्या कार्य-पद्धतीमध्यें एकरूपता आढळत नसली, तर त्यास त्यांच्या मूळ भूमिकांमधील फरक कारण नसून अहिंसेचा निर्णयच सर्वांचा सारखा ठाम नाहीं, हेंच खरें कारण आहे. अहिंसा तुम्ही धर्म म्हणून स्वीकारतां कीं धोरण म्हणून हा मुद्द्याचा प्रश्न नसून तुम्ही ती स्वीकारतांच कीं नाहीं, किंवा मना-पासून स्वीकारतां कीं चालढकलीच्या वृत्तीनें स्वीकारतां, हा मुख्य प्रश्न आहे. त्या बाबतींत प्रत्येक भूमिकेवराल लोकांमध्यें मतभेद असूं शकेल. धर्माच्या भूमिकेवरून तरी प्रत्येकाला अहिंसाच पटेल असें थोडेंच आहे ? सेनापति बापट सुद्धां गांधीजीप्रमाणें अत्यंत धार्मिक वृत्तीचे असून भंगीकाम सुद्धां ते धार्मिक भावनेनेंच करतात. हरेक व्यवहारांत त्यांना 'श्रीहरी' कडूनच प्रेरणा मिळते; परंतु त्यांना गांधी-जींची अहिंसा हें मोहावरणसें वाटतें. अनेक दहशतवादी हुतात्मेही अत्यंत धर्मनिष्ठ होते. अहिंसेच्या निर्णयावर तुम्ही धर्माच्या, राजकार-णाच्या कीं युद्ध–शास्त्राच्या भूमिकेवरून आलां, हा मुळींच महत्त्वाचा प्रश्न नाहीं. खरा प्रश्न हा आहे कीं अहिंसेची युक्तता, उपयुक्तता, अपरि-हार्यता, कांहीं म्हणा, तुम्हांला पुरी पटली आहे का ? या बाबतींत पुष्कळांच्या बुद्धीचा अद्याप ठाम निश्चय झालेला नाहीं, म्हणूनच आमच्या प्रयत्नांमध्यें एकाग्रता येत नाहीं, व म्हणूनच ते प्रयत्न यशस्वी होत नाहींत.

**शांतिमय कीं अहिंसक ?**—काँग्रेसच्या उद्देशामध्यें 'शांतिमय (पीसफुल) उपाय' असा शब्द आहे. परन्तु आतांपर्यंत आम्ही शांतिमय, अहिंसक, अनत्याचारी इत्यादि शब्द सरमिसळ व एकाच अर्थानें वापरीत आहों. कित्येकांचे मतें शांतिमय व अहिंसक (नान् व्हायोलंट्) यांमध्यें फरक आहे. त्यांचें म्हणणें असें कीं शांतिमय हा साधा, सोपा, स्थूल असा भाव आहे तर अहिंसक हा अवघड, गहन व आंतरिक असा भाव आहे. शांतिमय हें बाह्य कृतीचें विशेषण आहे, तर अहिंसक हें मनोवृत्तीचें विशेषण आहे. उदाहरणार्थ, प्रतिपक्षावर फौजदारी खटला गुदरून त्याचें पारिपत्य करविणें शांतिमय असेल, परंतु अहिंसक नाहीं. याच्या उलट इतरांचें कांहींचें म्हणणें पडतें कीं काँग्रेसनें आजवर केलेल्या चळवळी अहिंसक म्हणतां येतील, परंतु शांतिमय म्हणतां येणार नाहींत, सबब अहिंसक हाच शब्द अधिक समर्पक आहे. त्यांचे मतें 'शांतिमय' कार्यक्रम हे अधिक सौम्य व लोकरूढीस धरून असावे लागतात. 'शांति' शब्दानें क्रांति व धामधूम किंवा उलथापालथ यांचा निषेध दर्शविला जातो, परंतु अहिंसक उपाय हे प्रेमप्रेरित असले तरी क्रांतिकारक व धामधुमीचे असूं शकतील. १९३० सालचे मिठागरांवरील हल्ले किंवा मद्यबंदीसाठीं शिंदीच्या झाडांची तोडातोड यांसारखे उत्पातकारी कार्यक्रम अहिंसक असले तरी शांतिमय म्हणतां येत नाहींत, इत्यादि.

परंतु यावरून शांतिमय व 'अहिंसक' या शब्दांमध्यें निवडच करावयाची असेल तर 'अहिंसक' शब्दच पसंत करावा लागेल. कोणत्याही कार्याचा किंवा पद्धतीचा विचार करतांना त्याच्या मागील इरादा किंवा वृत्ति हीं लक्षांत घेतल्याविना त्या कार्याचें यथार्थ आकलन होणार नाहीं. तसेंच स्वराज्यसंपादन हें एक महान् क्रांतिकार्य आहे, त्यामध्यें उलथापालथ, धामधूम, नास, नुकसान इत्यादींचें वावडें

मानून भागणार नाहीं, व गांधीजींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसनें आजवर मानलेलें नाहीं. स्वतः आम्हांला शांतिमय व अहिंसक हे शब्द समानार्थीच वाटतात, परंतु त्यांमध्यें कांहीं फरक असलाच तरी काँग्रेसच्या कार्य-पद्धतीला 'अहिंसक' शब्द लावण्यांत कसलीही ओढाताण होते असें आम्हांला वाटत नाहीं आणि काँग्रेसनेंही तसें मानलेलें नाहीं. काँग्रेसच्या घटनेमध्यें शांतिमय (पीसफुल) शब्दच असला तरी काँग्रेसच्या वेळोवेळच्या ठरावामध्यें काँग्रेसच्या चळवळीं-विषयीं 'अहिंसक' (नानूव्हायोलंट) हाच शब्द ठिकठिकाणीं वापरलेला आढळतो.

"सत्यमय व अ-हिंसक:" खुद्द गांधीजींनीं 'शांतिमय' ऐवजीं 'अहिंसक' शब्द घालण्यांत यावा अशी सूचना केली होती, परंतु काँग्रेसनें ती मान्य केली नाहीं, हेंही आम्हांस माहीत आहे. परंतु हा फेरबदल सुचविण्यांत किंवा नाकारण्यांत कांहीं मूलभूत दृष्टि-भेद होता असें आम्हांला वाटत नाहीं. १९३४ सालच्या काँग्रेस अधिवेशनांत, काँग्रेसमधून बाहेर पडण्याचे प्रसंगीं, गांधीजींनी काँग्रेस-च्या उद्देशांतील 'उचित व शांतिमय' शब्दांऐवजीं "सत्यमय (ट्रुथफुल) व अहिंसक" (नॉन्–व्हायोलेंट, शब्द घालण्याची सूचना केली होती. त्या सूचनेवर त्या अधिवेशनांत निर्णय घेतला न जातां ती प्रांतिक काँग्रेस कमिट्यांकडे अभिप्रायार्थ पाठविण्यांत आली. नंतरच्या अधिवेशनांतही ती सूचना स्वीकारण्यांत आलेली नाहीं. या प्रश्नाचा आपण येथें थोडा विचार करणें उचित होईल.

१९२० सालच्या नागपूर कांग्रेसमध्यें नवीन घटना मान्य कर-ण्यांत आली व "उचित व शांतिमय" शब्द घातले गेले ते गांधीजीं-च्या सूचनेवरूनच. तोंपर्यंत "सनदशीर उपाय" (कॉन्स्टिट्यूशनल मीन्स) असे शब्द होते. कायदेभंग हा सनदशीर उपाय म्हणतां येत

नाहीं. चालू अन्याय्य घटना मोडून त्याऐवजीं स्वराज्याची न्याय्य राज्यघटना आपल्याला स्थापित करावयाची आहे. चालू कायद्याचाच न्याय करायला आपण बसलों आहों, तर त्या कायद्याच्याच कक्षेंत राहून त्या कायद्याला गचांडी देणें शक्य नाहीं म्हणून, कांग्रेसच्या कार्यक्रमांत कायदेभंगाचा समावेश करतां यावा एवढ्यासाठींच, नवीन शब्दप्रयोग स्वीकारण्यांत आला. हा कायद्याचा न्याय कायद्याहून उच्च अशा नैतिक हक्कांच्या भूमिकेवरूनच करणें शक्य आहे म्हणून ' लेजिटिमेट ' म्हणजे ' न्याय्य ' किंवा ' उचित ' हाही शब्द शांतिमयच्या जोडीला घालण्यांत आला.

' लेजिटिमेट ' शब्दाचें भाषांतर ' न्याय्य ' शब्दानें करण्याची वहिवाट आहे, परंतु आमच्या मतें ' योग्य, उचित, रास्त ' हे शब्द ' लेजिटिमेट ' चा अर्थ दाखविण्यास अधिक योग्य आहेत. या सर्व शब्दांचा अर्थही कांहींसा संदिग्धच रहातो. न्याय्य काय व अन्याय्य काय, उचित काय व अनुचित काय, तें ज्याच्या त्याच्या दृष्टीवर अवलंबून रहाणार. ठकास उलट ठकविणें, गुंडाला झोडपणें इत्यादि कृत्यें विशिष्ट नीतिकल्पनांनुसार न्याय्य किंवा उचित ठरतील, तर कोणाला तीं अनुचित वाटतील. हे वाद टाळायचे तर ' लेजिटिमेट ' चा अर्थ ' मनःपूत ' असाच करावा लागेल. अर्थात् मग तो शब्दच निरर्थक ठरतो; घातला न घातला सारखेंच.

म्हणून गांधीजींना त्या शब्दाची अधिक फोड करणें जरूरीचें वाटलें. त्यांनीं मुळांत ' लेजिटिमेट ' शब्द सुचवला तेव्हां त्यांना ' मनःपूत ' म्हणावयाचें नव्हतें हें उघडच आहे. उलट ' लेजिटिमेट ' याचा ' कायदेशीर ' हा अर्थ तर अभिप्रेत नव्हताच. त्या वेळच्या कॅाँग्रेसनेंही तो उचित, निर्मळ, अ-कुटिल, कपट-हीन, उघडकीस आले असतां ज्यांची लाज वाटणार नाहीं, अर्थात् सत्यमय, या अर्थानेंच स्वीकारला असला पाहिजे.

एखादें कृत्य शांतिमय किंवा (अभावात्मक अर्थानें) अहिंसक असूनही अनुचित असूं शकेल: उदाहरणार्थ लांच, लबाडी, वचनभंग इत्यादि. राजनीति किंवा राजकारण यांमध्यें कुटिलतेचा आश्रय करावाच लागतो, तेथें सत्य, एकवचनीपणा इत्यादि पाळून भागणार नाहीं, हा तर पुष्कळांचा सिद्धान्तच असतो. आणि सिद्धान्त नसला तरी सरकार उलथून पाडण्यासारख्या अटीतटीच्या मामल्यांत सरळ व्यवहारानें आपलें अभीष्ट साध्य होत नाहीं असें दिसतांच कुटिल उपायांचा 'सुलभ व जवळचा' मार्ग स्वीकारण्याचा मोह स्खलनशील माणसाला पदोपदीं पडतो. कायदेभंगाच्या चळवळींतील 'सत्याग्रही' कोर्टांत बहुधा बचाव देत नाहीं, तरीही प्रसंगीं बचाव देण्याचा प्रसंग आल्यास वकिलांच्या रुळलेल्या मार्गानुसार खोटा पुरावा उभा करणें व खरा दडपून टाकणें असल्या गोष्टी करण्याचा मोह 'सत्याग्रह्यांना' सुद्धां पडतो. विशिष्ट कामें साधण्यासाठीं सरकारी नोकरांना फितविण्याकडे प्रवृत्ति होते. निवडणुकींच्या धामधुमींत तर उचित–अनुचित भेद पार पुसून जातो !

गांधीजींचा बाणा एकंदर राजकारणालाच नीतीचें अधिष्ठान देण्याचा आहे. म्हणून वरीलसारखे प्रकार वगळण्याच्या हेतूनेंच त्यांनीं 'लेजिटिमेट्' शब्द घातला व तो कॉंग्रेसनें मान्य ही केला. परंतु अनुभवानें त्या शब्दाच्या अर्थाची अधिक फोड करण्याची, म्हणजेच अधिक स्पष्ट अर्थाचा शब्द वापरण्याची, जरूरी जाणवली म्हणून १९३४ सालीं गांधीजींनीं 'लेजिटिमेट्' ऐवजीं 'ट्रुथफुल' (सत्यमय) शब्द घालण्याची सूचना केली.

आपल्या सूचनेच्या स्पष्टीकरणार्थ गांधीजी स्वतः लिहितातः—
"पहिली सूचना अशी कीं न्याय्य व शांतताप्रधान या शब्दांऐवजीं सत्यमय व अहिंसामय हे शब्द घालावेत.

"मी या विशेषणांचा मूळच्या विशेषणांऐवजीं अगदीं साहजिकपणें उपयोग करीत असें. पण त्यावर कित्येकांनीं आक्षेप घेतला. तसा आक्षेप आला नसता, तर मी ही सूचना मांडलीही नसती. आपल्या ध्येयप्राप्तीसाठीं अनत्याचार व सत्य यांची जरूरी आहे अशी काँग्रेसवाल्यांची खात्री असल्यास त्यांनीं हीं विशेषणें स्वीकारण्यास अनमान करूं नये.

—डॉ. पट्टाभींचा काँग्रेसचा इतिहास—उत्तरार्ध, प्र. ३ रें.

या उताऱ्यावरून स्वतः गांधीजी दोन्ही शब्दप्रयोगांच्या अर्थांमध्यें फरक मानीत नाहींत, किंवा 'लेजिटिमेट' म्हणतांना सत्यपूत व 'पीसफुल्' म्हणतांना अहिंसामय हेच अर्थ त्यांना अभिप्रेत होते, हें स्पष्ट होतें. आपण पूर्वीं पाहिलेंच कीं 'लेजिटिमेट्‌चा' अर्थ सत्यपूत न करतां मनःपूतच करायचा असता तर तो शब्द घालण्याचीच आवश्यकता नव्हती. तसेंच 'पीस्फुल्' पेक्षां 'नॉन्-व्हायोलंट्' नें शांतिमय वृत्तीचा अधिक बोध होत असेल तर तेंही इष्टच आहे. शांतिमय कृतीमागें शांतिमय वृत्ति असेल तरच ती खरी शांतिमय होईल. असें असतां काँग्रेसनें गांधीजींची सूचना कां अमान्य केली, तें समजत नाहीं; तसें करण्याच्या कारणांची साधार माहिती उपलभ्य नाहीं. आणि संभव आहे, कीं निरनिराळ्या लोकांनीं निरनिराळ्या कारणांस्तव ती सूचना अमान्य केली असेल.

स्वराज्य हें साध्य, तें साधेल त्या साधनांनीं हस्तगत करावें, साधनांच्या बाबतींत फाजील कांटेकोरपणा नको, अशीच बहुसंख्य काँग्रेसजनांची वृत्ति असल्यास नवल नाहीं. जुन्या शब्दांचा अर्थ संदिग्ध असेल तर त्या संदिग्धपणांतच त्यांना मोकळेपणा ी वाटला असेल, जास्त जखडलें जाणें बरें वाटलें नसेल. पुष्कळांचा स्वराज्याचा अर्थसुद्धां इंग्रजांचा कांटा काढणें एवढाच असतो. त्या स्वराज्याचें स्वरूप कसें असेल त्याचा काथ्याकूट करण्यास त्यांस सध्यां तरी फुरसत

नसते. परंतु गांधीजी स्वराज्याचेही सूक्ष्म सूक्ष्म व विलक्षण अर्थ करतात व साधनांच्या शुद्धतेवरही फार भर देतात, तो या त्वरित कार्यनिष्ठांना नकोसा होतो, किंवा अतिशयित वाटतो. शिवाय गांधीं-विषयीं सामान्य लोकांना एक प्रकारची धास्ती वाटते, हें ही खोटें नाहीं. लॉर्ड विलिंग्डन, माजी व्हाइसरॉय, यांची तक्रार होती कीं गांधी करा-रांतील शब्दांचे अकल्पित अर्थ काढून प्रतिपक्ष्याला चकवितात. तशीच निष्कारण धास्ती कॉंग्रेसमध्येंही कांहींना वाटत असल्यास नवल नाहीं.

गांधीजींनीं अहिंसा धार्मिक सिद्धान्त म्हणून स्वीकारलेली आहे, तर कॉंग्रेस ही ऐहिक व्यवहाराचे दृष्टीनेंच विचार करते त्याअर्थीं तिनें अहिंसा हें उपयुक्त धोरण म्हणून स्वीकारलेलें आहे असें मानलें, तरीही प्रस्तुत सूचनेमागील गांधीजींचा हेतु एवढाच होता कीं कॉंग्रेसनें रास्त व शांतिमय उपाय धोरण म्हणूनच कां होईना पण आस्थापूर्वक किंवा पूर्णपणें स्वीकारावे. तथापि कॉंग्रेसजनांना धास्ती वाटली कीं या शब्दांच्या फरकानें गांधी आपल्याला धर्माच्या खोल पाण्यांत तर ओढूं पहात नसतील ?

साध्या ऐहिक व्यवहारांत सुद्धां, व राजकारणांत तर विशेषच, न्याय-अन्याय, खरें-खोटें, हीन-उदात्त, स्वार्थ-निःस्वार्थ, सज्जन-दुर्जन, मान-अपमान, नीति–अनीति इत्यादि नैतिक भेद आपण पदोपदीं करीतच असतों, करावेच लागतात. तसे भेद करण्यात कांहीं विलक्षण तर नाहींच, उलट अशा भेदांखेरीज राजकारणाला कांहीं अर्थही रहात नाहीं. त्यांचेविना समाजकारणाची व राजकारणाची आवश्यकता तरी काय ?

न्याय-कोर्टांत सुद्धां आपण 'ईश्वरास' स्मरून 'खरें' बोलेन अशी 'प्रतिज्ञा' घेतों, त्याची आम्हांला अडचण वाटत नाहीं. आम्हां कॉंग्रेस-सैनिकांना तर स्वतःला 'सत्याग्रही' म्हणवून घण्यांत अभिमानही वाटतो; आपण स्वतःसाठीं श्री. सावरकरांनीं योजलेली 'प्रतिकारक' संज्ञा घेत नाहीं.

काँग्रेसजनांना स्वराज्याच्या साधनांवर कसलेंही बंधन घालून घेणें अनिष्ट वाटत असेल, तर मूळ ' उचित व शांतिमय ' शब्दही राहूं देणें योग्य नव्हतें. उलट पक्षीं धोरण म्हणून तरी त्यांचा सत्य-अहिंसेवर विश्वास असेल तर नवीन शब्द स्वीकारणें त्यांना आवश्यक वाटत नसलें तरी जाचक वाटण्याचेंही कारण नव्हतें. " जुने शब्द व नवे शब्द यांचें अर्थांत कांहीं फरक नसतां ही फेरबदलाची निष्कारण उठाठेव कशाला ? " या समजुतीनेंच त्यांनीं गांधींची सूचना नाकारली असेल, तर आमची कांहींच तक्रार नाहीं. मग फार तर आम्ही एवढेंच म्हणूं, कीं फक्त गांधीजींच्या समाधानाखातर त्यांनीं मान्यता दिली असती तर बरें झालें असतें.

परंतु अहिंसेचें धोरण, नाकारण्याइतकें अमान्य ही नव्हतें व ठामपणें मान्य ही नव्हतें हेंच खरें कारण असण्याचा संभव आहे. आणि हीच खेदाची गोष्ट आहे. ही चालढकलीची वृत्ति धोक्याची आहे. अशा धरसोडी मुळेंच

यथासांग तें कर्म कांहीं घडेना ।
घडे कर्म तें पुण्य गांठीं पडेना ॥

अशा तऱ्हेची कुचंबणा होत असते.

विचारपूर्ण नास्तिकवादामध्यें अनेक स्पृहणीय गुण असतात. विचारपूर्ण आस्तिकवाद त्याहून स्पृहणीय आहे. विचाराचा आळस करणारा वरपांगी आस्तिकवाद भयावह आहे.

ही धरसोड जाऊन ठामपणा यावा व प्रयत्नांना उत्कटता व एकाग्रता यावी एवढ्यासाठींच हा लिखाणाचा प्रयत्न, अल्पमतीनिशीं व अल्पशक्तीनिशींही करण्याचें योजिलें आहे.

## अहिंसा परमो धर्मः

**प्रश्नांचें काहूरः**—सर्पाला ठार करावा कीं नाहीं ? शेजाऱ्यानें माझा कांहीं अपराध केला तर त्याचें पारिपत्य करावें का ? मला

आवडणारी किंवा हवी असलेली वस्तु दुसऱ्याच्या ताब्यांत आहे. त्याला नकळत, व कळल्यास बळजबरीनें, मीं ती त्याचेकडून काढून घ्यावी का ? तो आडवा आल्यास त्याला ठोकावा का ? चोर, दरोडेखोर, समाजकंटक, गुन्हेगार यांना शिक्षा द्यावी कीं नाहीं ? कशी, किती द्यावी ? खुनी इसमाला फांशीं द्यावा कीं नाहीं ?

माझ्या भुकेसाठीं, किंवा स्वादासाठीं, मी पशुपक्ष्यांना मारण्यास हरकत आहे का ? कोणत्या पशुपक्षांना मारावें ?

मुलगा सांगितलेलें ऐकत नाहीं, त्याला मार द्यावा कीं नाहीं ? विद्यार्थ्याला उदाहरण परोपरीनें समजावून दिलें तरी त्याच्या डोक्यांत कांहीं केल्या उतरतच नाहीं, अशा स्थितींत त्याला बडविण्याखेरीज काय इलाज ?

मी जिच्यावर प्रेम करतों ती स्त्री माझ्यावर प्रेम करण्याचें सोडून भलत्याच पुरुषावर प्रेम करते. तिला व तिच्या प्रियकराला यमसदनाला पाठविण्यांत कांहीं गैर आहे का? पत्नी सांगितलेलें ऐकत नाहीं, तिला मार देणें प्राप्त नाहीं का ?

दारू न पिण्याचा ठराव जाहीरपणें पास झाला, मी स्वतः तेव्हांपासून दारूला शिवलोंसुद्धां नाहीं, तरीसुद्धां माझ्या शेजाऱ्याची दारू अद्याप सुटत नाहीं ! त्याच्या तोंडाला डांबर फांसावें कीं नाहीं ? मीं पांढरी टोपी वापरण्यास सुरवात केली आहे, त्या अर्थीं कोणी काळीं टोपी वापरतांना आढळला तर त्याची ती टोपी हिरावून घेऊन जाळून टाकण्याचा मला अधिकार पोंचत नाहीं का ?

उंदीर, घुशी, वानर, ससे, डुकरें, वाघ, ढेंकूण, माशा इत्यादि प्राणी आम्हां माणसांना परोपरीनें उपद्रव देतात, त्यांचा नाश करावा कीं नाहीं ?

हे व यांसारखे शेंकडों, हजारों, प्रश्न पदोपदीं आपल्यापुढें उद्भवत असतात. कांहीं इसमांपुढें कांहीं काळापुरते हे प्रश्न उद्भत नाहींत; तरी

विचार येण्यापूर्वी तात्कालिक प्रेरणेनुसार तो वागून टाकतो. पण वागून मोकळा होत नाहीं. " मीं केलें तें बरें केलें का ? " असा प्रश्न त्याचें मन त्याला विचारीत रहातें.

**मनुष्याचें वैशिष्ट्यः** आणि असे प्रश्न उद्भवतात यांतच माणसाचें श्रेष्ठत्व—किंवा वैशिष्ट्य— आहे. " या माणसानें मला पाय लावला, याला दंश करूं कीं नको? असा प्रश्न सर्पाच्या मनांत उद्भवतोसें वाटत नाहीं. झोंपलेल्या माणसाचा अंधारांत चावा घेणें नामर्दपणाचें आहे, ही शंकाही ढेंकणाला येत नाहीं. मनुष्याला मात्र न्याय व अन्याय, नीति व अनीति, योग्य व अयोग्य, श्रेय व प्रेय यांमध्यें पदोपदीं विवेक करावा लागतो. आणि जें न्यायाचें आहे, उचित आहे, तें परिणामांची पर्वा न करतां केलेंच पाहिजे अशी निःसंदिग्ध ग्वाही त्याची मनोदेवता त्याला देत असते. धर्माधर्म-विवेक व तदनुसार वर्तन ठेवण्याचा सतत प्रयत्न हेंच मानवी जीवनाचें वैशिष्ट्य आहे.

**आहार-निद्रा-भय-मैथुनं च, सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम् ।**
**धर्मो हि तेषामधिको विशेषः, धर्मेण हीनाः पशुभिः समानाः ॥**

खाणें, पिणें, झोंपणें, भय, मैथुन इत्यादि शारीरिक व्यापार यांचे बाबतींत माणसें व पशु समानच आहेत. परंतु माणसामध्यें धर्मबुद्धि आहे हें त्याचें वैशिष्ट्य होय. धर्महीन मनुष्य पशूंत जमा आहे.

" जीवो जीवस्य जीवनम् ". मोठा मासा लहान माशाला गिळतो. वाघ शेळीला व साप बेडकीला खातो. वनस्पति भूमींतील द्रव्य व हवापाणी खाऊन वाढतात. कांहीं प्राणी केवळ वनस्पति खाऊन वाढतात तर कित्येक प्राणी आपल्याहून निर्बल प्राण्यांवर जगतात. मनुष्यें सुद्धां वनस्पतींना व इतर प्राण्यांना खाऊन वाढतात. प्रथम प्रथम तर तीं इतर माणसांनाही खात असत. तरीही माणसामध्यें प्रथमावस्थेपासूनच खाद्याखाद्य-विवेक व तोही केवळ आवडीनावडी-

मुळेंच नव्हे तर न्यायान्यायाच्या जाणीवेनें—उत्पन्न झाला व तो कांहीं काळ, कांहीं ठिकाणीं कमीअधिक होतांना दिसला, तरी एकंदरींत वाढत्या प्रमाणावरच आहे. या अर्थानें मनुष्य हा अहिंसेच्या मार्गावर पावलें टाकीत चाललेला प्राणी आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. धर्माची जाणीव व प्रेरणा हें मनुष्याचें वैशिष्ट्य आहे व अहिंसा हें धार्मिकतेचें प्रमुख व ठळक लक्षण आहे. म्हणूनच "अहिंसा परमो धर्मः". पशुतुल्य स्थितीकडून मनुष्याची देवत्वाकडील प्रगति अहिंसेच्या मापानें मोजण्यास हरकत नाहीं.

**सुखी मूढता:**— मूढ स्थितींत व्यक्ति स्वतःलाच साऱ्या विश्वाचा प्रभु समजते. "माझ्यासाठीं सारें विश्व आहे. माझ्या इच्छा किंवा माझी वांछितें पुरीं पाडील तेवढेंच या जगांत उपयुक्त. जगांतील यच्चयावत् वस्तु व प्राणी यांस मी माझ्या सोईला येईल तोंपर्यंत राहूं देईन, व सोईला येईल तेव्हां नष्ट करीन. त्या कामीं माझी शक्तिच कमी पडली, तर तेवढीच माझ्या हिंसेला मर्यादा पडेल. गाय दूध देते म्हणून मी तिला पाळीन, परंतु दुधानें भूक किंवा स्वाद भागेनाशी झाल्यास कापूनही खाईन. दूध देत नाहींशी झाली म्हणजे तर खाण्याखेरीज अन्य उपयोगच नाहीं, अर्थात् अन्य मार्गही नाहीं. इतर माणसांनाही मी माझी भूक किंवा क्रोध शमविण्यासाठीं ठार करीन. त्यांच्यापैकीं जे गुलाम म्हणून मी सांगेन ते श्रम माझेसाठीं मान्य करतील, त्यांस मी काम असेपर्यंत जिवंत ठेवीन व खाऊं-पिऊंही घालीन, परंतु काम सरलें म्हणजे मारूनही टाकीन.

"सृष्टीचा गुरुत्व-मध्य मी. माझ्या उपयोगाचें असेल तेवढेंच जगण्यास लायक, बाकी सारें निर्मूलन करण्याच्याच लायकीचें. सुंदर, सुवासिक फुलांचीं झाडें वाढविलीं पाहिजेत, तर खाजकोलतीचीं झाडें उपटूनच टाकलीं पाहिजेत. कुत्र्याला पाळणें योग्य, तसेंच लांडग्याला

मारणेंच योग्य. बायका-मुलें, आप्तेष्ट, शेजारी हे सारे माझ्या उपयोगीं पडतील तर व तोंपर्यंत जवळ करावे, परंतु ते माझ्यावरच उलटले तर त्यांना बाळगण्यांत, संभाळण्यांत, राहूं देण्यांत हंशील नाहीं. माझें सुख, माझी सोय, माझी मर्जी ही साऱ्या आचरणाची एकमात्र कसोटी."

**विचारांचा उपद्रवः**— परंतु माणसाचा हा आत्मविश्वास फार काळ टिकत नाहीं. विचारांचीं चक्रें फिरूं लागतात. आंतून हळूंच आवाज येतोः—"मी तसेच इतर सारे. मला जगण्याचा व सुखें भोगण्याचा हक्क आहे तितकाच इतरांनाही आहे. देवानें हें जग एकट्या माझ्यासाठीं थोडेंच निर्माण केलें आहे? लांडग्याचा मला उपद्रव वाटतो म्हणून त्याला मारून टाकायचा, तर माझा त्याला उपद्रव होतो म्हणून मलाच कां फांसावर चढवूं नये? गाय उपयोगी प्राणी, तिला खातो म्हणून वाघ वध्य, परंतु गाईचा मला उपयोग आहे तसा वाघाचाही वाघिणीला उपयोग नाहीं का? सर्प म्हणे घातुक आहे, परंतु मनुष्य सर्पाच्याही शतपटीनें घातुक नाहीं का? सर्पाला मारण्याचा अधिकार माणसाला कसा पोंचतो? माणूस अधिक शक्तिमान् किंवा युक्तिमान् म्हणूनच ना? "दयाळू देवानें माणसांना शिकारीची मौज लुटतां यावी म्हणून हरिणें केलीं, स्वादिष्ट-पौष्टिक खाणें मिळावें म्हणून मासे–कोंबडीं–बकरीं केलीं, उच्चवर्णीयांना श्रम पडूं नयेत म्हणून शूद्र केले, रोमन सद्गृहस्थांना काव्य–शास्त्र–कलादिकांचा व्यासंग करण्यास फुरसत मिळावी म्हणून हबशी गुलाम निर्मिले, गोऱ्या लोकांना कुरणें मिळावीं म्हणून आशिया, आफ्रिका, अमेरिका, ऑस्ट्रेलिया वगैरे मुलूख व तेथील नेटिव्ह निर्मिले" हें सारें पाखंड नव्हे का? 'बळी तो कान पिळी' हा जीवन-कलहाचा नियम असला तरी न्याय, नीति म्हणून जर कांहीं असेल तर गोऱ्यांइतकाच काळ्यांना, ब्राह्मण-क्षत्रियांइतकाच शूद्रांना, कुत्र्याइतकाच लांडग्याला, माणसाइतकाच सर्पाला व उंसा-

इतकाच काजऱ्याला जगण्याचा हक्क आहे. स्वतःच्या सुखसोईसाठीं दुसऱ्याला मारण्याचा किंवा पोडण्याचा बलिष्ठाला नैतिक अधिकार पोंचत नाहीं." अशा तऱ्हेनें—

" कॉन्शन्स् मेक्स कॉवर्ड्स् ऑफ अस् ऑल,
अँड दि सनी ब्लूम ऑफ लाइफ इज शेडेड ओव्हर
बाय दि पेल कास्ट् ऑफ थॉट ,,

—सदसद्विवेकबुद्धि आम्हांला भीरु बनवते आणि जीवनाच्या तेजस्वी प्रफुल्लतेवर विचाराची फिकट छाया पडते.

**परिवर्तन**–" माझ्याइतकेंच शेजाऱ्याच्या सुखसोईंनाही महत्त्व आहे. सृष्टि एकट्या माझ्यासाठींच नसून इतरांसाठींही आहे. माझ्याप्रमाणें इतरांनाही व्यक्तिमत्त्व आहे. जसा मी तसेच ते".- एवढें साधें सत्य लक्षांत आलें, कीं मनुष्याची सारी दृष्टि, सारीं मूल्यें, सारीं अभीष्टें, साऱ्या आकांक्षा, जीवनाची सारी दिशाच पालटून जाते. मग इतरांच्या सोइसाठीं स्वतः गैरसोय भोगण्यांत, इतरांच्या सुखासाठीं स्वतः दुःख सोसण्यांत, दुसऱ्याच्या तृप्तीसाठीं स्वतः तहानेलें रहाण्यांत, इतर जगावे म्हणून स्वतः मरण्यांत माणसाला आनंद वाटूं लागतो. दुःखांतही तो सुख अनुभवितो, कष्टांत आराम व मृत्यूनें अमरत्व प्राप्त करतो. तहानेनें जीव कासावीस झाला असतां माणसाला थंड पाण्याचा पेला लाख रुपयांच्या मोलाचा वाटतो; परंतु तशाही स्थितींत दुसऱ्याचा 'पाणी, पाणी' असा आवाज त्याच्या कानीं आल्यास ओंठाशीं नेलेला पेला मागें सारून दुसऱ्याला देण्यांत त्याला अधिकच समाधान वाटतें.

जगण्यांत आनंद आहे, परंतु दुसऱ्यासाठीं जगण्यांत — व दुसऱ्यासाठीं मरण्यांत—शतपट आनंद आहे.

असें कां होतें? हा चमत्कार आहे. चमत्काराचा खुलासा काय?

**अद्वैत**—खुलासा हाच कीं व्यक्ति समाजाहून भिन्न नाहीं. मनुष्य हा अखिल विश्वाचा एक अवयव आहे. विश्वदेहभर एकच चैतन्य खेळत आहे. व्यक्ति हें त्या अश्वत्थवृक्षाचें एक पान आहे, चैतन्य-सिंधूंतील एक बिंदु आहे. माणसानें त्या विश्वचैतन्याशीं एकजीव, एकतान होणें, त्याशीं समीपता, सरूपता, सलोकता, सायुज्यता मिळविणें, हाच त्याचा परम पुरुषार्थ आहे, ती त्याच्या उन्नतीची व कल्याणाची पराकाष्ठा आहे

मी व लोक, आपले व परके हे वरकरणी दिसणारे भेद व विरोध मुळांत खरे नाहींत. मी व लोक, माझे व परके, हे एकच आहों, एकाच उभयव्यापी जीवनाचे अवयव आहों. जीवात्मे हे एकाच शिवात्म्याचे अंश आहेत, किंवा प्रतिबिंबें आहेत. दुसऱ्याचें सुख तें माझेंच सुख आहे, इतरांचा आनंद तो माझाच आनंद आहे. समोरच्या माणसाच्या हास्यांत मीच हंसत आहें आणि त्याच्या रुदनांत मीच रडत आहें. त्याच्या अपमानानें मीच अपमानित होतों आणि त्याच्या विकासानें मीच प्रफुल्लित होतों.

ही सह-अनुभूति माणसांशींच समाप्त होत नाहीं. घोडा, गाय, कुत्रा, मांजर, गाढव, सर्प सर्वांपर्यंत पसरत जाते. "वृक्ष वल्ली आम्हां सोयरीं वनचरें ॥" हा तुकाराम महाराजांचा एकट्याचाच अनुभव नव्हे. तो आम्हांतुम्हांलाही मिळवितां येईल, किंबहुना तो गैरसोयीचा वाटत असला तरी आपल्याला तो टाळतां येत नाहीं.

"ईशावास्यं इदं सर्वं, यत्किंच जगत्यां जगत् ।
या जगांत जें जें कांहीं आहे तें सर्व ईश्वरानेंच व्यापलेलें आहे"
"तेन त्यक्तेन भुञ्जीथाः, मा गृधः कस्य स्विद् धनम् ॥

म्हणून (इतरांनीं) टाकून दिलेल्या वस्तूंतूनच स्वतःचे भोग साध, कोणाचेंही धन अभिलाषूं नकोस." असें उपनिषद् सांगतें. हा अहिंसेचा मूलमंत्र आहे. हें सत्य उपनिषदाच्या ऋषीला साक्षात् दिसलें.

आमच्या-तुमच्याबाबतींत तो साक्षात्काराचा विषय नसून केवळ अनुमानाचाच विषय आहे हें खरें, परंतु तें अनुमानही इतर कोणत्याही अनुमानाइतकें बिनधोक आहे. सायंकाळीं मावळलेला सूर्य दुसरे दिवशीं निश्चितपणें उगवेल, विस्तवांत हात घातला तर तो भाजेल, दुधांत विरजण घातलें असतां त्या दुधाचें दहीं बनेल हीं सुद्धां सारीं अनुमानेंच आहेत आणि असल्या सहस्रावधि अनुमानांच्या साह्यानेंच आपलें रोजचें जीवन आपण चालवीत असतों. दारावर थाप ऐकूं आली, कीं बाहेर कोणी आला आहे असें नक्की अनुमान आपण काढतों. आपण "गाय हंबरली" म्हणतों, तेव्हां प्रत्यक्ष अनुभव फक्त हंबरण्याच्या आवाजाचाच आलेला असतो. तो आवाज गाईचा, हें अनुमानच असतें, तथापि त्याच्या खरेपणाविषयीं प्रत्यक्ष अनुभवा-इतकीच आपल्याला खात्री वाटते. तितकीच खात्री या ईशावास्य-तत्त्वाच्या सत्यतेविषयीं बाळगण्यास मुळींच हरकत नाहीं.

न्याय, नीति, परोपकार, सत्य इत्यादींसाठीं वाटेल तो त्याग करण्याची प्रेरणा आपल्यामध्यें स्वयंभू आहे. भूक, तहान, झोंप या

---

१ टिप्पणीः—'तेन' व 'त्यक्तेन' या शब्दांचे आम्हीं येथें दिलेले अर्थ आजवरच्या परंपरागत अनेक अर्थांहून भिन्न आहेत. 'त्यक्त'—ज्यावर अन्य कोणी हक्क सांगत नाहीं, हा आमचा अर्थ पुढील 'दुसऱ्याचें धन अभिलाषूं नकोस' शीं अधिक मिळत आहे. स्मृतिकारांनीं ब्राह्मणांना घालून दिलेल्या ऊञ्छ वृत्तीशींही (शेत कापून नेल्यानंतर सांडलेले दाणे वेंचून निर्वाह करणें) आमचा अर्थ जुळतो आहे.

जितक्या अनिवार्य आहेत, तितकीच दुसऱ्यासाठीं आत्मबलिदान करण्याची वृत्ति हि नैसर्गिक व अनिवार्य आहे. दुसऱ्याच्या व्यक्तित्वाला माझ्या स्वतःच्या व्यक्तित्वाइतकेंच महत्त्व आहे, हा प्रत्यक्ष अनुभव आहे. आत्मैक्य व ईश्वराचें अस्तित्व हें या अनुभवावर आधारलेलें अनुमान आहे.

**जडवाद व आत्मबलिदानः—** एरवीं दुसऱ्यासाठीं आत्म-बलिदान करण्याऱ्या अनिवार्य प्रेरणेची उपपत्ति लागत नाहीं. मनुष्य म्हणजे जडदेह आहे, आत्मा म्हणून कांहीं नाहीं, ईश्वर झूट आहे, इंद्रिय-सुख हेंच मानवी जीवनाचें परमसाध्य आहे असें मानणारा जडवाद किंवा नास्तिकवाद या आत्मबलिदान-प्रवृत्तीची उपपत्ति लावूं शकत नाहीं. शरीरसुख हेंच परमसाध्य असेल तर इतरांच्या सुखासाठीं मीं माझें सुख कां घालवावें ? इतर शरिरांच्या वाढीसाठीं मीं माझें शरीर कां झिजवावें ?

"मनुष्य हा समाजावलंबी प्राणी आहे, माणसाचा विकास व सुखसोई या इतर असंख्य माणसांच्या सहकार्यावर अवलंबून असतात, म्हणून माणसानें आपल्या बांधवांच्या सुखासाठींही झटलें पाहिजे व त्यांच्यासाठीं स्वतःच्या सुखाचाच नव्हे तर प्रसंगीं प्राणाचाही होम केला पाहिजे" असें स्वार्थत्यागाचें समर्थन जडवादी करूं पहातात. परंतु मी जर केवळ शरीर म्हणजे हाडांमांसाचा पिंडच असेन व इतर माणसेंही तसलेच पिंड असतील तर मला माझें शरीर-सुख हें साध्य व इतर सारीं शरीरें व वस्तु हीं माझ्या सुखाचीं साधनें ठरतात. इतरांच्या दृष्टीनें माझें शरीर त्यांच्या सुखाचें साधन ठरेल. पण मी त्यांच्या विचारांना बळि कां पडावें ? त्यांच्या सुखासाठीं म्हणजे साधनासाठीं साध्याचा बळि कां द्यावा ?

माझ्या जिभेच्या तृप्तीसाठीं पक्व आंबे पाहिजे असतील तर मीं आंब्याचें झाड लावावें, शिंपावें, राखावें, वाढवावें व आंबे पिकेपर्यंत

माझ्या जिभेचें संयमन करावें हें वाजवी आहे. परंतु जिभेचें सुख हा परमार्थ असेल तर एवढी मेहनत करण्यापेक्षां शेजाऱ्याच्याच बागेंतील आंबे चोरून किंवा बळजबरीनें, कमींत कमी त्रासाचा असेल त्या मार्गानें, काढून खाणेंच अधिक योग्य व शहाणपणाचें ठरत नाहीं का? आणि स्वतः मेहनतीनें वाढविलेले आंबे दुसऱ्याच्या चैनीसाठीं फुकटचे देणें हा तर शुद्ध मूर्खपणा ठरेल. गाईनें दूध द्यावें म्हणून, ती दूध देत राहील तोंपर्यंत, गाईची जतन करणें वाजवी आहे. परंतु म्हाताऱ्या गाईची—गाईचीच कां, आईचीही—जतन करणें अव्यवहार्य आहे. तात्पर्य– जडवाद, सुखवाद, उपयुक्ततावाद यांच्या दृष्टीनें स्वार्थत्याग व परोपकार म्हणजे निव्वळ बावळटपणा ठरतो. त्यांची स्तुति करावी व उपदेशही करावा, पण तो फक्त इतरांना भुलवून झुलवून स्वतःचा मतलब साधण्या पुरताच !

शरीर-सुख हें स्पृहणीय किंवा अभिलषणीय आहे हें आम्ही नाकबूल करीत नाहीं. परंतु तें मानवी जीवनाचें एकमेव साध्य नव्हे किंवा परमसाध्य नव्हे. शरीरसुख हेंच माणसाचें एकमेव अभीष्ट असेल, तर व्यक्तींव्यक्तींमधील स्पर्धा व विरोध हीं अनिवार्य ठरतात, व प्रेम, सेवा, स्वार्थत्याग, नीति इत्यादि साऱ्या गोष्टींना मूर्खपणा किंवा ढोंग ठरवावें लागतें. परंतु समाजाच्या कल्याणासाठीं स्वतःचें बलिदान करण्याची प्रवृत्ति मनुष्यामध्यें इतकी अनिवार्य आहे कीं तिला मूर्खपणा किंवा ढोंग म्हणून बाजूला सारण्यास जडवादीही धजत नाहींत. इतरांसाठीं किंवा सत्यासाठीं आत्मबलिदान करण्यांत इंद्रियसुखापेक्षां अधिक आकर्षक किंवा उच्च प्रकारचें सुख आहे, हें मान्य आहे. परंतु तेवढें मान्य केल्यास मग क्रमानें हेंही मान्य करावें लागतें कीं मनुष्य म्हणजे केवळ शरीर नव्हे, तो आत्मा आहे, आत्मा भिन्न शरीरांमध्यें ही एकच आहे. जीवात्मे हे एकाच विश्वात्म्याचे किंवा ईश्वराचे अंश किंवा अवयव आहेत. केवळ शरीरें या नात्यानें आपण एकमेकांचे

दुश्मन आहोंत, पण आत्मे या दृष्टीनें आपण अभिन्न आहोंत; एकाचें कल्याण तें साऱ्यांचें कल्याण व एकाचें पतन तें साऱ्यांचें पतनही आहे. ' या जगामध्यें ' कोणी कुणाचा नाहीं, " जन हे दिल्या–घेतल्याचे " हें अगदीं खरें आहे; पण हें जग म्हणजेच सर्व सत्य हें मात्र साफ खोटें आहे. आपण केवळ याच जगाचे रहिवाशी नाहीं, येथें आपण प्रवासी म्हणून आलेले आहों, किंवा आपण या रंगभूमीवर निरनिराळया भूमिका घेतलेले नर आहों. या जीवनापलीकडे आपलें जीवन आहे व तेंच अधिक स्थायी व खरें आहे. तुरुंगांतील कैद्यांमध्येंही कुणाचा कोणी नसतो. एक आजारी पडला तर दुसरा त्याच्या शुश्रूषेला जाऊं शकत नाहीं. एक सुटला तर दुसरा त्याला पोंचवायला चार पावलेंही जाऊं शकत नाहीं. सख्खे भाऊ तुरुंगांत एकमेकांना ओळख सुद्धां देऊं शकत नाहींत. तीच गोष्ट 'इहलोक' नांवाच्या तुरुंगाचीही आहे. मात्र या तुरुंगांतून सुटका मृत्यूनेंच होते व नंतरच कैलास, वैकुंठ यांसारख्या परलोकाला जायचें असतें, असें मानण्याचें कारण नाहीं. इहलोक, परलोक, ब्रह्मलोक इत्यादि सारे येथल्या येथेंच आहेत. ते सारे दृष्टीचे प्रकार आहेत.

सारें विश्व एक आहे; विश्वांतील साऱ्या वस्तु परस्पर-संबद्ध, परस्परावलंबी व परस्परांवर परिणाम करणाऱ्या आहेत. हें विश्व चेतन आहे, शाश्वत व अविनाशी आहे. न्याय, नीति, धर्म, सत्य, अहिंसा, स्वार्थत्याग या सर्वांचा उगम या अद्वैतांतून आहे. या विश्व-चैतन्यालाच कोणी ईश्वर म्हणतात.

**समर्थन नव्हे, संगतिः—** तत्त्वनिष्ठा व स्वार्थत्याग यांची संगति याखेरीज लावतां येत नाहीं. नीति व धर्म म्हणजे अवयवाची देहाकडील, व्यक्तीची समाजाकडील, व्यष्टीची समष्टीकडील स्वभाव-सिद्ध ओढ होय. या ओढीच्या साक्षात् अनुभवावरुन आम्ही ईश्वराचें

अस्तित्व अनुमानिलें व ईश्वराच्या आधारें स्वार्थत्यागाची उपपत्ति लावली यांत तर्कदोष आहे, असा आक्षेप घेण्याचें कारण नाहीं. ईश्वराचें अस्तित्व हा नीतितत्त्वांचा अगाऊ पुरावा म्हणून आम्हीं पुढें मांडलेला नाहीं. ईश्वराचें अस्तित्व ही संगति ( हायपॉथॅसिस् ) आहे. नीति, धर्म, अहिंसा, आत्मबलिदान, सत्यनिष्ठा इत्यादि मनुष्याच्या वैशिष्ट्यांची संगति लावण्यासाठीं तें आवश्यक आहे. तिच्यामुळें नीतीचा उलगडा होतो. उलगडा झाल्यानें नीति-धर्मादिकांना दुजोरा मिळतो, हेंही खोटें नाहीं. धर्म, नीति, कर्तव्य, सत्य, अहिंसा इत्यादि एकाच माळेचे मणि आहेत. ईश्वर हा त्यांतून जाणारा धागा आहे. असतील तर तीं सारीं खरीं आहेत, नसतील तर सारींच झूट आहेत. धर्म किंवा कर्तव्याकर्तव्य म्हणून कांहीं असेल तरच अहिंसा हा परमधर्म आहे. धर्म हाच भ्रम असेल तर अहिंसा हाही मनाचा दुबळेपणा ठरू द्या.

**भेदांचें कोडें**— अद्वैत हेंच परमसत्य आहे, भिन्नता ही दिखाऊ आहे, असें मानलें तरी ही दिखाऊ भिन्नता तरी उत्पन्न कां झाली? ईश्वरापासून जीव वेगळा पडला व आतां परत ईश्वराकडे ओढ घेत आहे, ही यातायात त्याला कोणीं सांगितली? एकामध्यें अनेकत्वाचा उद्भव कां व कसा झाला? या विश्वांतील अनेक दिसणाऱ्या वस्तु परस्परांत गुंतलेल्या आहेत, अर्थात् सारें अस्तित्व एक आहे, हें मान्य करावें लागतें, परतु त्याचबरोबर एकमेकांशीं स्पर्धा, ओढाताण, झगडा, युद्ध करीत असलेल्या अनेकांचें अस्तित्वही ढळढळीत डोळ्यासमोर दिसत असतें. हें सनातन कोडें आहे, किंवा कौतुक आहे, किंवा परमेश्वराची लीला आहे. ब्रह्माला मायेची, आत्म्याला देहाची, अमूर्ताला मूर्तीची, अव्यक्ताला व्यक्त होण्याची, निर्गुणाला गुणांची जरूरी मुळांत जाणवलीच कां, त्याचा जबाब आम्हांतुम्हांला समजेल

अशा भाषेंत आजवर कोणतेंही तत्त्वज्ञान देऊं शकलेलें नाहीं. परंतु याच्या विरुद्ध स्वरूपाचें तत्त्वज्ञानही बुद्धि मान्य करूं शकत नाहीं. उदा० गीतेमध्यें (अ. १६.८) आसुरी तत्त्वज्ञानाची मांडणी केलेली आहे :—

असत्यं अप्रतिष्ठं ते जगद् आहुरनीश्वरम् ।
अपरस्पर-संभूतं किमन्यत् काम-हैतुकम् ॥

हें विश्व खोटें आहे, बिनबुडाचें आहे, ईश्वर झूट आहे, जगाच्या घडामोडींत कसलीच सुसंबद्धता नाहीं. कामवासनेंतून सारी सृष्टि उद्भवली आहे.

कविवर्य शेक्सपीयरनेंही आपल्या एका नाटकांतील पात्राच्या तोंडीं पुढील आशयाचे उद्गार घातले आहेत :—

'लाइफ इज अ टेल टोल्ड बाय अ फूल सिग्निफाइंग नथिंग,' इत्यादि.

'—जीवन म्हणजे वेड्यानें सांगितलेली असंबद्ध कहाणी आहे. तिला शेंडा नाहीं आणि बुडखा नाहीं.' हा नास्तिकवाद तर बुद्धीला क्षणभरही मान्य होत नाहीं.

# अहिंसेचे धागेदोरे.

"मी सृष्टीचा प्रभु नसून इतरांचे बरोबरीनें एक अल्प घटक आहे. माझ्या सोईसाठीं इतरांवर हुकमत चालविण्याचा किंवा इतरांचा बळि घेण्याचा मला तिळमात्र अधिकार नाहीं." ही अहिंसेची आधारभूत विचारसरणी असल्याचें आपण पूर्वी पाहिलें. याच विचारसरणींतून निष्पन्न होणाऱ्या, किंवा स्वतंत्र अशा अनेक युक्तिवादांतून आपल्याला अहिंसेच्या निर्णयावर यावें लागतें. अशा कांहीं युक्तिवादांचें आपल्याला येथें विवेचन करावयाचें आहे.

१. **जीवनाची एकता**: — नो थिंग् इज सिंगल,
ऑल थिंग्स् इन ईच अदर्'स् बिइंग मिंगल

'एकही वस्तु अलग अशी नाहीं, साऱ्या वस्तूंचें अस्तित्व परस्परांत मिसळलेलें आहे' असें एक इंग्रजी वचन आहे व तें अगदीं यथार्थ आहे. जगांतील कोणतीही वस्तु स्वयंभू किंवा स्वतंत्र नाहीं. सर्व वस्तु व बनाव बहुतांशीं परिस्थितीवर अवलंबून व परिस्थितीनें जखडलेले असतात. निवडुंगाला कांटेच कांटे असतात व केळीचें अंग तुळतुळीत असतें, हा केवळ त्या त्या वनस्पतीचा गुण किंवा दोष नसून जमीन, पाणी, हवा व एकंदर परिस्थिति यांचा परिणाम आहे. परिस्थिति व जोपासना पालटून निवडुंगाचे कांटे नाहींसे करतां येतात व त्याचें अंग केळीइतकेंच तुळतुळीत बनवितां येतें, हें आतां प्रत्यक्ष सिद्ध झालेलें आहे. केळीला सुपीक माती, भरपूर पाणी व अनुकूल हवामान न मिळाल्यास केळीच्या अंगाला कांटे येतील असें नसलें तरी केळीचें झाड मरून जाईल, जगूं शकणार नाहीं, हें तर उघड आहे. विशिष्ट प्रदेशांत केळीं होतात तशीं इतर ठिकाणीं होऊं शकत नाहींत. अर्थात् केळीच्या गुणांचें श्रेय किंवा निवडुंगाच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... क्रमांक ... नों: दि:

कांट्यांचा दोष सर्वस्वीं त्या वनस्पतींचाच नसूनहि ते... सबंध मुलुख त्यांत भागीदार आहेत.

मनुष्याचें सामाजिक जीवन तर विशेषच घनिष्ठ आहे. आपल्या साऱ्या विद्या, कला, शोध, सुखसोई, संस्कृति इत्यादि अभीष्टें, तसेंच आमच्यांतील दुर्गुण, रोग, कलह, व्यसनें इत्यादि अनिष्टें ही केवळ व्यक्तींची खासगी कमाई व संपत्ति नसून वडिलोपार्जित व समाईक संपत्ति आहे. आपलें प्रत्येक बारीकसारीक कृत्य, आपलीं सुखदुःखें, आपले गुणदोष हें सारें मागील पिढ्यांच्या व चालू पिढीच्या संचित अनुभवाचें, प्रयत्नांचें, प्रयोगांचे व यशापयशांचें फळ आहे. आपण माणसें एका महान् जीवनसिंधूचे बिंदु आहों. शेजाऱ्याच्या यशाचें श्रेय मलाही मिळालें पाहिजे, माझ्या मदतीखेरीज तें शक्य झालें नसतें. त्याचप्रमाणें इतरांच्या दोषांची जबाबदारीही मला टाळतां येणार नाहीं.

अ नें ब चा खून केला त्याबद्दल अ ला फांशीची शिक्षा मिळाली यांत खून करणारा केवळ अ च नसून माझें खुनांत अंग आहे. "दुष्ट माणसाचा वध समर्थनीय किंवा इष्टच नव्हे तर आवश्यक आहे," ही विचारसणी साऱ्या समाजाबरोबर मींही स्वीकारली व पोषिली. ब नें अ चा नाना सूक्ष्म प्रकारांनीं छळ केला, त्याचा मीं वेळींच निषेध केला नाहीं, निवारण केलें नाहीं, कदाचित् त्यास उत्तेजनही दिलें. राजकीय कुचंबणा, सामाजिक विषमता, आर्थिक दुरवस्था, तसेंच शाळा, वाङ्मय, उत्सव, नाटकसिनेमा इत्यादींमार्फत मिळणारें कुशिक्षण इत्यादींमुळेंच अ त्या अनुचित साहसाला प्रवृत्त झाला व हें सारें मीं आजवर उघड्या डोळ्यांनीं चालू दिलें व चालविलें.

अ च्या बाबतींत जी खुनी वृत्ति व्यक्त किंवा कार्यान्वित झाली ती अव्यक्त अवस्थेंत किंवा विकल्पाच्या स्वरूपानें माझ्या मनामध्येंही

अनेकदां डोकावून जात असते. खुनाची बीजें माझ्या स्वभावामध्यें असल्याचें आत्मनिरीक्षणान्तीं मला आढळून येतें. माझ्या स्वभावांतील त्या बीजांना योग्य खतपाणी मिळून त्यांचा सफल वृक्ष बनला नाहीं, याचें श्रेय स्वतः माझ्यापेक्षां परिस्थितीलाच अधिक आहे. माझ्यांतील खुनी वृत्तीला अद्याप फळें आलेलीं नाहींत, अ मधील तीच वृत्ति अगोदर फळाला आली एवढाच त्याच्या-माझ्यामध्यें फरक आहे.

अ नें केलेल्या खुनांत जसें माझें अंग होतें त्याचप्रमाणें खुनाचा तलास लावणाऱ्या व खटला करणाऱ्या पोलिसांशींही माझें संगनमत आहे. खुनासारख्या घोर गुन्ह्याचा तपास लागून गुन्हेगाराला इतरांस जरब बसण्याजोगी शिक्षा झाली नाहीं तर आमच्या-तुमच्या जीविताची शाश्वती रहाणार नाहीं, अशी आपल्याला धास्ती वाटते, तिच्या निवारणार्थ पोलिसांना तरी वाटेल तें करून खुनाचा तपास लावावा लागतो आणि कोणाला तरी फांसावर चढवावा लागतो.

खुन्याला फांशीची सजा सुनावणारा न्यायमूर्ति सुद्धां माझ्या प्रेरणेनेंच न्याय करीत असतो. ज्या राजसत्तेनें खुनाच्या गुन्ह्याला फांशीची शिक्षा ठरविणारा कायदा रचला त्या राजसत्तेचा मी एक घटक आहें. फांशीची शिक्षा म्हणजे थंड डोक्यानें केलेला प्रतिखूनच. न्यायमूर्तीसारख्या निर्ढावलेल्या इसमालासुद्धां एकाएकीं प्रतिखून करण्याची छाती होणार नाहीं. त्यासाठीं आपण पिनल कोडाचा तट व न्यायासनाचा बुरूज उभारतों. त्या बुरुजावर बसून त्या तटाआडून बंदूक झाडण्यास न्यायमूर्तीला तितकीशी धाकधूक वाटत नाहीं. त्याबद्दल आपण त्याला भरपूर वेतनही देतों. शिवाय बंदूक सुद्धां त्याला स्वतःला झाडावी लागत नाहीं. तो फक्त हुकूम देतो. प्रत्यक्ष कामगिरी दूरच्या मारेकऱ्यांनीं, तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनींच, करायची असते. त्यामुळें न्यायमूर्तीच्या धर्मबुद्धीची टोंचणी आणखी हलकी

होते. अशा तऱ्हेनें प्रतिखुनाचीं साधनें व त्याला अनुकूल असें एकंदर वातावरण आपण नागरिकच तयार करून देतों व प्रतिखुनाचीं जबाबदारी कोणा एकट्यालाच जड वाटूं नये अशा तऱ्हेनें आपण ती अनेकांवर वांटून देतों व ती स्वीकारण्याबद्दल लहानथोर सर्व कामगारांना लयलूट पैसे चारून आपण तो प्रतिखून मोठ्या कुशलतेनें घडवून आणतों.

खून, तपास, खटला, न्याय या प्रत्येकांत ज्याप्रमाणें माझा हिस्सा असतो त्याचप्रमाणें खुनी इसमाबरोबर मला शिक्षाही भोगावी लागते. फांशी गेलेल्या इसमाचें अस्तित्व नष्ट झालें, तरी त्या फांशीचे पश्चात्परिणाम आम्हांतुम्हांला भोगल्याखेरीज गत्यंतर नाहीं. देहाचा अंत एकट्या गुन्हेगाराच्याच वांट्याला येत असला तरी फांशीच्या शिक्षेमध्यें अंतर्भूत असलेला मानवतेचा अपमान हा तुमचा-आमचाच अपमान आहे. फांशीच्या प्रथेमुळें तुमच्या-आमच्यांतील संबंध कठोर बनतात व आपलें जीवित भयाकुल व संशयाकुल बनतें. खुनी इसम हयात रहाता, तर संभव आहे, कीं तो समाजाचा उपयुक्त घटक बनला असता. त्यानें एकाचा जीव घेतला, तसे प्रसंगीं दहांचे जीव वांचविले ही असते. फांशीमुळें आपण त्याच्या सोबतीला व साह्याला मुकलों.

अशा व्यापक दृष्टीनें विचार केला म्हणजे शिक्षेचें वैय्यर्थ्यच नव्हे तर अन्याय्य व आत्मघातकी स्वरूप लक्षांत येतें:—

अ. खुनाला आपण सारेच कारणीभूत असतां तोंडीं मिळणाऱ्या एखाद्यालाच आरोपी करून फांशीं देणें, हा न्याय नव्हे.

आ. फांशीनें झालेला खून तर भरून येत नाहींच, पण अधिक खुनांची तयारी केली जाते. " दुष्टाला ठार करणें न्याय्य व आवश्यक आहे " हा सिद्धान्त स्थापन झाल्यानें खुनांचें नैतिक समर्थनच होतें.

इ. खुनी इसम स्वभावतः खुनी नसतो, पण परिस्थितिवशात् त्याचे कडून खून घडतो. परिस्थिति सुधारणें व हिंसेचें भ्रामक पावित्र्य नष्ट करणें हाच खुनांच्या निवारणाचा उपाय आहे.

२. **सारेच स्वकीयः**—" मत रख मनमें बैर। बाबा, कोइ नहीं है गैर ॥ " माझे स्वतःचे दोष इतरांनीं सोसावे असें मला वाटत असतें. माझ्या मित्रांचे, आप्तेष्टांचे, किंवा मुलांबाळांचे दोष मी सहन करतों व इतरांनींही सहन करावे, असें इच्छितों. माझेंच मूल माझ्या अंगावर मुतलें, तर त्याची मला खंत वाटत नाहीं, किंवा राग येत नाहीं. आई मुलाला प्रेमानें न्हाऊं घालते. परंतु मुलगा आईवर चरफड-तच असतो व तिला चपराकासुद्धां मारतो. परंतु आईला त्याचें चरफ-डणें गाण्यासारखें गोड वाटतें, त्याच्या चपराका तबल्यावरील थापे-सारख्या मधुर वाटतात.

हें सर्व आपुलकीमुळें घडतें. जो आपला आहे, ज्याचे बद्दल प्रेम वाटतें, त्याचेसाठीं कितीही कष्ट सोसावे लागले तरी ते सुखावह होतात. तो जगावा म्हणून स्वतः मरण्यांत धन्यता वाटते. त्या मृत्यूनें आपण अमर बनतों. कारण आपण व आपलीं प्रिय माणसें मिळून आपलें एकच विशाल जीवन असतें. या जीवनाच्या एका विभागाला दुःख भोगावें लागलें तरी इतर विभागांत त्याची अनेक पटींनीं भरपाई होईल याची खात्री असली, म्हणजे मूळ दुःखही हलकें होतें. आईला आपल्या औरस मुलासाठीं भोगलेले तीव्र कष्टही आनंददायक होतात, परंतु सावत्र मुलासाठीं जरासा त्रास घ्यावा लागला तरी तो फार जाणवतो. कारण, तेथें आपलेपणाची भावना नसते.

परंतु ज्या तत्त्वदर्शी इसमाला आत्मैक्याची प्रचीति झाली, पृथक्त्वामागील ऐक्य उमजलें, त्याला सख्खा व सावत्र, आपले व परके असा भेदच उरत नाहीं. सारी मनुष्यजात व सारी भूतसृष्टि

त्याला आपलीशी होऊन जाते. मग कोणाचें पारिपत्य करण्याचा विचारही त्याच्या मनाला शिवत नाहीं, किंबहुना आपल्याला कोणी अपकार केल्याची जाणीवही त्याला होत नाहीं. पावरीबाबांविषयीं गोष्ट सांगतात, कीं सर्पानें त्यांना दंश केला तेव्हां ते म्हणाले, "शिवानें माझें चुंबन घेतलें.".

युद्धें किंवा सशस्त्र प्रतिकार अनिवार्य आहे व 'जशास तसें' ही उचित नीति आहे असें प्रतिपादणारेही स्वकीयांबाबत प्रतिकाराऐवजीं क्षमाच उपदेशितात. "स्वकीयांस क्षमा व परकीयांस दंड" हें त्यांचें ब्रीद असतें. उदा० सावरकरकृत हिंदूंचें एकतागान पहाः-

" उभयांनि दोष उभयांचे । खोडावे ।
द्वेषासि दुष्ट रूढींसी । सोडावें ।
सख्यासि आइच्यासाठीं । जोडावें ।
अम्हि अपराधांसी विसरुनि प्रेमा पुन्हांपुन्हां सांधूं ॥ "

संकुचित जातिसंघटना करणारे लोकही, आपसांतील कलह तडजोडीनें व सोशीकपणानेंच सोडवावे, फक्त परक्यांचे आक्रमणाचा सशस्त्र प्रतिकार करावा, असें प्रतिपादीत असतात. राष्ट्रवादी पुढारीसुद्धां राष्ट्रांतील अंतःस्थ हितविरोध सलोख्यानें व तडजोडीनें मिटविणेंच उचित मानतात. परंतु ज्याची अस्मिता किंवा आपुलकी अंतर्राष्ट्रीय म्हणजे मानवव्यापी आहे—"आमुचा स्वदेश । भुवनत्रयामध्यें वास" अशी ज्याची भावना आहे—त्याला लढायला कोणी उरतच नाहीं.

३. "शो मर्सी व्हाइल् यू हॅव मर्सी"—'दया करा, कारण तुम्हांलाही दया मिळत आहे.' वर आपण पाहिलें, कीं खुनाचीं बीजें माझ्या स्वभावांतही, गढलेलीं आहेत. खुनाचीं कदाचित् फक्त बीजेंच असतील परंतु इतर पापांचे व अपराधांचे माझ्यामध्यें वृक्षही झालेले आहेत व त्यावर फळांचे भरही येत असतात. मनुष्यमात्र स्खलनशील आहे.

“टु अर इज ह्यूमन, टु फरगिव्ह् डिव्हाइन” — प्रमाद मानवोचित आहे, क्षमा दैवी आहे. माझ्याकडून गतायुष्यांत अनंत अपराध घडलेले आहेत; आजही मी पदोपदीं चुकत असतों. माझ्या आईबापांनीं, वडील मंडळीनीं, भावंडांनीं, शेजाऱ्यांनीं, सोबत्यांनीं, गुरुजनांनीं माझे अपराध पोटांत घातले, माझीं न्यूनें सहन केलीं, माझी सेवाशुश्रूषा केली, सदुपदेश दिला, सन्मार्ग दाखविला. त्यांनीं इतका सोशिकपणा दाखविला नसता तर मी लहानाचा मोठा होऊं शकलों नसतों; आज सुद्धां त्यांच्या, सहिष्णुतेखेरीज मला पाऊल टाकणेंही अशक्य होईल. समाजाच्या व ईश्वराच्या दयेविना मी अपंग आहें. लोक माझे अपराध सोसतात; आपल्याला त्यांनीं सोसावें अशी मी अपेक्षा करतों. माझा अपराध आहे, याची मला स्पष्ट जाणीव असतांही माझी इच्छा असते, कीं मला त्या अपराधाबद्दल शिक्षा होऊं नये, क्षमा व्हावी; शिक्षा व्हायचीच तरी अगदीं क्षुल्लक, सुसह्य अशीच व्हावी. असें आहे तर मग दुसऱ्यानें अजाणतां, गैरसमजानें, अंतर्व्यथेमुळें, पूर्वसंस्कारांमुळें, दुसऱ्याच्या प्रेरणेनें, किंवा क्रोध, वैर, मत्सर, मोह इत्यादींच्या आवेशांत माझा एवढा-तेवढा अपराध केला तर त्याचें पारिपत्य करण्याची ईर्ष्या मीं तरी कां धरावी ? लोकांनीं माझ्या अपराधांच्या राशी सहन कराव्या, आणि मी मात्र इतरांचे अणुरेणूएवढे अपराधही सोसूं नयेत का ?

लोक माझे अपराध पोटांत घालतात एवढें च नव्हे तर माझ्यांतील एवढ्या तेवढ्या गुणांचाही कितीतरी गौरव करतात ! परगुण-परमाणून् पर्वतीकृत्य नित्यं । निजहृदि विकसंतः संति संतः कियंतः ॥ —‘अन्यांचे परिमाणुतुल्य गुणही मेरूपरी वानिती । चित्तीं हर्षहि पावती सुजन ते नेणों किती नांदती ॥’ लोकांच्या अकारण सौजन्याची सांवली भोगणाऱ्या मला प्रसंगीं अकारण दुष्टतेचें किंचित् ऊन सोसावें लागलें तर मीं लगेच उसळून उठावें का ?

बायबलमध्यें सद्वर्तनाचे जे नियम घालून दिले आहेत त्यांपैकीं एक प्रमुख नियम "डू अंटु अदर्स ॲज यू वुड लाइक अदर्स टु डू अंटु यू"—इतरांनीं तुमच्यापाशीं जसें वागावें असें तुम्हांला वाटतें तसें च तुम्हीं इतरांशीं वागावें—हा आहे.

**४. स्वभावतः दुष्ट कोण आहे?**—ज्याला आपण दुष्टपणा म्हणतों व म्हणून ज्याचें पारिपत्य करण्यास सरसावतों, तो मूळचा दुष्टपणा नसून दुर्बलता, भीति, व्यथा, अज्ञान यांचाच परिणाम असतो. स्वभावानें दुष्ट असा कोणीच मनुष्य नाहीं. आपण स्वतःवरून दुसऱ्याची पारख करावी. "सर्व सुखी असावे, सर्वत्र सलोखा नांदावा, कोणीं कुणाची कुरापत काढूं नये, कोणीं कुणाचें पारिपत्य करूं नये, किंवा अनिष्ट चिंतू नये," असें कोण इच्छीत नाहीं? मांगल्याची लालसा कोणाला नाहीं?

नवीन मित्राशीं आपला प्रथमच परिचय होतो तेव्हां मनांतल्या मनांत आपण किती शुभ संकल्प रचीत असतो, कीं या नवीन मित्राशीं मी अत्यंत पवित्र, एकांतिक आदराचे संबंध टिकवून धरीन. नवीन वर्ष, नवीन महिना इत्यादींविषयींही आपण किती शुभ संकल्प व शुभ चिंतन करीत असतों! प्रत्येक जीव प्रेमाचा, आदराचा, सौजन्याचा, मांगल्याचा भुकेलेला असतो. नव्या पाटीवर एकही चरा किंवा नव्या पुस्तकावर एकही डाग न पाडण्याचा द्वाडांत द्वाड मुलाचाही निश्चय असतो. परंतु कालांतरानें व अनुभवानें त्याचा विरस होतो. इतरांविषयीं तो निराश होतो, व त्याहूनही अधिक दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, स्वतःविषयीं निराश होतो. त्याची उमेद खचते. आणि ज्या इसमाची उमेद खचली त्याचेवर हल्ला चढविणें षड्रिपूंना फार सुलभ जातें. क्रियेची प्रतिक्रिया, त्या प्रतिक्रियेची त्याहूनही तीव्र प्रतिक्रिया, असें होतां होतां प्रकरण चिरडीला जातें. आणि माणसावर एकदां का चोर, बुडव्या,

नाठाळ, दुष्ट यांसारखा छाप बसला कीं मग त्याला, व समाजाला त्याचे-विषयीं, आशेचा किरणही रहात नाहीं. स्लेटीवर एकदां चरे पडले म्हणजे विद्यार्थीही तिच्यावर लिहितांना खरखरीत पेन्सिलीचा बिन-दिक्कत उपयोग करूं लागतो. आपले जुने कपडे आपण खास घाणींत काम करण्यासाठीं राखून ठेवतों; मग त्यांना कधीं साबण मिळण्याची आशा नको. जुन्या पोक आलेल्या, गंज चढलेल्या तांब्याला एकदां शौचाच्या तांब्याची पदवी प्राप्त झाली, कीं त्याला या जन्मीं उजळा येण्याची आशाच खुंटली, जगांतील सारी दुष्टता, बेपर्वाई, कर्कशता, वासाघीस, झगडे, कलह यांची हीच कुळकथा आहे.

एकदां दुष्टता, गुन्हे, व्यसनें, द्वेष यांचें बियाणें तयार झालें म्हणजे त्यांची पुढील वाढ व प्रसार होत जाण्यास मुळींच अडचण पडत नाहीं. गलिच्छ वस्तींत उद्भवलेला प्लेग हां हां म्हणतां स्वच्छ वस्तींतूनही पसरतो. मनुष्य हा समाज-संपन्न व विकासशील प्राणी असल्यानें त्याच्या साऱ्या विद्या, कला, शोध, त्याची सारी पुण्याई व करामती जशा मागील पिढीकडून पुढील पिढीकडे संक्रमित व विक-सित होत जातात, त्याचप्रमाणें त्याचीं पापें व रोग सुद्धां वारसा-हक्कानें उतरत व वाढत जातात. पूर्वजांची ‘ स्वकष्टोपार्जित ’ दुष्टता वंशजांची ‘ जन्म-सिद्ध संपत्ति ’ ( कीं विपत्ति ? ) बनते.

सारांश, मनुष्य मुळांत किंवा स्वभावतः दुष्ट नाहीं, कलह-प्रिय नाहीं. परंतु सारींच माणसें कमी-ज्यास्त प्रमाणांत दुर्बळ आहेत; शरी-रानें तशींच मनानें दुबळीं आहेत. त्यांची सहनशक्ति मर्यादित आहे. मनुष्य जितका दुबळा तितकी त्याची सहनशीलता कमी आणि त्रासिक पणा, चिडखोरपणा, प्रतिकार वा पारिपत्य करण्याची किंवा सूड घेण्याची वृत्ति अधिक तीव्र. पिसाळलेला कुत्रा ज्याला त्याला डसत सुटतो आणि त्याचा दंशही प्राणघातक असतो. परंतु पिसाळणें हा स्वभाव नव्हे, तो रोग आहे.

क्रूरपणा हा भीति व अगतिकता यांचाच परिणाम असतो. याचे अनेक दाखले देतां येतील. आपल्याशीं लडिवाळपणा करणाऱ्या घरांतल्या मांजरीला दुधाच्या चोरीची शिक्षा देण्यासाठीं जर का तुम्ही खोलींत काठीनें झोडपूं पहाल, तर ती गुरगुरून तुमच्यावरच हल्ला करण्यास कमी करणार नाहीं. आम्ही लहानपणीं शाळेंत जातांना वाटेंत गांवचीं गुरें भेटत तेव्हां वाटे-लगतच्या एखाद्या उंच कड्यावर चढून गुरांना धोंडे मारून पिटाळीत असूं व तीं पार दूर गेल्यानंतरच पुढें जाण्याचे धाडस करीत असूं. परंतु आतां मात्र गुरें आडवीं आलीं तर आम्ही त्यांना बाजू देऊन पुढें निघून जाऊं शकतो?

मुंबईंत हिंदुमुसलमानांचे दंगे होतात, ते तरी कसे होतात. त्यांची सुरवात परस्परांबद्दलच्या भीतींतूनच होते व वाढही भीती-मुळेंच होते. प्रथम दंगे होणार अशी अफवा कोणीतरी सुरू करतो भीतीमुळें ती अफवा खरी वाटली नाहीं, तरी फार महत्त्वाचीशी वाटते. ती आंत धरून ठेवणें अवघड होते. तिचा कुजबुजत प्रचार केल्याखेरीज लोकांना रहावतच नाहीं. अशा तऱ्हेनें भीतीचें वातावरण वाढत जातें. भ्यालेले लोक एकेकट्यानें फिरण्यास धजत नाहींत, म्हणून ते आपापले जमाव करून फिरूं लागतात. नंतर एका पक्षाच्या भीति-प्रद जमावाला पांगविण्यासाठीं दुसऱ्या पक्षाचा जमाव धोंडे किंवा सोड्याच्या बाटल्या फेंकतो, किंवा धाक बसविण्यासाठीं सुरा काढतो. अशा तऱ्हेनें दंग्याला रीतसर सुरवात झाल्यानंतर "शत्रूचे घाव निमूटपणें सहन केल्यास शत्रु अधिकच शेफारेल" ही 'साधार' भीति पुढील कार्य करते. आमचे एक हिंदू मित्र दंग्याच्या काळांत रात्रीं बसमधून जात असतां एका स्टेशनवर चारपांच मुसलमान त्या बसमध्यें घुसले. आमच्या मित्राच्या छातींत धस्स झालें! परंतु पुढील क्षणींच त्या मुसलमानांचे आपापसांतील शब्द त्याचे कानीं आलेः—

" बस मिळाली म्हणून बरें झालें, नाहींपेक्षां कठीण प्रसंग होता. " दुसऱ्या एका प्रसंगीं बस हिंदू वस्तींतून चालली होती. बसमध्यें मुसलमान उतारू एकटाच होता. त्याला धास्ती वाटत होती कीं बस थांबली कीं रस्त्यावरील हिंदु गुंड बसमध्यें शिरून आपल्याला ठार करतील. म्हणून तो कंडक्टरला धमकावून म्हणाला " खबरदार बस उभी करशील तर ! आंतडींच बाहेर काढीन. "

वाघ व साप हे दुष्ट प्राणी आहेत असें पुष्कळांना वाटते परंतु बकऱ्याला, उदरभरण्याची इतर साधनें असतांना, कापून शिजवून मसाले घालून खाणाऱ्या माणसापेक्षां तरी केवळ मांसाहार करणारा वाघ अधिक दुष्ट नाहीं हे उघड आहे. सर्पाचा दंश प्राणघातक असतो खरा परंतु तेवढ्यावरून सर्प दुष्ट बुध्दीचा ठरत नाही. बिचाऱ्याला मुळांत बुद्धि आहे कीं नाहीं याचाच संशय आहे, मग तो दुष्ट बुद्धि कोठून असणार ? माणसाचा प्राण घेण्यांत सर्पाला आनंद वाटतो म्हणून तो डसतों असें नव्हे. किंवा त्याला पाय लागला म्हणून अपमान मानून सूड घेण्याच्या इराद्यानेंही तो डसत नाहीं. तर त्याचेवर पाय पडला म्हणजे " आपल्यावर शत्रूचा हल्ला आला आहे, माझ्या जिवावर बेतली आहे " अशा भीतीनें गांगरून जाऊन आपलें एकुलतें एक हत्यार जें दांत त्याचा तो उपयोग करतो. " मी यावेळीं माणसासारख्या सर्वश्रेष्ठ, साधुचरित व इश्वराच्या लाडक्या प्राण्याला चावत आहें, माझ्या विषामुळें त्या सज्जनाचा मृत्यु होणार आहे, या महापापाबद्दल मला यमाच्या दरबारीं जाब द्यावा लागून पुढील जन्म उंदराचा घ्यावा लागेल " इत्यादिक आध्यात्मिक सत्यांची त्या बिचाऱ्याला कल्पनाही नसते. स्थिर म्हणजे हालचाल करीत नसलेल्या माणसाला साप चावत नाहीं असा अनुभव आहे; दगडाला ही चावत नाहीं; कारण त्याच्यापासून घाबरून जाण्याचें त्याला कारण नसतें.

त्याचप्रमाणें बुजरीं गुरेंच मारकुटीं असतात व आत्मरक्षणार्थ शिंगांच्या हत्याराचा उपयोग करतात. दाव्यावर बांधलेलें गुरूं मोकळया गुरापेक्षां अधिक बुजनें व अधिक त्वेषानें मारूं पहातें, कारण तें अगतिक असतें.

काकडीचा वेल गुरांनीं चावला म्हणजे त्या वेलावर धरणाऱ्या काकड्या कडु बनतात अशी समजूत आहे. वनस्पती, व पशु तसेच मनुष्य-ही जगाचा कटु अनुभव आल्यानें स्वतः कटु स्वभावाचे बनतात.

या सर्व दाखल्यांवरून हें स्पष्ट होतें कीं क्रूरपणा हा भीतींतून व अगतिकतेंतूनच निर्माण होतो. म्हणून क्रर उपाय योजणारांविषयीं आपल्याला द्वेष किंवा तिरस्कार वाटण्याऐवजीं करुणा वाटावी हेंच उचित आहे. अर्थात् आपणही त्याच्या क्रूरतेमुळें घाबरून गांगरून गेलों नाहीं तरच तें शक्य होणार.

दुर्बलता व भीति यांप्रमाणेंच अज्ञान ही हिंसेबद्दल जबाबदार असतें. हिंसा म्हणजे अडाणीपणाच आहे. मधमांशापासून मध मिळवि-ण्याची कुशल पद्धति सुचेपर्यंत मनुष्याला मध मिळविण्यासाठीं मधमाशांचीं पोळीं जाळून टाकण्याखेरीज मार्ग नव्हता. शेतीचा शोध लागेपर्यंत शिकार हेंच माणसाचें उदरभरणाचें प्रधान साधन होतें, परंतु आतां तें गौण बनलें आहे. आडमुठ्या शिक्षकालाच उठल्या सुठल्या छडीचा आश्रय घ्यावा लागतो. कुशल शिक्षक विद्यार्थ्याला प्रसन्न राखूं शकतो व स्वतःही प्रसन्न रहातो.

दुष्टपणा किंवा क्रूरपणा ही माणसाची प्रकृति नसून विकृति आहे. कांहीं शारीरिक विकृति असाध्य असतील, कारण शरीर हें नाशिवंत आहे, परंतु मानसिक विकृतींचें तसें नाहीं. मनुष्याची बुद्धि, किंवा वृत्ति, जशी कुसंस्कारांनीं बिघडूं शकते तशीच ती सुसंस्कारांनीं परत मूळच्या मंगल स्वरूपास आणणें अवघड असलें तरी कोणत्याही

स्थितींत अशक्य नाहीं. पिढ्यान् पिढ्याचे कुसंस्कार, आघात, कुचंबना, तिरस्कार अविश्वास, जुलूम, छळ इत्यादींचा संकलीत परिणाम म्हणून मनुष्य कर्कश व क्रूर बनला असला तरी त्याच्या हृदयाची कपाटें उघडून आंत मांगल्याचा प्रकाश आणण्यास पुष्कळदां एक बारीकशी किल्ली किंवा हळुच मारलेली टिचकी पुरेशी होते. खून चढलेल्या माणसाच्या हृदयाचें एकाद्या गोजिरवाण्या निष्पाप बालकाचें मुग्ध स्मित पाहून पाणी पाणी होऊन जातें. नारदमुनींशीं प्रसंग येतांच वाल्या कोळ्याचा वाल्मीकि मुनि बनला ही केवळ त्रेतायुगांतील कथा नसून चालू घटकेला ही अशा तऱ्हेचे प्रत्यक्ष दाखले वाटेल तितके मिळूं शकतील. श्री रामकृष्ण परमहंसांच्या पत्नी शारदादेवी एकदां कमरमुकुरहून दक्षिणेश्वरास जात असतां त्यांच्या सोबत्यांची व त्यांची चालणाच्या गतींतील फरकामुळें चुकामूक पडली व अशा एकट्या स्थितींतच एका निर्जन प्रदेशामध्यें त्यांना रात्र पडली व अंधार झाला. वाटेच्या कडेला त्या विवंचनेंत बसल्या असतां तिकडून एक ' डाकू ' आला व त्यांना " कोण तूं ? इथें काय करतेस ? " असें विचारता झाला. शारदादेवी म्हणाल्या " बाबा, मी तुमच्या जांवयाकडे दक्षिणेश्वरास जात आहें, परन्तु सोबत्यांची चुकामूक होऊन येथें अंधाऱ्या रात्रीं एकटी पडल्यें आहें. आतां तुम्हीच माझी काळजी घेणारे. तुम्हीच मला आपल्या जांवयाकडे पोचती करा. " इतक्यांत त्या इसमाची बायकोही मागून येत असलेली तेथें येऊन पोचली. त्या उभयतांनीं त्या रात्रीं व दुसरे दिवशीं शारदादेवींची पोटच्या मुली प्रमाणें काळजी घेतली. दुसरे दिवशीं देवींच्या मूळच्या सोबत्यांची गांठ पडली तेव्हां या जोडलेल्या माहेराचा निरोप घेतांना देवींना रडूं आलें. पुढें ही हीं आईबापें दक्षिणेश्वरीं शारदादेवींना भेटायला येत व त्यांच्यासाठीं भेटी आणीत.

" व्हिक्टरीज् विदाउट् व्हायोलन्स् "– (= " हिंसे शिवायचे विजय; " संपादक ए. रुथ्. फ्राय्, प्रकाशक पीस् बुक कंपनी, लंडन )

या इंग्रजी पुस्तकामध्यें वाचकांना अशाच मासल्याच्या एकसष्ट सत्य-कथा आढळतील. परंतु इतके दूर न जातां आपापल्या जीवनपोथीमध्यें ही अशा तऱ्हेचे अनेक अनुभव आपल्याला मिळण्याजोगे आहेत.

**५. मला पारिपत्याचा अधिकार काय?** धर्मोपदेश करित महात्मा येशुख्रिस्त एका गांवीं गेला असतां गांवचे लोक त्याचेपाशीं एका स्त्रीला घेऊन आले व म्हणाले:– " महाराज, या स्त्रीनें व्यभिचाराचा गुन्हा केला आहे. आमच्या गांवचा शिरस्ता आहे कीं व्यभिचारिणी स्त्रीला गांवच्या लोकांनीं धोंड्यांनीं बडवून ठार करावें; तरी आपण आम्हांला योग्य सल्ला द्यावा." ख्रिस्त म्हणाला " तुमचा शिरस्ता असेल तसेंच होऊं द्या. मात्र एवढेंच करा कीं जो स्वतः पूर्ण शुद्ध असेल त्यानें पहिला धोंडा मारावा."

ते लोक एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागले व धोंडा मारण्यास कोणाचाच हात चालेना!

परनिंदा किंवा दुसऱ्याच्या गुणदोषांची चिकीत्सा करण्याकडे माणसाची प्रथम प्रवृत्ति होते, परंतु तीच चिकत्सक बुद्धि कांहीं काळानें स्वतःवरच वळते, व ती तशी वळली म्हणजे माणसाला स्वतःच्या न्यूनांपुढें इतरांच्या न्यूनांकडे लक्ष्य पुरविण्यास सवडच मिळत नाहीं. दादू संतकवीनें निंदकाचें वर्णन " अप्पन डुबे, अन्य को तारे—स्वतः बुडतो पण इतरांस तारण्यासाठीं झटतो," असें केलें आहे. परंतु स्वतःचीच काळजी वहाणारा मनुष्य इतरांची काळजी कितीशी वाहूं शकणार? त्याला निंदकाची भूमिका परवडणार नाहीं.

पूर्वी आपण पाहिलें आहे कीं दुसऱ्याच्या पापामध्यें माझें अंग असतें, किंवा तेंच पाप व्यक्त किंवा सूक्ष्म रूपानें मी ही अनेकदां केलेलें असतें. अशा स्थितींत त्याचा क़ाज़ी (न्यायाधीश) बनण्याचा व त्याला शासन करण्याचा मला काय अधिकार?

शासनाचा प्रश्न बाजूला ठेवला तरी दुसऱ्याला दोष देणें, तिरस्कार करणें, न्याय करणें, हा सुद्धां हिंसेचाच प्रकार आहे. दोष-मूर्ति अशा मला न्यायमूर्ति बनण्याचा अधिकार नाहीं. 'जज् नॉट'–दुसऱ्याचा न्याय करायला बसूं नको—हा ज्ञानी पुरुषांचा आदेश आहे.

दुसऱ्याचा न्याय करण्याची जशी आपली नैतिक लायकी नाहीं त्याचप्रमाणें न्याय करण्यासाठीं लागणारा पुरावा ही पुरेशा प्रमाणांत तिऱ्हाइताला उपलभ्य नसतो. दुसऱ्याचा हेतु आपण प्रत्यक्ष पाहूं शकत नाहीं, केवळ अनुमानाने कल्पूं शकतों. परंतु कृत्याचा गुणदोष पुष्कळ अंशानें कर्त्याच्या हेतूवर अवलंबून असतो. तसेंच कोणत्याही कृत्याच्या सर्व बाजू व पूर्वापर संदर्भ लक्ष्यांत घेणें आपल्याला बहुधा शक्य होत नाहीं. इसापनीतींतील आई प्रमाणें मुंगुसाचें तोंड रक्तानें भरलेलें पाहून त्यानें आपल्या बाळाला मारलें असें उतावळेपणानें ठरवून आपण मुंगुसाला देहांतशासन देतों, परंतु मुंगुसानें खरोखरी सर्पाला मारून बाळाचे प्राण वांचविलेले होते. पूर्वापार संदर्भ विरहित शास्त्रवचनांचा संपूर्ण विपर्यास करणें जसें सोपें असतें त्याचप्रमाणें पूर्वीची हकीकत माहीत नसतां विशिष्ट क्षणीं विशिष्ट बाजूनें पहातां तें कृत्य जसें दिसतें तेवढ्यावरून त्या कृत्याची पारख केल्यानें स्वतःची फसगत व दुसऱ्याला अन्याय घडल्यावांचून रहात नाहींत. विशेषतः स्वतःचा संबंध असलेल्या गोष्टींचाच जेव्हां न्याय करायचा असतो, स्वतः पक्षकारच जेथें न्यायासनावर बसतो, तेथें तर दुसऱ्या पक्षाला अन्याय घडणें अगदींच साहजिक असतें. शिवाय

**६ माझ्यावरील अन्यायाला मीही कारण असतोंः—** माझ्यावर जेव्हां कसला तरी अन्याय होतो, कोणी हल्ला करतो किंवा हक्कांवर आक्रमण करतो ( असें मला वाटतें ) त्या त्या वेळीं त्या

अपकृत्यास मीही प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें, जवळून नाहीं तरी दुरून, स्पष्टपणें नाहींतर सूक्ष्मपणें, जबाबदार असतों. शाळेंतील द्वाड सोबती इतरांना सोडून माझेशींच कां भांडतो ? मास्तरांच ग्रह माझे-बद्दलच दूषित कां ? चोरानें इतर घरें टाकून माझे घरींच कां चोरी केली ? मतदारांनीं मला मतें कां दिलीं नाहीं ? बढतीच्या जागे-साठीं वरिष्ठांनीं माझी निवड कां केली नाहीं ? यांसारख्या गोष्टींचा आत्मसंशोधनपर दृष्टीनें तपास केल्यास हें सर्व केवळ दुष्टपणामुळें किंवा केवळ योगायोगामुळेंच घडलें असें नसून माझें ही त्या प्रकारांत अंग होतें हें आपल्या लक्षांत येईल. खुद्द माझ्याच कर्माचा तो परिणाम नसल्यास माझ्या सोबत्यांच्या, माझ्या जातीच्या, माझ्या समाजाच्या कर्माचें फलही मला भोगावें लागलें असेल असा संभव आहे. दोष स्वतःचा नसला तरी स्वकीयांचा असेल. स्वकीयांच्या पुण्याईचीं शुभफलें मी चाखतों तशींच त्यांच्या पापाचीं कटुफळेंही माझ्या वाट्यास आलीं तर त्याबद्दल तिऱ्हाइताला दुष्ट ठरवून, किंवा त्याला शासन करून, मी मोकळा होऊं शकत नाहीं. स्वतःची व स्वकीयांची सुधारणा करणें हेंच माझें कर्तव्य आहे.

रानांत स्वतःच उच्चारलेल्या अपशब्दांचे प्रतिध्वनि ऐकून मुलानें घरीं येऊन “ कोणी द्वाड मुलगा रानांत मला निष्कारण अप-शब्द बोलला ” अशी आपल्या बापापाशीं तक्रार केली. मुलें आपणच भांडण उकरून काढतात व स्वतःच्याच हिंमतीवर लढतात, परंतु स्वतःचें बल अपुरें पडूं लागलें म्हणजें मात्र वडिलांकडे फिर्याद घेऊन जातात. आमची तुमची सुद्धां पुष्कळदां तशीच अवस्था होते.

‘ जशास तसें ’ किंवा ‘ करावें तसें भरावें ’ हा सृष्टीचा नियम आहे. आपण त्या नियमाची पाळणूक आपल्याला दुसऱ्याकडून अपकार घडल्या क्षणापासून पुढें करूं पहातो व अपकारकर्त्याला त्याच्या कर्माचें

फल भोगायला लावण्याचा विचार करतों. परंतु अपकाराची फेड करण्यापूर्वीं आपण जर त्या अपकाराचें कारण शोधूं तर त्याच नियमानुसार "माझ्याकडून त्या माणसाला कांहीं तरी अपकार घडला असला पाहिजे, एरवीं तो मला अपकार कां करील?" असें म्हणून आपण आत्मसुधारणेकडेच वळूं.

विश्वाचे 'मी' व 'मदितर सृष्टि' असें भाग कल्पितां येतात. 'जशास तसें' हा मदितर सृष्टिव्यापाराचा नियम आहे. "मी कसें वागावें?" हा सृष्टिशास्त्राचा प्रश्न नसून नीतिशास्त्राचा आहे. सृष्टिशास्त्राचा नियम नीतिशास्त्राला लावणें हा त्या नियमाचा दुरुपयोग असून तो भ्रांत युक्तिवाद किंवा विचारदोष आहे.

७. **अज्ञेयवादः**—बालपणीं मला वाटे कीं महारांचांभारांना स्पर्श करणें हा अधर्म आहे. आतां वाटतें कीं कोणालाही अस्पृश्य किंवा हीन लेखणें हा अधर्म आहे. एके काळीं स्नानसंध्या केल्याखेरीज अन्न न घेणारे आमचे एक मित्र अलिकडे मांसाहाराचाही निषेध मानीत नाहीं. कांहीं धर्मोपदेशक विवाह म्हणजे पतन समजतात तर महंमद पैगंबर विवाहाचा पुरस्कार करतात. पांच वर्षांपूर्वीं कट्टा असहकारी असलेला देशभक्त आज सरकारीं नोकरींत विराजमान झालेला व तोच मार्ग खरा देशसेवेचा आहे असें प्रतिपादितांना आढळतो. पूर्वीं कट्टे नास्तिक असलेले श्री.—अलीकडे नेमानें शनिवारचा उपास करतात. आपल्याला पूज्य व अधिकारी वाटणाऱ्या पुरुषामध्यें मतभेद असतात. एकाच इसमाचें कालचें मत आज रहात नाहीं. आपलें स्वतःचेही विचार व मतें पालटतांना आपल्याला जाणवतात.

अशा स्थितींत कोणतें मत खरें व कोणतें खोटें याविषयीं दृढ विश्वासपूर्वक विधान करणें अशक्य होऊन जातें, व मग कथंतच दुसऱ्याच्या उघड उघड अनुचित वाटणाऱ्या वर्तनाचाही निषेध किंवा

तिरस्कार करण्यास मन धजत नाहीं. मग शासन करण्याचा प्रश्न दूरच राहिला. ज्याला जेव्हां जें खरें वाटेल त्याप्रमाणें त्यावेळीं त्यानें स्वतःचें वर्तन अवश्यमेव ठरवावें, परंतु दुसऱ्याच्या वाटेस जाऊं नये.

७. निसर्गाचा समतोलः—सर्प माणसाला चावतो, म्हणून मीं सर्पाला ठार केलें, तरी तेवढ्यानें मुलखांतील सर्प कमी होतील, अशी खात्री नाहीं. सर्प सर्पांना खातात. विशिष्ट टापूमध्यें अमुक इतक्या सर्पांनाच रहाणें व जगणें शक्य असतें, त्याहून अधिक संख्या झाल्यास ते एकमेकांना खातील, किंवा त्यांचेवर अन्य कसलें तरी अरिष्ट येऊन त्यांची संख्या आपोआप, म्हणजे माणसानें त्यांत ढवळाढवळ न करतांच, कमी होईल.

उलट पक्षीं मीं पांच साप मारले, तर सापांतील यादवी तेवढ्या प्रमाणांत कमी होऊन त्यांची संख्या पूर्ववत् होईल.

जोंपर्यंत एकंदर परिस्थिति कायम आहे, तोंपर्यंत परिस्थितीच्या मागणी इतकी, किंवा परवानगी इतकी, सर्पांची संख्या रहाणारच. तींत तात्पुरता बिघाड होऊं शकेल, पण निसर्ग आपला समतोल गांठल्याखेरीज रहाणार नाहीं.

आणि जेवढ्या अंशानें हा बिघाड होईल, तेवढ्या अंशानें तो माझ्यावरही उलटल्याशिवाय रहाणार नाहीं. कारण, सर्प उंदरांना खातात. सर्प मेले कीं तेवढ्या प्रमाणांत उंदीर बोकाळणार आणि शेतांतील व घरांतील धान्याचा फडशा उडविणार. कदाचित् उंदीर वाढल्यानें प्लेगाचा प्रसार होण्यासही मदत होईल. मग माणसें सर्पदंशानें मरण्याऐवजीं प्लेगानेंच मरतील.

आपणाकडे गोरक्षण-संस्था आहेत त्याप्रमाणें दक्षिण आफ्रिकेंत सर्परक्षण-संस्था आहेत, असें ऐकतों. त्या संस्था भित्ति-पत्रकांमार्फत

"सर्पांना मारूं नका" असा प्रचार करतात. "एका सर्पाला मारणें म्हणजे हजार पौंड धान्याचा नाश करणें होय." कारण, एक सर्प पंचवीस उंदीर खातो व पंचवीस उंदीर हजार पौंड धान्याचा फडशा उडवितात.

यावर तोड म्हणून आपण सर्प व उंदीर दोघांचाही निःपात करण्याचें ठरविलें तर आणखी कोठें तरी बिघाड उमटेल. "भरपाईचा नियम"--लॉ ऑफ कॉंपेन्सेशन्—सृष्टीमध्यें अटल आहे. समुद्राला एका ठिकाणीं मागें हटवाल तर तो दुसरे कोठें तरी तेवढी जमीन गडप केल्याखेरीज राहणार नाहीं.

एक गळूं कापून काढलें तरी आणखी दहा ठिकाणीं गळवें उमटतात. टिकाऊ उपाय पथ्याहार व रक्तशुद्धीचे उपचार हाच असतो. सुधारणा टिकाऊ व्हावयास पाहिजे तर त्यासाठीं केवळ पृष्ठभागावर मलमपट्टी बांधून भागत नाहीं, तर आमूलाग्र सुधारणा करावी लागते.

८. **हिंसा आपल्यावरच उलटतेः**—हिंसा ही दुधारी तलवार आहे; एका धारेनें प्रतिपक्षाला हाणूं जातां मागील धारेनें स्वतः-च्याच शरीरावर वार होतात. ही प्रतिक्रिया दोन प्रकारें घडतेः (१) प्रतिपक्षी आमच्या हिंसेची सव्याज फेड करतो; (२) खुद्द आपल्यामध्यें हिंसावृत्तीची वाढ होते व ती आपापसांतील व्यवहारालाच बाधते.

मी दुसऱ्याचा हिंसक प्रतिकार करूं लागलों कीं तोही माझा हिंसक प्रतिकार करण्यास उद्युक्त होतो. प्रेमानें प्रेम वाढतें त्याच प्रमाणें द्वेषानें द्वेष वाढतो. "अहो तर कांहो, अरे तर कांरे." त्याचप्रमाणें "ही हू ड्रॉज दि स्वोर्ड, शॅल पेरिश बाय दि स्वोर्ड"—तरवार खेंचील तो तरवारीनेंच मरेल. आत्मरक्षणासाठीं म्हणून हिंसक प्रतिकार अवलंबिण्यांत येत असतो, परंतु नेमकें तेंच आत्मघाताचें बिनचूक साधन बनतें. विंचू नेहमीं भेटेल त्याला नांगी मारण्याच्या तयारीनें ती

ग्रा. क्र. ८८३४

उभारून चालत असतो, परंतु त्याच कारणानें विंचू दिसला कीं त्याला तत्काळ ठेंचण्याकडे माणसाची प्रवृत्ति होते. विंचवापाशीं विषारी नांगी नसती किंवा त्यानें तिचा उपयोग केला नसता तर त्याच्या वाटेला कोणी गेलें नसतें. गोगलगाईला कोणी मारीत नाहीं, विंचवाला मात्र मारतात.

"सर्व्हायव्हल ऑफ दि फिटेस्ट्—श्रेष्ठ तेवढेच टिकणार" हा सृष्टीचा नियम म्हणून सांगण्यांत येतो. परंतु ही श्रेष्ठता हिंसाबळाची श्रेष्ठता नव्हे. हिंसा--बलिष्ठाला जगाचें शत्रुत्व संपादन करावें लागतें. साऱ्या जगाचें वैर संपादन करून टिकाव धरणें महादुष्कर आहे. अर्थात् जो हिंसक आहे तो कितीही बलिष्ठ झाला तरी भय-मुक्त नसतो. उलट पक्षीं, जो निर्वैर व निरुपद्रवी आहे तो साहजिकपणेंच सर्वांना हवासा वाटतो; नकोसा तरी वाटत नाहींच. त्यामुळें त्याला शत्रु नाहीं—मित्रच मित्र भेटतात व त्यालाच टिकाव धरून रहाण्याची संधि अधिकांत अधिक असते. बंडाळीच्या काळीं, परकी मुलखांत किंवा जंगली लोकांशीं प्रसंग आला असतां, जे सशस्त्र असतील त्यांना धोका असतो, परंतु जे निःशस्त्र व निरुपद्रवी बाण्यानें फिरतील ते अकुतोभय व शाबूत रहातात, हें अनेक प्रत्यक्ष अनुभवांवरून सिद्ध झालेलें आहे.

या बाह्य विरोधांपेक्षांही हिंसेपाईं निर्माण होणारा अंतर्विरोधच अधिक मर्मच्छेदक बनतो. दुसऱ्याला चिरडण्यासाठीं स्वतःचें युद्धयंत्र —वॉरमशीन—अगोदर घट्ट करावें लागतें. शत्रूचा संहार करण्यासाठीं स्वतःला फौज उभारावी लागते, आणि त्या फौजेला कठोर शिस्तींत किंवा जरबेंत ठेवावें लागतें. एरवीं ऐन प्रसंगीं, मृत्यूचा सामना करावा लागेल तेव्हां, योद्धे भयानें रणांगणांतून पळ काढतील. त्यांनीं तसा पळ काढूं नये यासाठीं "शत्रूवर चालून जाल तर विजयी

होण्याची व निदान कांहींचें प्राण वांचण्याची आशा आहे, पण मागें हटाल किंवा पळाल तर लष्करी कोर्टाकडून देहान्त शिक्षा निश्चित पावाल " अशा पेचांत स्वतःच्या सैनिकांना पकडावें लागतें. रणधुरंधर विजयी सेनानायक तोच होऊं शकतो कीं जो स्वतःच्या सैनिकांविषयीं ही संपूर्णपणें निष्ठुर असतो. शत्रूचा कर्दनकाळ व्हायचें तर स्वकीयांचा कर्दनकाळ अगोदर व्हावें लागतें.

युध्यमान राष्ट्रांमध्यें नागरिक-स्वातंत्र्य संपुष्टांत येतें, सक्तीची लष्कर भरती सुरू होते व इतरही हरएक बाबतींत सक्ती करणें भाग पडतें. शांततेच्या काळीं सरकारी नोकरीचा विशिष्ट मुदतीच्या नोटिशीनें राजिनामा देतां येतो, परंतु युद्धकालीं तसा राजिनामा देतां येत नाहीं, नोकरी केलीच पाहिजे अशी सक्ती असते व लष्करी खात्याची नोकरी तर एकदां पत्करली म्हणजे शांततेच्या काळीं सुद्धां ठरलेली मुदत भरेपर्यंत मध्यंतरीं सोडतां येत नाहीं. मुदतबंदी नोकरी म्हणजे एक प्रकारची गुलामगिरीच आहे व ती विसाव्या शतकांत अद्याप लष्करी खात्यांतच शिल्लक राहिलेली आहे. सैनिकांना वस्त्राभूषणांनीं कितीही सजविले व स्वातंत्र्याचे रक्षक नि राष्ट्राचे तारक म्हणून कितीही गौरविलें तरी ते गुलाम आहेत ही गोष्ट लपवितां येणार नाहीं.

मिलिटरीचा—या देशरक्षकांचा—तळ जवळपास आल्याची वार्ता मिळतांच गोरगरीब स्त्रिया किती धास्ती घेतात व लाकडें, गवत इत्यादि घेऊन बाजारांत विकण्यास जाण्यास किंबहुना घराबाहेर पडण्यासही कशा धजत नाहींत याची कल्पना शहरच्या लोकांनाही स्वानुभवावरून येऊं शकेल. युद्धांत मार खाऊन येणारे हे 'गाझी' लष्करांतून रजा मिळाल्यानंतर आपल्या खेड्यांतील गरीब शेजाऱ्यापाजाऱ्यांना कसे 'त्राहि भगवन्' करून सोडतात त्याचाही गांवोगांवच्या लोकांना अनुभव आहेच.

हिंदु मुसलमानांच्या झटापटीच्या एका प्रसंगाची हकीकत वर्तमानपत्रांत पुढील प्रमाणें आली होती:—हिंदूंच्या पालखीची मिरवणूक एका मशिदीपाशीं मुसलमानांनीं अडविली. अग्रभागीं ढोल वाजविणारे महार होते. महारांना देवस्थानच्या मानकऱ्यांइतका आमच्या देवाच्या पालखीचा अभिमान असण्याचा संभव नाहीं. हिंदुत्वाचा अभिमानही त्यांच्यामध्यें शून्यप्राय असल्यास नवल नाहीं. गरीबीमुळें ते हिंदूंप्रमाणेंच मुसलमानांचेही मिंधे असतात. अशा स्थितींत मुसलमानांच्या धमकावणीपुढें नरमून महार लोक आघाडी सोडून जातील असा संभव होता. म्हणून त्यांना 'भक्कम' करण्यासाठीं मिरवणुकीचा एक पुढारी महारांना उद्देशून ओरडला "खबरदार एक पाऊल हालाल तर! मागें वळाल तर तुमच्या तंगड्याच तोडून टाकीन!" प्रतिपक्षाच्या भीतीपेक्षां स्वतःच्या सेनापतीची सवापट भीति वाटेल तेव्हांच लढवय्यांना शौर्य चढणार!

पठाण लोक अत्यंत कडवे, मृत्यूविषयीं अत्यंत बेफिकीर व एवढ्या—तेवढ्या कारणावरून सुरा काढणारे म्हणून प्रसिद्ध आहेत; त्यामुळें इतर लोक त्यांना वचकून असतात. परंतु ही त्यांची झगडाऊ वृत्ति आपापसांतील व्यवहारांत त्यांची त्यांनाच घातक होते. त्यांचीं कौटुंबिक वैरें व अपकारांचा सूड घेण्याची ईर्ष्या पिढ्यान् पिढया घुमसत रहाते व त्यापायीं कुटुंबेंच्या कुटुंबें नष्ट होतात. हीच परंपरा चालल्यास पठाण जातच पृथ्वीतलावरून नामशेष होऊन जाईल हें त्यांचे थोर व भविष्यदर्शी पुढारी खान अबदुलगफारखान यांनीं ओळखलें. म्हणूनच ते आपल्या अनुयायांमध्यें अहिंसेचा प्रचार अत्यंत कळकळीनें करीत आहेत.

हिंदुस्थानांत क्षत्रियांनीं युद्ध हा पेशा म्हणून स्वीकारला व वाढविला. महाभारत—युद्धामध्यें या पेशानें उच्चांक गांठला परंतु

युद्धापाईं भयंकर संहार झाला, राष्ट्राच्या पौरुषाची खच्ची झाली व क्रमानें पुढें यादव कुलही 'यादवी'—पाईं समूळ नष्ट होऊन गेलें.

विश्व एक आहे. आपपर भेद हे कल्पित आहेत. सारी मनुष्य-जात हा एक विराट्पुरुष असून आपण व्यक्ति त्या पुरुषाचे अवयव आहोंत. त्यामुळें आम्हीं दुसऱ्याला म्हणून केलेला अपकार स्वतः आम्हांलाच येऊन पोंचतो. "केलां तुका तां झालां माका"—तुला म्हणून केलें तें उलट मलाच भोंवलें किंवा "इच्छी परा तें येई घरा" हा अनिवार्य सृष्टिक्रम आहे.

९. "पाय धरिल्या न चळे बळ":— येथवर आपण आगळीक दुसऱ्याकडून घडली आहे असें कल्पून विचार केला. कधीं कधीं आपल्याकडूनच आगळीक घडली आहे याची आपल्याला मनां-तून जाणीव असते, परंतु अपकृत इसमानें आपल्याला हटकलें असतां आपण दुरभिमानास पेटून आपली चूक प्रांजलपणें कबूल करीत नाहीं, उलटेंच आत्मसमर्थन करूं पहातों. अशानें प्रतिपक्षी अधिकच बिघडतो व प्रकरण हातघाईवर येतें. परंतु समोरच्या माणसाच्या पहिल्या प्रश्नासरशीच आपण चूक पदरांत घेतली तर मात्र तो तत्काळ थंड पडतो. "तुका म्हणे कळ। पाय धरल्या न चळे बळ॥"

प्रांजल कबुलीनें साऱ्या दोषांची क्षमा मिळते. "जो आपले दोष उघडे मांडतो, त्याच्या दोषांवर जग पांघरूण घालतें; जो आपले दोष झांकूं पहातो, त्याचे दोष जग उघडे पाडतें." प्रत्यक्ष घडलेली अलीकडचीच गोष्ट आहे; एका तरुणाकडून एका मजुराच्या स्त्रीशीं तारुण्यसुलभ दुर्वर्तन घडलें. पश्चात्ताप झाला. त्यानें त्या प्रमादाची आपल्या गुरूपाशीं कबुली दिली. गुरुजी म्हणाले, "माझ्यापाशीं कबुली दिल्यानें भागत नाहीं; तूं ज्याचा अपराध केलास त्या मजुरा-पाशीं कबुली दे." तो श्रद्धावान् तरुण त्या मजुराकडे गेला. मजूर

मराठी ग्रंथ ... ठाणे ... क्रमांक ... नों: दि:

कुऱ्हाडीनें लांकडें फोडीत होता. कुऱ्हाडधारी पुरुषापाशीं असली कबुली देण्याचें त्याला विशेष भय वाटलें; म्हणून त्यानें त्या मजुराला कुऱ्हाड खालीं ठेवण्यास सांगून बाजूला नेलें व त्याचेपाशीं अपराधाची कबुली दिली.

मजुराला केवळ गहिंवर आला!

"जित शुद्ध तरी । शत्रु मित्र होती ॥"

**१०. सुधारणा अहिंसेनेंच शक्यः—** पंतोजी काठीच्या मदतीनें विद्यार्थ्यांना पढवूं पहात, परंतु ती पद्धति अडाणी व निष्फळ आहे. हें आतां सर्व शिक्षणानुभवींना मान्य झालेलें आहे. विद्यार्थ्यांमध्यें जिज्ञासा व ज्ञानार्जनाविषयीं हौस निर्माण केल्यानेंच त्याची प्रगति निश्चितपणें व वेगानें होऊं शकते. उलट काठीच्या प्रयोगामुळें मुलांमध्यें विद्येविषयीं अरुचि उत्पन्न होते. विद्यार्थ्यांचे डोक्यांत सक्तीनें कोंबलेलें ज्ञान आंत शिरत नाहीं, शिरलें तरी ठरत नाहीं आणि ठरलें तरी पचत नाहीं. आणि मी 'ढ' आहें असा न्यूनगंड विद्यार्थ्यांमध्यें एकदां का निर्माण झाला कीं तो जन्माचा अरेशी झाला समजावें.

मुलाच्या नैतिक सुधारणेला तर हें विशेषच लागू आहे. शिक्षा व धाक यांनीं नैतिक सुधारणा घडवून आणणें फारच कठिण आहे. मुळांत मुलाची जी खोटें बोलण्याकडे किंवा चोरी करण्याकडे प्रवृत्ति होते तीच वडील माणसांविषयींच्या धाकामुळें व अविश्वासामुळें— त्यांच्यापुढें प्रांजलपणें वस्तुस्थिति मांडल्यास तीं रागावून आपल्याला शिक्षा करतील, किंवा आपल्या मनीषा त्यांना कळविल्यास त्या पुऱ्या करण्याऐवजीं आपली हेटाळणी मात्र करतील या अपेक्षेंतूनच—निर्माण होते. त्यांना शिक्षा केल्यानें, हेटाळणी केल्यानें, किंवा धाक दाखविल्यानें रोग अधिकच बळावतो; वरकरणी दबलासा वाटला तरी अधिक खोलांत शिरतो. मुलाची सुधारणा होण्यासाठीं पहिली आवश्यक गोष्ट

ही आहे कीं मुलाला आपले पालक किंवा शिक्षक यांचे बद्दल निर्धास्तपणा, निर्भयता, प्रेम व आदर हीं वाटलीं पाहिजेत. आपण कांहीं केलें, केवढाही अपराध केला, तरी वडील माणसें आपल्याला शिक्षा करणार नाहींत, रागावणारही नाहींत, आपला तिरस्कार करणार नाहींत, आपल्यावरील त्यांच्या प्रेमांत अंतर तर पडणार नाहींच पण उलट तें प्रेम अधिकच भरून येईल, अशी एकदां मुलाची खात्री पटली कीं तो सुधारणेच्या मर्गाला लागलाच म्हणून समजावें.

सन्मित्र हा अमूल्य ठेवा आहे म्हणतात तें म्हणूनच. ज्या मनुष्याला खरा जिवाभावाचा मित्र लाभला आहे, ज्याला या जगांत एक तरी विश्वासाचें स्थान आहे, तो भाग्यवान् आहे. तो कधीं आत्महत्या करणार नाहीं, त्याचें कितीही पतन झालें तरी त्याच्या उद्धाराचा मार्ग खुंटत नाहीं. प्रेमाला असाध्य असें कांहींच नाहीं.

जशी लहान मुलांची तशीच गुन्हेगारांची सुधारणाही शिक्षेनें होऊं शकत नाहीं. खरी सुधारणा ही पश्चात्तापानें किंवा स्वयंस्फूर्तीनेंच व्हावी लागते. शिक्षेमुळें पश्चात्तापाचा मार्गच खुंटून जातो. मीं चोरी केली या बद्दल माझें मन मला खात असतें. परंतु पोलिसांनीं मला पकडला, मला मारहाण करून कबूल करविण्याचा व्यर्थ प्रयत्न केला, मीं खरोखरी केलेली चोरी शाबित करण्यासाठीं खोटे साक्षी सुद्धां उभे केले परंतु मॅजिस्ट्रेटनें साक्षी अविश्वासार्ह ठरवून मला सोडून दिलें म्हणजे त्या जयानें मी शेफारून जातों व पश्चात्तापाऐवजीं मला प्रौढिच वाटूं लागते. उलटपक्षीं खऱ्याखुऱ्या पुराव्यावरूनही मॅजिस्ट्रेटनें मला जबर शिक्षा दिली तरीही मी मनाशीं म्हणतों, "मींच एक चोरी केली असें थोडेंच आहे? इतर थोडे चोऱ्या करतात? मला मात्र इतकी जबर शिक्षा? हरकत नाहीं, पाहून घेईन इत्यादि."

अशा तऱ्हेनें खटल्यामुळें गुन्हेगाराची सदसद्विवेकबुद्धि मारली जाते. तुरुंगांत इतके कैदी हरप्रकारचे गुन्हे करून शिक्षा भोगीत असतात, परंतु त्यांपैकीं एकालाही "मी समाजाचा गुन्हेगार आहें, स्वतःच्याच कर्माचीं फळें भोगीत आहें" असें जाणवत असल्याचें आढळत नाहीं. शिक्षेमुळें गुन्हेगार समाजावरच उलटतो, बेगर्वा व बेमुर्वतखोर बनतो. वारंवार शिक्षा झाल्यानें तर तो कोडगा व गुन्ह्यांतच भूषण मानणारा बनतो. गुन्हे करण्याखेरीज अन्य पेशाच त्याला उरत नाहीं. तुरुंग हाच त्याचा आश्रम बनतो. "ईव्हल बी दाउ माय गुड"–पापा, तूंच माझें पुण्य हो–असें तो मिल्टनकृत पॅरॅडाइझ लॉस्ट मधील सैतानाप्रमाणें म्हणूं लागतो.

कडक शिक्षा देत राहिल्यानें समाजांतील गुन्ह्यांचें प्रमाण कमी होत नाहीं, उलट शिक्षा सौम्य केल्यानें गुन्ह्यांचें प्रमाणही कमी होतें असा अनेक देशींचा अनुभव आहे.

पं. जवाहरलाल नेहरूंनीं लिहिलें आहेः "अज्ञ लोकांची कल्पना असते कीं गुन्हेगारांना पुरेशा कडक शिक्षा मिळत गेल्या नाहीं तर गुन्हे वाढतील. वस्तुतः खरी स्थिति याच्या अगदीं उलट आहे. शंभर वर्षांमागें इंग्लंडांत भुरट्या चोरांना फांशी देत. चोरांना फांशी देऊं नये अशी सूचना पुढें आली तेव्हां तिच्या विरूद्ध भयंकर ओरडा झाला. लॉर्डांच्या सभागृहांत थोर थोर उमरावांनीं सांगितलें कीं अशानें चोर दरोडेखोर कोणतीच वस्तु शिल्लक ठेवणार नाहींत आणि झोटिंगशाही माजेल. परंतु त्या सुधारणेचा प्रत्यक्ष परिणाम उलट झाला; गुन्ह्याचें प्रमाण कमीच झालें. इंग्लंडांत व इतर देशांत जेथें फौजदारी कायदा व तुरुंग यांमध्यें सुधारणा घडून आल्या तेथें गुन्हेगारी क्रमाक्रमानें कमी होत गेली आहे. इंग्लंडांत कित्येक जुन्या तुरुंगांची अलीकडे गरज राहिलेली नाहीं, त्यांचा इतर कामांसाठीं उपयोग करतात." (इंडिया अँड दि वर्ल्ड पृष्ठ १२३ प्रकाशक जॉर्ज अॅलन् अन्विन्, लंडन.)

मुलांच्या व गुन्हेगारांच्या सुधारणेप्रमाणेंच मद्यनिवृत्ति, पथ्याहार, खादीप्रचार यांसारख्या प्रौढ माणसांच्या जीवनांतील सुधारणाही धाकदपटशानें करूं पहाणें हें अडाणीपणाचें, दुर्बलतेचें, उतावळेपणाचें व अज्ञानाचें लक्षण आहे. मद्यपान—निषेधाची लाट उसळली म्हणजे पुष्कळदां असें घडतें कीं दारूबाज मनुष्य "ही दारू अजीबात बंद झाली पाहिजे. मी अतःपर दारूला शिवणार नाहीं" असा निर्धार करतो. तो निर्धार पवित्र व मनापासूनही असतो, परंतु पुष्कळदां त्यांत धीर व स्थैर्य नसतें. मीं दारू सोडली तरी माझे दुष्ट शेजारी अद्याप दारू पितात. माझ्या या अतुल आत्मनिग्रहाचा सुद्धां या कोडग्या लोकांवर तिळमात्र प्रभाव पडत नाहीं; हें बऱ्या बोलानें वळणारे नव्हत, याना चांगली अद्दलच घडली पाहिजे, यांच्या तोंडाला डांबर फासूं या" असें म्हणून आमचा नवसुधारक नाना अत्याचारांना प्रवृत्त होतो. गुत्त्यांना आगी घालतो. तरीही इतर लोकांना दारू पितांना पाहून तो मनाशीं म्हणतो: "मी इतक्या कंठरवानें उपदेश केला, आपल्या जीवाची आटापीट केली, तरी त्याचें यांना कांहींच नाहीं. यांनीं खुशाल दारूची लज्जत चाखावी आणि मीं मात्र माझा जीव मारावा? मींच काय चोरी केली आहे?" असें म्हणून तो मध्यंतरींच्या खाड्यांची भरपाई करण्याच्या उत्सुकतेनें गुत्त्याची वाट धरतो. परंतु जवळचा त्यानेंच जाळलेला गुत्ता अद्याप पुन्हां उभारून झाला नसल्यानें बिचाऱ्याला दूरपर्यंतचा हेलपाटा पडतो!

दारूबंदीच्या या हिंसक प्रकारांतील खुबी हीच असते कीं "दारू सोडण्यांत मी मोठा स्वार्थत्याग केला, स्वतःचें नुकसान करून घेतलें, स्वतःच्या सुखावर लाथ मारली," अशी जाणीव किंवा रुखरुख सुधारकाच्या मनामध्यें वसत असते. अशा दृष्टीनिशीं केलेली दारूबंदीची चळवळ फसावी हें योग्यच आहे. परंतु दारू सोडण्यांत माझें कल्याण आहे, मी दारू सोडूं शकलों हें माझें मोठें सुदैव होय,

इतर लोक दारू पितोत किंवा आणखी कांहीं करोत, मी माझा मार्ग सोडण्याचें कारण नाहीं, इतर लोक खड्डयांत पडतात म्हणून मीही खड्डयांत पडावें असें थोडेंच आहे? मला जो हिताचा मार्ग वाटला व अनुभवानें पटला तो इतरांना ही दाखवून देणें एवढेंच माझें सामाजिक कर्तव्य आहे" अशा विचारानें कामाला लागणाऱ्या मासणाच्या मनाला धाकदपटशानें काम करण्याचा विचार शिवतही नाहीं. त्याचा दारूबंदीचा प्रयत्न सावकाश कां होईना परंतु यशस्वी झाल्याविना राहणार नाहीं.

सुधारणा ही खरोखरीचीच सुधारणा असेल, हितकारक असेल, न्यायाची असेल, तर ती स्वतःच्या गुणांनींच प्रसार पावेल, तिला धाकदपटशा, गुंडगिरी इत्यादींची आगंतुक मदत अनावश्यकच नव्हे तर मारक आहे. सत्य व मांगल्य हीं स्वयंप्रेरक व स्वयंप्रचारित असतात. त्यांना तरवारीची मदत लागत नाहीं. तरवारीची कुसंगत धरल्यानें त्यांची नापत मात्र होईल. उदा० खादी वापरणें ही गोष्ट चांगली असेल तर तिच्या प्रसारासाठीं सक्तीची आवश्यकता नाहीं, आचरण, उपदेश व विवेचन एवढ्यांनींच तिचा प्रसार होत जाईल. १९१९ सालीं एकटे गांधीजीच खादी वापरीत. आज पंचवीस वर्षांनंतर लक्षावधि लोकांनीं तीच बाणा स्वीकारला आहे. हा कशाचा परिणाम? गांधीजींनीं आमचेवर खादी सक्तीनें किंवा धाक दाखवून लादली होती का? नाहीं. त्यांनीं "आधीं केलें, मग सांगितलें;" खादीची उपयुक्तता व नैतिक श्रेष्ठता आम्हांला परोपरींनीं समजावून दिली. गांधीजींच्या व इतर थोर पुढाऱ्यांच्या उदाहरणानें व खादीच्या गुणांनीं आम्हीं आकर्षिले गेलों व स्वतः खादीधारी नि खादी प्रचारक बनलों.

याचे उलट राष्ट्रीय उत्थानाच्या प्रसंगीं क्वचित् कोणी सोट्याच्या साह्यानेंही गांधीटोपीचा प्रचार करूं पाहतात, रस्त्यानें जाणारांच्या

काळया किंवा विलायती टोप्या हिसकून घेण्यांत येतात व जाळल्या जातात. परंतु हा प्रचार जितका उतावळा तितकाच अल्पजीवी असतो. स्वतः प्रचारकही अंमळशानें विलायती टोपींत मिरवूं लागतो.

धर्मप्रसार तरवारीच्या जोरावर करूं पहाणें हा तर निव्वळ वेडेपणा आहे, किंवा पाखंड तरी आहे, हें आतां निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. धर्म ही माणसाची सर्वांत बलिष्ठ प्रेरक शक्ति असल्यानें धर्माच्या बचावासाठीं व प्रसारासाठीं मनुष्य आपली सारी शक्ति पणाला लावतो. यच्चयावत् शक्ति लागू करण्याची अनिवार्य प्रेरणा उत्पन्न झाली, परंतु त्याबरोबरच ती शक्ति वापरण्याच्या योग्य परिणामकारक पद्धतीविषयींचा विवेक नसला, म्हणजे व्यक्तीची, तशीच सबंध समाजांचीही, वेड्यासारखी स्थिति होते. एकाच विचारानें सर्वस्वीं भारून जाणें हा वेडाचाच प्रकार आहे. सात्त्विक संतापाचीं लक्षणें पिशाचबाधेसारखींच असतात.

धार्मिक आवेश हा सर्वंकष आवेश असतो. म्हणून पाण्याच्या लोंढ्यामध्यें ज्याप्रमाणें नानाप्रकारचा मळ वाहून येतो त्याप्रमाणेंच धर्माच्या निमित्तानें माणसांतील हीनतम अभिमानही प्रकट होत असतात. माझा धर्म नव्हे, तर माझा धर्म, माझा देव, माझी संस्कृति यांसाठीं मनुष्य इतरांचीं मुंडकीं उडविण्यास उद्युक्त होतो. ‘ धर्मप्रसार ’ हा पुष्कळदां पक्षप्रचारच असतो; व ‘ धर्माचा बचाव ’ हा स्वजाति—रक्षणाचाच मुलामा दिलेला प्रकार असतो.

आत्म–सुधारणा हाच सर्व सुधारणेचा बिनचूक स्वाधीन असा मार्ग आहे. सारें विश्व जर एक म्हणजे परस्परांत गुंतलेलें आहे तर त्याच्या एका भागाची सुधारणा साऱ्या विश्वाची सुधारणा केल्या खेरीज रहाणार नाहीं—व होणारही ही नाहीं. मी सुधारलों म्हणजे जग सुधारेल व जग सुधारल्याखेरीज

माझी स्वतःची सुधारणा पक्की होणार नाहीं. याच्या उलट, स्वतःची सुधारणा करण्याचे अगोदर सारें जग सुधारूं पहाणें हें भलत्याच कष्टाचें काम आहे, व तें माझ्या आटोक्यांतही नाहीं. उन्हानें तापलेल्या जमिनीवरून चालतांना पायांना चटके बसूं नयेत म्हणून साऱ्या जमिनीवर चामडीं आंथरणें ही अशक्य सुधारणा आहे, परंतु मीं स्वतःच्याच पायांत पायतणें घालणें हें सुलभ व स्वाधीनचें आहे. पृथ्वी—प्रदक्षिणा करण्याची फार सोपी युक्ति आपल्या धार्मिक विधींमध्यें सांगितलेली आहे—स्वतःच आपल्या भोंवतीं एक गिरकी घेणें. म्हणून ज्याला विश्वक्रांति पाहिजे त्यानें प्रथम आत्मक्रांति करावी.

आत्मसुधारणेचा कोंब प्रत्येक माणसाचे हृदयामध्यें असतो. सक्ती, निंदा, इत्यादींमुळें तो कोंब दबून किंवा सुकून जातो. स्वतंत्रता, निर्भयता इत्यादींच्या उबदार प्रकाशांत त्याची झपाट्यानें वाढ होते.

समाज हा एक भला मोठा प्रासाद आहे. या प्रासादाला अगणित दारें आहेत परंतु तीं आंतून बंद केलेलीं आहेत. माझें जीवन हेंही त्याप्रासादाचें एक दार असून तेवढेंच मला खुलें आहे. त्या दारानें मी प्रासादांत शिरलों कीं मग बाकीचीं दारेंही उघडणें कठिण नाहीं. परंतु हा स्वाधीन मार्ग टाकून मी अगोदर इतर दारांशीं जाऊन त्यांवर धक्के मारतों. परिणामीं माझे पदरीं शीण पडतो, पण दारें मात्र उघडत नाहींत.

आत्मसुधारणा हा विश्वसुधारणेचा स्वाधीन व बिनचूक उपाय असला तरी क्लेशरहित आहे असें मात्र नाहीं. अघाडीच्या सैनिकांच्या वांट्याला मरणच असतें. पिछाडीचे सैनिक त्यांच्या मुडद्यांवरून विजयाकडे चालून जातात. त्याचप्रमाणें कोणत्याही सुधारणेंतील अग्रेसराला, अर्थात् सुधारणेच्या मातेला, प्रसववेदना भोगल्याखेरीज गत्यंतर नसतें. नवीन जवळची वाट चालणाराला कांट्याकुट्यांतून

चालावें लागतें; ती मळल्यानंतर चालणाराला कांटे बोचत नाहींत व कमी अंतराचा फायदा मात्र मिळतो. सुधारणेचें नेतृत्व हा एक प्रकारचा सत्याग्रह म्हणजे हट्टच आहे व हट्टी मुलाला त्याचा हट्ट पुरा होईपर्यंत क्लेश सोसावे लागणारच. परंतु मानवी जीवनाचें साफल्य अशा तऱ्हेनें क्लेश सहन करीत पुढें पुढें जाण्यांतच आहे.

११ कर्ता व कृत्यें—कर्ता व कृत्य यांमध्यें महत्त्वाचा फरक असून तो लक्षांत घेणें आवश्यक आहे. जगांत पापें व गुन्हे अनेक घडतात, परंतु निर्लेप 'पापी' किंवा 'गुन्हेगार कोणीच नाहीं. ज्यानें एकदां चोरी केली त्याला चोर म्हणणें हें प्रत्येक सायकल स्वाराला किंवा पहिलवानाला 'पड्या' म्हणण्याप्रमाणेंच आहे, कारण साय-कलवरून कधीं पडला नाहीं असा सायकल स्वार, किंवा कुस्तींत कधीं हरला नाहीं असा पहिलवान मिळणें कठीण आहे. आपण चोरीचा निषेध वा तिरस्कार अवश्य करावा, परंतु 'चोराचा' करणें योग्य नाहीं. ज्याला आपण चोर म्हणतों तो चोर नसून साधासुधा तुमच्या–आमच्यासारखा माणूसच आहे. जगांत जसा कोणी केवळ सुखी किंवा सर्वस्वीं दुःखी नाहीं, प्रत्येकाला सुख-दुःख दोहींचे अनुभव कमी–अधिक प्रमाणांत मिळत असतात, त्याचप्रमाणें चोर, खुनी, पापी असे कायम ठसे घेऊन आलेलेही कोणी नाहींत.

पाप्यांचें निर्दलन हें ईश्वरी कार्य व दुष्टांचें शासन हें राजाचें तसेंच समाजसेवकाचें कर्तव्य मानण्यांत येतें. ज्या भाग्यवंताला खऱ्याखुऱ्या 'पापी' किंवा 'दुष्ट' मनुष्याचें दर्शन होईल त्यानें हीं दिव्य कार्यें करण्यास हरकत नाहीं, परंतु ज्यांच्या नशिबीं असलें दर्शन नाहीं त्या आम्हीं तुम्हीं काय करावें? आमचें काम पापाचें निर्दलन एवढेंच आहे, पाप्यांचें नव्हे.

परंतु रोगाचा प्रतिबंध करण्याऐवजीं आपण रोग्यालाच मारून मोकळें होऊं पहातों!

**१२ दुष्टपणाला मर्यादा असतात**—कोणी जन्मानें चोर नसतो; गांजणूक, उपासमार—स्वतःपेक्षांही आपल्या प्रियजनांची उपासमार—इत्यादींमुळें मनुष्य चोरीकडे वळतो. तो चोरी करतो तीही माझी नजर चुकवूनच करूं इच्छितो. माझ्या देखत व मला मारहाण करून तो माझी संपत्ति हरण्यास धजत नाहीं. याला सरकारची व माझी भीति कारणीभूत नसतें असें नाहीं, परंतु त्या-खेरीज पापभीरुतासुद्धां कारणीभूत असते. त्याला चोरी करण्याचें कांहीं वाटत नाहीं, परंतु चोरीसाठीं मारामारी किंवा खून करावा लागणार असेल तर त्यापेक्षां तो उपाशी रहाणें किंवा भीक मागणेंही पसंत करील.

मऊ माती कोणी झाला तरी कोपरानें खणूं पहातो. रस्त्यानें जाणाऱ्या एकट्या-दुकट्या वाटसरूला दरडावण्यानें व नुसता धाक दाखवण्यानेंच जर तो आपला पैशाचा बटवा काढून देऊन पळ काढ-णार असेल तर तेवढा प्रयोग करण्याचा मोह आम्हांतुम्हांलाही पडेल. एक भागूबाई बनला कीं दुसऱ्याला धटिंगण बनण्याची ऊर्मि येते. परंतु जर तो वाटसरू आमच्या धमकावणीला भीक न घालतां आमचा प्रतिकार करण्यास सरसावला तर आम्हांला आमच्या कार-स्थानाचा फेरविचार करावा लागेल. “प्राण गेला तरी बेहेत्तर, पण धमकीला वश होणार नाहीं” असें म्हणणारे वाटसरू भेटतील तर निर्ढावलेला डाकूही निवळल्या खेरीज राहणार नाहीं. कदाचित् तो एकादुसऱ्या वाटसरूचा खूनही करील, परंतु मागाहून आपला क्रम भलत्याच थरावर गेला असें पाहून त्याचा त्यालाच पश्चात्ताप होईल. वाटसरूचा प्रतिकार जितका अहिंसक असेल तितका पश्चा-त्ताप अधिक लवकर घडून येईल.

पुष्कळ चोऱ्या व दरवडे केवळ साहसप्रियतेमुळेंही घडत असतात. त्यांत सहेतुक दुष्टपणा नसतो पण अविचारी बेपर्वाई असते.

भ्याडपणापाईं दरवड्याचा प्रतिकार घडला नाहीं कीं मग त्या साहसी व अल्पश्रमानें बहुफलदायी धंद्याची चटक लागते. म्हणून भ्याड शरणागतीपेक्षां अन्यायाचा प्रतिकार श्रेष्ठ. मात्र प्रतिकारांमध्यें हिंसक प्रतिकारापेक्षां अहिंसक प्रतिकार श्रेष्ठ.

"मरेन पण जुलमाला वश होणार नाहीं; मोडेन पण नीचापुढें वांकणार नाहीं" असें जालिमाला छातीठोकपणें सांगणाऱ्या—व त्याप्रमाणें वागणाऱ्या—माणसांवर जालीम कितीही दुष्ट असला तरी जुलूम चालवूं शकत नाहीं; कारण, प्रत्येक दुष्टाच्यादुष्टतेला सीमा असते; अहिंसक प्रतिकारकाच्या आत्मयज्ञानें ती सीमा गांठली कीं त्याची फत्ते ठरलेली आहे.

१३ **सेवा व हिंसा**—मनुष्य पोटासाठीं हिंसा करतो, मत्स्य, मांस इत्यादि खातो. पोटासाठीं खातो किंवा जिव्हालौल्यासाठींही खातो. स्वतः कसेंही करून जगण्याच्या अनिवार्य उत्सुकतेमुळें सर्पाला ठार करतो, उंदरां ढेंकणांचा संहार करतो. देवी, प्लेग, पटकी इत्यादींच्या निवारणार्थ प्राणिजन्य लशी टोंचून घेतो. हा सारा त्याच्या दुर्बलतेचा किंवा देहासक्तीचा परिणाम म्हणून एक वेळ क्षम्य समजतां येईल.

परंतु पोटोबाच्या नव्हे तर विठोबाच्या म्हणजे ईश्वराच्या नांवानें हत्या करणें, बकरे-कोंबडीं-रेडे इत्यादींचा बळि देणें हा बुद्धीचा भ्रम आहे व तो विशेष शोचनीय आहे. बकरा हा माणसाप्रमाणेंच ईश्वराचें लेंकरूं आहे. देवबापाला त्याच्याच लेकराचा बळि देऊन संतोषवूं पहाणें किती विपरीत आहे !

म्हणून आपण आपल्या खाण्यापिण्यामध्यें मांसाचा किंवा दारूचा उपयोग केला तरी देवाला देण्याच्या नैवेद्यामध्यें तीं वर्ज्यच मानलीं पाहिजेत. आपण शिळेंपाकें खातों, कांदा खातों, पण ते

जिन्नस देवाच्या नैवेद्यांत घालीत नाहीं. त्याचप्रमाणें आपण आपल्या पोटासाठीं, स्वार्थासाठीं, प्रपंचासाठीं पापें केलीं तरी देवाच्या नांवानें किंवा देवा प्रीत्यर्थ पापें करणें विशेषच निषिद्ध समजावें.

कसलेंही सेवा-कार्य म्हणजे ईश्वराला अर्पण करावयाचा नैवेद्यच आहे. सेवा म्हणजे निःस्वार्थी कर्म. मला अमुक गोष्ट करणें आवडतें, उदा० गाण्याची स्फूर्ति येते, पाण्यांत डुबावेंसें वाटतें, किंवा चांदण्यांत हिंडण्याची मौज वाटते म्हणून त्या त्या गोष्टी करणें म्हणजे सेवा नव्हे. किंवा अमुक गोष्ट माझ्या सोईची आहे, फायद्याची आहे, माझी कीर्ति किंवा प्रतिष्ठा वाढविणारी आहे, म्हणून ती करणें म्हणजे ही सेवा नव्हे. परतफेडीच्या अपेक्षेनें दुसऱ्याला दिलेली मदत हा व्याज-बट्ट्याचाच प्रकार समजण्यास हरकत नाहीं. परंतु अमुक गोष्ट करणें आवश्यक आहे, उचित आहे, कर्तव्य आहे म्हणून निरपेक्ष बुद्धीनें, अनासक्त बुद्धीनें, ईश्वरार्पण-बुद्धीनें केलेलें कर्म म्हणजे सेवा.

परंतु विशेष लक्षांत भरण्यासारखी गोष्ट ही आहे कीं स्वतःच्या पोटासाठीं पशुहिंसा करणें निषिद्ध मानणारे लोकही यज्ञार्थ पशुहिंसा विहित मानतांना ज्याप्रमाणें आढळतात, त्याचप्रमाणें खासगी व्यवहारांत असत्य व हिंसा पाप मानणारे लोकही समाजाच्या किंवा देशाच्या फायद्यासाठीं असत्य किंवा हिंसा यांचा उपयोग करणें विहित मानतात. परंतु हा भ्रम आहे, अधर्म आहे व तो धर्माचें सोंग घेऊन वावरत असल्यानें विशेषच घातुक आहे. उघड शत्रु तितका घातक नसतो, जितका मित्र म्हणून सलगी करणारा शत्रु घातक असतो. लोखंडी बेडीनें हातपायच जखडले जातात, परंतु सोनेरी बेडीनें मनही जखडलें जातें.

निःस्वार्थ बुद्धीनें किंवा परोपकारार्थ हिंसा करण्यास हरकत नाहीं, एवढेंच नव्हे तर कित्येकदां हिंसा करणें कर्तव्य ठरतें, अहिंसा हा अधर्म ठरतो, असें प्रतिपादिलें जातें. त्यासाठीं जें एक उदाहरण वारंवार दिलें जातें त्याचाच आपण विचार करूं:–" एखादा नराधम एखाद्या अबलेवर बलात्कार करूं पहात आहे, अशा प्रसंगीं त्या अबलेची सुटका करण्यासाठीं त्या नराधमाला ठोकणेंच आवश्यक आहे."

या असल्या उदाहरणांमध्यें असें कल्पिलेलें असतें कीं (१) दुर्जन हा दुष्टपणाचा—येथें कामवासनेचा—पुतळा आहे; (२) दुर्बल हा दुर्बलतेची, तशीच निष्पापतेची, मूर्ति आहे; (३) दुर्जन हा दुर्बलाच्या तुलनेनें अपार शक्तिमान् असला तरी दुर्बलाच्या कैवारी सेवकाच्या तुलनेनें कमताकत आहे. नाटकांत ज्याप्रमाणें नायक यच्चयावत् गुणांचा व प्रतिनायक यच्चयावत् दुर्गुणांचा पुतळा असतो, तसेंच या युक्तिवादांतही असतें.

परंतु या मूर्ति नाटकांत शोभत असल्या तरी युक्तिवादांत शोभत नाहींत, कारण प्रत्यक्ष जीवनांत अशा भाववाचक, निर्लेप मूर्ति कोठेंच आढळत नाहींत. दुर्जनाची दुष्टता, तशीच दुर्बलाची दुर्बलता व निष्पापता, मर्यादित असतात. उभयतांमध्यें तद्विरुद्ध गुणांचेंही थोड्या तरी प्रमाणांत मिश्रण असतेंच. पाप प्रकाशाला भितें. प्रस्तुत उदाहरणामध्यें दुर्जनाची पाशवी वासना आपल्याला कोणी पहाणारा नाहीं अशा कल्पनेनें मोकाट सुटूं पहात असली तरीही तिऱ्हाइतानें मध्यें पडून नुसती आरडाओरड केली तर तेवढ्यानेंही तो खजील व परावृत्त होईल असा संभव आहे. दुसरी गोष्ट ही कीं तिऱ्हाइताची जागा व मदत मिळतांच त्या अबलेलाही अवसान येईल व तीही त्या नराधमाचें अधिक नेटानें निवारण करूं शकेल. किंवा ती अबला व तो कैवारी यांची संयुक्त शक्ति प्रतिपक्षावर आघात न करतांही त्याचें निवारण

करण्यास समर्थ होईल. विचारांत घ्यावयाची तिसरी गोष्ट अशी कीं त्या उभयतांची अहिंसक, म्हणजे आत्मसंरक्षक, शक्ति दुर्जनाचें निवारण करण्यास पुरेशी नसेल तर त्यांची हिंसक शक्ति म्हणजे आघातक शक्ति तरी त्याला पराभूत करण्यास समर्थ होईल असें कोणीं सांगावें ?

**शिबिराजाचें उदाहरण:**—शरणार्थ्याचें प्रबलापासून संरक्षण करण्याची निर्दोष पद्धति शिबिराजाच्या गोष्टीवरून दिसून येते. एक ससाणा एका कबुतराला पकडून खाण्यासाठीं त्याचा पाठलाग करीत असतां कबुतर आश्रयार्थ सूर्यवंशीय थोर राजा शिबि याजकडे गेलें व "माझें या अन्यायी ससाण्यापासून रक्षण करा" अशी विनंति करतें झालें. ससाणाही पाठोपाठ तेथें येऊन प्रतिवादी या नात्यानें हजर झाला. शिबीनें त्याला कबुतरावर हल्ला करण्याची मनाई केली, तेव्हां ससाणा म्हणाला : "कबुतर हें माझें ईश्वरानें नेमलेलें भक्ष्य आहे. माझें हक्काचें भक्ष्य माझेपासून हिरावून घेऊन मला भुकें मारणें तुझ्यासारख्या न्यायी राजाला शोभणार नाहीं." राजा पेंचांत पडला. एका बाजूला शरणार्थ्याचें संरक्षण करण्याचें पवित्र कर्तव्य तर दुसऱ्या बाजूला ससाण्याचा नैसर्गिक आहार तोडण्याचें पाप. परंतु त्याला युक्ति सुचली. तो ससाण्याला म्हणाला "तूं स्वभावतः मांसाहारी असल्यानें कबुतराचे ऐवजीं मी तुला फळें किंवा मिठाई दिली तर भागणार नाहीं हें खरें आहे म्हणून मी तुला कबुतराऐवजीं माझ्याच शरीराचें भारंभार मांस तोडून देतों. त्याचा स्वीकार करून तूं कबुतराचे प्राण घेण्याचा इरादा सोडून द्यावा".

तडजोड मान्य झाली. ताजव्याच्या एका पारड्यांत कबुतराला बसवून दुसऱ्या पारड्यांत राजा आपल्या मांसाचे लचके तोडून तोडून घालूं लागला. परंतु कांहीं केल्या वजनाची भरती होईना. अखेरीस राजा स्वतःच पारड्यांत बसला.

परंतु तो श्येन नसून श्येनाच्या रूपानें शिवच शिबीची सत्त्व-परीक्षा करण्यासाठीं आलेला होता. शिबि राजा मांसाकडून हलका ठरला. तरी त्याच्या ब्रीदनिष्ठेनें भरपाई केली; तेव्हां शिवानें प्रसन्न होऊन शिबीला दर्शन दिलें व धन्यवाद दिला.

**सात्त्विक संताप**—मनुष्य पुष्कळदां क्षणिक आवेशानें दुष्टांचें पारिपत्य करण्यास उद्युक्त होतो हें खरें आहे. अशा वेळीं तो स्वतःचा मालक नसतो, स्वतः पलीकडची अशी एक गूढ शक्ति त्याच्या तनु-मनावर ताबा चालवून त्याला त्याच्या साऱ्या शक्तीनिशीं प्रतिकारास प्रेरीत असते. अर्थात् अशावेळीं स्वार्थाचा किंवा आपल्या कृत्याच्या परिणामांचा विचारही त्याच्या मनाला शिवत नसतो हेंही खरें आहे. ज्याला आपण ‘सात्त्विक संताप’ म्हणतों तो अशाच तऱ्हेचा असतो. संतापाचा अतिरेक झाला म्हणजे मनुष्य एक प्रकारें बेभान होतो. आपण ईश्वरी आदेशानुसार वागत आहों असा त्याला भास होतो. त्याला त्यावेळीं दहा गड्यांचें अवसानही येतें. अशावेळीं त्याला स्वतःला वाटतें, व तिऱ्हाईत प्रेक्षकालाही वाटतें, कीं हा विदेही स्थितींत, अर्थात् निष्काम, अनासक्त बुद्धीनें—वाटल्यास ईश्वरार्पण बुद्धीनेंही म्हणा—हिंसाकर्म करीत आहे. अशा प्रसंगांना अनुलक्षूनच एक वक्ता एकदां उद्गारला होता कीं “प्रेम हें ऐहिक आहे तर द्वेष स्वर्गीय आहे.”

जमीन व स्त्री यांवरून होणाऱ्या मारामाऱ्या पुष्कळदां असल्या सात्त्विक संतापाच्या भरांतच घडतात. तथापि हें सारें विकारविल-सितच असतें. त्यांतील अनासक्ति किंवा निरिच्छता दिखाऊच असते. आसक्तीची पराकाष्ठा ही अनासक्तीसारखी दिसते, ज्याप्रमाणें अति प्रखर प्रकाश हा डोळे दिपावल्यानें अंधारासारखाच वाटतो. प्रेम-पात्रानें केलेल्या प्रतारणेमुळें संचरणारा संतापातिरेक हा आत्यंतिक

आसक्तींतून उद्भवतो. जमिनीवरील मालकीच्या भावनेमुळेंच मनुष्य जमिनीसाठीं जान देण्यास—व घेण्यास—तयार होतो. घेरी म्हणजे ज्याप्रमाणें समाधि नव्हे त्याच प्रमाणें परिणामाबद्दलची बेफिकीरी म्हणजे अनासक्ति नव्हे. शांत प्रसन्न चित्त, नम्रता, लीनता, अलिप्तता हीं अनासक्तीचीं किंवा निष्कामतेचीं अधिक खात्रीचीं लक्षणें होत. लोभ, लालसा, आसक्ति इत्यादींतूनच क्रोध किंवा संताप उद्भवतो याला गीतेचीही साक्ष आहे: "कामात् क्रोधोऽभिजायते." कामाबरोबर शक्ति असली म्हणजे संताप येतो, व अ-शक्ति असली म्हणजे भीति वाटते. संतापाचा तोंडवळा शक्तीसारखा दिसला तरी त्याचा जनक कामच आहे. भीति ही संतापाची (सावत्र) बहीण आहे.

देह, जीवनेच्छा, कामवासना, सुखोपभोग, संपत्ति, घरदार, जमीनजुमला, स्त्रीपुत्र, मित्र, सगेसोयरे स्वजाति एवढेंच नव्हे तर स्वदेश, स्वधर्म, स्वसंस्कृति, कीर्ति, सत्ता, प्रतिष्ठा हीं सारीं आसक्तीचीं आश्रयस्थानें आहेत, हीं सारीं बंधनें आहेत. जीवात्म्याचीं कारागृहें आहेत, त्याच्या पायांतील बेड्या आहेत. जगांतील सारे कलह, झटापटी, ओढाताणी, असत्य, हिंसा हीं अखेरीस कसल्या तरी आसक्तीचेंच फळ होत. मी दुष्काळांत सांपडलों तर जीव जगविण्यासाठीं गोमांस खाण्यास तयार होईन. सर्प चावेल व त्या दंशानें मी किंवा माझीं प्रिय माणसें मरतील या भयानें मी सर्पाला मारेकरी घालीन; माझ्या मुलांबाळांची उपासमार होऊं नये यासाठीं मी गिऱ्हाइकांना खोटें माप देईन; माझा देश वैभवाला चढावा यासाठीं मी कृष्ण-कारस्थानें रचीन; निवडणुकींतील माझ्या प्रतिस्पर्ध्याचें मी मरण चिंतीन, हें सर्व समजणें शक्य आहे. परंतु जो पूर्णपणें समबुद्धि आहे, स्व-पर-पक्षपात ज्याच्या मनाला शिवत नाहीं, मी किंवा माझें व परकें असा भेद ज्याच्या पाशीं नाहीं, त्याला हिंसा करण्याचें कसलेंच

परंतु तो श्येन नसून श्येनाच्या रूपानें शिवच शिबीची सत्त्व-परीक्षा करण्यासाठीं आलेला होता. शिबि राजा मांसाकडून हलका ठरला. तरी त्याच्या ब्रीदनिष्ठेनें भरपाई केली; तेव्हां शिवानें प्रसन्न होऊन शिबीला दर्शन दिलें व धन्यवाद दिला.

**सात्त्विक संताप**—मनुष्य पुष्कळदां क्षणिक आवेशानें दुष्टांचें पारिपत्य करण्यास उद्युक्त होतो हें खरें आहे. अशा वेळीं तो स्वतःचा मालक नसतो, स्वतः पलीकडची अशी एक गूढ शक्ति त्याच्या तनु-मनावर ताबा चालवून त्याला त्याच्या साऱ्या शक्तीनिशीं प्रतिकारास प्रेरीत असते. अर्थात् अशावेळीं स्वार्थाचा किंवा आपल्या कृत्याच्या परिणामांचा विचारही त्याच्या मनाला शिवत नसतो हेंही खरें आहे. त्याला आपण 'सात्त्विक संताप' म्हणतों तो अशाच तऱ्हेचा असतो. संतापाचा अतिरेक झाला म्हणजे मनुष्य एक प्रकारें बेभान होतो. आपण ईश्वरी आदेशानुसार वागत आहों असा त्याला भास होतो. त्याला त्यावेळीं दहा गड्यांचें अवसानही येतें. अशावेळीं त्याला स्वतःला वाटतें, व तिऱ्हाईत प्रेक्षकालाही वाटतें, कीं हा विदेही स्थितींत, अर्थात् निष्काम, अनासक्त बुद्धीनें—वाटल्यास ईश्वरार्पण बुद्धीनेंही म्हणा—हिंसाकर्म करीत आहे. अशा प्रसंगांना अनुलक्षूनच एक वक्ता एकदां उद्गारला होता कीं "प्रेम हें ऐहिक आहे तर द्वेष स्वर्गीय आहे."

जमीन व स्त्री यांवरून होणाऱ्या मारामाऱ्या पुष्कळदां असल्या सात्त्विक संतापाच्या भरांतच घडतात. तथापि हें सारें विकारविल-सितच असतें. त्यांतील अनासक्ति किंवा निरिच्छता दिखाऊच असते. आसक्तीची पराकाष्ठा ही अनासक्तीसारखी दिसते, ज्याप्रमाणें अति प्रखर प्रकाश हा डोळे दिपावल्यानें अंधारासारखाच वाटतो. प्रेम-पात्रानें केलेल्या प्रतारणेमुळें संचरणारा संतापातिरेक हा आत्यंतिक

आसक्तींतून उद्भवतो. जमिनीवरील मालकीच्या भावनेमुळेंच मनुष्य जमिनीसाठीं जान देण्यास—व घेण्यास—तयार होतो. घेरी म्हणजे ज्याप्रमाणें समाधि नव्हे त्याच प्रमाणें परिणामाबद्दलची बेफिकीरी म्हणजे अनासक्ति नव्हे. शांत प्रसन्न चित्त, नम्रता, लीनता, अलिप्तता हीं अनासक्तीचीं किंवा निष्कामतेचीं अधिक खात्रीचीं लक्षणें होत. लोभ, लालसा, आसक्ति इत्यादींतूनच क्रोध किंवा संताप उद्भवतो याला गीतेचीही साक्ष आहे : " कामात् क्रोधोऽभिजायते. " कामाबरोबर शक्ति असली म्हणजे संताप येतो, व अ-शक्ति असली म्हणजे भीति वाटते. संतापाचा तोंडवळा शक्तीसारखा दिसला तरी त्याचा जनक कामच आहे. भीति ही संतापाची (सावत्र) बहीण आहे.

देह, जीवनेच्छा, कामवासना, सुखोपभोग, संपत्ति, घरदार, जमीनजुमला, स्त्रीपुत्र, मित्र, सगेसोयरे स्वजाति एवढेंच नव्हे तर स्वदेश, स्वधर्म, स्वसंस्कृति, कीर्ति, सत्ता, प्रतिष्ठा हीं सारीं आसक्तीचीं आश्रयस्थानें आहेत, हीं सारीं बंधनें आहेत. जीवात्म्याचीं कारागृहें आहेत, त्याच्या पायांतील बेड्या आहेत. जगांतील सारे कलह, झटापटी, ओढाताणी, असत्य, हिंसा हीं अखेरीस कसल्या तरी आसक्तीचेंच फळ होत. मी दुष्काळांत सांपडलों तर जीव जगविण्यासाठीं गोमांस खाण्यास तयार होईन. सर्प चावेल व त्या दंशानें मी किंवा माझीं प्रिय माणसें मरतील या भयानें मी सर्पाला मारेकरी घालीन; माझ्या मुलांबाळांची उपासमार होऊं नये यासाठीं मी गिऱ्हाइकांना खोटें माप देईन; माझा देश वैभवाला चढावा यासाठीं मी कृष्ण-कारस्थानें रचीन; निवडणुकींतील माझ्या प्रतिस्पर्ध्याचें मी मरण चिंतीन, हें सर्व समजणें शक्य आहे. परंतु जो पूर्णपणें समबुद्धि आहे, स्व-पर-पक्षपात ज्याच्या मनाला शिवत नाहीं, मी किंवा माझें व परके असा भेद ज्याच्या पाशीं नाहीं, त्याला हिंसा करण्याचें कसलेंच

प्रयोजन रहात नाहीं. पूर्ण अनासक्तींत, अर्थात् निरपेक्षतेंत, अहिंसेचा अंतर्भाव सहजींच होतो. जेथें जेथें कपट किंवा हिंसा आढळेल तेथें स्थूल नाहींतर सूक्ष्म स्वरूपांत आसक्ति असणारच अशी शंका घेण्यास हरकत नाहीं.

तुरुंगांतील एका तहःहयात कैद्यानें मांजर पाळलें आहे. (कैदी मांजरांवर प्रेम करतात तेवढें घरंदाज लोक क्वचितच करूं शकतील.) हा कैदी त्या मांजराचें नाना प्रकारें कौतुक करतो. नाना क्लृप्त्या रचून किंवा लोकांच्या पायधरण्या करून त्याचेसाठीं दूध मिळवून आणतो. त्याच्या कोठडींत मांजरासाठीं दूध-भात कालवून कायमचा ठेवून दिलेला असतो. तुरुंगाच्या छपरांत कबुतरेंही रहातात. कित्येक कैदी कबुतरांवरही प्रेम करतात. परंतु हा कैदी मात्र साधेल तेव्हां कबुतरांना मारून आपल्या मांजराला मेजवानी देतो! आपण कबुतरांना अनासक्त बुद्धीनें मारतों असें त्याचें मन त्याला ग्वाही देत असतें!

आपण जेव्हां समाज सेवा, देशसेवा इत्यादींच्या नांवानें कार्यें अंगावर घेतों तेव्हां त्यांतील सेवेचा हेतु जर खराखुरा, निखालस व डोळस असेल तर त्या कार्यांमध्यें कपट किंवा हिंसा आणण्याची आवश्यकता आपल्याला जाणवणार नाहीं. स्वतःच्या प्रपंचामध्यें आपण लबाडी व अन्याय करीत असलों, आणि त्याची आपल्याला खंतही वाटत नसली तरी सेवाकार्यामध्यें आपण असले दोष मिसळूं न देण्याची विशेष काळजी घेतली पाहिजे. एखादा व्यापारी जकात किंवा इन्कम टॅक्स चुकविण्यासाठीं बनावट हिशेब दाखवीत असेल तर असो, परंतु तोच एखाद्या सार्वजनिक फंडाचा खजिनदार झाला म्हणजे त्या संस्थेचे हिशेब त्यानें अगदीं चोखच ठेवले पाहिजेत. दोष मिसळूं न देण्याची विशेष काळजी घेतली पाहिजे. देशसेवा म्हणजे राष्ट्रीय-

स्वार्थाची साधनाच असेल तर तीसाठीं हिंसा व कपट उपयुक्त वाटण्याचा संभव आहे, परंतु देशसेवेमध्यें कीर्ति, सत्ता, प्रतिष्ठा, स्वार्थ इत्यादींचा लवलेश नसेल, म्हणजे देशसेवा ही विश्वसेवाच असेल तर सेवकाचे मनामध्यें विशिष्ट परिणाम विशिष्ट मुदतींत कसेंही करून घडवून आणण्याचा हट्टही नसेल व तीव्र प्रयत्नाबरोबरच तटस्थता, समाधान, निरिच्छता व ईश्वर-शरणता ( रेसिग्नेशन ) असेल. मग हिंसेचा संभवच रहात नाहींत.

१४. मोठ्या उपकारासाठीं थोडा अन्याय ?—जुन्या काळची एक वेडी समजूत आहे कीं मोठें धरण, तलाव, पूल इत्यादि कसलेंही मोठें बांधकाम करावयाचें असेल तर तें यशस्वी व टिकाऊ होण्यासाठीं प्रथम पायामध्यें नरबळि द्यावा लागतो. "लक्षावधि लोकांना पिढ्यान्‌पिढ्या सुखकारक होणारें बांधकाम उभारण्यासाठीं एखाददुसऱ्या माणसाचा बळि देण्यांत, अर्थात् महान् उपकारासाठीं अल्पसा अन्याय करण्यांत, कांहीं गैर नाहीं." अशा प्रकारची ही विचारसरणी आहे, परंतु ती चुकीची व घातुक आहे. इतरांच्या हितास्तव मी स्वतःचें बलिदान करण्यांत कांहीं वावगें नाहीं, ती अत्यंत उदात्त गोष्ट आहे. त्यापासून माझी तशीच मानवजातीची उन्नतिच होईल. परंतु पुष्कळांवर उपकार करण्यासाठीं थोड्यांना किंवा एकालाही अपकार करण्याचा मला बिलकुल अधिकार नाहीं. नरबळीचे अभावीं जलाशयाचें बांधकाम अयशस्वी झालें व त्यामुळें अनेकांचे पाण्याविना हालहाल झाले तरी त्याचें अपेश माझ्या माथीं यत्किंचित् ही नाहीं. शुद्ध मार्गांनीं मला माझ्या बांधवांचें क्लेशनिवारण करतां येईल तेवढें मी करावें, परंतु क्लेशनिवारणार्थ क्लेश देणें ही भूल आहे. जगाचा भार मी आपल्या माथीं वाहूं पाहणें ही रिकामी प्रौढी आहे. तो अव्यापारेषु व्यापार आहे व त्यासाठीं दुसऱ्यावर जुलूम करण्यांत त्या इसमाच्या व्यक्तित्वाचा

आत्मतत्त्वाचा व साऱ्या मानव जातीचा द्रोह आहे. तीच माणुसकी व तेंच आत्मतत्त्व माझ्यांत आहे व ज्यांना मी पाणी पाजणार त्या तृषार्तांमध्यें ही आहे. अर्थात् त्या बळि दिलेल्या व्यक्तीच्या द्रोहानें मी स्वतःच ईश्वराचा व त्या तृषार्तांचाही द्रोह व अपमान करतों. तृषार्तांचा प्रथम आत्मा हाणून नंतर त्याला चुळकाभर पाणी देण्यांत कसलीच सेवा किंवा थोरवी नाहीं. "हातचें घालवा व पळत्याच्या पाठीमागें लागा" या मासल्याचा तो व्यवहार आहे. नरबळीमुळें त्या एका इसमाला नाहक क्लेश होतात त्यापेक्षांही एकंदर मानवी जीवनाचें मूल्यच उतरतें ही किती तरी मोठी हानि आहे.

**१४. रक्षण सुजनांचें कीं सौजन्याचें?**—वरच्या सारखेंच आणखी एक तर्कट हिंसेच्या समर्थनार्थ योजण्यांत येत असतें: "जगांत सद्गुणांची वाढ साधण्यासाठीं प्रथम सज्जनांचें जतन केलें पाहिजे. सज्जन हे साऱ्या सद्गुणांचा झरा आहेत. तो झरा शाबूत आहे तोंपर्यंत पाण्याची टांकी (सत्कृत्यें) रिकामी झाली तरी पुन्हां भरूं शकेल. परंतु झराच सुकला तर सारी आशाच खुंटते. त्याचप्रमाणें सज्जन नष्ट झाले कीं सद्गुणांच्या विकासाची आशाच खुंटली. सुसंस्कृति हें मनुष्यजातीच्या हजारों वर्षांच्या संचित श्रमांचें फळ आहे व सुसंस्कृत जीवन-व्यक्तींचें किंवा समाजांचें-हाच संस्कृतीचा आधार आहे. अशा सुसंस्कृत व्यक्तींचा किंवा समाजांचा नाश म्हणजे संस्कृतीचा समूळ नाश होय. म्हणून संस्कृति दूषित किंवा भ्रष्ट झालेली एकवेळ पत्करेल, कारण संस्कारी व्यक्ति हयात राहिल्यास तिच्या पुनरुज्जीवनाची आशा आहे; परंतु संस्कारी व्यक्तींचा नाश झाला म्हणजे संस्कृतीचा आधारच गेला. म्हणून संस्कृतीच्या चाहत्यांनीं सज्जनांचें रक्षण कसेंही करून केलें पाहिजे. पाशवी बलानें सज्जनांच्या रक्षणार्थ रणांगणांत उतरलें पाहिजे," इत्यादि.

याच युक्तिवादानें असेंही निष्पन्न होतें कीं जुलूम, अन्याय इत्यादि अनिष्टांचें निवारण होण्याकरतां जुलमी, अन्यायी, खल, दुर्जन इत्यादींचें निर्दलन केलें पाहिजे.

आणि हा युक्तिवाद तिऱ्हाइतांशींच थांबत नाहीं. मनुष्य मनाशीं म्हणतो : "मी सज्जन आहें हें तर स्वयंसिद्ध सत्य आहे. मी हयात राहिलों तर सौजन्य हयात रहाणार. त्यासाठीं मला दुर्जनांशीं कराव्या लागणाऱ्या झटापटींत कांहींहीं करून, तात्पुरतें दौर्जन्य पत्करूनही, प्रथम जगलें पाहिजे."

ब्राह्मण म्हणतील : "आम्ही टिकलों तर ब्राह्मण्य टिकणार म्हणून आपली संघटना करून जीवनकलहांत टिकाव धरला पाहिजे." क्षत्रिय म्हणतील : दुनियेंतील क्षात्रतेज टिकवून धरण्यासाठीं आपण टिकून राहिलें पाहिजे. त्यासाठीं दुर्जनाला कांहीं वेळ शरण जावें लागलें तरी हरकत नाहीं." हिंदु म्हणतील : "हिंदु संस्कृति ही सर्वश्रेष्ठ संस्कृति आहे. तिच्या रक्षणार्थ आपण मुसलमानांचा मुकाबला केला पाहिजे; त्यासाठीं हिंदूंनीं मांसाहार करून शरीरबळ कमाविलें पाहिजे" इत्यादि. म्हणजे मुसलमानांचा प्रतिकार करण्यासाठीं आपणच मुसलमान बनलें पाहिजे.

युद्धयमान दोस्त राष्ट्रें म्हणतात : "आमचा विजय हीच जगाची आशा आहे. म्हणून प्रथम कसेंही करून विजय मिळवूं या. त्यासाठीं सचाई फॅसिस्ट बनावें लागलें तरी बनलें पाहिजे."

हीच विचारसरणी आणखीही पुढें जाऊन प्रतिपादते कीं सज्जनांनीं ब्रह्मचर्य पाळल्यास जगाची हानि होते; सज्जनांची खूपखूप वंशवृद्धि होण्यानेंच जगाचा उत्कर्ष होईल.

या विचारसरणीमध्यें अज्ञान, मोह व दर्प यांचा प्रकर्ष आहे. अज्ञान असें कीं सद्‌गुण किंवा संस्कृति हा विशिष्ट व्यक्तींचा किंवा

गटांचा जणूं मक्ता आहे. मोह-दर्प असा कीं ती मक्तेदार व्यक्ति किंवा गट मी किंवा माझा वंशच आहे.

परंतु व्यक्तींचें किंवा गटांचें जीवन परस्परांपासून तुटक नसतें. अखिल मानवजातीचेंच नव्हे तर भूतमात्रांचें जीवन एकजिनसी व सलग आहे. एकांत आहे तें सर्वांत आहे व सर्वांत आहे तें प्रत्येकांत आहे. विशिष्ट व्यक्तीची पुण्याई, संस्कृति किंवा सद्‌गुण–संपत्ति ही त्या एकट्या व्यक्तीचीच कमाई नसते, साऱ्या समाजाच्या सहकार्यानेंच ती पुण्याई उभी असते. जसें, नारळीचें झाड हातभर जमिनीवरच उभें असतें, परंतु भोंवतालच्या दहा पंधरा हातांच्या टापूंत दुसरें नारळीचें झाड वाढूं शकत नाहीं. अर्थात् तेवढ्या सर्व जमिनींतून त्या हातभर जमिनीवरील झाडाला पोषण मिळत असतें. त्याचप्रमाणें पंडित किंवा प्रोफेसर एक लाख वस्तींत एकादाच नांदूं शकेल. सबंध गांव पंडितांचाच वसवायचें योजलें तर बिचारे पंडित उपाशी मरतील. शेतकरी, गवळी, मजूर इत्यादींच्या साह्याखेरीज पंडितांचा निभाव लागणार नाहीं. त्याचप्रमाणें शाकाहारी लोक सुद्धां विशिष्ट प्रदेशांत विशिष्ट प्रमाणांतच राहूं शकतात असा अनुभव आहे. सारेच गांवकरी शाकाहार करूं लागले तर सध्यांचे शाकाहारी अडचणींत सांपडतील. म्हणून स्वतःच्या संस्कृतीबद्दल कोणीही गर्व वाहूं नये. माझी संस्कृति म्हणजे जागतिक संस्कृतीचा जगाच्या संमतीनें माझ्या वांट्याला आलेला हिस्सा आहे. मी मेलों तर तो हिस्सा माझ्या बरोबर मरणार नाहीं, तर दुसऱ्या कोणाच्या वांट्याला जाईल.

मी माझ्या वांट्याची जतन करावी, वृद्धि करावी व तो परत जगाला अर्पण करावा. सत्यभक्तानें सत्यासाठीं प्राण अर्पण केल्यानें सत्य मरत नाहीं तर उलट विश्वविजयी होतें.

जीवन ही एक अखंड गंगा आहे. परंतु हिंसक स्वसंरक्षण किंवा जीवनार्थ कलह यांमुळें या गंगेचे तुकडे पडतात. हिंसक स्वतः त्या जीवन–गंगेपासून वेगळा पडून डबकें बनतो. याचे उलट अहिंसेचा मार्ग हा आत्मार्पणाचेद्वारा आत्मवृद्धि साधण्याचा मार्ग आहे. डबकें किंवा नाला गंगेला आत्मार्पण करून स्वतः पवित्र व विशाल–गंगारूप–बनतो. बायबलमध्यें म्हणलें आहे : " जो आपला जीव राखूं पाहील त्याला मृत्यू मिळेल; जो प्राण देऊन टाकील त्याला अमरता मिळेल. " गव्हाचा दाणा चिखलांत बुडून विरून गेल्याखेरीज कणीस बनत नाहीं. तत्त्वासाठीं दुसऱ्याला इजा न करतां स्वतः मृत्यु पत्करल्यानें तें तत्त्व अमर बनतें. तत्त्वाच्या बचावासाठीं दुसऱ्यावर हाणलेला घाव त्या तत्त्वावरच बसत असतो. अहिंसेचा मार्ग मरून अमर होण्याचा मार्ग आहे.

# अहिंसेची चढण

**हिंसेची अनिवार्यता :**—विश्व एक आहे. भिन्नतेपेक्षां ऐक्य व स्पर्धेपेक्षां सहकार्य हीं अधिक खरीं आहेत, या सिद्धान्ताचे आधारावरच आपण अहिंसेची उभारणी केली. परंतु ऐक्याबरोबर अनेकत्वालाही विश्वरचनेमध्यें हक्काचें स्थान आहे, त्यामुळें साऱ्या वस्तु व जीव परस्पर पोषक व परस्पर–उपकारी आहेत हें जसें खरें आहे तसेंच त्या सर्वांमध्यें नित्य सार्वत्रिक कलह चालू आहे हेंहि खरें आहे.

त्यामुळें हिंसा सर्वस्वीं टाळणें देहधाऱ्याला शक्य नाहीं. संपूर्ण अहिंसा म्हणजे परब्रह्मांत विरून जाणें, स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाचा लोप होणें; म्हणजे मृत्युच होय. जिवंत माणसाला इच्छया–अनिच्छया, कळत–नकळत, व कमीअधिक प्रमाणांत प्रतिक्षणीं हिंसा केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. देहधारी अन्नाखेरीज जगूं शकत नाहीं. मांस, अंडीं दूध हा प्राणिजन्य परंतु उतरत्या प्रमाणांत हिंसामय आहार वर्ज्य केला तरी धान्य व भाज्या खाण्यांतसुद्धां हिंसा आहेच. प्रत्येक मनुष्य स्वतः शेती करीत नसला तरी शेतीवर अवलंबून असतो. शेतकीव्यवसाय शिकारीपेक्षां कमी हिंसक असला तरी शेतीमध्येंही गांडुळें, वाळवी, कीडमुंगी यांसारख्या भूमिगत प्राण्यांची हिंसा व वानर, ससे, डुकरें, इत्यादि शत्रूंची ‘राखण’ करावीच लागते. मनुष्य पाणी पितो त्यामध्येंही किती जंतु असतील त्याचा नेमच नाहीं. पोटांतील निरनिराळ्या रसांनीं ते जंतु मारले जात असतात. श्वासोच्छ्वासा बरोबरही किती जंतु आंत बाहेर जात असतील व त्यांतील किती मरत असतील त्याचा हिशेब करणें कठिण. श्वासांतून जंतु जाऊं नयेत म्हणून जैन साधु तोंडावर फडकें बांधतात, परंतु त्यामुळें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

सूक्ष्म जंतु बचावतील असें नाहीं. चालतांना पावलांखालीं अनेक जंतु चिरडले जातील, अनेक वनस्पति मोडतील, पावलांच्या आवाजानें अनेक प्राणी दचकतील, कित्येकांची झोपमोड होईल.

प्राणी व वनस्पति यांचे प्रमाणेंच इतर माणसांनाही नानाप्रकारें उपद्रव दिल्याखेरीज माझा एक क्षण जात नाहीं. लहानाचा मोठा होईपर्यंत मी वडील मंडळींना किती प्रकारांनीं कष्टविलें आहे! आजही मी अन्न खातों तेवढें दुसऱ्या माणसांचें कमी करतों. मला कपडे पाहिजेत, रहायला जागा पाहिजे, त्यासाठीं अनेकांना अनेक परींनीं राबावें लागतें. श्वासोच्छ्वासानें मी हवेंत दुर्गंधि व विष पसरवितों. माझ्या बडबडण्यानें, व विशेषतः गाण्यानें कितीकांना कटकट होत असेल, माझ्या जिन्यावरून धडधड चालण्यानें कितीकांची झोपमोड होत असेल, मी जागोजाग थुंकतों, मलमूत्र सांडतों त्याचा कितीकांना किळस येत असेल व माझ्या मळापासून उद्भवणाऱ्या रोगजंतूंमुळें कितीकांचीं आरोग्यें बिघडलीं असतील, व मृत्युही झाले असतील. सांसर्गिक रोगांचा प्रसार माझेकडून झाला असेल. फार कशाला? माझ्या एका नजरेनें कितीकांचा हिरमोड झाला असेल, हृदयें फाटलीं असतील, कितीकांच्या एकांताचा व स्वस्थतेचा भंग झाला असेल. माझ्या अविचारी हंसण्यानें कितीकांचा उपहास घडला असेल, कितीक खट्टू झाले असतील. मी कितीकांची नालस्ती केली असेल, कितीकांना टाकून बोललों असेन, रागावलों असेन, कितीकांचा मनोभंग केला असेल. उघड नाहीं तरी मनांतून कितीकांवर जळफळलों असेन, माझें अस्तित्व म्हणजेच इतरांना उपद्रव आणि एवढ्या उपरही मी समाजसेवक, उपकारकर्ता, दानशूर, दयाळू म्हणून शेखी मिरविण्यासही कमी करीत नाहीं. माझे हे सारे अपकार व सारी ही पोटांत घालणाऱ्या समाज-माउलीला शतशः धन्यवाद असोत!

# अहिंसेची चढण

**हिंसेची अनिवार्यता** :—विश्व एक आहे. भिन्नतेपेक्षां ऐक्य व स्पर्धेपेक्षां सहकार्य हीं अधिक खरीं आहेत, या सिद्धान्ताचे आधारावरच आपण अहिंसेची उभारणी केली. परंतु ऐक्याबरोबर अनेकत्वालाही विश्वरचनेमध्यें हक्काचें स्थान आहे, त्यामुळें साऱ्या वस्तु व जीव परस्पर पोषक व परस्पर–उपकारी आहेत हें जसें खरें आहे तसेंच त्या सर्वांमध्यें नित्य सार्वत्रिक कलह चालू आहे हेंहि खरें आहे.

त्यामुळें हिंसा सर्वस्वीं टाळणें देहधाऱ्याला शक्य नाहीं. संपूर्ण अहिंसा म्हणजे परब्रह्मांत विरून जाणें, स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाचा लोप होणें; म्हणजे मृत्युच होय. जिवंत माणसाला इच्छया–अनिच्छया, कळत–नकळत, व कमीअधिक प्रमाणांत प्रतिक्षणीं हिंसा केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. देहधारी अन्नाखेरीज जगूं शकत नाहीं. मांस, अंडीं दूध हा प्राणिजन्य परंतु उतरत्या प्रमाणांत हिंसामय आहार वर्ज्य केला तरी धान्य व भाज्या खाण्यांतसुद्धां हिंसा आहेच. प्रत्येक मनुष्य स्वतः शेती करीत नसला तरी शेतीवर अवलंबून असतो. शेतकीव्यवसाय शिकारीपेक्षां कमी हिंसक असला तरी शेतीमध्येंही गांडुळें, वाळवी, कीडमुंगी यांसारख्या भूमिगत प्राण्यांची हिंसा व वानर, ससे, डुकरें, इत्यादि शत्रूंची 'राखण' करावीच लागते. मनुष्य पाणी पितो त्यामध्येंही किती जंतु असतील त्याचा नेमच नाहीं. पोटांतील निरनिराळ्या रसांनीं ते जंतु मारले जात असतात. श्वासोच्छ्वासा बरोबरही किती जंतु आंत बाहेर जात असतील व त्यांतील किती मरत असतील त्याचा हिशेब करणें कठिण. श्वासांतून जंतु जाऊं नयेत म्हणून जैन साधु तोंडावर फडकें बांधतात, परंतु त्यामुळें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

सूक्ष्म जंतु बचावतील असें नाहीं. चालतांना पायांखालीं अनेक जंतु चिरडले जातील, अनेक वनस्पति मोडतील, पावलांच्या आवाजानें अनेक प्राणी दचकतील, कित्येकांची झोपमोड होईल.

प्राणी व वनस्पति यांचे प्रमाणेंच इतर माणसांनाही नाना-प्रकारें उपद्रव दिल्याखेरीज माझा एक क्षण जात नाहीं. लहानाचा मोठा होईपर्यंत मी वडील मंडळींना किती प्रकारांनीं कष्टविलें आहे! आजही मी अन्न खातों तेवढें दुसऱ्या माणसांचें कमी करतों. मला कपडे पाहिजेत, रहायला जागा पाहिजे, त्यासाठीं अनेकांना अनेक परींनीं राबावें लागतें. श्वासोच्छ्वासानें मी हवेंत दुर्गंधि व विष पसरवितों. माझ्या बडबडण्यानें, व विशेषतः गाण्यानें कितीकांना कटकट होत असेल, माझ्या जिन्यावरून धडधड चालण्यानें कितीकांची झोपमोड होत असेल, मी जागोजाग थुंकतों, मलमूत्र सांडतों त्याचा कितीकांना किळस येत असेल व माझ्या मळापासून उद्भवणाऱ्या रोगजंतूंमुळें कितीकांचीं आरोग्यें बिघडलीं असतील, व मृत्युही झाले असतील. सांसर्गिक रोगांचा प्रसार माझेकडून झाला असेल. फार कशाला? माझ्या एका नजरेनें कितीकांचा हिरमोड झाला असेल, हृदयें फाटलीं असतील, कितीकांच्या एकांताचा व स्वस्थतेचा भंग झाला असेल. माझ्या अविचारी हंसण्यानें कितीकांचा उपहास घडला असेल, कितीक खट्टू झाले असतील. मी कितीकांची नालस्ती केली असेल, कितीकांना टाकून बोललों असेन, रागावलों असेन, कितीकांचा मनोभंग केला असेल. उघड नाहीं तरी मनांतून कितीकांवर जळ-फळलों असेन, माझें अस्तित्व म्हणजेच इतरांना उपद्रव आणि एवढ्या उपरही मी समाजसेवक, उपकारकर्ता, दानशूर, दयाळू म्हणून शेखी मिरविण्यासही कमी करीत नाहीं. माझे हे सारे अपकार व सारी प्रौढी पोटांत घालणाऱ्या समाज-माउलीला शतशः धन्यवाद असोत!

**मी भूभार नाहीं:**—परंतु पूर्ण अहिंसक कोणी नाहीं तसा पूर्ण हिंसकही कोणी नाहीं. मी लोकांना केवळ तापदायकच असतों तर माझा क्षणभर निभाव लागताना. मी जनता-माउलीचें बालक आहें. त्या माउलीला मी कष्ट देतों तितकाच आल्हादही देतों. म्हणून तर ती माझें इतक्या आस्थेनें संगोपन करते. मी सदा आजारी असलों, फुकटचें खात असलों, लोकांची फुकटची सेवाचाकरी घेत असलों, व्यंग–रुग्ण–जीर्ण कसाही असलों तरी मी भू–भार झालेला नाहीं. तसा असतों तर ही भूमि व ही जनता माझा त्रास क्षणभर चालवून घेणार नाहीं. लोक माझी असहाय बालकाप्रमाणें सेवा चाकरी करतात ती कांहीं माझ्या उपकारासाठीं नव्हे. मला जाणीव नसते आणि त्यांनाही जाणीव नसते, पण माझ्या निरुद्योगी, आळशी, रोगट अस्तित्वानें सुद्धां त्यांना आनंदवीत असतों, सुखवीत असतों. म्हणून ते मला निभावून घेतात. माझा पुण्यांश साफ संपेल तेव्हां ते माझी काळजी घेण्याचें सोडून देतीलच, मला जाळून पुरून सुद्धां टाकतील; किंवा गिधाडांना खाऊं घालतील.

**हिंसा–अहिंसा–वाद :**—कोणताही जिवंत मनुष्य केवळ हिंसक नाहीं व केवळ हिंसावादी तर कोणीच नाहीं. हिंसेची हौस कोणालाच वाटत नसते. मांसाहाराचा विधिनिषेध न मानणारा मनुष्य-ही आपल्या आहारांत संयम पाळतो, व त्याच्या मांसाहारावर कमी अधिक मर्यादा असतात. अहिंसक हा पूर्ण अहिंसक नसतो तसाच हिंसक हा पूर्ण हिंसक नसतो. अहिंसावादी "अहिंसा परमो धर्मः" म्हणत असला तरी आचरणांत किंवा व्यवहारांत उतरविण्याच्या अहिंसेला कितीसरी मर्यादा घालून घेतो. याच्या उलट हिंसावाद्याचा आक्षेप अहिंसेच्या अतिरेकावरच असतो. तत्त्वतः अहिंसा सर्वांनाच मान्य असते, मतभेद अंमल बजावणीच्या बाबतींत उत्पन्न होतात, व

तेथें हिंसा–अहिंसा यांमधील फरक तारतम्यावरच असतो. अहिंसेच्या मार्गावरील वाटसरूंपैकीं चार पावलें पुढें जाणारांना अहिंसावादी व मागें थबकणारांना हिंसावादी म्हटलें जातें. गोमांस खाणारा मुसलमान हिंसक व मटण खाणारा हिंदु अहिंसक, मटण खाणारा मराठा हिंसक व मासे खाणारा ब्राह्मण अहिंसक समजला जातो. त्याच प्रमाणें हिंदूंच्या जातींजातींतील व्यवहारांत क्षमा व सहिष्णुताच वापरावी म्हणणारे सावरकर हिंसावादी म्हणून व राष्ट्रांराष्ट्रांतील विवादही कत्तलींखेरीज मिटवावे म्हणणारे गांधी अहिंसावादी म्हणून ओळखले जातात.

माणसांमाणसांमध्यें एक अधिक हिंसक व दुसरा अधिक दयाशील असे भेद करणेंही मुष्किलीचें आहे. आहाराच्या बाबतींत नेमनिष्ठ असलेला तपस्वी पुष्कळदां कोपिष्ट असतो; उलट भाजी चिरावी तशीं बकरीं चिरणारा खाटीक प्रेमळ वृत्तिचा असतो. एक एका विषयांत तर दुसरा दुसऱ्या विषयांत अधिक गुण मिळवील साऱ्या विषयांत मिळून कोणाचा वर नंबर लागेल तें सहजीं ठरवितां येण्यासारखें नाहीं.

शिवाय विशिष्ट प्रकारच्या अहिंसेचें पालन हें परिस्थितीवर तसेंच शेजाऱ्यांच्या सहकार्यावर अवलंबून असतें, त्यामुळें "मीच अधिक अहिंसक" असा अभिमान कोणीच बाळगूं नये. उदा० हिंदुस्थानासारख्या धनधान्याची समृद्धि असणाऱ्या मुलखांतील रहिवाशांना मांसनिवृत्त असणें सोपें आहे तर ग्रीनलंड सारख्या वनस्पतिशून्य मुलखांतील लोकांना शाकाहाराचा नियम मुळींच झेपण्यासारखा नाहीं. गांवांतील मिश्राहारी बहुजनसमाज स्वतः मांसमच्छर खाऊन गांवांतील बहुतेक दूधदुभतें ब्राह्मणांसाठीं राखून ठेवतो म्हणूनच ब्राह्मणांना आपला शाकाहाराचा निश्चय टिकविणें सोपें जातें. मटण खाणारे लोकही बकरा

क्षापणें कमीपणाचें मानतात. परंतु जेथें खाटीक असतो तेथेंच त्यांचा तो बाणा चालूं शकतो. जेथें खाटीक नाहींत अशा खेड्यांतील लोकांना खाटकाचें काम स्वतःच करावें लागतें.

**प्रगतिः**—संपूर्ण अहिंसा देहधाऱ्याला अशक्य आहे, यावरून अहिंसा हा अशक्य आदर्श म्हणून सोडून द्यावा, असें मात्र निष्पन्न होत नाहीं. हरएक सद्‌गुणाचें व न्याय, स्वतंत्रता इत्यादि साध्यांचें अंतिम स्वरूप आपल्या आटोक्याबाहेरचें असतें. तेवढ्यासाठीं त्या त्या ध्येयांची साधनाच आपण सोडून देऊं म्हटलें तर मानवी जीवन निरर्थक होऊन जाईल. ध्येय पूर्णांशानें साध्य नसलें तरी त्याच्याकडे प्रगति करण्याचा सतत, सर्व शक्तीनिशीं व जागरूकपणें प्रयत्न करणें हाच मनुष्याचा धर्म आहे. अहिंसेच्या साधनेमध्यें ही मनुष्यानें व्यक्तिशः व संघशः नित्य प्रगति करीत रहावयाचें आहे. आजवर तो अशी प्रगति करीत आलाच आहे.

अगदीं प्राथमिक अवस्थेमध्यें मनुष्य हा वाघलांडग्यां इतकाच हिंस्र होता, फरक असेल तर नैसर्गिक सामर्थ्याचाच होता. त्या अवस्थेंत माणसाला जगण्यासाठीं तीव्र धडपड व झगडा चालवावा लागत होता; निसर्गाशीं सतत हातघाईचा लढा करावा लागत होता. हें जग त्याला सर्वस्वीं परकें; शत्रुवत् होतें. परंतु हळूहळू त्याची निसर्गाशीं ओळख होऊं लागली तसतसा निसर्गाचा त्याला वाटणारा भेसूरपणा कमी होऊं लागला. सृष्ट पदार्थांतील विविधता, वस्तु, प्राणी व अन्य माणसें यांचे स्वभावधर्म, हळूहळू त्याच्या लक्षांत येऊं लागले. साऱ्याच वस्तु व सारेच प्राणी सारखेच भयंकर नाहींत हें त्याला कळूं लागलें. कुत्रा व लांडगा, मांजर व वाघ, मुंगूस व सर्प, आंबा व काजरा, बिब्बा व बदाम यांतील फरक त्याला उमगूं लागले. निसर्गाशीं ओळखदेख व मैत्री जमूं लागली. सृष्टींतील निरनिराळ्या पदार्थांचा

स्वतःच्या सुखासाठीं उपयोग करण्याचे अधिकाधिक सोयीस्कर मार्ग तो शोधून काढूं लागला. स्वतःच्या संरक्षणासाठीं व सुखासाठीं नाना प्रकारच्या नवीन नवीन युक्त्या तो योजूं व निर्मूं लागला. प्रथम त्याला पडलेल्या आंब्यावरच भूक भागवावी लागे. पुढें धोंडे मारून आंबे पाडण्याची क्लृप्ति त्याला सुचली व धोंड्यांनीं आंबे पाडण्याची कला सरावानें त्यानें हस्तगत केली. पुढें तो आंब्याच्या झाडावर चढूंही लागला व फांद्या हालवून पक्व आंबे खालीं पाडूं लागला. कालांतरानें त्यानें आंबे काढण्याचा घळ बनविला व जुने आंबे घळानें काढून गवतांत घालून पिकविण्याची युक्ति काढली. प्रथम तो आंब्याच्या झाडांची जतन व पुढें पुढें लागवडही करूं लागला; व आतां तर कलमी आंब्यांच्या बागाच उठवितो. अशा तऱ्हेनें ज्ञान व कौशल्य यांची वाढ झाली तसतशी नासधूस करण्याची प्रवृत्ति कमी होत गेली.

प्रथम मनुष्य जंगलांतील गाईंना मारून फाडून कच्चें मांसच खात असे. पुढें भाजून शिजवून खाऊं लागला. पण पुढें गाईला माणसाळवून पाळून तिचें दूधच काढून पिऊं लागला व मांस प्रमाणांत कमी खाऊं लागला. शेवटीं कांहीं माणसांनीं गाईला मारायचीच नाहीं असा निश्चय केला. * मनुष्य शेती करूं लागला तेव्हां त्यानें पाहिलें कीं बैलाला मारून खाण्यापेक्षां त्याला नांगराला जुंपणेंच अधिक फायद्याचें आहे. होतां होतां शेतकऱ्याला गाई बैल हीं कुटुंबांतील माणसांसारखीं वाटूं लागलीं.

सारांश, ज्ञान व कर्तृत्व यांच्या विकासाबरोबर मनुष्याचा आत्मविश्वास, निर्भयता व निश्चितता हीं सुध्दां वाढीस लागलीं. निसर्ग व मनुष्य यांचे मधील लढा अधिकाधिक सौम्य होऊं लागला, व तेवढ्या प्रमाणांत मनुष्याची हिंस्रवृत्तिही ओसरत चालली.

* टीपः—वेदामध्यें गाय या अर्थीच 'अघ्न्या' (अवध्य) असा शब्द आढळतो.

मनुष्याला जीवन-कलहाच्या बाबतींत जसजशी निश्चितता येते तसतशा त्याच्या अभिरुचिही अधिक सौम्य व अहिंसा-वृत्तीला पोषक बनत जातात. "नरडीचा घोट घेणें" हा कधीं तरी सूडाचा शिष्टसंमत मार्ग होता. आतां पराकाष्ठेचा द्वेष वाटत असला तरी मनुष्य दुसऱ्याच्या नरडीचा घोट घेणार नाहीं. पूर्वकाळीं मनुष्य नरमांस भक्षणही करीत असे; परंतु आतां विश्व-बंधुत्वामुळें नव्हे पण त्या गोष्टीचा किळस वाटूं लागल्यानें नरमांस-भक्षक जमाती पृथ्वीच्या पाठीवर राहिलेल्या नाहींत. प्रथमावस्थेंतील मनुष्य लैंगिक वासना प्रबल होतांच माशुकावर बळजबरी करीत असे, तर आतां प्रणय करण्याकडे त्याची प्रवृत्ति असते. अशा तऱ्हेनें अभिरुचींच्या विकासामुळेंही मनुष्याची प्रवृत्ति अहिंसेकडे होत आहे. नैतिक हेतूनें नव्हे पण किळस वाटतो म्हणून मांसाशनापासून निवृत्त रहाणारे अनेक इसम आढळतात.

मनुष्याच्या उपभोगांमध्येंही दिवसेंदिवस सौम्यपणा, विविधता व सूक्ष्मता वाढत आहे. पूर्वावस्थेंतील माणसाला कोंबडीं किंवा ससे यांचा उपयोग फक्त फाडून खाण्यापुरताच होता. परंतु आतां कोंबड्यांना धष्टपुष्ट करून त्यांच्या डौलदार रूपाकडे पहात राहण्यांतही त्याला समाधान वाटतें. क्षुधाशांतीपेक्षां किंवा स्वादापेक्षां नेत्रानंदाला तो अधिक महत्त्व देऊं शकतो व देतो. अशा तऱ्हेनें माणसाची मनःस्थिति व परिस्थिति त्याला हळूं हळूं हिंसेकडून अहिंसक वर्तनाकडेच नेत आहे.

**मांसाहारावर निर्बंध :—** खाद्याखाद्य-विवेकाच्या रूपानेंही अहिंसावृत्ति विशेष स्पष्ट स्वरूपांत दिसून येते. जे केवळ शाकाहारी नाहींत तेही सर्वच पशुपक्ष्यांचें मांस खात नाहींत. हे मांसाहारावरील निर्बंध कांहीं अंशीं स्वाद व सदभिरुचि यांवर आधारलेले असतात हें खरें, तथापि

बऱ्याच अंशीं भूतदयेवरच आधारलेले असतात. हिंदूंची गाई विषयींची उत्कट भावना ही पशुसृष्टीबद्दलच्या बंधुभावनेचें प्रतीक आहे. हिंदूला गाय ही आईसारखी व बैल हा भावासारखा वाटतो.

साऱ्या जगभर अनेक व्यक्ति व हिंदुस्थानांत तर मोठमोठे समाजही धर्म-भावनेनें, म्हणजे आहारासाठीं प्राणिहिंसा करणें पाप आहे अशा समजुतीनें, मांसाहार वर्ज्य मानणारे आहेत. पाश्चात्त्य संस्कृतीच्या लोंढ्यामध्यें आपण वहावत जात असतांही आपल्यामध्यें अद्यापि असे लक्षावधि स्त्री-पुरुष आहेत कीं जे औषधामध्येंही मांस किंवा तज्जन्य पदार्थ वापरण्यापेक्षां मृत्यु पत्करतील. सारे जैन, सारे लिंगायत, ब्राह्मणांतील बहुतेक पोट जाति, गुजराथ सारख्या प्रांतांतील क्षत्रिय वैश्यही, तसेंच वैष्णव व वारकरी इत्यादि संप्रदायांतील किती तरी जाति व व्यक्ति यांनीं धार्मिकतेनें पिढ्यान् पिढ्या मांसाशन वर्ज्य केलेलें आहे.

ज्या जाति मांसाहार निषिद्ध समजत नाहींत त्या सुद्धां त्या बाबतींत अनेक निर्बंध पाळतात. गोमांसाचा निषेध तर हिंदूंमध्यें सार्वत्रिक आहे, परंतु त्या खेरीजही जातवार अनेक निर्बंध असतात. कोणी बकऱ्याचें मांस खातील तर बकरीचें खाणार नाहीं, मासे खाणारे कोंबडीं खाणार नाहींत, नेहमीं खाणारेही श्रावणांत, चातुर्मासांत, व शनिवार-सोमवारांसारख्या पवित्र मानलेल्या दिवशीं खाणार नाहींत.

**वनस्पति-संहारावर निर्बंध :**— आपण हिंदू वड, पिंपळ, यां-सारख्या मोठ्या वृक्षांना, कीं ज्यांची छाया अनेक संतत माणसांना व पशु-पक्ष्यांना आश्रय देते, ज्यांच्यावर हजारों पक्षी घरटीं बांधून व त्यांचीं फळें खाऊन रहातात, ज्यांच्या ढोलींमध्यें सुद्धां अनेक पशु घरें करतात, त्यांना पवित्र व अवध्य मानतों.

शेतकरी लोक जिवंत झाड तोडणें हें पापच समजतात. जिवंत झाडें तोडणाराचा निर्वंश होतो असा लोक-समज आहे, त्यांत अहिंसेचीच दृष्टि आहे. जैनांनीं तर वनस्पतीमध्यें सुद्धां अधिक जीव असणाऱ्या व कमी जीव असणाऱ्या असें वर्गीकरण करून विशिष्ट भाज्या-ही वर्ज्य मानल्या आहेत. त्यांचें वर्गीकरण आधुनिक शास्त्रांच्या दृष्टीनें कोणास अमान्य होईल, तथापि त्याचे मागील अहिंसा-पालनाबाबतची आस्था कौतुकास्पद आहे.

**भूतदया**—परंतु अहिंसा अनेक बाबतींत व अनेक प्रकारांनीं पाळावयाची व अभ्यासावयाची असते. खाद्याखाद्य-विवेक हा अहिंसा-पालनाचा एक प्रांत आहे, परंतु त्याचे बाहेरही अमर्याद मुलुख पसरलेला आहे. मुसलमान, ख्रिश्चन इत्यादि समाजांनीं खाद्या-खाद्यनिर्बंधांवर हिंदूं इतका भर दिलेला नसला तरी तेवढ्यानें ते समाज किंवा त्यांचे धर्म हिंदू धर्मापेक्षां अधिक निर्दय आहेत असें मुळींच नाहीं. कित्येक बाबतींत कांहीं हिंदूंचें पशुपक्ष्यांबाबतचें वर्तन त्यांचेपेक्षां अधिक निर्दयपणाचें ठरेल.

सारे धर्म भूतदयाच उपदेशितात. उदाहरणार्थ मुसलमान लोक बकऱ्याचें मांस खाण्यापूर्वी त्याला हलाल केला आहे किंवा नाहीं म्हणजे शक्य तेवढ्या कमी क्लेशकारक रीतीनें मारलेला आहे कीं नाहीं याची थम खात्री करून घेतील. कलमा पढणें हें तंत्र म्हणून बाजूला ठेवलें तरी पशूचें नरडें कापण्यांतील हेतु त्याला कमींत कमी वेदना व्हाव्या हाच असतो. शिखांचें शास्त्र बकऱ्याची गर्दन एका झटक्यांत उडविण्याचें, व तशी न उडाल्यास तें मांस न खाण्याचें, आहे. हा वेदना कमी करण्याचा दुसरा प्रकार आहे.

ख्रिश्चन धर्मामध्यें खाद्याखाद्य-विवेकाला विशेष महत्त्व दिलेलें

नाहीं, परंतु प्राण्यांना निर्दयतेनें वागविणें निषिद्धच मानलें आहे. ख्रिस्ताचें एक वचन प्रसिद्ध आहे कीं " मनुष्य खातो त्यामुळें बाटत नाहीं, तर तो जें बोलतो त्यामुळें बाटतो " उघडच आहे, गुलाबाला शेणखत घातल्यानें गुलाब बिघडत नाहीं, पण तो स्वतःच दुर्गंधी सोडूं लागेल तर मात्र तो कुजला आहे असें समजावें.

**निर्दयतेविरुद्ध कायदे :**—पशुपक्ष्यांना निर्दयतेनें वागविणें हा पाश्चात्त्य देशांत कायद्यानें गुन्हा ठरविलेला आहे. आपल्याकडेही अलीकडे त्यांच्या अनुकरणानें कांहीं कायद झालेले आहेत. गाडीच्या बैलांना पराणी मारणें, गाई-म्हशींना 'फूका' मारून दूध काढणें, बैलाला खांद आला असतां त्याला गाडीला जुंपणें, गाडींत प्रमाणाबाहेर ओझें लादणें, बैलांना वाद्यांनीं मारणें इत्यादि गोष्टी कायद्यानें गुन्हे ठरविलेल्या आहेत. भिन्न भिन्न समाजांनीं भूतदयेचा विकास भिन्न भिन्न प्रकारें केलेला असतो. आपली पद्धति तेवढी भूत-दयेची व इतरांची निर्दयतेची असें मानण्याकडे उथळ विचाराच्या लोकांची प्रवृत्ति असते, परंतु खरोखरी ते सर्व अहिंसेच्या पालनाचेच भिन्न भिन्न प्रयत्न असतात.

**सामाजिक अहिंसा**:— येथपर्यंत प्राणिविषयक अहिंसेचा उल्लेख केला. माणसांनीं परस्परांबाबतच्या अहिंसेमध्येंही युगानुयुगांमध्यें निःसंदिग्ध प्रगति केलेली आहे. मनुष्य अगदीं मूळपासूनच संघ करून रहात आला आहे. स्वतःच्या संघांतील माणसें तेवढीं मित्र व तद्-व्यतिरिक्त सारे शत्रु, ही त्याची नीति असे. प्रथम हे संघ लहान असत; हळूंहळूं ते मोठमोठे होत गेले. गांव-राज्यें बनलीं; राज्यांच्या विस्ताराची वाढ होतां होतां राष्ट्रें बनलीं; व अलीकडे विमानें, तारायंत्र, टेलिफोन, रेडियो इत्यादींची आश्चर्यकारक प्रगति झाल्यानें सारें जग एक राष्ट्र बनूं पाहत आहे. सध्यांचें

महायुद्ध म्हणजे नवीन विश्वराष्ट्राची प्रसववेदनाच आहे. 'लीग ऑफ नेशन्स' हा सुद्धां अडाणी व सदोष परंतु विश्वराष्ट्र-निर्मितीचाच प्रयत्न होता. माणसांमाणसांमधील उच्चनीचतेच्या कल्पना दूर सारून मनुष्यमात्रांना समान व समान अधिकाराचीं लेखण्याकडे मनुष्य प्रगति करीत आहे, व हा अहिंसेचाच प्रभाव आहे.

**गुलामगिरीची बंदीः**—या प्रवृत्तीचें सर्वांत ठळक व मनोवेधक उदाहरण गुलामगिरीची बंदी होय. "बळी तो कान पिळी" या तत्त्वाचा तो सडेतोड अव्हेर होय. एकेकाळीं सर्व देशांमध्यें युद्धकैद्यांना किंवा दुबळ्या जमातींच्या लोकांना गुलाम म्हणून, गाईबैलांप्रमाणें मालमत्तेच्या वस्तु म्हणून, वापरण्याचा व विकण्याखरीदण्याचा रिवाज होता. पिढ्यान्-पिढ्यांच्या वहिवाटीमुळें गुलामांचा एक स्वतंत्र वंश किंवा योनिच बनून राहिली होती. या अन्यायाचा प्रतिकार खुद्द गुलामांकडून होणें अशक्य होतें. त्यांना स्वतःची संघटणा करणें शक्य नव्हतें. एकेकट्यानें प्रतिकार करणें व्यर्थ होतें. परंतु मालक वर्गाची न्यायबुद्धि आपण होऊन जागृत झाली, आपल्याच बांधवांना पशूंप्रमाणें वागविणें व ते असहाय म्हणून त्यांचेवर सत्ता गाजविणें त्यांचें त्यांनाच अन्यायाचें वाटूं लागलें व असह्य झालें म्हणून त्यांनीं स्वतःच्याच प्रेरणेनें—स्वतःच्याच लोकांशीं झगडून गुलामांना मोकळें केलें व अतःपर कोणालाही गुलाम म्हणून वागविणें हा सरकार विरुद्ध गुन्हा ठरविला. मनुष्य स्वभावतः सत्प्रवृत्तच आहे याची खात्री पटण्यास एवढें एकच उदाहरण पुरेसें नाहीं काय ?

**ग्लेडिएटर झुंज** :—रोमन साम्राज्याच्या काळीं अद्याप बैलांचीं लावतात त्याप्रमाणें गुलामांचीं झुंजें लावीत. दोन गुलामांना शस्त्रें देऊन एकमेकांशीं झुंजण्यास लावीत. एकाचा जीव जाईपर्यंत ही झुंज चाले.

लक्षावधि रोमन नागरिकांना आरामशीर बसून हा खेळ पहातां यावा यासाठीं मोठमोठे स्टेडियम बांधलेले असत. या झुंजांना ' ग्लेडिएटरचें झुंज ' म्हणत. धन्यांच्या मनोरंजनार्थ गुलामांना एकमेकांचा जीव घेण्याखेरीज गत्यंतर नसे.

इ. स. ४०३ सालीं शत्रूवर मिळविलेल्या विजयाच्या उत्सवार्थ ग्लेडिएटर झुंजीचा कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. " ग्लेडिएटर खेळाचे जागीं येतांच तेथें जमलेल्या प्रेक्षकांनीं मोठा आनंदघोष केला. इतक्यांत अगदीं साधा पोशाक केलेला असा एक म्हातारा मनुष्य त्या ठिकाणीं आला. त्यानें त्या खेळ करण्याकरतां आलेल्या लोकांस मागें हटण्यास सांगितलें व हें असलें घोरकृत्य आजपासून बंद करावें म्हणून तो प्रेक्षक समुदायाची प्रार्थना करूं लागला. तो म्हणाला, " अहो महाराज, आपले शत्रु गॉथ लोक यांजवर परमेश्वरानें आपणांस जय मिळवून दिला, हे त्याचे उपकार आपण चांगलीं कृत्यें करून स्मरावें कीं अशा तऱ्हेनें खून पाडवून स्मरावे बरें ? तो इतकें बोलला तथापि त्याकडे कोणीही लक्ष दिलें नाहीं, इतकेंच नव्हे तर सर्व लोक मोठमोठ्यानें आरोळ्या मारूं लागले, आणि " खेळाडूंनो, या म्हातारड्याचें काय ऐकतां ? या तुम्ही पुढें आणि आपला पराक्रम दाखवा !" असें मोठ्या आवेशानें म्हणूं लागले. तेव्हां त्यांनीं पुढें येऊन त्या म्हाताऱ्यास एकीकडे ढकललें आणि लढावयास सुरवात केली. तथापि तो वृद्ध मनुष्य पुन्हां पहिल्या जागीं येऊन उभा राहिला, आणि त्या लढणाऱ्या लोकांस दूर करून आपलें म्हणणें लोकांनीं ऐकावें म्हणून यत्न करूं लागला. पण लोक कसचे ऐकतात ? त्यानीं ओरडून म्हटलें, " मारून टाका त्या थेरड्याला !" हें ऐकतांच आपले प्राण वांचविण्याकरतां आलेल्या त्या म्हाताऱ्यावर त्या ग्लेडिएटर लोकांनीं एकदम तरवारी चालवून त्यास तेथच्या तेथें ठार केलें !" ( नीतिबोध ) परंतु हीच शेवटली ग्लेडिएटर झुंज ठरली !

त्या वृध्द महात्म्याचें नांव संत टेलिकस. तो ख्रिस्ताचा अनुयायी होता.

**पुढील टप्पे:**—अशा तऱ्हेनें मनुष्यसमाज अहिंसेचे कांहीं टप्पे चालून आला असला तरी अद्याप चालून जावयाचा रस्ता अनंत आहे. अहिंसेचें उच्चतम शिखर गांठणें जरी आपल्याला शक्य नसलें तरी अहिंसेच्या चढणींतील आणखी कांहीं पायऱ्या चढून जाणें आपल्या आजवरच्या प्रगतीमुळेंच क्रमप्राप्त झालें आहे. आजवर पाळलेल्या अहिंसेची कांहीं बाबतींत परिपूर्ति व कांहीं बाबतींत संशोधन करणें आवश्यक आहे.

गुलामगिरीची बंदी करून आपण मनुष्यमात्राच्या व्यक्तित्वाला मान्यता दिली, मनुष्यत्वाला आदरणीय स्थान दिलें. त्या सुधारणेची परिपूर्तता होण्यासाठीं लोकशाहीची स्थापना व तिचें हरएक सामाजिक व्यवहारांत अनुशीलन होणें आवश्यक आहे. लोकशाहीची पूर्ण स्थापना होण्यासाठीं साऱ्या सामाजिक जीवनामध्यें अहिंसा व्यापून जाणें आवश्यक आहे.

**लोकशाहीची साधना:**—लोकशाहीचें तत्त्व अलीकडे सर्वमान्य झालेलें आहे. राजा हा विष्णूचा अवतार आहे व त्याला इतर माणसांवर पाहिजे तशी सत्ता चालविण्याचा हक्क जन्मतः किंवा राज्याभिषेकाच्या विधीमुळें प्राप्त होतो, किंवा विशिष्ट थोर वंशांतील माणसें इतर जातींहून श्रेष्ठ व त्यांचेपेक्षां अधिक सुखांत रहाण्यासाठीं देवानें योजिलीं आहेत, तसेंच विशिष्ट जाति अगर वंश हे जन्मानेंच हीन दर्जाचे व इतर श्रेष्ठ जातींची किंवा वंशांची सेवाचाकरी करण्यासाठींच निर्मिलेले आहेत असल्या खुनशी कल्पना आतां कोणालाच मानवत नाहींत. हा अहिंसेचाच उत्कर्ष आहे. सर्व मनुष्य समान आहेत. कोणी श्रेष्ठ नाहीं, कोणी कनिष्ठ नाहीं. माणसांमाणसांचें कर्तृत्व व बुध्दिमत्ता यांमध्यें फरक असला तर त्याचा हेतु

बलवानांना निर्बलांवर जुलूम करतां यावा हा नव्हे. निर्बळांची सेवा करावी व त्यांना आपल्या बरोबरीनें शहाणे व कर्तृत्ववान् करावे हाच बलिष्ठांचा धर्म आहे. या गोष्टी आतां शिष्टमान्य झाल्या आहेत. तथापि त्यांची अंमलबजावणी करण्याच्या बाबतींत मात्र मनुष्यजात अद्याप फार मागें आहे.

**वर्णद्वेषः**—एका बाजूनें वंश-मूलक आढ्यता व तुच्छता व दुसऱ्या बाजूनें न्यूनगंड यांचें मानवी व्यवहारांत अद्याप फार प्राबल्य आहे. गोऱ्या लोकांना वाटतें कीं आपण जणूं देवदूत आहों व काळे मानववंश हे आपले दास आहेत. नीग्रोंची गुलामगिरी नष्ट केली याबद्दल जणूं पश्चात्ताप पावून अमेरिकेंतील गोरे लोक नीग्रोंना अपमानपूर्वक वागवीत असतात, व छळीत असतात. हिंदूंना अस्पृश्यांबद्दल वाटणारी तुच्छता त्याच मासल्याची आहे. एवढेंच नव्हे तर जातीजातींमधील सार्वत्रिक उच्चनीचता ही सुद्धां निराळी नाहीं. या दूषित दृष्टीमुळें स्वतःला उच्च म्हणविणाऱ्या जातींकडून नीच मानलेल्या जातींना पदोपदीं अपमानच नव्हे तर अन्याय व छळ सोसावा लागत असतो. माणसांतील गूढ खुनशी वृत्तीचेंच हें प्रतिबिंब आहे, व त्याच्या निराकरणासाठीं आपणां सर्वांनाच, काळ्यांना व गोऱ्यांना, द्विजांना व शूद्रांना, नेटिव्हांना व वसाहतवाल्यांना झटलें पाहिजे. हे प्रयत्न अहिंसकच असले पाहिजेत, हिंसक प्रतिकारानें हिंसावृत्तीचें निराकरण न होतां वाढच होईल, हें उघड आहे.

**आर्थिक शोषण :**— विशिष्ट व्यक्तींकडून किंवा वर्गांकडून अन्य व्यक्तींचें किंवा वर्गांचें होणारें शोषण व त्यांतून उद्भवणारी आर्थिक विषमता ही सुध्दां समता व लोकशाही यांना बाधक आहे. संपत्तीची सत्ता ही प्रसंगीं तरवारीच्या सत्तेहूनही अधिक प्रभावी व प्रतिपक्षाला लाचार बनविणारी असते. खासगी मालकीच्या यांत्रिक उत्पादन पध्दतीची जसजशी

वाढ होते तसतशी संपत्ति थोडक्या लोकांच्या हातीं सांठते, इतरत्र दारिद्र्य पसरते व कोट्यवधि लोकांच्या जीवनमरणावर थोड्या श्रीमंतांची अबाधित सत्ता प्रस्थापित होते. बहुसंख्य निर्धन लोक धनिकांचे आश्रित व मिंधे बनतात. संपत्त्युत्पादनाच्या साधनांप्रमाणेंच लोकमत बनविण्याचीं साधनें— वर्तमानपत्रें, वृत्तसंस्था, छापखाने, प्रकाशन-संस्था, शिक्षण-संस्था इत्यादि धनिकांच्या बटीक बनतात. कायदेमंडळांच्या व इतर राजसंस्थांच्या निवडणुकी म्हणजे पैशाचा खेळ बनतो. ज्याचेपाशीं धन नाहीं किंवा ज्याला धनिकांचा आश्रय नाहीं त्यानें लोकप्रतिनिधि होण्याची आशाच करायला नको. अशा आर्थिक विषमतेच्या स्थितींत खरी लोकशाही नांदणें अशक्य आहे. पैसा ही शस्त्रास्त्रांसारखीच महान् शक्ति आहे. राष्ट्रांत कांहीं लोकांच्या पाशीं अत्यंत शक्तिमान् शस्त्रास्त्रें असतील व बाकीची सारी प्रजा निःशस्त्र व दुबळी असेल तर त्या राष्ट्रामध्यें ज्या प्रमाणें लोकशाही, म्हणजे राजकीय समता, नांदूं शकणार नाहीं, तसाच परिणाम आर्थिक विषमतेचाही होतो म्हणून न्याय, समता, लोकशाही व स्वातंत्र्य यांच्या प्रस्थापनेसाठीं राष्ट्रामध्यें आर्थिक समता, प्रस्थापित होणें आवश्यक आहे. ही समता समाजसत्ता प्रस्थापित करून घडवून आणावी कीं उत्पादन पद्धतीचें विकेंद्रीकरण करून संपत्ति एका ठिकाणी सांचू नये, प्रत्येक कुटुंबानें, गांवानें किंवा प्रदेशानें मुख्यतः स्वतःच्या उपयोगासाठींच उत्पादन करावें अशी व्यवस्था करून साधावी या प्रश्नामध्यें आपल्याला येथें शिरण्याचें कारण नाहीं.

**लोकशाही व अहिंसा :—** लोकशाहीमध्यें बहुमताच्या निर्णयानुसार राज्य कारभार चालविणें, अर्थात् त्या निर्णयाला अल्पसंख्य भिन्नमतवाल्यांनाही मान देणें, आवश्यक असतें. स्वतःच्या मताचा प्रचार करून बहुमत स्वतःकडे वळवून घेण्याचा प्रत्येक नागरिकाला हक्क आहे एवढेंच नव्हे

तर तें त्याचें कर्तव्यही आहे. परंतु त्या बरोबरच त्यानें इतर नागरिकांच्या मत-स्वातंत्र्याला व प्रचार-स्वातंत्र्याला मान दिला पाहिजे. मतप्रचार व मताधिक्य हीं सत्यमय व शांततेच्या उपायांनींच घडवून आणणें हें लोकशाही-निष्ठांचें कर्तव्य आहे. भिन्नमतवाल्यांना धाक दाखवून आपल्या बाजूनें मत देण्यास लावणें किंवा प्रतिपक्षी मतदारांचीं मतें विरुद्ध बाजूनें पडूंच नयेत म्हणून त्यांना पळवून नेणें, पिटाळून लावणें, किंवा मतदानाचें ठिकाणीं येण्यासच अडथळा करणें हे सारे प्रकार लोकशाहीचा द्रोह करणारे आहेत. इतरांच्या मतांबद्दल आदर व सहिष्णुता बाळगणें व तीं आपल्याला पसंत नसतील तर त्यांची कुशलतेनें, आस्थापूर्वक, निराग्रही वृत्तीनें व सोशिकपणें समजूत घालण्याचा प्रयत्न करणें हेंच लोकशाहीच्या अनुयायांचें कर्तव्य आहे. जें न्याय्य, सत्य किंवा हितकारक आहे तें त्या उदात्त तत्त्वांच्या अंगभूत शक्तीच्याच जोरावर प्रभावी होईल अशी खात्री लोकशाहीवाद्याची असावी लागते; तसेंच सत्याचा जय यथाकाल होणारच, तसा तो होईपर्यंत दृढ प्रयत्न करीत परंतु शांत चित्तानें वाट पहाण्याची त्याची तयारी असावी लागते. सरकारी ठराव, कायदे, किंवा हुकूम आपल्या मनासारखे व्हावे म्हणून दरारा किंवा कपट यांचा प्रयोग करणें म्हणजे लोकशाहीचा खून करणें होय.

लोकशाही म्हणजे सार्वत्रिक स्वातंत्र्य, प्रत्येकाच्या अनिर्बंध आत्म-विकासाला मोकळीक, नागरिकांचें परस्परांशीं पूर्ण खुषीचें सहकार्य. अर्थात्च सत्य व अहिंसा हीं लोकशाहीचीं फुप्फुसें आहेत. लोकशाही म्हणजे राज्य-कारभारांत अहिंसा-तत्त्वाचा अंमल.

आज जगानें लोकशाहीच्या तत्त्वाचा स्वीकार केलेला आहे. तें तत्त्व प्रत्यक्ष व्यवहारांत उतरविणें हा आपला चालू प्रयत्न आहे. अहिंसा ही त्या

प्रयत्नाची अनिवार्य शर्त आहे. परकीय सत्तेचें निवारण एवढाच हेतु असेल तर तो सशस्त्र बंडानें साध्य होऊं शकेल. पण परकी सत्तेऐवजीं समताप्रधान लोकशाही स्थापन व्हावी अशी इच्छा असेल तर शस्त्रांचा मार्ग धोक्याचा आहे.

युद्ध ही वस्तुच लोकशाहीला मारक आहे. लोकशाहीची सर्वत्र स्थापना व्हावी यासाठीं युद्धें व लष्करें बंद होणें आवश्यक आहे. युद्धाचे प्रसंगीं नागरिक स्वातंत्र्य व लोकसत्ता यांची गळचेपी करून हुकूम शाही सुरू करावी लागत असते हा नित्याचा अनुभव आहे. युध्दकालीन भयभीत वातावरणांत लोकशाहीचा जीवच गुदमरून जातो. शिवाय राष्ट्राचें सर्वोत्तम बुध्दिबल, मनुष्यबल व द्रव्यबल युध्दाचे कामीं खर्ची पडल्यानें गरीब बहुजन समाजाचे पराकाष्ठेचे हाल होतात. हल्लींच्या महायुध्दांपायीं सत्ताधीशांचा खेळ होतो परंतु उभयपक्षीय बहुजन समाजांचा जीव जातो. बहुजनसमाज, कामकरी व शेतकरी, कीं ज्यांची सारी शक्ति दिवसभर कष्ट करून आपला व आपल्या बालबच्च्यांचा कसाबसा निर्वाह करण्यांतच खर्च होत असते, ते बहुधा नम्र, शांतिप्रिय व पापभीरू असेच असतात. युद्धांतील शत्रुराष्ट्राच्या बहुजन समाजाशीं त्यांचा कांहीं हेवादेवाही नसतो. ते सुद्धां यांच्या प्रमाणेंच आपल्या सत्ताधाऱ्यांचे अंकित असतात; स्वतःचे मालक नसतात. जगांतील राष्ट्रांच्या बहुजन समाजांच्या हातीं खरीखुरी सत्ता येईल व त्यांचा आत्मविश्वास वाढेल तर युद्धांना सहजींच आळा बसेल

**युद्धांची भीषणताः**—दिवसेंदिवस युद्धें अधिकाधिक भीषण, संहारकारक, सर्वव्यापी व क्रूर बनत आहेत. सर्व जगाचे व्यवहार अलिकडे एकमेकांत गुंतलेले झाले आहेत, त्यामुळें युद्ध विशिष्ट ठिकाणीं सुरूं झालें

तरी त्याला क्रमाक्रमानें जागतिक स्वरूप प्राप्त होतें; सारें जग युद्धाच्या खाईत सांपडतें व होरपळून निघतें.

आधुनिक युद्धें जशीं जगद्-व्यापी तशींच सर्वंकष ( टोट्ल् ) म्हणजे देशांतील सर्व वर्गांना व त्यांच्या जीवनाच्या सर्व अंगांना आपल्या भोंवऱ्यांत खेंचणारीं असतात. पूर्वीं युद्धाचा प्रसंग आला कीं घरंदाज गांवकरीच ढाल, तरवार किंवा भाला घेऊन लढायला जाई व उभयपक्षांच्या सैन्यांचा गांवाबाहेर एकाद्या सोयीस्कर मैदानांत सामना होऊन तेथील चकमकीवरून युध्दांतील जयापजय ठरत. तशी स्थिति आतां राहिली नसून युध्द हें आतां अतिगहन असें स्वतंत्र शास्त्रच बनलें आहे. केवळ त्याच कामासाठीं तयार केलेल्या व जन्मभर त्यांतच घालविणाऱ्या लोकांचा तो स्वतंत्र पेशा बनला आहे. परंतु अशा तऱ्हेनें युध्दाचे चालक किंवा खडे सैनिक हे धंदेवाईक बनले असले तरी युध्दाच्या आघाडीवरील यशाचे दृष्टीनें पिछाडीवरील तयारीला फार महत्त्व आलें आहे. सारा देश ही युध्दाची पिछाडी बनून रहाते, व यच्चयावत् नागरिकांना युध्दाच्या तयारीमध्यें या-ना-त्या प्रकारें भाग घ्यावा लागतो. अनेक प्रकारचीं विमानें, अनेक प्रकारचे बॉंब, अनेक प्रकारचीं लढाऊ जहाजें, पाणबुड्या, सुरुंग, रणगाडे, तोफा, बंदुका व दारुगोळा व आणखी हजार प्रकारचीं युध्द-साहित्यें बनविण्यांत देशांतील मजूर, कारागीर व एंजिनियर गुंतवावे लागतात. विमानतळ व रस्ते बांधणें, सैनिकांसाठीं कपडे, बूट, पट्टे इत्यादि तयार करणें यांसारख्या कामांमध्यें लक्षावधि कारागिरांचे श्रम पाहिजे असतात. लढवय्यांना व युध्दकारागिरांना शिधागणी पुरविण्यासाठीं अवाढव्य योजना कराव्या लागतात. सैनिकांच्या आरोग्य-रक्षणासाठीं प्रतिबंधक इलाज व औषधें यांचा तसेंच डॉक्टर व नर्सेस यांचा पुरवठा करावा लागतो; इस्पितळें व शुश्रूषापथकें उभारावीं

लागतात. प्रचार, हेरागिरी व फितुरी हीं सुध्दां हल्लींच्या युध्दतंत्राचीं महत्त्वाचीं अंगें असतात. अशा प्रकारें सर्व नागरिकांची सर्वोत्तम शक्ति राष्ट्राच्या युध्दप्रयत्नाला तपानुर्पे जुंपावी तेव्हांच हल्लींच्या युद्धांमध्यें कांहीं काळ तरी टिकाव धरणें शक्य होतें —अखेरचें यशापयश दूरच राहिलें.

पूर्वी लढाई जमिनीवरच चाले तर हल्लींची जमिनीवर, खंदकांत भुयारांत, समुद्रांत, पाण्याखालून व आकाशांत चालते. पूर्वी लढवय्ये समोरासमोर येऊन लढत त्यामुळें वैयक्तिक शौर्य व बहादुरी तसेंच दिलदारपणा व दया यांना स्थान मिळे. परंतु आतां सर्व लढाई यंत्राधीन झाली आहे. यंत्रेंच परस्परांशीं लढतात. माणसें हीं यंत्रांची केवळ नोकर म्हणून काम करतात. शत्रूंची परस्पर दृष्टादृष्ट सुद्धां होत नाहीं. शत्रु-नगरांवर विमानांतून ढगांपलीकडून टाकलेले विषारी धुराचे बॉंब, निर्मनुष्य विमानें, पाणसुरुंग, भुइसुरुंग इत्यादि अस्त्रें आणि त्यांचें नूतन भावंड ॲटम बॉंब हीं आपापलें काम करतात. बॉंब शेतकऱ्याच्या खोपटावर पडतो, युध्द कारखान्यावर पडतो, देवळाच्या घुमटावर आदळतो, कीं एखाद्या हॉस्पिटलवर कोसळतो याची वैमानिकाला कल्पनाही नसते व पर्वाही नसते. पाणसुरुंग लढाऊ जहाजाचा बळी घेतो, कीं उतारूंच्या बोटीचा, कीं मच्छीमारी होडीचा याशीं त्या सुरुंगाला कांहीं कर्तव्य नसतें. अशा तऱ्हेनें पूर्वींच्या लढायांत शस्त्रधारी सैनिकांना, कीं जे मृत्यूच्या तयारीनेंच लढाईला जात त्यांनाच फक्त जोखीम असे तर हल्लींच्या युध्दांत वृध्द, स्त्रिया, अर्भकें कोणालाच माफी नाहीं.

युध्दापायीं मनुष्यानें युगानुयुगांच्या प्रयत्नानें कमाविलेली संपत्ति व सुखसोयीच नव्हत तर सारी संस्कृति, मंगलता, सामाजिक नीतिमत्ता, किंबहुना माणुसकीच लयाला जाते. मनुष्य पशूहून हीन बनतो.

**जागतिक शांतता**:--म्हणून मनुष्य समाजाला युध्दांचा वीट आला आहे. तरीही पुन्हां "युध्दाचा अंत आणण्यासाठीं" मागल्याहून अधिक भीषण युद्धें आरंभिलीं जात आहेत! प्रत्येक राष्ट्राचें 'संरक्षण खातें' असतें. आत्मसंरक्षणासाठीं प्रत्येक राष्ट्र लष्कर, आरमार, विमानदल व शस्त्रास्त्रें वाढवीत जातें. इतरांनीं वाढविलीं म्हणून हें राष्ट्र वाढवितें व यानें वाढविलीं म्हणून इतर राष्ट्रें वाढवितात. या स्पर्धेपायीं शांततेच्या काळांतही राष्ट्राची अधिकांश शक्ति या 'बचावा'वर (म्हणजे खरोखरी संहारावर) खर्च होत असते. शिक्षण, आरोग्य, रुग्णालयें, रस्ते, पाणी-पुरवठा, शेतीसुधारणा इत्यादि राष्ट्रपोषक कार्यांकडे लक्ष पुरविण्यास राष्ट्रधुरीणांना फुरसत रहात नाहीं व त्यांसाठीं खर्च करण्यासही सवड नसते. अशा तऱ्हेनें आपली उत्तम शक्ति खर्ची घालून राष्ट्रें युध्द विकत घेतात व मग त्या युध्दाच्या आगींत उरल्या सुरल्या वित्ताचा व जीवितांचा होम करतात.

युध्दांची प्रथा बंद झाली पाहिजे, राष्ट्रांराष्ट्रांमधील हितविरोधांचा न्याय तरवार किंवा बॉंब यांजवर सोपविण्यापेक्षां तो राष्ट्रसंघासारख्या न्यायपीठाकडून करवून घेणेंच अधिक योग्य असें प्रत्येकाला वाटतें.

**पॅसिफिझम्**:–यूरप-अमेरिकेमध्यें अनेक शांतिवादी सुधारक आपल्या मताचा प्रचार करीत असून त्यांनीं त्यासाठीं ठिकठिकाणीं शांतिसभाही स्थापन केल्या आहेत. युध्दाच्या प्रसंगीं किंवा शांततेच्या काळींही सक्तीच्या लष्कर भरतीमध्यें दाखल होण्याचें नाकारून हजारों लोकांनीं आजवर जबर शिक्षा भोगल्या आहेत. उदा. १९२८ सालीं युगोस्लाव्हिया सारख्या छोट्या देशामध्यें एकावेळीं बहात्तर सद्गृहस्थांना शस्त्रधारण करण्याचें नाकारल्याबद्दल दहादहा वर्षें तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. त्यापूर्वीही

त्यांनीं तसल्याच गुन्ह्याबद्दल (?) पांच पांच वर्षें शिक्षा भोगली होती. अशाच प्रकारचे सत्याग्रही देशोदेशीं पसरलेले आहेत.

**केलॉग पॅक्ट:**—१९२३ सालीं अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांच्या सेनेटमध्यें सिनेटर बोरा नांवाच्या सभासदानें असा एक ठराव मांडला होता कीं संयुक्त संस्थानांच्या सरकारानें इतर राष्ट्रांशीं करार करून असें जाहीर करावें कीं कोणत्याही राष्ट्रानें शस्त्रयुध्द करणें हें बेकायदेशीर कृत्य असून तो आंतरराष्ट्रीय कायद्याविरुध्द गुन्हा समजला जाईल. हा ठराव त्यावेळीं पास होऊं शकला नाहीं. परंतु १९२८ सालीं यूरप-अमेरिकेंतील प्रमुख प्रमुख पंधरा राष्ट्रांनीं युध्द-निषेधाचा ठराव केला. पुढील पांच-सहा महिन्यांत तर जगांतील सर्व राष्ट्रांनीं त्या करारास अनुसरून वागण्याचा आपापला निश्चय जाहीर केला. मि. केलॉग हें त्यावेळीं संयुक्त संस्थानांचे परराष्ट्र मंत्री असून त्यांनीं हा करार घडवून आणण्यांत पुढाकार घेतला होता म्हणून तो करार त्यांचेच नांवानें प्रसिध्द आहे.

या कराराच्या मागोमाग सर्व राष्ट्रांनीं आपापलीं शस्त्रास्त्रें व युद्ध-साहित्यें कमी कमी करीत जाणें क्रमप्राप्त होतें. परंतु तें मात्र घडलें नाहीं. युध्दबंदीचा तोंडानें पवित्र घोष करणें सोपें होतें, परंतु इतर राष्ट्रें आपापली शस्त्र-सामुग्री सज्ज ठेवीत असतां कोणत्याही राष्ट्रानें एकट्यानेंच आपली शस्त्र-सामुग्री कमी करणें धोक्याचें होतें. हा धोका पत्करण्यास पुढें कोणीं सरावें ?

**अग्रेसराची आवश्यकता** :— युध्दें बंद व्हावीं असें प्रत्येकाला मनापासून वाटतें. पण तें घडून येणार कसें ?

कोणतीही सुधारणा घडवून आणावयाची तर त्यासाठीं "सर्व जग सुधारेल तर मीही सुधारण्यास तयार आहें" असें न म्हणतां "जग कांहीं

करो, मला योग्य व इष्ट वाटतें तें मी एकट्यानेंही करणार," त्यासाठीं भोगाव्या लागतील त्या अडचणी भोगण्यास मी सिध्द आहें अशा निर्धाराचा एक तरी मनुष्य प्रथमारंभीं तयार झाला पाहिजे. त्याचा निर्धार पुरेसा वेळ टिकून राहिला तर त्याचा इतरांवर परिणाम झाल्यावेरीज रहात नाहीं. त्याला एक, दोन, पांच जोडीदार मिळत जातात, आणि असें पांचदहा जोडीदार मिळाले कीं मग आणखी हजारों मिळण्यास अडचण पडत नाहीं. लोक जमले कीं मीही सभेला येईन असें प्रत्येक जण म्हणेल तर सभा मुळीं होणारच नाहीं. कोणी तरी पहिला सभा-जन बनलेंच पाहिजे. त्याचप्रमाणें "कसलाही प्रसंग आला तरी आम्ही शस्त्रानें लढणार नाहीं" असें म्हणणारें एक तरी राष्ट्र तयार झालें व आपल्या ब्रीदाला चिकटून राहिलें तर त्याचा प्रभाव साऱ्या जगावर पडल्याशिवाय रहाणार नाहीं. अशा राष्ट्रानें शांततेच्या काळांत लष्कर व शस्त्रास्त्रें यांची यत्किंचितही उभारणी करूं नये, इतरांशीं संघर्ष उद्भवल्यास तंट्याचा प्रश्न लवादापुढें मांडून लवादाचा निर्णय मानण्याची तयारी दर्शवावी व त्याउपर दुसऱ्यानें चढाई केल्यास तिचा केवळ अहिंसक मार्गांनीं प्रतिकार करावा. शस्त्रास्त्रें घेऊन शत्रूला मारण्यासाठीं नव्हे तर हातीं शस्त्र न धरतां अंगांत चिलखत हि न घालतां, केवळ मरण्यास तयार असलेल्यांच्या पलटणी घेऊन शत्रूस सामोरें जावें.

**सशस्त्रांविरुद्ध निःशस्त्र :--** असल्या अहिंसक परंतु शूरोचित प्रतिकाराचा जादूसारखा परिणाम झाल्याविना रहाणार नाहीं. शत्रूच्या बंदुकांच्या पहिल्या काहीं फेरींबरोबर अहिंसक सैनिकांपैकीं पुष्कळसे मरून पडतील. शौर्य व अहिंसा हीं कसोटीला उतरतील त्यानंतरच त्यांचा परिणाम होऊं लागणार. चिनीचे सैनिक मरून पडल्यानंतरही मागील

रांगा शस्त्राविना पुढें पुढें चालून येत असलेल्या पाहून मात्र शत्रु-सेना चपापून, गोंधळून, जाईल. शत्रु गोंधळला कीं अर्धी लढाई जिंकली ! या अहिंसक शौर्यापुढें शत्रूची शक्ति लटकी पडेल. शत्रुसैन्य हल्ला करतें तें प्रतिहल्लयाच्या अपेक्षेनें किंवा भीतीनेंच करीत असतें. प्रतिहल्लयामुळें त्यांच्या हल्लयाचें त्यांना समर्थन मिळतें व अधिक जोरानें हल्ला करण्यास आवेश चढत असतो. परंतु प्रतिहल्लयाच्या अभावीं हा आवेश लटका पडतो.

भ्याडाचा पाठलाग करणें सोपें असतें. क्रूराशीं दोन हात करण्यांत मौज वाटते. परंतु जो भ्याडही नाहीं व क्रूरही नाहीं त्याचें कोण काय वांकडें करणार ? हरणाची शिकार करण्यांत मौज वाटतें, कारण तें धूम ठोकून पळतें; वाघाची शिकार करण्याचीही ईर्ष्या येते, कारण त्यांत साहस असतें. परंतु ढोणग्याची कोण कशी शिकार करूं शकणार ?

खऱ्या शौर्याबद्दल शत्रूला सुद्धां नितांत आदर वाटल्यावांचून रहात नाहीं. अहिंसक शौर्य हेंच निर्भेळ शौर्य. हिंसक शौर्य म्हणजे क्रौर्याची भेसळ असलेलें शौर्य. तरवार ही शौर्याची नव्हे तर क्रौर्याची निशाणी आहे; आणि क्रौर्य हें भ्याडपणांतून व देहाबद्दलच्या आसक्तींतून उद्भवतें. अर्थात् तरवार ही शौर्याची नव्हे तर भ्याडपणाचीच निशाणी आहे. एवढें खरें कीं लाचारीपेक्षां तरवार उपसणारा भ्याडपणा श्रेष्ठ आहे. परंतु जुलमाच्या प्रतिकारार्थ मृत्यु पत्करण्याची तयारी नाहीं, जालिमाच्या व्यक्तित्वाबद्दलच्या आदरामुळें त्याला दुखापत करण्याचीही इच्छा नाहीं व अन्य व्यवहार्य मार्गही सुचत नाहीं अशा स्थितींत उद्भवणारी तात्पुरती निष्क्रियता ही सुध्दां तितकीच किंवा अधिक श्रेष्ठ आहे. असो.

अहिंसा-दलाच्या अपूर्व शौर्यामुळें प्रतिपक्षाचे सैनिक चपापतात व गोंधळतात एवढेंच नव्हे तर त्यांच्या हृदयामध्यें द्वेष व सूड यांचे ऐवजीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत

आदर व करुणा यांचा प्रादुर्भाव होतो. "अशा बहादूर परंतु सर्वस्वीं निरुपद्रवी सज्जनांची आम्हीं कत्तल कां करावी ?" असा प्रश्न त्यांचे मनामध्यें उठतो. ते [illegible] म्हणून लढाई खेळण्याच्या आशेनें आले होते. परंतु येथें तर त्यांच्या वांट्याला खाटीक-कामच येतें. म्हणून ते आपल्या वरिष्ठांना चोख सांगतात कीं "निष्पाप निःशस्त्र माणसांवर गोळ्या झाडण्यास आम्ही मारेकरी थोडेच आहों ? आम्ही नाहीं गोळ्या झाडणार. आम्हांला आमच्या पेशाला साजेसें अन्य काम द्याल तर करूं." कारण हे शत्रु सैनिक तरी माणूसच असतात. त्यांना आई, बाप, भाऊ, मुलेंबाळें असतात. त्यांनाही हृदयाचा ओलावा असतो; प्रेम-आदर-करुणा-मंगलता आमच्या प्रमाणेंच जाणवत असतात. आपल्या इतकीच त्यांनाही न्यायाची व नीतीची चाड असते. खोडसाळ प्रचारामध्यें आमचें जें अतिरंजित भेसूर चित्र त्यांना दाखविण्यांत आलें त्यानें फसून, सैनिकांना देशाचे रक्षक म्हणून गौरविण्यांत येतें त्याला भाळून, घरीं आईबापांशीं पटेना म्हणून, किंवा निर्वाहाचें अन्य साधन नव्हतें म्हणून, त्यांनीं सैन्यांत नांव दाखल केलें असेल किंवा ते सक्तीच्या लष्कर-भरतींत सांपडले असतील. आणि आतां हुकमाचे ताबेदार म्हणून, परत जिवंत जाण्याची आशा सोडून, आमच्या विरुध्द लढण्यास—लढविले जाण्यास—आले असतील. त्यांच्यांतील हिंस्रवृत्ति हें आपल्यांतील हिंस्रवृत्तीचें प्रतिबिंब असतें. बिंबाचाच अस्त झाला म्हणजे प्रतिबिंबाचा लोप होण्यास उशीर नाहीं.

या अहिंसेच्या नव प्रयोगांत प्रथम कांहीं हानि होईल, परंतु शस्त्र-युध्दाच्या प्रमाणांत ही हानि अगदींच क्षुल्लक असेल. शस्त्रास्त्रांनिमित्त करावा लागणारा अवाढव्य खर्चही तींत करावा लागत नाहीं. अमर्याद संपत्ति व मनुष्यबळ खर्ची घालूनही शस्त्र-युध्दामध्यें अपेश आलें म्हणजे

पराजिताची स्थिति विशेषच दुःसह बनते. जपान सुइसाइड स्क्वाड्स् (आत्माहुति-दलें) उभारून सुध्दां पराजय पावलाच कीं नाहीं? परंतु अहिंसक प्रतिकारांतील आत्माहुतीचें प्रमाण प्रतिपक्षाचें हृदय द्रवविण्यास पुरेसें भरलें नाहीं व त्यामुळें त्याला अपयश आलें, तरी तें अपयशही शस्त्रयुध्दांतील अपयशापेक्षां पुष्कळच सुसह असतें. शस्त्रसंग्रामाच्या अंतीं विजेत्याचा उन्माद विशेषच तापकारक होतो.

मात्र जेव्हां प्रतिकारकाचा पक्ष उघड उघड व सर्वस्वीं न्यायाचा असतो, त्याची शक्ति जालिमाच्या पासंगालाही पुरणारी नसते, तथापि अशा स्थितींतही तो विजयाच्या नव्हे तर मृत्यूच्याच निश्चित अपेक्षेनें, जिवावर उदार होऊन, सशस्त्र प्रतिकार करतो—उदा० एकटा गृहस्थ काठी किंवा कुऱ्हाडीनिशीं पंचवीस सशस्त्र दरोडेखोरांवर तुटून पडतो—तेव्हां अशा प्रतिकारानें आक्रामक पराभूत न झाला तरी फजित होईल हें निश्चित. असला प्रतिकार लाचार निष्क्रियतेहून श्रेष्ठ असल्याचें आपण मान्य केलेंच आहे. त्या प्रतिकाराला हिंसक म्हणण्यापेक्षां अहिंसक म्हणणेंच अधिक शोभेल. १९३९ सालीं पोलंडनें शस्त्रांनिशीं केलेल्या जर्मनीच्या प्रतिकाराला गांधीजींनीं याच अर्थानें जवळजवळ अहिंसक म्हणून गौरविलें होतें. असो.

ऐहिक मानवी जविनामध्यें राष्ट्राराष्ट्रांचे दरम्यान तंटे किंवा घर्षणाचे प्रसंग निर्माण होणारच नाहींत असें व्हावयाचें नाहीं; परंतु तंटे उपस्थित झाले तरी ते मिटविण्यासाटीं शस्त्रसंग्रामाचा जंगली मार्ग अवलंबिण्याऐवजीं लवादाचा सभ्य व सयुक्तिक मार्ग अवलंबिण्यांत यावा. आक्रमणाचा अहिंसक प्रतिकार करतांना सत्याग्रह्याची मागणी प्रतिपक्षानें तंट्याचा मुद्दा लवादासमोर मांडण्यास तयार व्हावें एवढीच असावी.

**निसर्गाची चाळणः**—कित्येकांना वाटतें कीं माणसाच्या प्रगतीला

युद्धें आवश्यक आहेत. त्यांचें म्हणणें युद्ध ही निसर्गाची चाळण आहे, किंवा निसर्गानें घेतलेली स्पर्धा-परीक्षा आहे. या जगांत सर्वांचा निभाव लागण्यासारखा नाहीं; येतील तितक्या उमेदवारांना नोकऱ्या देणें शक्य नाहीं. म्हणून त्यांची परीक्षा घेऊन वरच्या नंबरांना निवडून काढण्याची निसर्गाची रीत शस्त्र-संग्राम हीच आहे. जो अधिक बलवान्—केवळ शरीरानें च नव्हे तर बुद्धि, चिकाटी, संघशक्ति इत्यादि सर्व दृष्टींनीं सरस—असेल त्याची सरशी होईल व तोच जगण्यास लायक. निर्बलानें नष्ट व्हावें यांत जगाचें हित आहे. मधून मधून युद्धें होऊन अशा तऱ्हेनें सरस-निरसांची निवड होत गेली नाहीं व नालायक लोकांनासुद्धां आपण जगवीत व वाढवीत गेलों तर जगाची लोक-संख्या भरमसाट वाढेल आणि बऱ्या-वाईट साऱ्याच माणसांची कुचंबणा व उपासमार होईल. यापेक्षां युद्धाच्या चाळणींतून पास होणाऱ्या निवडक लोकांनींच जगावें हें उचित आहे.

जीवन स्पर्धाकुल आहे हें कांहीं अंशीं खरें आहे. त्यामध्यें लायक इसमांचाच टिकाव लागावा हें उचित आहे. प्रश्न एवढाच कीं लायकाची कसोटी काय असावी. पशुबलाचें आधिक्य हीच मानवी श्रेष्ठतेची कसोटी ठरवायची का ? मनुष्याची व्याख्या 'बुद्धिशाली पशु' अशीच करायची का ? ज्या मनुष्याची संहारशक्ति अधिक तो श्रेष्ठ व तो जगण्यास अधिक लायक असें समजायचें का ?

परंतु अशा मनुष्याला 'बुद्धिशाली पशु' म्हणण्यानें आम्ही पशु-वर्गाचा अपमानच करीत आहों ! पशूंमध्यें सुद्धां केवल आत्मसंरक्षणाचीच नव्हे तर जातिसंरक्षणाचीही निसर्गदत्त प्रेरणा असते. जातिरक्षण किंवा वंशवृद्धि यांसाठीं पशुसुद्धां आत्मबलिदान करतात. अर्थात् हें ते स्वेच्छा-पूर्वक करीत नाहीं तर नैसर्गिक, अनिवार्य, प्रेरणेनुसार करतात. पशु जें

नैसर्गिक प्रेरणनें—“बलादिव नियोजितः=वेठीस धरिला जसा—करतो तेंच मनुष्यानें स्वतंत्र पसंतीनें, सदसद्विवेक-पूर्वक करावें अशासाठींच मनुष्याला इच्छा-स्वातंत्र्य प्राप्त झालें आहे. “बळी तो कान पिळी” किंवा बळी तोच जगेल हें पशुसृष्टीच्या बाबतींतही पूर्ण सत्य नाहीं व मनुष्य-सृष्टीच्या बाबतींत तर तें असत्यच आहे. आत्म-निष्ठा म्हणजे देहाच्या क्षणभंगुरतेची व नीतितत्त्वांच्या अबाध्यतेची प्रचीति व तदनुसार वर्तन—हा मनुष्य जीवनाचा कायदा, म्हणजेच मनुष्य-स्वभाव किंवा मनुष्य-धर्म आहे. पशुसृष्टीच्या बाबतींत आधिभौतिक मूल्यांना जें स्थान असतें तेंच स्थान मनुष्यजातीच्या बाबतींत आध्यात्मिक मूल्यांना प्राप्त होतें. अर्थात् शस्त्रसंन्यासी, त्यागशील व सेवा-परायण माणसेंच अधिक लायक असून पृथ्वीवर उत्तरोत्तर त्यांचीच वंशवृद्धि होत जाणार आहे. “दि मीक्‌शॅल् इन्हेरिट् दि अर्थ्” (बायबल) जे नम्र वृत्तीचे आहेत तेच जगाचे राजे होतील. “नम्र झाला भूतां। तेणें कोंडिलें अनंता” नम्र, नीतिपरायण माणसांचा अकालीं देहनाश होतांना आढळला तरी त्या मरणांतूनच ते अमरता प्राप्त करतील; त्यांच्या आत्म-यज्ञानेंच त्यांचा वंश विस्तारेल, म्हणजे मागें रहाणारीं माणसें अधिकाधिक नीति-परायण बनत जातील.

मनुष्य-जाति-रक्षणासाठीं युध्दांची प्रथा थांबणें आवश्यक झालें आहे. मनुजता-रक्षणासाठीं तर युध्दबंदी विशेषच आवश्यक आहे.

शिवाय भूपृष्ठावरील लोकसंख्या भूमि पोसूं शकेल त्याहून अधिक वाढण्याची भीति अद्याप फार दूर आहे. आफ्रिका, अमेरिका, आस्ट्रेलिया इत्यादि मुलूख अद्याप पुष्कळ अंशीं निर्जन आहेत. तेथील जमीन कांहीं पिढ्यांनंतर आपल्या वंशजांना कमी पडेल या निष्कारण धास्तीनेंच, तसेंच

सध्यांही तेथील जमीन बळकावून बसलेल्या लोकांची कांहींशीं गैरसोय होईल म्हणून, त्या मुलखांत इतर गरजवंतांना येऊन रहाण्यास प्रतिबंध करण्यांत येत आहे. संख्या-वाढीचा प्रश्न खरोखर उद्भवेल तोंपर्यंत संख्या नियमनाचे कत्तलीहून अधिक चांगले उपायही सुचतील. उलट आज अशींच युध्दें चाललीं तर मनुष्यजात नेस्तनाबूद होण्याचीच धास्ती उत्पन्न झाली आहे.

**व्यापक सुधारणेची आवश्यकता**:—तथापि युध्दें होऊं नयेत ही शुभेच्छा किंवा युध्द करणार नाहीं असा शुभ संकल्प हीं एकेकटीं सिध्दीस जाणार नाहींत. त्यांच्या जोडीला व त्यांच्या परिपूर्तीसाठीं इतर अनेक बाबतींत सामाजिक व अंतर्राष्ट्रीय जीवनाची पुनर्घटना होणें आवश्यक आहे. अनावर लोभ, मद, मत्सर यांचे साम्राज्यांत वारंवार युध्दें होणें अपरिहार्य आहे. कुपथ्य पदार्थ फाजील प्रमाणांत खाणाराला गळवें होतच रहाणार. तीं झालीं असतां त्यांचेवर शस्त्र-क्रिया करणार नाहीं असा संकल्प केल्यानें तीं किंवा त्यांचेपासून होणारी पीडा जाणार नाहीं. त्यासाठीं कुपथ्य पदार्थ वर्ज्य करून शरीरांतील सारें रक्त सुधारेल अशी दक्षता घेतली पाहिजे. त्याच प्रमाणें भांडवलशाही, साम्राज्यशाही, वंशाभिमान, धर्माभिमान तसेंच संरक्षणाच्या नांवाखालीं सैनिक-भरती व शास्त्रास्त्रवृध्दि हीं जोंपर्यंत चालू आहेत तोंपर्यंत युध्दें टाळणें अशक्य आहे. हिंसेच्या या साऱ्या संथ प्रवाहांचा कडेलोट झाला म्हणजे युध्दाचा धबधबा बनतो. भांडवलशाही म्हणजे दुसऱ्याच्या श्रमफलाचा अपहार, ही हिंसाच आहे. धनसंचय म्हणजेही शस्त्र-सज्जताच आहे. साम्राज्यशाही राष्ट्रांनीं युध्दनिषेधाची भाषा बोलणें म्हणजे विजयी आक्रामकानें “ प्रतिपक्षानें प्रतिहल्ला करूं नये ” असें म्हणण्याप्रमाणें आहे. भिन्न भिन्न मनुष्यवंशांमध्यें

जोंपर्यंत " मी इतरांहून श्रेष्ठ आहें, म्हणून इतरांचा स्वामी होण्याचा मला हक्क आहे असा मद संचरलेला आहे, तसेंच " माझा धर्म तेवढाच सत्यधर्म व बाकीचे धर्म म्हणजे पाखंडें, व त्यांचे अनुयायी ते सारे पापी " या अधार्मिक समजुतीचा अंमल जोंपर्यंत चालू आहे तोंपर्यंत युध्दाचे प्रसंग येतच रहाणार, व " अनिवार्य युध्दांच्या पूर्वतयाऱ्यांमुळें " ते अधिकच लवकर येणार.

म्हणून लोकशाही व शांति यांच्या उपासकांनीं हे सारे हिंसक प्रकार स्वतःच्या जीवनांतून व समाजांतून नाहींसे करण्याचा पध्दतशीर प्रयत्न केला पाहिजे.

**अहिंसेची साधनाः—** सामाजिक, राजकीय, व अंतर्राष्ट्रीय व्यवहारांत अहिंसेची स्थापना कर्तव्य असेल तर व्यक्तीव्यक्तींमधील खासगी व्यवहारांतही अहिंसेचें पालन करण्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. किंबहुना समाजाची रचना अहिंसेच्या पायावर घडवून आणावयाची असेल तर त्यासाठीं अहिंसक वृत्तीच्या घटकांचीच प्रथम आवश्यकता आहे. अहिंसेचें पालन हा केवळ एक सार्वजनिक कार्यक्रम न रहातां ती नित्याची वृत्ति बनून राहिली पाहिजे. व्यक्तींतीलही अहिंसा-निष्ठा जागतिक-शांतता-स्थापनेचें साधन म्हणूनच केवळ इष्ट आहे असें नव्हे तर त्यांतच व्यक्तीचें हित व जीवन-साफल्य आहे. म्हणूनच ती अभ्यासावयाची आहे. स्वाभाविक ओढीमुळेंच मनुष्याला अहिंसेच्या मार्गावर प्रगति करीत जावें लागतें.

नित्याच्या जीवनामध्यें हिंसे-अहिंसेमध्यें निवड करण्याचे प्रसंग मनुष्यावर हरघडी येत असतात. भाऊबंदांनीं जमीन बळकावली, शेजाऱ्याचीं गुरें शेतांत शिरलीं, शेजाऱ्यानें शिवीगाळ केली, झाडावरील फळें चोरीस गेलीं, कर्जदार कर्ज देण्याची चुकवाचुकव करतो, आगगाडींत इतर

उतारू जागा अडवून बसतात किंवा मी धरलेल्या जागेवर आक्रमण करतात, खोडकर मुलें माझ्या संरक्षणाखालील मुलांना सतावतात—अशा कितीतरी अडचणींचें निराकरण अहिंसक पद्धतीनें कसें करावें तें तत्काल सुचत नाहीं. तें मुकाट्यानें सहन करण्याइतकी सहनशीलताही नसते अशा प्रसंगीं हिंसेचा उपाय हा परिणामीं विफल व हानिकारक कां ठरेना पण तूर्तातूर्त सोपा व सीधा वाटतो.

“ दि स्वोर्ड इज् एव्हर् अे शिफ्ट् ऑफ् फूल्स्,
टु हाइड् देअर् फॉली ”–(अर्न्स्ट टोलर—

पं. जाहरलाल नेहरूंच्या इंडिया ॲंड दि वर्ल्ड या पुस्तकांत उध्दृत केलेलें वचन.)–‘तरवार हें मूर्खांचें हुकमी साधन आहे. त्यानें स्वतःचा मूढपणा झांकून काढतां येतो.’ अहिंसक उपायांसाठीं योजकता व कमालीची सहनशीलता लागत असते. पारिपत्य करावयाचें नाहीं असा निर्धार केला म्हणजेच योजकतेला वाव मिळतो. परंतु योग्य उपाय सुचेपर्यंत, किंवा त्याचा सुपरिणाम घडेपर्यंत, सहन करणें एवढाच मार्ग रहातो.

ही सहनशक्ति अभ्यासानें कमावितां येइल. मन हें सुद्धां एक मूलच आहे. त्याला पढवून तयार केलें पाहिजे. त्याला पढवितां येईल. अहिंसेचा धडा घोकून घोकून पाठ करवून घेतां येईल.

अहिंसेच्या साधकाची आत्मैक्यावर दृढ श्रद्धा असली पाहिजे. त्याचा त्यानें निदिध्यास केला पाहिजे :—

(१) मी व जग एक आहों; मी व शेजारी एक आहों. प्रतिपक्षी हा माझाच आत्मा आहे. माझ्याप्रमाणें तोही मंगलमयच आहे.

(२) प्रतिपक्षी स्वभावतः दुर्जन नाहीं. त्याचा माझा विरोध येतो त्यांत माझीही चूक असेल. त्याचें म्हणणें मला न कळल्यानें, माझें म्हणणें

त्याला समजावून न देतां आल्यानें, हा विरोध उत्पन्न होतो, किंवा झालासा वाटतो.

( ३ ) मी देह नसून आत्मा आहें. देह क्षणभंगुर आहे. शत्रूचा हल्ला परतविला तरी दुसऱ्याच क्षणीं मृत्यूचा हल्ला येणार नाहीं कशावरून ? शील, ब्रीद, धर्म-पालन यांनाच महत्व आहे, त्यांसच जपावें.

( ४ ) मृत्यूमध्यें भिण्यासारखें कांहींच नाहीं. मृत्यु कोणाला चुकलेला नाहीं. मृत्यु म्हणजे झोपच आहे. झोपतांना ज्याप्रमाणें वेदना किंवा जाणीव नसते त्याच प्रमाणें मृत्यूचे क्षणीही वेदना नसतात. मृत्यु हा जीवाचा मित्रच आहे. मृत्यु म्हणजे कंटाळवाण्या जीवनांतून सुटका. देह मेला तरी अमर आत्मा नवे नवे देह घेऊन त्यांचे मार्फत आपले उद्देश तडीस नेणारच.

( ५ ) सुख दुःख हीं क्षणजीवी आहेत. ते मनाचे खेळ आहेत. दुःख हें सुधारणा, प्रगति, उन्नति पुनर्घटना इत्यादींसाठीं आवश्यक आहे हें जाणून त्याचें स्वागत केलें पाहिजे, मग दुःखच सुख-रूप बनतें; संकटें उन्नतीच्या पायऱ्या बनतात.

( ६ ) ईश्वर माझा पोषिंदा आहे. माझ्या चारितार्थाची त्याला काळजी आहे. माझें उद्यां कसें होईल याची मला आज काळजी करण्याचें मुळींच कारण नाहीं.

( ७ ) जग माझ्या सुखासाठीं निर्माण केलेलें नाहीं. मी त्याचा एक अत्यंत अल्प व क्षुद्र घटक आहें. मी जीवन-सागरावरील एक बुडबुडा आहें. मी अज्ञ आहें, स्खलनशील आहें, दुनियेच्या कृपेनें जगत आहें.

( ८ ) हीनपणा पत्करून कसलें तरी निंद्य जीवन जगण्यापेक्षां मरून जाण्यांतच कल्याण आहे.

अशा तऱ्हेचे विचार मनांत नित्य घोळवून ठसविल्यानें अहिंसेवरील निष्ठा दृढ होईल व तिचें पालन सुलभ व स्वाभाविक होईल.

निर्धारबल वाढविण्याचे दृष्टीनें साधकानें साधेच नियम पण ते कठोरपणें पाळण्याची संवय लावून घ्यावी. बुध्दीला तसेंच जीवनालाही योग्य संवईच्या मार्गें वळण लावलें पाहिजे. साधकाला शारीरिक श्रमांचा सराव पाहिजे, स्वतःकडून दुसऱ्याचें शोषण व्हायला नको असेल तर उत्पादक शारीरश्रम आवश्यक आहे. श्रमाच्या सरावामुळें उद्यांची चिंता वाटत नाहीं, त्यामुळें निर्भयता येते. साधी संयमशील रहाणी ही अहिंसा वृत्तीला फार पोषक होते. साध्या अल्पखर्ची रहाणीमुळें मनावरील फालतू बोजा कमी होतो, स्वतःपायीं इतरांना होणारा त्रास कमी होतो, आपली सेवा-शक्ति वाढते.

साधकानें क्रोध आवरण्यास शिकलें पाहिजे. कोणाचाही द्वेष किंवा मत्सर करतां नये.

अशा तऱ्हेच्या सतत, दीर्घ, दृढ प्रयत्नांतूनच अहिंसा चित्तांत मुरेल व जगांत पसरेल.

———

# साधक–बाधक चर्चा

येथवर आपण अहिंसेच्या मार्गाचें श्रेष्ठत्व दर्शविण्याचा प्रयत्न केला. मनुष्य-समाजानें आपापसांतील व्यवहार शस्त्रांच्या साह्याखेरीजच चालवावे, वादाचे प्रसंग समजुतीनें किंवा तिऱ्हाइताच्या निर्णयानुसार मिटवावे हें योग्य व इष्ट असल्याचें कोणीही मान्य करील. स्वतःच्या मनगटाच्या किंवा शस्त्रास्त्रांच्या जोरावर दुसऱ्यावर नाहक आक्रमण करणें ही गोष्ट निंद्य व माणुसकीला न शोभणारी आहे हेंही सगळे कबूल करतील. परंतु जगांत अन्याय, जुल्म, जबरदस्ती, आक्रमण इत्यादि सरसहा चालू आहेत. त्यांचा प्रतिकार किंवा निवारण अहिंसेनें होऊं शकेल, करणें झेपेल, तर उत्तमच, परंतु त्यासाठीं प्रसंगीं आत्म-यज्ञाची, हंसत मृत्यूला आलिंगन देण्याची, आक्रामकावरही मातृवत् प्रेम करण्याची, आपलें शत्रुत्व करणाराचेंही शुभ चिंतिण्याची, सत्पक्षाची तयारी असावी लागते. ही तयारी क्वचित् एखाद्या लोकोत्तर पुरुषाचीच होणार. सामान्य माणसाची तेवढी तयारी नसल्यास तो त्याचा गुन्हा म्हणतां येणार नाहीं. अशा सामान्य इसमानें त्याचेवर दुसऱ्याकडून नाहक जबर्दस्ती होत असेल तर त्याप्रसंगीं काय करावें ?

उदा० माझ्या घरावर एकाएकीं दरोडा आला. दरोडेखोर सशस्त्र आहेत व ते धमक्या देण्यासच नव्हे तर मारहाण करण्यास संवकलेले आहेत. अशा प्रसंगीं मी त्यांना प्रतिकार न करतां माझें घर लुटून नेऊं द्यावें कीं मारहाणीची किंवा मृत्यूचीही पर्वा न करतां त्यांचा सर्वशक्तीनिशीं कुऱ्हाड कोयती सोटा मिळेल तें हत्यार वापरून सामना करावा ?

हें उघडच आहे कीं भ्याडपणानें दरोडेखोरांपुढें नमण्यापेक्षां त्यांचा हिंसक प्रतिकार करण्यांत मर्दुमकी आहे. हिंसा तत्त्वतः म्हणजे आदर्श व्यवहाराच्या दृष्टीनें अनिष्ट असली तरी दुष्टाच्या जबर्दस्त हिंसेच्या प्रतिकारार्थ केलेली बचावात्मक हिंसा केव्हांही स्पृहणीयच आहे. हिंसे-हिंसेमध्यें फरक केला पाहिजे. शक्तीच्या मदानें केलेली आक्रमणात्मक हिंसा निंद्य आहे, पण म्हणूनच त्या निंद्य आक्रमणाच्या प्रतिकारार्थ केलेली बचावात्मक हिंसा प्रशस्त ठरते. प्रतिपक्षाची शक्ति भारी आहे आणि त्याचा अन्याय धडाडीत आहे अशा स्थितींत लाभालाभ जयाजय इत्यादींची पर्वा न करतां केलेल्या हिंसक प्रतिकारामध्यें लाज मानण्यासारखें कांहीं नाहीं. लाचार शरणागतीपेक्षां प्रतिकारच श्रेष्ठ आहे. स्वतःच्या बचावाप्रमाणेंच शरणार्थी, निरपराधी निर्बलाचा बलिष्ठ जुलमी आक्रामका-पासून बचाव करण्यासाठीं केलेली उघड, निष्कपट व रोखठोक प्रतिहिंसा श्रेष्ठ नसली तरी निंद्यही नाहीं.

समोरचें फणसाचें झाड माझ्या हद्दींत व माझ्या मालकीचें आहे कीं शेजाऱ्याचें आहे याबाबत वाद उत्पन्न झाला असतां त्या वादाचा निवाडा दांडपट्ट्यानें किंवा निशाणबाजीनें करूं पाहणें आडमुठेपणाचें ठरेल, हास्यास्पद ठरेल; परंतु शेजाऱ्यानें द्वंद्वयुद्धाचें दिलेलें आह्वान स्वीकारण्यांत, किंवा माझ्या आह्वानस्वीकाराची वाट न पहातां, किंबहुना आह्वान न देतांही, तो अकस्मात् माझ्यावर चालून आला तर त्याला तोंड देण्यांत मी कसलेंच निंद्य आचरण करीत नाहीं, व त्याच्या आक्रमणापुढें भयानें पळ काढण्यापेक्षां त्याचा सशस्त्र सामना करणें श्रेष्ठ ठरेल.

"क्षमा वीरस्य भूषणम्". क्षमा ही श्रेष्ठ वृत्ति आहे, पण ती मनःपूर्वक असली पाहिजे. "आई बाळाचे हजार अपराध पोटांत घालते" असें

तिऱ्हाईत म्हणतो पण खुद्द आईला बाळाचे 'अपराध' घडले किंवा आपण त्यांची 'क्षमा' केली याची गंधवार्ताही नसते. आपण अजाणतां हजारों श्वास पोटांत घेतों त्याचप्रमाणें ती बाळाचे अपराध पोटांत घेते. परंतु लाचारी म्हणजे क्षमा नव्हे. लाचारीपेक्षां प्रतिकार श्रेष्ठ, प्रतिकारापेक्षां क्षमा श्रेष्ठ.

योगसामर्थ्याची एक गोष्ट आहे. एका योग्यानें आपल्या योग-सामर्थ्याचा प्रयोग करून दाखविला. त्यानें आपली छाती कुंभक करून ताठ केली व दुसऱ्या इसमानें त्याच्या छातीवर पूर्ण शक्तीनिशीं बाण सोडला तो बाण छातीवर आदळून पातें मोडून खालीं पडला. त्यावर दुसरा योगी म्हणाला "छे, तुझा योग कच्चा आहे. याहून श्रेष्ठ रीत मी दाखवितों" त्यानें स्वतःच्या छातीवर बाण सोडण्यास सांगितलें. बाण छातींतून आरपार निघून गेला आणि छाती लगेंच पूर्ववत् भरूनही आली ! जणूं कांहीं झालेंलेंच नाहीं! खिस्ताच्या 'रेझिस्ट नॉट इव्हल'—पापाचा प्रतिकार करूं नका—या उपदेशाचें रहस्य या दृष्टांतावरून लक्ष्यांत येण्यासारखें आहे

शौर्य, धैर्य, त्याग देहाविषयीं अनासक्ति हीं क्षमेचीं अर्थात् अहिंसेचीं, मुख्य लक्षणें आहेत. त्यांचे शिवायची अहिंसा ही नकली किंवा खोड-साळ आहे. लाचारीपेक्षां—मनांतून जळफळणाऱ्या अहिंसेपेक्षां—हिंसक प्रतिकारामध्यें अधिक शौर्य आहे व त्या अर्थानें अधिक अहिंसा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कुढणारी अहिंसा रोगट आहे. पित्त ओकून टाक-णारी हिंसा आरोग्यावह आहे.

हिंसेपेक्षां कपट, लबाडी, विश्वासघात इत्यादि गोष्टीच विशेष गर्हणीय आहेत, आणि त्यांच्या संगतीपायींच बहुधा हिंसेच्या मार्गाची विशेष नाचक्की होत असते. बचावासाठींही कपट किंवा विश्वासघात करणें कधींही समर्थनीय ठरणार नाहीं. हिंसेचें तसें नाहीं. निष्कपट बचावात्मक हिंसा निंद्य नाहीं.

पण मुख्य अडचण हीच आहे कीं हिंसा एकदां मान्य, स्वीकृत व चालू केल्यानंतर ती बचावाच्या मर्यादेंत राहीलच अशी खात्री देतां येत नाहीं. बचाव कुठें संपला व आक्रमण कुठें सुरू झालें तें सांगणें कठिण आहे. युद्धनीतीचें हें तत्त्वच आहे कीं शत्रूला आपल्यावर चाल करून येण्याची सवड मिळण्यापूर्वी आपणच त्याच्यावर चाल करून जावें. मनुष्य सर्पाला किंवा वानराला ठार मारतो तो तरी स्वतःच्या जीवाच्या किंवा बागेंतील फळांच्या बचावासाठींच. कंसाला ज्योतिषानें सांगितलें कीं "देवकीचा आठवा पुत्र तुझा घात करील;" पण आठवा कोठून कसा मोजायचा याचा संदेह पडला म्हणून त्यानें सारेच पुत्र मारून टाकण्याचें ठरविलें तें सुद्धां स्वतःच्या बचावासाठींच. हिटलर म्हणतो "पुढें मागें जर्मनीची वस्ती वाढून त्याला वसाहतींची जरूर पडेल. पण तोंपर्यंत इतर राष्ट्रें सारे प्रदेश बळकावून बलिष्ठ होऊन बसतील व गरजेच्या वेळीं जर्मनीला वसाहती मिळविणें अशक्य होईल. म्हणून आतांपासूनच वसाहती काबीज करून ठेवल्या पाहिजेत, तरच जर्मनीची धडगत आहे." सर्व राष्ट्रें आपापलें बचाव (डिफेन्स) खातेंच मजबूत बनवीत असतात. म्हणून बचावाच्या नांवानें हिंसामार्ग अंगीकारण्यांत आत्मवंचना व अतिरेक होण्याचा पुरेपूर संभव असतो.

शिवाय आक्रमणाच्या किंवा अपकाराच्या निवारणार्थ केलेला प्रतिकार किंवा योजलेले प्रतिबंधक उपाय आणि अपकारांची फेड म्हणून केलेला प्रति-अपकार यांमधील महदंतर आहे तें लक्ष्यांत घेतलें पाहिजे. उदा० जातीय दंग्यांत प्रतिपक्षी मला किंवा सोबत्याला ठोकण्यास किंवा भोसकण्यास येत आहे तर त्यालाच उलट ठोकून पिटाळून लावणें, किंवा त्याचे हातांतील काठी किंवा सुरा हिसकून घेणें निराळें आणि तो भोसकून पळून जात असतां त्याचा

पाठलाग करून त्याचें पारिपत्य करणें निराळें. पारिपत्य म्हणजे बचाव नव्हे. "दांतास दांत व नखास नख" व त्याच न्यायानें पुढें जाऊन "खुनास खून" हें या पारिपत्यवादाचें सूत्र असतें. पारिपत्य न घडल्यास समाजांत गुन्ह्यांची प्रवृत्ति बळावेल असें प्रतिपादिलें जातें, परंतु हें समर्थन शंकास्पद असल्याचें आपण पूर्वीं पाहिलेंच आहे. पारिपत्य म्हणजे सूडच आहे व सूडानें हिंसेचा बंदोबस्त न होतां वृध्दिच होते.

ही पारिपत्याची भावना सुध्दां अपराधी व्यक्तीपुरतीच मर्यादित रहात नाहीं, तर 'अ' च्या अपराधाबद्दल 'ब' वर तो 'अ' चा जातवाला किंवा गांववाला आहे एवढ्याच बद्दल सूड उगविणें व तोही त्याला बेसावध व असहाय स्थितींत गांठून घेणें हे प्रकार अधिकाधिक गर्हणीय ठरतात.

तत्क्षणिक उत्स्फूर्त हिंसा आरोग्यावह आहे, परंतु हिंसेच्या योजना व संघटना बनवूं लागलें म्हणजे मात्र हरतऱ्हेच्या विकृति उद्भवल्याखेरीज रहात नाहींत. अनेकांनीं मिळून कांहीं मुदतीपर्यंत चालवावयाच्या हिंसक प्रतिकाराच्या संघटनेमध्यें, उदा० जातीय दंग्यांमध्यें किंवा राष्ट्राराष्ट्रांतील युध्दांमध्यें कपट, फितुरी, विश्वासघात इत्यादींचा आश्रय बहुधा घ्यावाच लागतो--निदान घेतला जातो--असा अनुभव आहे. न्यायान्यायविवेकही बाजूला पडतो.

तथापि कांहीं तात्पुरत्या प्रसंगीं किंवा परिस्थितींत हिंसा टाळणें अशक्यच नसलें तरी बिकट बनत असतें. स्वतःची न्यायसिध्द मालमत्ता किंवा स्वतःचे न्याय्य हक्क यांचें रक्षण करणें अहिंसेनें शक्य होईल, परंतु आपली मालमत्ता दुसरा लुबाडून बसला असतां ती त्याचेकडून काढून घेणें अहिंसेनें फार बिकट आहे. बसल्या जागेवरून दुसरा मला काढून लावूं

पहात असेल, माझ्या वहिवाटीखालील जमिनीचा कब्जा घेऊं पहात असेल, तर त्याला अहिंसेनें प्रतिबंध करणें प्रमाणांत सोपें आहे; परंतु दुसऱ्यानें बळकाविलेल्या बैठकीवरून किंवा जमिनींतून त्याला काढून लावणें अहिंसेनें बिकट आहे. पगार वांटणारा कारकून पन्नास रुपयांऐवजीं एकोणपन्नास रुपयेच माझ्या हातावर ठेवूं लागला किंवा मी धान्याचें परमिट घेऊन गेलों असतां कोठीवाला कारकून लांचासाठीं अडून बसला व माझें काम तर लगेच व्हायला पाहिजे असेल तर अशा प्रसंगीं, लांच द्यायचा नसेल तर, अस्तन्या वर सारणें हाच मार्ग शीघ्रपरिणामी होण्यासारखा सुचतो ! पगार न घेणें किंवा परमिट न वटावणें ही अहिंसक असहकाराची रीत होईल, व ती समाजाला कालांतरानें सुपरिणामी होईल, परंतु मला येथें व आतांच ती कितीशी उपयोगीं पडेल तें सांगतां येत नाहीं. दीर्घकालीन व अंगीं मुरलेल्या दुखण्याचा प्रतिबंध तडकाफडकी होऊं शकणार नाहीं, परंतु पेनाकिलरच्या डोसानें किंवा इंजेक्शनानें त्याचा हल्ला तात्पुरता परतावितां येईलही.

**कॉंग्रेस वर्किंग कमिटीचा निर्णयः**— या चर्चेच्या ओघानेंच कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें १९४० सालीं परचक्रनिवारणाबाबत घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयाचा विचार करणें बोधप्रद होईल.

आपण वर पाहिलेंच कीं परक्याच्या हातीं सापडलेली वस्तु त्याचें कडून काढून घेण्यापेक्षां स्वतःच्या हातांतील वस्तु टिकवून धरणें अधिक सोपें असतें. आपण हिंदुस्थानचें स्वराज्य इंग्रजांकडून अहिंसेनें मिळविलें तर जर्मन किंवा जपानी आक्रमणाविरुद्ध तें अहिंसेनें टिकविणें अधिकच सोपें आहे असें गांधीजी म्हणतात तें खरें आहे, परंतु १९४० सालीं म्हणजे अहिंसेनें पूर्ण स्वराज्य हस्तगत होण्यास भरपूर अवधि असतांनाच

काँग्रेसच्या पुढाऱ्यांपुढें परचक्राचा प्रश्न निकडीच्या स्वरुपांत एकाएकीं उभा राहिला. तेव्हां वर्किंग कमिटीनें निर्णय घेतला कीं हातीं सत्ता आल्यास आपण परचक्रनिवारणार्थ शस्त्रबल वापरूनही दोस्त राष्ट्रांना साह्य करूं.

हा निर्णय काँग्रेसच्या नित्याच्या अहिंसक धोरणाच्या विरुद्धच होता असें नाहीं. काँग्रेसनें स्वराज्याच्या साधनेपुरताच अहिंसेचा मार्ग स्वीकारलेला होता. परचक्र निवारणाचा प्रश्न काँग्रेसपुढें आजवर उपस्थितच झाला नव्हता. स्वराज्य मिळाल्यानंतरचें परराष्ट्रीय धोरण नंतरच ठरविणें उचित होतें. तें अवचितच अकालीं ठरविण्याचा प्रसंग आल्यानें असा निर्णय घेतला गेला.

आणि तो जनतेच्या वतीनें, जनतेचे प्रतिनिधि म्हणून येणाऱ्या जबाबदारीमुळें वर्किंग कमिटीला घ्यावा लागला, हा मुद्दा लक्षांत घेण्यासारखा आहे. आपण एकेकटे व्यक्तिशः अहिंसेच्या पालनाची व तन्निमित्त कराव्या लागणाऱ्या आत्मयज्ञाची जेवढी तयारी ठेवूं शकतों तेवढी सामुदायिक रीत्या ठेवूं शकत नाहीं. आपण एकेकटे शूर असतों व येतील ते धोके पत्करण्यास तयार होतों, परंतु इतरांचे रक्षक म्हणून विचार करूं लागतांच भीरु बनतों. पांचभाऊ एकेकटे कर्ज करण्यापेक्षां उपास काढणें पत्करतील, परंतु सामुदायिक कुटुंबाच्या दृष्टीनें ते उपासापेक्षां कर्जच पसंत करतील. मी एकटाच दुसऱ्याकडे पाहुणा म्हणून गेलों म्हणजे सहजींच भिडस्तपणा करतों, परंतु माझेबरोबर माझा पाहुणा तेथें उतरण्यास आलेला असेल तर मी भिडस्तपणा सोडून देतों. घरांत सर्प आला असतां मी एकटाच रहात असेन तर सर्पाला न मारतां येईल तो धोका पत्करीनही, परंतु माझे घरांत माझे रक्षणाखालीं मुलें माणसें किंवा पाहुणे असतील, तसेंच मी चालवीत असलेल्या छात्रालयांत किंवा मी अधिकारी असलेल्या तुरुंगांत

सर्प येईल तर माझी प्रवृत्ति सर्पाला मार मारण्याकडे होईल. दुसऱ्याच्या जबाबदारीची भावना माणसाला भीरु बनविते.

वर्किंग कमिटीला राष्ट्राच्या वतीनें निर्णय घ्यावयाचा होता त्यामुळें सशस्त्र प्रतिकाराचा मार्ग पत्करावा लागला. शस्त्र-प्रतिकार विफल झाला तरी लोकापवादाचें भय नसतें कारण तो रूढ मार्ग आहे, परंतु निःशस्त्र प्रतिकार फसला तर हंसें होणार अशी भीति वाटली असावी. आपला प्रियजन वांचण्यासारखा नाहीं हें समजत असतांही माणसें त्याला इंजेक्शनें व इतर उपाय करून अंतकाळची त्याची पीडा वाढवीतही असतात. तो मार्ग लोकापवादाच्या दृष्टीनें अधिक सुरक्षित असतो हें त्याचें एक कारण असावें.

आणखी एका विचारानेंही परचक्राच्या अहिंसक प्रतिकारापेक्षां सशस्त्र प्रतिकाराला लोक अधिक संख्येनें तयार होण्याचा संभव असतो. परक्याच्या स्वारीचा अहिंसेनें सामना करतांना आघाडीवरील सैनिकांचा मृत्यु निश्चित आहे. शस्त्र-युद्धामध्यें एकूण संहार अधिक होणार, परंतु व्यक्तिशः प्रत्येक सैनिकाला जिवंत रहाण्याची थोडीशी आशा असते व तेवढ्या आशेवर मनुष्य साहसाला तयार होतो. लॉटरींत २।३ टक्के लोकांनाच बक्षिसें मिळणार, बाकीच्या सर्वांचे पैसे फुकट जाणार हें स्पष्ट असतांही "त्या २।३ टक्के भाग्यवंतांमध्येंच मी नसेन कशावरून!" असें म्हणून लोक लॉटरीमध्यें लाखों रुपये उडविण्यास सिद्ध होतात. मोठ्या लाभाच्या किंचित् आशेवर मी माझ्या सर्वस्वाची होळी करीन, पण निरपेक्ष बुद्धीनें एक दमडी खर्चिणें माझ्या जिवावर येईल. मनुष्य स्वभावांतील या वर्मामुळें शस्त्र-युद्धासाठीं सैनिक मिळविणें अहिंसक सामन्यापेक्षां अधिक सुलभ असतें. परिणाम कांहींही होवो परंतु वेळ मारून न्यायला शस्त्रमार्ग अधिक सोयीचा ठरतो.

वर्किंग कमिटीच्या निर्णयामागें आणखीही एक विचार असण्याचा संभव आहे. चालू ब्रिटिश सरकाराचा आज्ञाभंग किंवा विरोध केला असतां सरकार जें पारिपत्य करील तें चालू कायद्यांना नाहीं तरी निदान गॅझेटांत जाहीर केलेल्या वटहुकूमांना अनुसरून करील. त्यामुळें त्याचा साधारणसा अंदाज आगाऊ मिळूं शकतो. परंतु जपान्यांच्या आक्रमणाला विरोध केला असतां त्याचे परिणाम कोणत्या थरावर जातील, ते आपल्याला सहन करण्याजोगे असतील किंवा नाहीं, याचा कांहींच अंदाज बांधतां येत नाहीं. अर्थात् इंग्रजसरकारचा विरोध करण्यापेक्षां जपान्यांचा विरोध करण्यांत जोखीम अधिक आहे.

**प्रारब्धाची अनिवार्यता:—** आणखी कांहीं प्रसंगीं मनुष्यानें हिंसेचा मार्ग टाळणें अडचणीचेंच नव्हेतर अनुचितही ठरेल. अहिंसेचा मार्ग सुध्दां अवचितच स्वीकारून चालत नाहीं. उदा० मी एक बँक उघडली व लोकांच्या ठेवी घेतल्या. मग त्या बँकेवर सशस्त्र पहारा ठेवणें मला क्रमप्राप्त आहे. लोकांच्या ठेवीतर घेईन परंतु त्यांच्या रक्षणार्थ हिंसेचा उपयोग करणार नाहीं हें म्हणणें अव्यवहार्य आहे. सशस्त्र पहारा ठेवणें याचा अर्थच कोणी चोर-लुटारू आल्यास त्याचेवर गोळ्या झाडणें असा होतो. संपत्तीचा संग्रह आणि हिंसा यांची जोडी अभेद्य आहे. तसेंच. माझ्या गाईला खायला वाघ आला तर तिच्या रक्षणार्थ वाघावर हल्ला करणें माझें कर्तव्य ठरेल. गाय आपल्या मूळ वतनांत—वन्यस्थितींत—होती तोंपर्यंत वाघानें तिला खाल्ली तरी मध्यें पडण्याची जबाबदारी माझेवर नव्हती. परंतु मी तिला सक्तीनें माझ्या गोठ्यांत कैदेंत ठेवल्यानंतर तिच्या रक्षणाची व त्यासाठीं हिंसाही करण्याची जबाबदारी माझेवर येते. तशा प्रसंगीं मला हिंसेचें वावडें मानायचें असेल तर अगोदर गाईला कैदेंत ठेवण्याची हिंसाच

करायला नको होती. ती छोटी हिंसा केल्यानंतर वाघाची मोठी हिंसा करणें क्रमप्राप्त बनतें.

यावरून अहिंसा त्याज्य ठरते असें नव्हे तर अहिंसेचें परिपालन व्यापक व दीर्घ अशा योजनेनुसार करावें लागतें, मध्येंच एकाएकी हिंसा टाकून अहिंसा स्वीकारल्यानें आपल्याशीं ज्यांचे हितसंबंध नाना प्रकारांनीं गुंतलेले असतात त्यांची फसगत केल्याप्रमाणें होतें. म्हणून अहिंसेचा स्वीकार-सुद्धां त्या हितसंबंधी इसमांना पूर्वसूचना व स्वतःची अन्य व्यवस्था करण्यास पुरेसा अवधि देऊनच करणें योग्य.

आम्हां मानवांच्या जीवनामध्यें हिंसा नानाप्रकारें अनिवार्य असते हें आम्ही मागें मान्यच केलें आहे. हिंसेचें प्रमाण कमी कमी करीत जाणें एवढेंच माणसाच्या हातीं आहे. व त्यासाठीं सुद्धां योजनापूर्वक व नाना-प्रकारांनीं, दीर्घ व पद्धतशीर प्रयत्न करणें आवश्यक असतें एवढेंच आम्हांला दाखवून द्यावयाचें आहे.

———

# स्वराज्याचा मार्ग : नैतिक दृष्टि

येथवर अहिंसेचें सामान्य व तात्त्विक विवेचन झालें. आपल्याला परत हिंदुस्थानाच्या स्वराज्याच्या प्रत्यक्ष प्रश्नाकडे वळलें पाहिजे. प्रथम स्वराज्य कशासाठीं पाहिजे त्याचा विचार करूं.

**साम्राज्यशाहीचे दुष्परिणामः**— पारतंत्र्याची स्थिति मुळांतच अनिष्ट आहे, ईश्वरी योजनेशीं विसंगत आहे, परतंत्र राष्ट्राला तशीच सम्राट् राष्ट्राला उभयतांसही हानिकारक आहे, उभयतांची अवनति करणारी आहे. साम्राज्यशाहीला चटावलेलें राष्ट्र अधिकाधिक क्षेत्रे आपल्या सत्तेखालीं आणूं पहात असतें. चालू साम्राज्यसत्तेच्या रक्षणासाठीं त्याला तसें करावेंही लागतें. त्यापायीं त्याला अनेक प्रजांचे शाप घ्यावे लागतात, व प्रतिस्पर्धी सम्राटांचें शत्रुत्व संपादावें लागतें. हें विश्व-शत्रुत्व त्याला आराम मिळूं देत नाहीं व परिणामीं त्याच्या नाशासही कारण होतें.

सध्यां यूरप-अमेरिकेचीं साम्राज्यशाही राष्ट्रें इतर साऱ्या जगाकडे आपली मालमत्ता म्हणून पहात आहेत व तिच्या वाटणीसाठीं आपापसांत झगडत आहेत. जपानही त्या स्पर्धेमध्यें सामील झाला आहे. एक महायुद्ध, शांततेच्या काळांत पुढील महायुद्धाची तयारी, मग दुसरें युद्ध हा क्रम सम्राटांच्या परस्पर स्पर्धेचें फळ आहे. साम्राज्य लोभ व त्यांतून उद्भवणारा रक्तपात, जुलूम, दुष्टपणा इत्यादि साऱ्या पापांचें मूळ हिंदुस्थानाच्या पारतंत्र्यांत आहे. हिंदुस्थानाएवढें मोठें व समृद्ध क्षेत्र व हिंदुस्थानाएवढ्या लोकसंख्येचें राष्ट्र परकी अंमलाखालीं असलेलें जगांत दुसरें नाहीं. हिंदुस्थान म्हणजे साम्राज्यशाहीचें काळीज.

हिंदुस्थान अल्पायासानें ताब्यांत आला, तो प्रतिस्पर्ध्यांपासून राखण्या- साठीं इंग्रजांना अरबस्तान, इजिप्त, सुएझ, माल्टा, जिब्राल्टर, मेसोपोटेमिया, इराण इत्यादि हिंदुस्थानाच्या मार्गावरील मुलखांवरही कब्जा करावा लागला. बलुचिस्तान, अफगाणिस्तान, चीन व ब्रह्मदेश इत्यादि मुलखांवर इंग्रजांनीं स्वाऱ्या केल्या त्याही हिंदुस्थानाचा लष्करीतळ म्हणून उपयोग करून व हिंदीसैन्याच्या जोरावरच केल्या. रानटी घोड्यांना पकडण्यासाठीं मनुष्य अगोदर वश केलेल्या घोड्यावर स्वार होऊन जातो त्याच न्यायानें इंग्रजांनीं हिंदुस्थानाच्या जोरावर इतर मुलखांना उपद्रव दिला. त्याचें अपेश अर्थातच हिंदुस्थानाच्या माथीं आहे. हिंदुस्थान स्वतंत्र झाला कीं जगभरच्या साम्राज्यशाहीचा अंत जवळ येईल. मग सारीं परतंत्र राष्ट्रें क्रमाक्रमानें स्वतंत्र होऊं शकतील आणि साऱ्या जगाला शांतता व आत्मविकासाची संधि लाभेल अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

**हिंदुस्थानाची हानिः--** पारतंत्र्यामुळें हिंदुस्थानाची झालेली व होत असलेली हानि तर उघडच आहे. व्यापार व उद्योगधंदे यांची गळ- चेपी व इतरही नाना प्रकारांनीं होणारें आर्थिक शोषण यांमुळें देशभर भीषण दारिद्र्य पसरलें आहे. उपासमार व निकस आहार यांमुळें आरोग्य व आयुर्मर्यादा यांचाही ऱ्हास झाला आहे.

परंतु या भौतिक हानींपेक्षांही आमच्यांतील आत्मविश्वास, निर्भयता प्रामाणिकपणा इत्यादि सद्गुणांचा, नागरिक कर्तव्यांच्या जाणिवेचा व सामाजिक नीतिमत्तेचा लोप झाला ही अधिक शोचनीय हानि आहे.

पारतंत्र्य म्हणजे स्वदेशी धर्माचा किंवा शेजार धर्माचा भंग. आपण ज्या लोकांमध्यें जन्मास आलों व वाढलों, आणि ज्यांच्या सहकार्यानें आपली जीवित यात्रा व सर्व व्यवहार चालतात त्यांच्या इच्छेला व सत्तेला

मान देणें माझें कर्तव्य आहे. त्यांचे सांघिक निर्णय व आज्ञा म्हणजेच मुलखाचे कायदे. अशा लोक-कायद्यांचें पालन हीच खरी राजनिष्ठा. परंतु पारतंत्र्य म्हणजे या स्वजनराजाचा द्रोह, व परक्या झोटिंगापुढें लाचारीची शरणागति. आपल्यांतील हिंदुमुसलमानांचे, ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचे किंवा बंगाली-बिहारींचे बेबनाव, आपल्या संस्थानिकांची गोऱ्या रेसिडेंटांचे हुकूम झेलण्याची तयारी परंतु ज्यांच्या पूर्वजांनीं त्या संस्थानिकांच्या पूर्वजांना हें वंशपरंपरा चालणारें वैभव मिळवून दिलें त्या प्रजेबद्दलचा तुच्छभाव, युरोपांतील लोकशाहीबद्दल कळवळा व तिच्या रक्षणासाठीं आपल्या प्रजेच्या प्राणांचा व धनाचा बळी देण्याची तत्परता, परंतु तेंच लोकशाहीचें तत्त्व स्वतःच्या राज्याला लावण्यास नाखुषी, हे सारे आमच्या स्वजनद्रोहाचे व ढोंगी तोंडपुजेपणाचे मासले आहेत.

"स्वराज्याचीं तहान सुराज्यानें भागूं शकत नाहीं" असें म्हटलें आहे. परंतु परराज्य हें सुराज्यही होऊं शकत नाहीं, परराज्यामध्यें राजा व प्रजा यांच्यामध्यें अविश्वास व वैर असतें, त्यामुळें उभयपक्षीं सुखशांति लाभत नाहीं. परराज्यांत शांतता व सुव्यवस्था—अर्थात् ती स्मशान शांतताच असते हीं सरकारचीं मुख्य कामें होऊन रहातात. शिक्षण, आरोग्य या सारख्या कल्याणकारी खात्यांकडे सहजींच दुर्लक्ष केलें जातें. लेखकाशीं बोलतांना एका मामलेदारानें प्रांजलपणें कबूलच केलें कीं "रेव्हिन्युची वसूली हें आमचें पहिलें काम. बाकी साऱ्या गोष्टी मागाहून."

**स्वराज्याचें कर्तव्यः**—म्हणून आम्हांला स्वराज्य पाहिजे तें देशाचें आर्थिक शोषण व कोट्यावधि देशबांधवांची उपासमार यांचें निवारण व्हावें यासाठीं तर अत्यावश्यक आहेच, परंतु त्याखेरीज आम्हांला आत्म-विकासाला वाव मिळावा, गमाविलेली माणुसकी परत यावी, मानानें जगतां

यावें, आपसांतील सवतीमत्सर नष्ट व्हावे, शेजारधर्माचा उत्कर्ष व्हावा आणि साऱ्या जगाच्या स्वातंत्र्याचें व शांतीचें मंगलाचरण व्हावें यासाठींही पाहिजे आहे. स्वराज्याला भौतिक मूल्य आहेच, पण नैतिक मूल्यही आहे. अर्थात् स्वराज्य हा हक्कच नव्हे तर कर्तव्यही आहे.

**स्वराज्य व अहिंसाः**--परसत्ता म्हणजे जुलमाचें राज्य व स्वराज्य म्हणजे स्वखुषीनें संमत केलेली व्यवस्था. परसत्ता म्हणजे दुसऱ्यानें लादलेली शिस्त, स्वराज्य म्हणजे आत्मसंयमन. अर्थात् स्वराज्याची स्थापना म्हणजे हिंसेचें व असत्याचें निवारण आणि अहिंसेची व सत्याची स्थापनाच होय.

अशा तऱ्हेनें स्वराज्य हें पूर्ण निर्दोष व अत्यंत पवित्र असें ध्येय आहे. असलें सत्य-अहिंसामय साध्य-सिद्ध करण्यासाठीं साधनेंही तदनुरूपच पाहिजेत असेंच कोणीही चटकन म्हणेल; असत्यमय व हिंसक साधनें असल्या पवित्र साध्याला बाधकच होण्याचा संभव आहे.

आपल्याला जें स्वराज्य पाहिजे तें लोकशाही स्वराज्य आहे. लोकशाहीला हिंसेचें वावडें आहे हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. लोकशाहीच्या साधनेमध्येंही हुकुमशाहीचा लवलेश असतां कामा नये. परंतु गुप्त तयारीनें करावयाच्या सशस्त्र बंडामध्यें मतप्रचार व मतमोजणी यांना स्थान नसतें; सर्वाधिकाऱ्याचे हुकूम अनुयायांनीं बिनतक्रार पाळले पाहिजेत, तसेंच बंडाची योजना व कार्यक्रम कटवाल्यांना एकमेकांपासून सुद्धां गुप्त ठेवावे लागतात. बंडाच्या तयारीच्या व प्रत्यक्ष बंडाच्या अवधींत तरी लोकशाहीचें संपूर्ण उच्चाटन करणें अपरिहार्य असतें. बंडवाल्यांना आपापसांत हुकूमशाही चालवावी लागते एवढेंच नव्हे तर ज्या जनतेच्या-वतीनें व हितार्थ बंड करावयाचें तिचेवर-सुद्धां लष्करशाही चालवावी लागते. बंड यशस्वी होण्या-साठीं बंडवाल्यांना जनतेची संपूर्ण व तत्परतेची मदत मिळत गेली पाहिजे.

ही मदत मागतांच जनतेनें दिली नाहीं तर त्यांची समजूत घालण्यांत वेळ न दवडतां ती निष्ठुर सत्तीनें मिळविणें अपरिहार्य होतें. सशस्त्र बंडामध्यें त्या त्या वेळेचें, त्या त्या क्षणाचें आत्यंतिक महत्व असतें. अशा हातघाईच्या प्रसंगीं कार्यनाश होऊं द्यावयाचा नसेल तर "एक घाव, दोन तुकडे" केल्या खेरीज गत्यंतर रहात नाहीं.

**साध्य व साधनः**—बंडवाल्या देशभक्तांना मनापासून वाटत असतें कीं ही सारी सत्ती, धमकावणी किंवा लष्करशाही आपण लोक-कल्याणासाठीं व लोकशाहीच्या स्थापनेसाठींच चालवीत आहों, सद्-हेतूनेंच करीत आहों, सबब ती क्षम्यच नव्हे तर स्तुत्य आहे. शुभसाध्याच्या सिध्द्यर्थ अशुभ साधनें वापरण्यांत कांहीं गैर तर नाहींच पण तें कर्तव्य आहे.

परंतु यांत विचार दोष आहे, आत्मवंचना आहे. जें लष्करशाहीनें मिळविलें तें टिकविण्यासाठींही तेंच साधन चालवावें लागतें. बंडवाल्या-हुकुमशहाची खरीखुरी समजूत असतें कीं "मी सज्जन आहे. जनतेचें कल्याण चिंतणारा आहे. जनतेच्या स्वातंत्र्यासाठीं, परकीसत्तेचें उच्चाटन होईपर्यंत, कांहीं काळ आपद्धर्म म्हणूनच मी लष्करशाही चालविणार आहे. तेवढें साधल्यानंतर अधिकार संन्यास करून लोकशाहीची स्थापना करणें ही माझ्या हातची गोष्ट आहे." परंतु यथाकाळीं त्याला आढळून येतें कीं परसत्ता दूर करून स्वसत्ता स्थापिल्यानंतर पूर्वींप्रमाणें जनहितार्थच "कल्याण-कारी हुकुमशाही" ( बेनेव्होलंट डिस्पॉटिझम् ) चालविणेंच भाग आहे.

नेपोलियन बोनापार्टचा इंग्रज चरित्रकार ॲबट यानें भक्कम पुराव्यानिशीं सिद्ध केलें आहे कीं नेपोलियन हा लोकशाहीचा कट्टा पुरस्कर्ता होता. परंतु स्वातंत्र्य, समता व बंधुता यांसाठीं करण्यांत आलेल्या फ्रेंच राज्यक्रांतीचें प्रसंगीं उद्भवलेली बेबंदशाही शमविण्याकरतां त्याला कठोर उपाय योजावे

लागले. परंतु फ्रान्समध्यें अंतर्गत स्वस्थता प्रस्थापित केल्यानंतर सुद्धां शेजारच्या राजांनीं त्याला स्वस्थता लाभूं दिली नाहीं. त्यामुळें त्याला जन्मभर तरवार गाजवीतच रहावें लागलें; लोकशाहीच्या उपासकाला जगांतील सर्वांत मोठा लष्करशाहा बनावें लागलें. नेपोलियनच्या चरित्राची ही मीमांसा खरी असेल तर शस्त्राच्या साह्यानें लोकशाही स्थापिण्याच्या प्रयत्नाची व्यर्थता उत्कृष्ट रीतीनें शाबीत होते.

साध्य व साधन यांमध्यें अशा तऱ्हेनें फारखत करणें हेंच मुळांत चुकीचें आहे. "युद्धाचा अंत आणण्यासाठीं" युद्ध करणें, किंवा "खरोखर झालेला गुन्हा कोर्टांत शाबितकरण्यासाठीं" खोटे साक्षीदार तयार करणे हें बुद्धिमांद्याचें लक्षण नसेल तर दांभिकपणाचें लक्षण समजलें पाहिजे. साधन व साध्य हीं बीज व अंकुर, कळी व फुल किंवा फूल व फळ या प्रमाणें परस्पर-संबद्ध असतात. साध्य हें साधनाचेंच परिणत स्वरूप होय. म्हणून शुभ साध्य अशुभ साधनांनीं सिद्ध करण्याची आशा ही दुराशा होय. उलट साध्य हें आपल्यापासून दूर असतें, तें आपल्या हातचें नसतें, साधन मात्र आपल्या नजीक व आपल्या हातीं असतें. म्हणून साध्याविषयीं आस्था बाळगून साधनाविषयीं बेपर्वा रहाण्यानें आपण हातांतलें घालवितों व दूरचें तें अधिक दूर पिटाळतों. उलट आपण हातांतील साधनाची काळजी घेतली, तर साध्याविषयीं निश्चित रहण्यास हरकत नाहीं.

म्हणून आपल्याला लोकशाही स्वराज्यच स्थापावयाचें असेल तर आपले स्वराज्य संपादनाचे प्रयत्नही लोकशाहीच्या तत्त्वांस धरून असणें आवश्यक आहे. म्हणजे बहुजन समाजाच्या संमतीनें व हार्दिक सहकार्यानेंच स्वराज्य संपादिलें पाहिजे. जनतेला विश्वासांत न घेतां थोड्याशा बुद्धिशाली व कर्तृत्ववान् लोकांनीं स्वपराक्रमानें मिळवून जनतेला देणगी दाखल दिलेलें

स्वराज्य हें खरेंखुरें स्वराज्य होणार नाहीं त्यासाठीं जनतेलाच राजकीय शिक्षण दिलें पाहिजे व स्वराज्यार्थ त्याग करण्यास उद्युक्त केलें पाहिजे. बहुजन समाजामध्यें राष्ट्रीय वृत्ति व धमक यांची जोपासना केली पाहिजे. राज्य लोकांचें होण्यासाठीं तें मिळविलेंही पाहिजे लोकांनींच. लहानशा कंपूच्या कारस्थानांमुळें किंवा हुकुमशाहीनें स्वराज्य मिळालेंच तरी तें कंपूचें राज्य बनेल, ती खरी लोकशाही होणार नाहीं. आपण जीं साधनें वापरूं त्यांचा रंग साध्यावर चढल्या शिवाय राहणार नाहीं. लोकशाही स्वराज्या-सारख्या न्याय्य, पवित्र व शांततामय साध्यासाठीं वापरावयाचीं साधनेंही तशींच असलीं पाहिजेत.

**पारमार्थिक राजकारणः**—आपल्या स्वराज्याचा लढा न्याया-साठीं आहे, स्वार्थासाठीं नव्हे. किंवा तो कांहीं अंशीं स्वार्थासाठीं असला तरी न्याय्य स्वार्थासाठीं आहे. शिवाय तो उदार स्वार्थ आहे. स्वराज्य झालें कीं **मला** बडी नोकरी मिळेल या आशेनें स्वराज्याच्या चळवळींत सामील होणारे फारच विरळा. जमिनीवरील सरकारदस्त कमी होईल, मीठ-तंबाकू-साखर यांसारखे सरकारी करामुळें महाग मिळणारे जिन्नस स्वस्त होतील, शिक्षण व बढतीचा मार्ग गोरगरीबांसही उपलभ्य होईल असा सामुदायिक स्वार्थ--मला स्वराज्याचें फळ मिळावें परंतु तें साऱ्या मुलखाच्या बरोबरीनेंच मिळावें, मला एकट्यालाच नव्हे, असा उदात्त स्वार्थच—अधिक लोकांचा असतो. या उदात्त स्वार्थासाठीं संकुचित वैयक्तिक स्वार्थाचा आत्यंतिक त्याग करण्यास, स्वतःचे प्राणही अर्पण करण्यास, देशभक्त तयार होतात. "मी मरावें परंतु माझ्या मृत्यूनें माझ्या कोट्यवधि देशबांधवांना चिरसुख लाभावें" अशी देशभक्तांची मनीषा असते.

ही मनीषा उदात्त व आदरार्ह आहे म्हणूनच ती अधिकांत अधिक

विशुद्ध व किल्मिष-राहित असावी अशी अपेक्षा उत्पन्न होते. "अन्य देशीयांच्या सुखाचा बळी देऊन माझ्या देशबांधवांनीं सुख भोगावें" अशी देशभक्ताची इच्छा असतां कामा नये. स्वतःचे देशबांधव तेवढेच नव्हे तर सारे मानव, व प्राणीही, सुखी असावे, "सर्वेऽत्र सुखिनः संतु" अशी त्याची इच्छा असावी व तसाच त्याचा प्रयत्न असावा. देशभक्तांच्या स्वराज्य साधनेचेंच नव्हे तर साऱ्या राजकारणाचेंच ध्येय सर्वसुख व सर्वोन्नति हेंच असावें. देशसेवा ही अंततोगत्वा ईशसेवाच असली पाहिजे.

राजकारण म्हणजे राष्ट्रांराष्ट्रांतील, वर्गावर्गांतील किंवा कंपूकंपूतील चुरस, स्पर्धा व ओढाताण, किंवा महत्त्वाकांक्षी मतलबी व्यक्तींची सत्ता काबीज करण्यासाठीं केलेली धडपड व लटपट, किंवा उपद्यापी लोकांचा करमणुकीचा खेळ असा राजकारणाचा अर्थ केला जातो, परंतु तो राजकारणाचा अनर्थच आहे.

मनुष्यजीवनाचें जें परमोच्च ध्येय, ज्याच्या सिद्धीनें किंवा साधनानें जीविताचें सार्थक होतें, त्यालाच परमार्थ म्हणावयाचें—मग त्या परमार्थाचें वर्णन सुख, कल्याण, मोक्ष इत्यादि कोणत्याही एका शब्दानें किंवा या सर्व अभीष्टांच्या समुच्चयानें करा. मनुष्याचे सारे उद्योग व सारे प्रयत्न या परमार्थ प्राप्तीला अनुलक्षूनच असतात. धर्म व नीति यांचा उगम या परमार्थाकांक्षेतच आहे. मनुष्य हा समाजावलंबी व समाजप्रिय प्राणी असल्यानें व राजकारण हें सामाजिक जीवनाचें अत्यंत महत्त्वाचें अंग असल्यानें ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्वज्ञानें मनुष्याची व्याख्याच 'राजकारणी प्राणी' अशी केली आहे. राजकारण हें परमार्थाभिमुखच असलें पाहिजे. तें परमार्थपराङ्मुख झाल्यास मोठा अनर्थ ओढवेल.

परमार्थ, धर्म, नीति या पारलौकिक वस्तु नसून पुरेपूरपणें ऐहिकच आहेत. स्वर्ग, नरक, वैकुंठ, इहलोक, परलोक हे शद्बप्रयोग बुद्धिगम्य गूढ भाव प्रचलित भाषेच्या द्वारें सूचित करण्यासाठीं स्वीकारण्यांत आले असावें. विद्यार्थी जग, व्यापारी जग, क्रिकेट जग यांसारखे शद्ब-प्रयोग आपण नव्यानेंही रूढ करीत आहों. कालांतरानें या 'जगांना' सुद्धां परस्परांहून अलग अशा लोकांचा अर्थ प्राप्त झाला तर जसा घोटाळा होईल तसाच विचाराचा घोटाळा स्वर्गादि लोकांच्या कल्पनेमुळें झालेला आहे. विद्यार्थी जग व व्यापारी जग ज्याप्रमाणें सम-व्यापी आहेत त्याचप्रमाणें स्वर्ग-मृत्यु-नरकही समव्यापीच आहेत. स्वर्ग व नरक या लोकींच भोगावें लागतात. परलोक हा इहलोकाचाच प्रांत आहे. धर्म व्यवहारासाठींच आहे. व व्यवहारानें धर्माच्या नियंत्रणानुसार चालावयाचें आहे. राजकारण हें तर व्यवहाचें अत्यंत महत्त्वाचें अंग आहे. त्यांतून धर्माला गचांडी देणें म्हणजे त्याला जीवनांतूनच हद्दपार करण्याप्रमाणें आहे.

उलट आमचें तर म्हणणें आहे कीं खासगी जीवनांत धर्मपालनाची आवश्यकता आहे त्यापेक्षांही राजकारणांत अधिक आवश्यकता आहे. राजकारण म्हणजे सार्वजनिक जीवन. खासगी जीवनापेक्षां सार्वजनिक जीवनाचें आदर्श अधिक उच्च व कडक असावे हें उचित आहे. आपापल्या घरीं आपण शिळेंपाकें किंवा कांदा-लसुणीसारखे पदार्थ खात असलों तरी सार्वजनिक 'समाराधनेंत' असले पदार्थ वर्ज्य मानतों, किंवा खासगी भाषणांत ज्याला 'गणू' म्हणतों त्यालाच सार्वजनिक प्रसंगीं "श्रीयुत गणपतराव" म्हणतों. त्याच न्यायानें आपण आपल्या खासगी जीवनांत स्वार्थाला किंवा रागद्वेषादि विकारांना वश होऊन भलतें वर्तन करीत असलों तरीही राजकारणामध्यें हे दोष घेऊन गेल्यास त्याचा परिणाम विशेषच अनर्थकारक

होईल. खासगी जीवन हें घरच्या रांजणांतील पाणी म्हटलें तर राजकारण ही गंगा नदी आहे. गंगोदकच दूषित झालें म्हणजे सारी आशाच खुंटली.

म्हणून देशसेवेच्या नांवानें आपण जीं कार्यें करणार तीं निर्मळ निर्दोष राखण्याची आपण विशेष खबरदारी घेतली पाहिजे. खाजगी व्यवहारांत आपण स्वतःचे धनी असतों, परंतु राजकारणामध्यें आपण देशाचे प्रतिनिधि असतों, देशाचा मान, देशाची इभ्रत व देशाचें हिताहित यांचें रखवालदार असतों.

म्हणून स्वराज्य संपादनासाठीं आपण योजावयाचे उपाय हे आपल्याला व देशाला भूषणावह होतील, लज्जास्पद होणार नाहींत असे, म्हणजे सरळ, न्याय्य, सत्यमय असेच असले पाहिजेत. कपट फितुरी, लांचलुचपत असल्या प्रकारांना राजकारणांत बिलकुल स्थान असतां कामा नये. स्वार्थासाठीं शेजाऱ्याचा बळी घेण्याचा मोह आपल्याला पडत असला तरी देशहित साधण्यासाठीं इतर देशांचा किंवा स्वदेशांतील व्यक्तींचा वा वर्गाचा बळी घेण्याची आसुरी आकांक्षा आपण धरूं नये.

कै. गोपाळ कृष्ण गोखले यांचा राजकारणाला सात्त्विक स्वरूप देण्यावर ("स्पिरिच्युअलाइझ् पॉलिटिक्स्") विशेष भर असे. लोकमान्य टिळकांनीं साऱ्याच लौकिक व्यवहाराला गीतोपदिष्ट कर्मयोगाची बैठक दिली. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं तर गेले पंचेवीस वर्षांपासून आपण राजकारण उच्च नीतिशुद्ध भूमिकेवरून चालविण्यास शिकलों आहों. ही आपली परंपरा व संचित पुण्याई आपणच धुळींत मिळविणें उचित होणार नाहीं.

**चिर-प्रतिष्ठित सरकारशीं अहिंसा:**—१९४० च्या जूनमध्यें वर्ध्याच्या वर्किंग कमिटीच्या सभेंत व नंतर पुणें येथील ऑल इंडिया कॉंग्रेस

कमिटीच्या सभेंत, तसेंच पुनरपि १९४२ च्या सुरवातीच्या बारडोली येथील वर्किंग कमिटीच्या व वर्धा येथील ऑ. इं. कॉ. कमिटीच्या सभांमध्यें काँग्रेस व गांधीजी यांच्या मार्गांमध्यें भेद पडून काँग्रेसनें परचक्राच्या निवारणार्थ शस्त्र उचलण्याची अपरिहार्यता मान्य केली तरीही स्वराज्य-संपादनाच्या बाबतींत, किंवा अंतःस्थ बंडाळीच्या बाबतींत, अहिंसेचें धोरण पूर्ववत् कायम असल्याचें काँग्रेसनें पुन्हां पुन्हां स्पष्ट केलें.

जपानी आक्रमणाचा सशस्त्र प्रतिकार करण्यांत कांहीं गैर वाटत नसतां इंग्रजी सत्तेचा प्रतिकार करतांना मात्र अहिंसेला चिकटून रहाण्याचें ठरविण्यांत काँग्रेसची दृष्टि कोणती असावी ?

१९३१ च्या गोलमेज परिषदेपुढें भाषण करतांना गांधीजी म्हणाले होते कीं देऊं केलेल्या स्वराज्य घटनेमध्यें पोलीस व लष्कर यांवर हिंदी-लोकांचाच अधिकार राहिला पाहिजे. यावर टीका करण्यांत आली होती कीं "गांधीजी भावी स्वराज्यांत परकीयांवर व स्वकीयांवर शस्त्र चालविण्यास मागेंपुढें पहाणार नाहींत. त्यांची अहिंसा इंग्रजांशीं गांठ पडेल तेवढयापुरतीच आहे. परंतु त्यांच्या इंग्रज श्रोत्यांनीं ताडलें कीं ही अहिंसा नसून निवळ भ्याडपणाच आहे. आम्हां इंग्रजांशीं दोन हात करण्याची गांधींची छाती नाहीं म्हणून ते आम्हांला शरण येऊन सांगतात कीं आम्ही तुमच्याशीं अहिंसा पाळूं तरी तुम्ही प्रसन्न होऊन आम्हांला स्वराज्याचें कृपादान द्या."

गांधीजींच्या म्हणण्याचा अर्थ आम्ही स्वराज्यांत लष्कर ठेवूंच आणि परकीयांशीं शस्त्रानें लढूंच असा नव्हता तर लष्करावर ब्रिटिश सरकारची हुकमत न रहातां हिंदी स्वराज्य सरकाराचीच राहिली पाहिजे, लष्कर असावें किंवा नाहीं तेही स्वराज्य सरकारच ठरवील, एवढाच होता हें प्रांजळ मनाच्या कोणाही मनुष्याला समजण्यासारखें आहे. त्यावेळचा प्रश्न लष्करावरील

सत्तेचा होता, लष्कराचा उपयोग करण्याचा प्रश्न तेव्हां नव्हता. कॉंग्रेस कमिटयांचे वरील ठराव मात्र काल्पनिक प्रसंगांना उद्देशून नव्हते तर प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या प्रसंगासाठींच होते. अशास्थितींत परचक्राचा प्रतिकार व ब्रिटिश सत्तेचा प्रतिकार भिन्न मार्गांनीं करण्याचें कॉंग्रेसनें ठरविलें.

याचें कारण उघड आहे. जर्मनीची किंवा जपानची हिंदुस्थानावरील स्वारी हें उघड उघड आक्रमण होईल. परंतु ब्रिटिशांची हिंदुस्थानावरील सत्ता ही पिढयान् पिढया चालत आलेली, दृढमूल, सुसंघटित व सुप्रतिष्ठित अशी सत्ता आहे. आगंतुक आक्रमकाला लावावयाचा न्याय इंग्रजी सत्तेला लावणें उचित होणार नाहीं. इंग्रजी सत्ता आमच्याच सहकार्यानें स्थापिली गेली, आम्ही तिचें स्वागत केलें, इंग्रजी राज्य झालें तेव्हां दीपोत्सव केले. आम्ही आजवर प्रेमपूर्वक त्यांची नोकरी करून त्यांची सत्ता दृढमूल करण्यास मदत केली. चालू घटकेला हिंदुस्थानांतील इंग्रजीराज्य छोटाबडा हिंदी नोकरवर्गच चालवीत आहे "इंग्रज गेले तर आमचें कसें होईल?" अशी आमच्यापैकीं पुष्कळांना अद्याप भीति वाटत आहे. आमच्यांतील कित्येक राजकारणधुरंधर आज १९४४ सालींही, उघड बोलण्याचें धैर्य न झालें तरी गर्भित अर्थानें, "इंग्रजांनीं हिंदुस्थान सोंडून जाणें म्हणजे हिंदुस्थानाला दगा देणें आहे" असें म्हणून त्या भीतिला वाचा फोडीत आहेत, अशा परिस्थितींत ऑ. इं. कॉं. कमिटीनें इंग्रजांना 'क्विट इंडिया'—सत्ता सोडा असा आदेश देतांच इंग्रज निघून गेले नाहीं तर तो त्यांचा केवळ दुष्टपणा तरी कसा म्हणावा ?

एकादी कुलटा स्त्री आपली अनावर कामवासना तृप्त करण्यासाठीं माझ्यावर चालून आली तर मी तिला लत्ता-किंवा-लगुड-प्रहार करून पिटाळून लावणें एक वेळ शोभेल. परंतु ज्या स्त्रीला मीच लालूच दाखवून,

फुसलावून, भ्रष्टवून माझ्या घरांत आणून स्थापिली, व जिच्या बरोबर मी जन्मभर नांदलों, तिच्या विषयीं मला आतां एकाएकीं वैराग्य जाणवलें तरी तिला सोटा दाखवून पिटाळून लावणें उचित होणार नाहीं. मी तिच्याशीं कामुक संबंध ठेवण्याचें व तिला पोसण्याचें सोडून दिलें म्हणजे ती आपसूखच निघून जाईल.

हिंदुस्थानांतील विद्यमान ब्रिटिश सत्ता व तीपासून उद्भवणारे सारे अनर्थ हें आमच्याच कर्माचें फळ आहे. इंग्रज आमच्याहून किंवा सर्व सामान्य माणसाहून अधिक दुष्ट आहेत म्हणून ते आमच्यावर राज्य करतात अशांतील स्थिति नाहीं. ते आमच्याहून राजकीय नीतिमत्तेंत श्रेष्ठही असण्याचा संभव आहे. परंतु ते तरी काय करणार ? ते इकडे केवळ व्यापारासाठीं आले. आमच्या राज्यांतील अंदाधुंदीपासून स्वतःचा बचाव करण्यासाठीं त्यांना स्वतःच्या वखारींचे शस्त्रसज्ज कोटे बनवावे लागले. मग आमच्यांतीलच असंतुष्ट लोकांनीं देशी राज्यांविरुद्ध त्यांचें संरक्षण मागण्यास सुरवात केली. फितूर मंडळींनीं राजाच्या पारिपत्यासाठीं त्यांच्या साह्याचीं याचना केली. मऊ माती मिळाल्यानंतर कोपरानें खणण्याचा मोह कोण आवरूं शकणार ? हळुहळू हे शांतिप्रिय बनिये लढाया मारूं लागले. त्यांना अल्पायासानें महद्यश मिळत गेलें तसतसे ते अधिक चटावले. तेही कोणी देवदूत नव्हते कीं इतक्या लालुचींपुढेंहीं त्यांना मोह पडूं नये.

इंग्रज दुष्ट नाहींत, आम्हीही दुष्ट नाहीं, परंतु आमच्यांतील संबंध मात्र दूषित, पापी संबंध आहे. पापी माणसांमध्यें सन्मैत्री जडूं शकते. त्याचप्रमाणें साधारण दर्जाच्या सज्जनांमध्येंही कुसंगति जडूं शकते. हा पापी संबंध किंवा ही कुसंगति आपल्याला पालटायची आहे. त्यासाठीं

आम्ही स्वतः आत्महत्या करण्याची जशी आवश्यकता नाहीं तशीच इंग्रजांना ठार करण्याचीही आवश्यकता नाहीं.

शिवाय संख्येनें आम्ही इतके अधिक आहों व ते इतके अल्प आहेत; आम्ही येथील भूमिपुत्र, परिचित व घरंदाज आहों व ते अपरिचित परागंदा, ' परदेशी ' आहेत. अशा स्थितींत आम्ही त्यांच्यावर शस्त्र उगारणें आपल्याला शोभणार नाहीं. शस्त्र उगारायचेंच तर ते तुल्य बलावरच उभारावें. इंग्लिश कविशेले याच्या ' दि मास्क ऑफ अॅनर्की ' नांवाच्या काव्यांत पुढील ओळी आहेत: —

1. Stand ye calm and resolute,
Like a forest close and mute,
With folded arms and looks which are
Weapons of unvanquished war.

2. And if then the tyrants dare,
Let them ride among you there,
Slash and stab, and maim and hew
What they like, that let them do

3. With folded arms and steady eyes,
And little fear and less surprise,
Look upon them as they slay,
Till their rage has died away.

4. Then they will return with shame
To the place from which they came,
And the blood thus shed will speak,
In hot blustes on their- cheek.

5. Rise like lions after slumber
In unvanquishable number.
Shake your chains to earth like dew
Which in sleep has fallen on you.
You are many - they are few.

१. शांतचित्तानें व दृढनिश्चयानें उभे रहा,
अरण्यांतील वृक्षांप्रमाणें खांद्यास खादा भिडलेले व निःशब्द;
बाहू छातीवर वळून; तुमच्या डोळ्यांतील तेज
हेंच तुम्हांला युद्धांत अजिंक्य बनविणारें शस्त्र.

२. या उपर जालिमांची छाती असेल,
तर त्यांना आपले घोंडे तुमच्यावर घालूं द्या;
हाणणें व भोंसकणें आणि तोडणें नी कापणें--
त्यांच्या मनास येईल तें तें त्यांना करूं द्या.

३. बाहू छातीवर वळून व निश्चल नजरेनें,
भय न धरतां, न दचकतां,
ते ठार करतील तेव्हां फक्त पहात रहा,
त्यांचा क्रोध शमे पर्यंत बघत रहा,

४. मग ते शरमून परत वळतील,
जेथून आले तेथें जातील;
सांडलेलें रक्त त्यांचे गालांत चढेल,
त्यांच्या लज्जेला वाचा फुटेल.

९. झोपेंतून उठलेल्या सिंहाप्रमाणें उठा,
तुमचें संख्या बल अजिंक्य आहे.
आपल्या शृंखला फेकून द्या,
जणूं तुम्ही झोपले असतां अंगावर पडलेले दंव बिंदूच.
तुम्ही पुष्कळ अहां, ते थोडे आहेत.

हिंदुस्थानाच्या स्वराज्य संपादनाचा प्रश्न हा बऱ्याच अंशीं हिंदी लोकांचा अंतर्गत प्रश्नच आहे. इंग्रजी राज्याचे चालक आमचे आम्हीच आहों. पोलीस आमचे, मॅजिस्ट्रेट आमचे जेलरही आमचेच, गांवचा पोलीस पाटील आमचाच व नव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाचे सभासदही आमचेच, आम्हांला स्वराज्य मिळवायचें तें या आमच्या बंधूकडून मिळवायचें आहें. इंग्रजांचे हृदय परिवर्तन होवो किंवा न होवो, यांचें परिवर्तन झालें तरी पुरे आहे. परंतु ते तरी आमच्याहून भिन्न थोडेच आहेत ? आम्ही जें काळपर्यंत करीत होतों तेंच ते आज करीत आहेत. न जाणों, आम्हीही उद्यां कदाचित् तेंच करूं. परंतु जर आमच्या मार्गावर आमची दृढ श्रद्धा असेल तर आम्ही त्यांच्या मार्गाला जाऊन मिळणार नाहीं व हळुहळु तेच आम्हांला येऊन मिळतील. हें परिवर्तन समजुतीनें, सोशिकपणानें, तपश्चर्येनें व आत्मक्लेशानें घडवून आणणेंच शक्य आहे; श्रेयस्कर तर आहेच.

**हिंदुस्थानाचें नेतृत्वः**—राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारांत सध्यां कायद्याचें राज्य स्थापित झालें असलें तरी राष्ट्राराष्ट्रांमधील व्यवहारांत मात्र तरवार हाच न्यायाधीश आहे. अंतर्राष्ट्रीय व्यवहारांत आपलीं राष्ट्रें अद्याप जंगली अवस्थेंतच आहेत व त्यांचा हा जंगली स्वभाव त्यांच्या अंतर्गत कारभारालाही बाधत आहे. या मानवदेहधारी जंगली प्राण्याची मारामाऱ्या

करण्याची शक्ति मात्र अलीकडे बेसुमार वाढली आहे, त्यामुळें त्याचा जंगलीपणा अधिकच भेसूर झाला आहे.

जगाला शस्त्रयुद्धांचा वीट आलेला आहे. अलीकडील शास्त्रीय शोधांमुळें जग लहान बनत चाललें आहे. साऱ्या जगाचें एक राष्ट्र बनलें आहे त्यामुळें प्रत्येक युद्ध हें जागतिक युद्ध बनतें व आधुनिक शोधांमुळें सर्व-संहारकही बनतें. मनुष्याची शक्ति वाढली आहे. नीति वाढली असली तरी शक्तीच्या फार मागें राहिली आहे. त्यामुळें मानवी जीवनामध्यें सध्यां तीव्र पेच प्रसंग निर्माण झाला आहे. युद्धप्रथा बंद होऊन त्याऐवजीं एका अंतर्राष्ट्रीय न्यायालयाची व चक्रवर्ती रामराज्याची स्थापना होणें जरूर आहे. व हें सर्व घडून येण्यासाठीं कोणातरी एका राष्ट्रानें हिंमतपूर्वक पुढें सरणें, परक्यानें आपल्यावर सर्व शस्त्रास्त्रांनिशीं अन्याय्य आक्रमण केलें तरी आपण हातांत शस्त्र घेणार नाहीं असा निर्धार करणें आवश्यक आहे, हें सर्व आपण मागील प्रकरणांत पाहिलें.

हिंदुस्थानानें तें राष्ट्र व्हावें अशी आज साऱ्या जगाची अपेक्षा आहे. हिंदुस्थानानें सुद्धां जर लष्करी-बाणाच स्वीकारला तर मात्र जगाची आशाच खुंटली.

जगाला शांतीचा संदेश देण्याचा अधिकार हिंदुस्थानाचाच आहे. हिंदुस्थान अहिंसाभूमि आहे. हा अहंकार किंवा प्रौढी नव्हे; इतर देशांना कमी लेखण्याचा यांत इरादा नाहीं. या विश्वकुटुंबांतील निरनिराळ्या घटकांना विधात्यानें निरनिराळी कामगिरी नेमून दिलेली आहे; प्रत्येकानें विशिष्ट गुणाचा किंवा शक्तीचा विशेष विकास करून त्याचा लाभ साऱ्या जगाला द्यावयाचा आहे. कोणी शास्त्रीय शोध लावील, कोणी ललितकलांची वृद्धि करील, तसा कोणी गूढ आध्यात्मिक तत्त्वांची साधना करील. हिंदुस्थानाकडे

विधात्यानें अहिंसेची साधना सोपविली व त्या साधनेला अनुकूल अशी नैसर्गिक परिस्थितिही पुरविली. सुपीक प्रदेश, गंगा यमुनांसारख्या महान् नद्या, एका बाजूला हिमालयाचा संरक्षक तट तर दुसऱ्या बाजूला महासागराचा दुर्लंघ्य खंदक, ऊबदार हवामान, सूर्यप्रकाशाची विपुलता, अशातऱ्हेच्या नैसर्गिक अनुकूलतेंतच अहिंसावृत्तीचा विकास होऊं शकतो. जगण्यासाठीं मनुष्याला जेथें निसर्गाशीं व एकमेकांशीं सतत झगडावें लागतें अशा अति थंड, उजाड किंवा पहाडी मुलखांत अहिंसेचा विकास अधिक कष्टसाध्य असल्यास नवल नाहीं, किंवा तो तेथील रहिवाशांचा दोषही नाहीं.

म्हणूनच आर्य लोकांनीं बाहेरून येऊन पंचनद्यांच्या व नंतर गंगा यमुनांच्या तीरीं वस्ती केली व क्रमाक्रमानें सारा हिंदुस्थान व्यापला तेव्हां त्यांनीं आदिवासी जमातींचा, युरोपियन वसाहतवाल्यांनीं त्रिखंडभर केला तसा, निःपात केला नाहीं. स्वतः जगून त्यांनाही जगूं दिलें. अहिंसा-धर्माच्या भूमिकेवरून कोट्यवधि लोकांनीं मांसाशनाचा सर्वथैव त्याग केला व तो सतत हजारों वर्षें पाळीत आहेत, याच्या तोडीचें दृश्य इतर कोणत्याच देशांत पहावयास मिळणार नाहीं. पशुपक्ष्यांबद्दलच नव्हे तर वनस्पतींबद्दलही बंधुत्वाची भावना या हिंदभूमीमध्येंच परमावधीला पोचलेली आढळेल. रे. अँड्रूज् यांनीं हिंदी लोकांच्या अहिंसा सिद्धीची प्रशस्ति करतांना पुराव्यादाखल १९२१ च्या सुमारास गांधीजींच्या 'यंगइंडियांत' लिहिलें होतें कीं "चिमण्यांसारखे पक्षी व वानर-खारी यांसारखे पशु माणसाच्या सान्निध्यांत निर्धास्तपणें वावरतांना हिंदुस्थानाप्रमाणें अन्य कोणत्याच देशांत आढळणार नाहींत." भगवान् बुद्ध व महावीर यांसारखे अहिंसाधर्माचे समर्थ उपदेशक हिंदुस्थानांतच निर्माण झाले व आजही महात्मा गांधींसारखी आपल्या अहिंसेच्या संदेशानें जगद्वंद्य झालेली ही विभूति हिंदुस्थानानेंच जगाला दिली

आहे. धार्मिक बाबतींतील परमतसहिष्णुता सुद्धां हिंदी लोकांमध्यें सहजसिद्ध आहे. धर्मप्रसारार्थ सारा यूरोप रक्तानें माखून निघाला परंतु सीरियांतील ख्रिस्तानुयायी १८०० वर्षांपूर्वीं हिंदुस्थानाच्या आश्रयाला आले व तेव्हांपासून त्रावणकोरमध्यें सुखानें नांदत आहेत. इस्लामीयांच्या आक्रमणानें त्रस्त झालेले पारसी हजारवर्षांपूर्वीं हिंदुस्थानाच्या आश्रयाला आले व हिंदूंनीं त्यांचें प्रेमानें स्वागत केले. इस्लाम व हिंदुधर्म यांच्या भेटींतून हिंदुस्थानांत जें देवाण-घेवाण व धार्मिक पुनरुज्जीवन झालें, नाना मिश्रपंथांच्या रूपानें जें धर्मजागृतीचें सार्वत्रिक पीक आलें तें खरोखरच धन्यता मानण्याजोगें आहे !

परमतसाहिष्णुताच नव्हे तर दुसऱ्यामध्यें जेवढें चांगलें असेल तेवढें निराग्रही बुद्धीनें आत्मसात् करण्याची कला या भूमीइतकी इतरत्र आढळणार नाहीं आजवर जे जे विजेते हिंदुस्थानावर आक्रमण करण्यास आले त्या सर्वांना हिंदुस्थानानें आलिंगन देऊन हृदयाशीं धरलें व कालंतरानें त्यांनाच जिंकून आत्मसात् केलें. गुलामगिरी बंद करावी कीं चालू ठेवावी या प्रश्नावर अमेरिकेंत घनघोर युद्ध झालें, परंतु हिंदुस्थानांत अस्पृश्यता दूर करणाऱ्या सुधारकांच्या जीविताला अपायाची यत्किंचित्‌ही भीति नाहीं. हिंदुस्थानानें धर्मप्रसाराच्या, सत्तेच्या किंवा धनाच्या लोभानें आजवर एकाही परकीमुलखावर आक्रमण केलेलें नाहीं बौद्ध धर्माचा प्रसार साऱ्या पूर्व आशियाभर झाला, परंतु तो केवळ उपदेशानें; त्यासाठीं रक्ताचा एक थेंबही गळला नाहीं. गेले पंचवीस वर्षां-पासून हिंदीराष्ट्राची प्रतिनिधिभूत संस्था जी हिंदी-राष्ट्रीय-सभा तिनें हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्य-संपादनार्थ अहिंसेच्या मार्गानें जाण्याचा निश्चय केला असून अहिंसा-संग्रामाच्या अभिनव व यशस्वी प्रयोगांनीं साऱ्या जगाचें लक्ष वेधलें आहे, व आशा जागृत केल्या आहेत.

अशा तऱ्हेनें अहिंसा हा हिंदुस्थानचा स्वधर्म आहे. हिंदुस्थानानें शस्त्र युद्धापेक्षां अधिक सभ्यतेचा मार्ग जगाला दाखवून द्यावयाचा आहे, व त्यासाठींही अहिंसेच्याच मार्गानें आपलें पूर्ण स्वराज्याचें ध्येय गांठावयाचें आहे.

---

# स्वराज्याचा मार्ग : व्यावहारिक दृष्टि

गेल्या प्रकरणांत आपण हिंदुस्थानाच्या स्वराज्य प्राप्तीसाठीं अहिंसेचा मार्ग नैतिक दृष्ट्या श्रेष्ठ असल्याचें पाहिलें. या प्रकरणांत आपल्याला अहिंसेचा व्यावहारिक दृष्ट्या विचार कर्तव्य आहे.

**नीति व व्यवहारः**—नीति व व्यवहार यांचा परस्पर संबंध काय? पहिल्या प्रकरणांत धर्म व धोरण यांमध्यें ज्या तऱ्हेचा संबंध असल्याचें आपण पाहिलें तसलाच संबंध नीति व व्यवहार यामध्यें आहे नीति व व्यवहार, श्रेय व प्रेय, परमार्थ व स्वार्थ. यांमध्यें आत्यंतिक भेद किंवा विरोध नाहीं. परमार्थ म्हणजे खराखुरा स्वार्थ उलट ज्याला आपण सामान्य भाषेंत स्वार्थ म्हणतो तोही खोटा स्वार्थ असतो असें नव्हे, तो तात्कालिक व नश्वर स्वार्थ असतो एवढेंच.

इंद्रियसुख व बुद्धिगम्यसुख यांमधील फरकही वाटतो तितका आत्यंतिक नाहीं. सुखदुःखांची जाणीव इंद्रियांना होत नसून मनालाच होते. आपण म्हणतों " माझ्या पायावरील गळूं दुखत आहे. " परंतु खुद्द गळूं दुखत नाहीं किंवा पाय ही दुखत नाहीं तर पायांतील ज्ञानतंतु मेंदूला दुःखाची तार पाठवितात. आपल्याला दुखवट्याची तार येते तेव्हां ज्याप्रमाणें तार, विजेचा प्रवाह, तार पाठविणारा सिग्नलर, तारमास्तर, सायकलस्वार यांपैकीं कोणालाच दुःख होत नाहीं तर ज्याला उद्देशून संदेश असतो त्यालाच तेवढें दुःख होतें, त्याप्रमाणें देहांतील तारायंत्रांतही मेंदूच्याही मागें म्हणा, आंत म्हणा किंवा पलीकडे म्हणा, असलेल्या मनाला, जिवाला किंवा

आत्म्यालाच तेवढें सुखदुःख होतें. शारीरिक सुख हें मानसिक सुखच असतें. उलट मानसिक दुःखही केवळ मनोमय नसतें. त्याचेमुळें छाती भरल्यासारखी होते, डोळ्यांतून अश्रुधारा सुरू होतात, हातपाय लुले पडतात. शरीर व मन-बुद्धि-जीव-आत्मा हीं परस्पराशीं अभेद्यपणें जोडलेलीं आहेत.

इंद्रियसुखावेगळें बुद्धिगम्य सुख नाहीं, देहाव्यतिरिक्त आत्मा नाहीं, इहलोकाशीं असंबद्ध परलोक नाहीं त्याच न्यायानें नीति व व्यवहार यांमध्येंही वस्तुतः अलगपणा नाहीं. या भेदांना आत्यंतिक किंवा मौलिक महत्त्व दिल्यानेंच नास्तिकवादांचें फावतें अशी आमची समजूत आहे. देहाव्यतिरिक्त असे कांहीं आत्मे—पितरांचे, भूतांचे किंवा अन्य कोणाचे—अंतराळांत फिरत असतात, इहलोकींच्या कर्मांचें फळ स्वर्गांत किंवा नरकांत भोगावें लागतें तसेंच निर्गुण, निराकार व जगाहून अगदीं अलिप्त असा एक विलक्षण ईश्वर उंचावर कोठें तरी रहातो, असल्या कल्पनांनीच नास्तिकांना चीड येत असावी.

नीति व व्यवहार यांमध्यें आत्यंतिक भेद नाहीं, तरीही विचाराच्या सोयीसाठीं आपण निरनिराळ्या तऱ्हांनीं भेद कल्पूं शकतो. (१) जेणें करून तात्पुरता हेतु सिद्ध होतो तें व्यवहार्य व जेणें करून समग्र जीविताचें साफल्य होतें तें नैतिक. स्वराज्य मिळविणें हा आपला उद्देश आहे. इतरही आपले अनेक उद्देश असतात, पण त्यांचा विचार न करतां स्वराज्य एवढाच विशिष्ट उद्देश त्वरितांत त्वरित कोणत्या मार्गानें सिद्ध होईल याचा विचार तो व्यावहारिक विचार व स्वराज्याचा अधिक बारकाईनें केलेला विचार तसेच जीवनांतील इतर विविध उद्देश किंवा जीवनाचा संपूर्ण उद्देश लक्ष्यांत घेऊन केलेला विचार तो नैतिक विचार. "आपल्याला स्वराज्य प्राप्तीच्या मार्गाचा व्यावहारिक दृष्टीनें विचार करावयाचा आहे, नैतिक दृष्टीनें नव्हे" असें जेव्हां म्हटलें जातें तेव्हां त्याचा आशय स्वराज्याबरोबर

इतर अनेक अभीष्टांची गलत करण्यांत येऊं नये असाच असावा. (२)–कदाचित् नैतिक विचार म्हणजे व्यक्तीच्या आध्यात्मिक उन्नतीचा विचार या अर्थानें त्याच्याशीं स्वराज्याच्या चळवळींत आपल्याला कांहीं कर्तव्य नाहीं, असें म्हणावयाचें असेल तरीही तें वावगें नाहीं. स्वराज्य हें सार्वजनिक ध्येय आहे व त्या दृष्टीनेंच त्याचा विचार केला पाहिजे. मात्र सार्वजनिक उद्दिष्टांचा नीतीशीं संबंध नसतो असें मुळींच नाहीं. उलट न्याय, स्वातंत्र्य, समता हे सारे नैतिक भावच आहेत, व स्वराज्य त्यांचे साठींच पाहिजे आहे.

(३) आणखी एका अर्थानें व्यवहार हा तात्त्विक विचारांहूनही वरिष्ठ ठरतो. व्यवहार म्हणजे प्रत्यक्ष परिस्थितीला अनुलक्षून ठरवावयाचें धोरण. तत्त्वें किंवा सिद्धांत हे सामान्य म्हणजे एकांगी किंवा काल्पनिक प्रसंगाना अनुलक्षून असतात. म्हणून प्रत्यक्ष व्यवहाराला कोणतेंही एकांगी तत्त्व निष्ठुरपणें लागू करतां येत नाहीं. उदा० मी प्रवासांत असतां किंवा दुसऱ्याकडे पाहुणा म्हणून उतरलों असतां मला ताप आला तर आरोग्य-शास्त्री मला सांगेल "प्रथम लंघन कर, एनिमा घे, नंतर कांहीं दिवस मोसंब्यांचा रस किंवा ताक या सारखा आहार घे." परंतु अशा प्रसंगीं व्यवहार्य मार्ग बहुधा भरपूर कोयनेल घेऊन तापाला दाबून टाकणें हाच असूं शकेल. येथें आरोग्यशास्त्राची दृष्टि एकांगी व व्यवहाराची व्यापक आहे.

आपल्याला तूर्त विचार कर्तव्य आहे तो हा कीं स्वराज्य प्राप्तीसाठीं अहिंसेचा मार्ग स्वीकारल्यानें आपलें चिरकालिक व सर्वांगीण कल्याण होणार असलें तरी तात्कालिक नुकसान होईल कीं काय? अहिंसेच्या बंधनामुळें स्वराज्य प्राप्ति लांबणीवर पडेल कीं काय? किंवा अहिंसेच्या स्थापनेसाठीं स्वराज्याचा बळीच घ्यावा लागेल कीं काय?

**सशस्त्र बंड अशक्य :—** सशस्त्र बंडाचा मार्ग आपल्याला सर्वस्वी अशक्य आहे ही गोष्ट सहज लक्ष्यांत येण्यासारखी आहे. आपण निःशस्त्र आहों व सरकार सर्व आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज आहे. युद्धामध्यें आतां वैयक्तिक शौर्य व शरीरबल यांस पूर्वीसारखें महत्त्व राहिलेलें नाहीं. आधुनिक शस्त्रास्त्रें इतकीं प्रचंड व अवाढव्य झालीं आहेत कीं तीं सरकारच्याच ताब्यांत रहाणार. प्रजेला ती बाळगण्यास परवानगी नाहीं व चोरून बाळगण्या इतकी तीं सुटसुटीतही नाहींत. खर्चाच्या दृष्टीनेंही तीं खरीदणें व बाळगणें प्रजाजनांना परवडणारें नाहीं. त्यांसाटीं लागणारा अलोट खर्च फक्त सरकारच करूं शकेल. आम्ही चोरट्या पिस्तुलांनीं, गांवठीं बॉबगोळ्यांनीं किंवा मिलिटरी स्टोर्समधून लांबविलेल्या हँडग्रेनेड्नीं चारचौघां सरकारपक्षीयांना ठार करूं व दहशत बसवूं परंतु असल्या भुरट्या हल्ल्यांनीं क्रांति करतां येत नसते, हें बंगाली क्रांतिकारकांच्या चाळीस वर्षांच्या अनुभवानें सिद्ध होऊन चुकलें आहे. उलट असल्या अत्याचारांमुळें प्रतिपक्षाचीच बाजू बळकट होते. स्वामी श्रद्धानंदांचा एका मुसलमान माथेफिरूनें खून केला त्यामुळें हिंदुसंघटनेचा पक्ष कमजोर नव्हे तर दसपट बळकट झाला.

आजवर आमची अहिंसेच्या ब्रीदाबद्दल ख्याति झालेली असल्यानें साहजिकच अधिकारी वर्ग निर्धास्त असतो. या त्यांच्या गाफिलपणाचा फायदा घेऊन विशिष्ट प्रसंगीं आपण आपल्या संख्याबलाच्या व लाठ्याकुऱ्हाडींच्या साह्यानेंही एकादे ठिकाणचा खजिना लुटूं शकूं, किंवा चारदोन पोलिसांच्या बंदुका हिसकून घेऊं किंवा एकाद्या कचेरीचा ताबा घेऊं. परंतु प्रतिपक्षी एकदां सावध झाल्यानंतर शस्त्रबलाच्या चढाओढींत आमचा टिकाव लागणें अशक्य. सरकारनें एकादें विमान किंवा एकादी मशीनगन् आमचे विरुद्ध आणली तरी आमचा धुव्वा उडण्यास वेळ लागणार नाहीं.

**सरकारी हेरगिरी:**– सरकारला गाफिल स्थितींत पकडून व आपली सर्व शक्ति एकवटून त्याचेवर मात करणें हेंच साऱ्या सशस्त्र बंडांचें मर्म असतें. गुप्तकट, चोरटी तयारी, फितुरी इत्यादि उपायांनीं छोटया टापूंतील निर्बल सरकारांवर बंडखोरांनीं मात केल्याचीं अनेक उदाहरणें गतेतिहासांत मिळतात. परंतु औरंगजेब व शिवाजी यांचा काळ आतां राहिलेला नाहीं. दळणवळणाचीं साधनें आतां किती तरी वाढलीं असून तीं सारीं सरकारच्या स्वाधीन आहेत. इंग्रजी राज्य मोगल-पातशाहीपेक्षां किती तरी पटींनीं सुसंघटित आहे. त्यांचे गुप्तहेर परदेशांतून सुद्धां बित्तंबातमी काढून आणतात. हिंदुस्थानाच्या कोनाकोपऱ्यापर्यंत गुप्त पोलिसांचे जाळें पसरलेलें आहे. आमच्या चुलीवर काय शिजत आहे याची बातमी घरच्या पुरुष मंडळीला कळण्यापूर्वीं पोलीस खात्याला कळते! कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या खासगी सभांचे ठराव वर्तमानपत्रांच्या बातमीदारांना किंवा ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सभासदांना कळण्यापूर्वीं व्हाइसरॉयला कळूं शकतात. गेल्या महायुद्धाच्या काळीं अमेरिकेंतील कित्येक हिंदी लोकांनीं हिंदुस्थानांत येऊन बंड करण्याचा कट रचला. दोन तीनशें क्रांतिकारकांनीं हिंदुस्थानांत येऊन निरनिराळ्या भागांत जाऊन एका क्षणाला बंडाची सार्वत्रिक उठावणी करायची इत्यादि सर्व बेत ठरले. हे सर्व साहसी देशभक्त कोमागाटामारू नांवाच्या जपानी बोटींत बसून अमेरिकेहून कलकत्ता बंदरी येण्यास निघाले. कलकत्ता बंदरीं बोट येण्यापूर्वीं पोलिसांनीं सामोरे जाऊन त्या सर्वांस उतरून घेतलें व बिनभाड्याच्या घरांत सरकारी पाहुणचार भोगण्यासाठीं ठेवून दिलें!

इंग्रज सरकार शस्त्रबलाकडून आम्हांला अजिंक्य आहे एवढेंच नव्हे तर गुप्तकट करून त्याला बेसावध पकडणें त्याहून अशक्य आहे. आपला

देश अफाट असल्यामुळें देशव्यापी कटाची सांखळीं फार लांबलचक असावी लागणार, व या सांखळीचा एक दुवा तुटला तरी सारी सांखळीं फुकट जाते. कटांतील एकादा इसम कमकुवत, बेसावध, दगाबाज इत्यादि निघणें मुळींच कठीण नाहीं.

**रणांगणाची पसंती** :—शत्रूशीं आपण कोणत्या रणांगणावर कोणत्या शस्त्रांनिशीं लढावयाचें तें त्याच्या किंवा तिऱ्हाइतांच्या मर्जीनुसार न ठरवितां स्वतःच्या शक्तीला व सोयीला अनुसरून, आपलें बळ कशांत आहे व शत्रूचें दुबळें अंग कोणतें याचा विचार करून, पसंत करणेंच केव्हांही शहाणपणाचें असतें. शस्त्रांच्या चढाओढींत इंग्रजांपुढें आपला निभाव लागणें सर्वस्वी अशक्य आहे. अर्थात् त्या बाबीवर त्यांचेशीं लढा देणें शहाणपणाचें नाहीं. आम्ही येथील मूळ रहिवाशी आहों, संख्येनें किती तरी अधिक आहों, देशावर आमचा कब्जा आहे ("वुइहोल्ड दि कन्ट्री"), अर्थात् आम्ही मनांत आणलें तर परक्याला लटका पाडूं शकतों, निदान-पक्षीं त्याचें आमच्यावरील राज्य मुष्किलीचें करणें आमच्या हातीं आहे— या मुद्यावर आपण आपल्या लढ्याची उभारणी करणें हाच खरा धूर्तपणा आहे. एका रोमन सेनापतीची ऐकीव गोष्ट आहे : तो आपल्या फौजेनिशीं एका डोंगरी किल्यामध्यें आश्रय धरून राहिला होता. डोंगराच्या पायथ्याशीं शत्रु सैन्य येऊन पोंचलें होतें. शत्रु सेनेच्या सेनापतीनें किल्ल्यांतील सेना-पतीला आव्हान दिलें :—"असा किल्ल्यांत दडून कां बसतोस ? मर्द असशील तर खालीं ये; मैदानांत तुमचे आमचे दोन हात होऊं द्यात." रोमन सेनापतीनें शांत चित्तानें प्रति-आव्हान पाठविलें :—"लढायला आलास तर असा खालीं थबकून कां रहातोस ? छाती असेल तर ये डोंगर चढून आणि घूस किल्ल्यांत. हे आम्ही तुमच्या स्वागताला तयार आहों !"

आम्ही अत्याचार केल्यास तें सरकारच्या पथ्यावरच पडतें मग आमची चळवळ चिरडून टाकण्यास त्याला सबब मिळते. सरकारच्या दडपशाहीचें नैतिक समर्थन होतें. आमची बदनामी करण्यासाठीं सरकारच गुप्त हस्तकांकरवीं कॉंग्रेसच्या नांवावर अत्याचार करवितें असा सुद्धां प्रवाद आहे. तो सर्वस्वी खरा नसला तरीही आपण प्रक्षुब्ध होऊन प्रतिपक्षाच्या जाळ्यांत सांपडायचें नाहीं अशाबद्दल खूणगांठ बांधली पाहिजे

**त्याग व संघटनाः**— शस्त्रबळ कितीही भारी झालें तरी मनोबलाहून उतरतें आहे हें आम्हांला मान्य आहे. सरकारपाशीं कितीही भयंकर शस्त्रें असलीं आणि आपल्यापाशीं गोफण धोंड्या पलीकडे कांहीं साधन नसलें तरीही हिंदुस्थानच्या यच्चयावत लोकांनीं जर इंग्रजांचें राज्य चालू द्यावयाचें नाहीं असा निर्धार केला तर तें राज्य घटकाभरही टिकूं शकणार नाहीं. आम्ही इतके अधिक आहों आणि इंग्रज इतके थोडे आहेत कीं "आम्ही सर्वांनीं एकदम फुंकर मारला तरी ते उडून जातील ! इंग्रज दिसेल तेथें त्याचेवर हातांत मिळेल तें फेकून हल्ला करायचा असें सर्वांनीं ठरविलें तरी भागेल." पण तें व्हावें कसें ? एवढा त्याग व एवढी संघटना, हिंदी लोकांच्या विचारांमध्यें व कार्यामध्यें इतकी एकतानता, कशी घडून येणार ? व ती घडून आल्यानंतर शस्त्रांचा प्रयोग करण्याचें कारण तरी काय ? केवळ असहकारानेंही भागणार नाहीं का ?

शिवाजीच्या वेळच्या एका मावळ्याची गोष्ट सांगतात. ती कल्पित असली तरी बोधप्रद आहे. दिल्लीहून महाराष्ट्रावर स्वारी करण्यास आलेलें मोंगलांचें सैन्य एका खिंडींतून कूच करीत असतां शेजारच्या टेकडीवर गुरें चारीत असलेला एक मावळा त्या सैन्यावर गोफणीचे गुंडे मारूं लागला. त्याचा सोबती त्याला म्हणाला "गोफणगुंडे मारून काय साधणार ?

लष्कराची नजर तुझ्यावर गेली तर ते तुला गोळी घालून क्षणांत ठार करतील." तो मर्द मराठा उत्तरला:-"बेहेत्तर मेलों तर. मी मेलों तरी महाराष्ट्राच्या अफाट जनसंख्येंत तुटवडा पडणार नाहीं. परंतु माझ्या गोफण-गुंड्यांनीं दुष्मनाच्या लष्करापैकीं एकादें जरी टाळकें फुटलें तरी त्यांची संख्या एकानें कमीच होणार."

ही मर्दानगी आपल्यामध्यें सार्वत्रिक होईल तरच सध्यांच्या स्थितींत उपयोग. पण मग गोफण गुंड्यांखेरीजही स्वराज्य मिळवितां येईल. परंतु ती सार्वत्रिक व्हावी कशी ? हें मनोबल कसें निर्माण करावें ? त्यासाठीं लोक-शिक्षण, लोक-संघटना व एकजूट ह्यांची भरपूर जोपासना झाली पाहिजे. तीं कशी घडवून आणावीं ?

**अहिंसेची शक्ति :**—तपश्चर्या हेंच त्याचें साधन आहे. तपश्चर्या म्हणजे ध्येयसिद्धीसाठीं इतरांना पीडा न देतां स्वतः कष्ट सोसणें, स्वतःमधील किल्मिषें जाळून टाकणें, स्वतःबद्दल कठोर व इतरांबद्दल सहिष्णुवृत्ति ठेवून धीरानें, सतत व दीर्घकाल प्रयत्न करणें. आपण स्वराज्याची इष्टता व श्रेष्ठता लोकांना दाखवून द्यावी, स्वराज्याच्या प्राप्तीसाठीं सर्वांनीं जें करणें आवश्यक आहे असें आपल्याला वाटतें तें आपण लगेच स्वतःच्या वर्तनांत व जीवनांत उतरवावें व इतरांचीही तसें करण्याविषयीं समजूत घालण्याचा प्रयत्न करावा. कोणतीही सुधारणा, नवी व्यवस्था किंवा पुनर्घटना घडवून आणायची असेल तर त्यासाठीं तात्पुरती गैरसोय किंवा कष्ट कोणी तरी सोसणें अपरिहार्य आहे. स्वतः सुखरूप राहून इतरांवर हे कष्ट लादण्याचा प्रयत्न करणें हा हिंसेचा मार्ग आहे. कष्टाचा प्रथम हिस्सा स्वतःकडे घेणें, नंतर क्रमाक्रमानें स्वकीयांना त्या कष्टाचे भागीदार करणें व दूरच्यांना किंवा परकीयांना अपरिहार्य

तेवढेच कष्ट पोंचू देणें हा तपश्चर्येचा व अहिंसेचा मार्ग आहे. हा अहिंसेचा मार्ग ‘ सर्वेषामविरोधेन ’—कोणाचाही विरोध न इच्छितां—चालवयाचा असतो. हा अजात शत्रुत्वाचा मार्ग आहे. त्यामध्यें सुधारकाला कोणाचें शत्रुत्व संपादावें लागत नाहीं. कोणी कमी तर कोणी अधिक पण सारेच त्याचेकडे आकर्षिले जातात. सुधारकापासून तों तहत प्रतिपक्षापर्यंत एकच सलग सांखळी बनते व सुधारकाच्या गतीची त्या सांखळीच्या साऱ्या दुव्यांना खेंच पोचते. ती सुधारणा ज्यांच्या बुद्धीला पटत नाहीं किंवा ज्यांना ती स्वतःच्या हितसंबंधांना जाचक वाटते त्यांनाही सुधारकाच्या, त्यांच्यामतें चुकीच्या कां होईना पण, शुद्धहेतु बद्दल—तो आपलें वाईट इच्छीत नाहीं याबद्दल—प्रचीति वाटत असते, त्यामुळें ते त्याची फार तर कींव करतील परंतु द्वेष किंवा तिरस्कार करणार नाहींत. त्यांचा सुधारणेला विरोध असला तरी सुधारकाला नसतो त्यामुळें सुधारणेचा खुल्यामनानें विचार व स्वीकार होण्यास अनुकूलता उत्पन्न होते. ज्यांना ती सुधारणा मान्य आहे, परंतु ती घडवून आणण्यासाठीं लागणारे कष्ट सहन करण्याची तयारी नाहीं म्हणून जे तटस्थ आहेत किंवा चालू पद्धतीला उचलून धरीत आहेत, त्यांचें त्या सुधारकाच्या उदाहरणानें नीतिधैर्य वाढेल व तेही हळु हळू सुधारणेला सक्रिय पाठिंबा देण्यास तयार होतील. अशातऱ्हेनें सुधारणा पक्षाचें बल एक सारखें वाढतच जाईल. कांहीं काळानें सुधारणापक्ष इतका बलशाली बनेल कीं भीरु लोकांना स्वतःची कातडी किंवा प्रतिष्ठा बचाविण्याकरितांही त्याला येऊन मिळावें लागेल. मग प्रतिपक्षी अगदींच एकटा पडेल व त्यालाही शरण आल्याखेरीज गत्यंतर उरणार नाहीं.

याच्या उलट सुधारकानें जोर जुलमाचा मार्ग पत्करला कीं वर

वर्णिलेली सुधारणेची सांखळी तत्काळ तुटते. कांहीं दुवे सुधारकाला जोडून आले तरी पुष्कळसे अलग होऊन विरुद्ध दिशेला जातात. जे तटस्थ असतात ते शत्रु होतात व जे विरुद्ध होते ते अधिकच शत्रुत्व करूं लागतात स्वपक्षीयही दुरावतात व प्रतिपक्षीयांची मात्र एक जूट बनते. अहिंसक युद्धनीतीचा नियम असतो कीं "जो आपला दुष्मन् नाहीं तो आपल्या बाजूचाच आहे" तर हिंसक युद्धनीतीचा नियम आहे" "जो आपल्या बाजूला नाहीं तो आपला दुष्मन आहे." अहिंसा जोडते, हिंसा तोडते. हिंसक लढवय्याला भारी शक्ति नासावी लागते. व परिणामीं विजय मिळाला तरी तो विजयही "होतें तें बरें होतें" म्हणायला लावतो.

**कमी त्यागांत काम :—** आपल्याला स्वराज्य सशस्त्र बंडानें मिळवायचें असो किंवा अहिंसेनें मिळवायचें असो, उभयपक्षीं आपली त्यागाची तयारी पाहिजेच; परंतु अहिंसेनें फारच कमी त्याग पुरेल. आपल्याला शस्त्रयुद्ध करायचें तर लक्षावधि, किंबहुना कोट्यवधि, प्राण खर्चावे लागतील; संपत्तीची धुळधाण तर विचारायलाच नको. इतकें करूनही विजयाची खात्री नाहीं. अहिंसक त्यागानेंही अमुक इतका त्याग भरतांच स्वराज्य मिळेल असा नक्की आंकडा मांडतां येणार नाहीं, परंतु पुष्कळच कमी त्याग पुरे होईल हें निश्चित. हिंसायुक्त त्यागाच्या मारक शक्तीपेक्षां अहिंसक त्यागाची आकर्षण शक्ति कितीतरी पटींनीं अधिक असते. तिनें स्वकीय, तटस्थ, प्रतिपक्षी व दुनियाभरचे प्रेक्षक आकर्षिले जातात. आपण अद्यापपर्यंत पुरेसा त्याग केलेला नाहीं, केला तो पुन्या अहिंसेनिशीं केला नाहीं, तरीही "अद्याप स्वराज्य मिळत नाहीं" म्हणून आपण अधीरे बनतों. परंतु चाळीस कोटी प्रजेचें स्वराज्य ही इतकी सवंग वस्तु नाहीं. त्यासाठीं लक्षावधि नको पण सहस्रावधि लोकांनीं आपलें सर्वस्व—प्राणच नव्हे तर

चैन, आराम, प्रतिष्ठा, मालमत्ता इत्यादि—चालविण्यास सिद्ध झालें पाहिजे; व त्याचे मागून लक्षावधि किंवा कोट्यवधि लोकांनीं तात्पुरत्या अडचणी सोसण्यास तयार असलें पाहिजे, व त्याहूनही अधिक लोकांनीं —बहुसंख्य वर्गानें—या शुद्ध त्यागाचें मोल कमी होईल, या उदात्त चळवळीला बट्टा लागेल, असें कांहीं न करण्याचा समंजसपणा दाखविला पाहिजे. सगळे च सारखे पुढें जाऊं शकले नाहीं तरी मागें रहाणारांनीं पुढें सरणारांचा मत्सर न करतां त्यांना आशिर्वाद देणें याचेंच नांव संघटना.

हिंदुस्थानांत तरी ही संघटना अहिंसेच्या व तपश्चर्येच्या मार्गाखेरीज घडून येणार नाहीं. आपला देश हा एवढा मोठा आहे, विविधतेनें भरलेला आहे, कीं आपण लष्करी बाणा पत्करल्यास त्याचे तुकडेच तुकडे होऊन जातील. आपल्यामध्यें धर्मभेद आहेत. भाषाभेद आहेत. हवापाणी, पिकें इत्यादींचे भेद असल्यामुळें रहाणीमध्येंही विविधता आहे. जातिभेद आहेत. गरीब-श्रीमंत भेद आहेत. नाना पक्षभेद आहेत. शेकडों देशी संस्थानिक आहेत. या भेदांची आपल्याला लाज वाटण्याचें कारण नाहीं, उलट अभिमानच वाटावा. यूरोपखंडांतून रशिया वगळला तर पुरणाऱ्या युरोपखंडाएवढें हें आपलें भरतखंड आहे. यूरोपमध्यें तेवढ्या भागांत पन्नास छोटीं छोटीं अलग अलग राष्ट्रें आहेत, व त्यांचेमध्यें यादवी चालू आहे. अशा छोट्या छोट्या राष्ट्रांमध्यें एकधर्म, एकभाषा, एक रहाणी, एक जिनसीपणा आढळल्यास त्यांत पुशारकी मारण्यासारखें कांहीं नाहीं. तेथेंही तो आढळत नाहींच. परंतु आपलें हें हिंदुस्थान मात्र हजारों वर्षांपासून एकभूमि, एक राष्ट्र म्हणून नांदत आलें आहे. त्यांत जो विस्कळितपणा आहे तो या एकीकरणाच्या महान् प्रयत्नाची अपरिपूर्णता आहे. हा महाप्रयत्न पूर्ण होण्यासाठीं व टिकून रहाण्यासाठीं अहिंसावृत्तीची मात्र आवश्यकता आहे.

जो न्याय आपण परक्याला लावूं तो आपल्या आपापसांतील संबंधांनाही लागू झाल्याशिवाय रहाणार नाहीं. इंग्रजांशीं आपण शस्त्रानें लढण्याचें ठरविल्यास आम्हांला स्वकीयांवरही सक्ती करावी लागणार. मतभेदामुळें हितसंबंधांमुळें, अविश्वासामुळें किंवा भीरुतेमुळें जे ब्रिटिशांच्या पक्षाला चिकटून आहेत त्यांना कैचींत धरावें लागणार. परिणामीं मतभेद, हित-विरोध, अविश्वास हीं अधिकच चिघळणार व प्रतिपक्षाचेंच फावणार. हिंदुमुसलमान, स्पृश्यास्पृश्य, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, बंगाली-बिहारी, मराठे-कानडी, सोशालिस्ट-कम्युनिस्ट, आर. एस्. एस्.– आर. एस्. डी. यांचे-मध्येंच वितुष्टें माजणार व स्वातंत्र्य दूर जाऊन गुलामगिरीच चिरकाळ नशिबीं येणार. ब्रिटिशांशीं मारामारी व परस्परांशीं सबूरी हीं एकावेळीं संभावणें शक्य नाहीं. हिंसा-अहिंसा हा केवळ युद्धनीतीचाच प्रश्न नसून ती साऱ्या सामाजिक जीवनांतील एक स्थायी वृत्ति किंवा संवयच आहे. सबूरीच्या संवयीखेरीज हिंदुस्थानासारख्या अफाट देशाचा निभाव लागणार नाहीं.

**उघड्या कारभाराची आवश्यकता:—** हिंदुस्थानासारख्या अफाट देशाच्या स्वातंत्र्यासाठीं चाळीस कोटी लोकांची संघटना करावयाची ती गुप्त मार्गांनीं करणें असंभवित आहे. गुप्त कटांची शक्ति किती मर्यादित आहे, व ती हिंदी स्वराज्याचा प्रश्न सोडविण्यास किती अपुरी आहे, याचें विवेचन पूर्वीं केलेंच आहे. गुप्त कटांनीं लोकशिक्षण, जागृति व विस्तृत संघटनाही शक्यच नाहींत. परंतु अहिंसेची मर्यादा आपण स्वखुषीनें स्वतःला घालून घेतल्यानंतर उघड मत प्रचाराला मनाई करणें सरकारला अवघड जातें, तसेंच अनावश्यक व कांहीं अंशीं अनिष्टही वाटतें. अहिंसेची मर्यादा स्वीकारल्यानंतर असहकार, कायदेभंग व विधायक कार्यक्रम हींच

आपलीं मुख्य साधनें बनतात. यापैकीं विधायक कार्यक्रमामध्यें सरकार व्यत्यय आणूं इच्छिणार नाहीं व धजणारही नाहीं. असहकार व कायदेभंग यांचें सारें बळच उघडपणामध्यें आहे. दुटप्पी किंवा तोंडपुजी विश्वासघातकी वृत्ति ही असहकार-कायदेभंगाशीं विसंगत व त्यांना विघातक आहे. म्हणून आपली अहिंसक चळवळ ही शक्य तेवढी उघडपणें चालविण्यांतच आपला फायदा आहे. सरकारचें त्यांतच मरण आहे. सरकारची त्यांत एका परीनें सोयही आहे हें खरें असलें तरी तेवढ्यावरून आपला त्यांत तोटा आहे असें अनुमान केल्यास मात्र फसगत होईल. अहिंसेचा मार्ग सरकारला तापदायक होत नाहीं सबब आपण तो सोडून देणें मूर्खपणाचें होईल. सत्य-अहिंसेच्या लढ्याची, व साऱ्याच शुद्ध सुधारणांची, खुबी हीच आहे कीं तो लढा व त्याचे परिणाम लढ्यांतील उभय पक्षांना सारखेच हित-कारक होतात. विरोधी पक्षाचें प्रथमदर्शनीं नुकसान होतेंसें दिसलें तरी वस्तुतः अधिक उच्च व टिकाऊ कल्याणच होत असतें.

आपल्या चळवळीच्या उघडपणाविषयीं पं. जवाहरलाल नेहरू १९२९ च्या लाहोर काँग्रेसमध्यें आपल्या अध्यक्षीय भाषणाचा समारोप करतांना म्हणाले होते "अलीकडे आपण गुप्त कटांविषयीं पुष्कळ ऐकतों. बंधुहो, आपला सुद्धां हा एक उघडा कटच आहे. या कटामध्यें सामील होण्यास मी माझ्या कोट्यवधि हिंदी बंधुभगिनींना निमंत्रण देतों." कन्या इंदिरा यांस लिहिलेल्या पत्रांत (ग्लिम्प्सिस् ऑफ् वर्ल्ड हिस्टरी, पत्र १ लें) ते लिहितातः— "आपल्या कार्याची किंवा राष्ट्राची बदनामी होईल असें कांहींच आपण करतां कामा नये. आपण हिंदुस्थानाचे सैनिक आहों, त्याअर्थी देशाचा लौकिक आपल्या वर्तनावर अवलंबून रहाणार व त्या लौकिकाचें आपण जीवापलीकडे जतन केलें पाहिजे. पुष्कळदां काय करावें याचा

आपल्याला उलगडा होणार नाहीं. योग्य काय व अयोग्य काय याचा निवाडा करणें नेहमींच सोपें नसतें. शंका येईल तेव्हां तेव्हां लावण्याजोगी एक अल्प कसोटी मी तुला सांगतों, तिचा तुला उपयोग होईल. चोरटे-पणानें किंवा लपविण्याच्या हेतूनें कांहीं करूं नये. लपंडाव म्हणजे भ्याडपणा. भ्याडपणा फार निंद्य आहे. तुला तो शोभणार नाहीं. तूं निर्भयता धर कीं बाकीचें सारें आपोआप साधेल. बापूंच्या (गांधीजींच्या) नेतृत्वाखालीं चाललेल्या आपल्या स्वातंत्र्याच्या महान् चळवळीमध्यें गुप्ततेला किंवा लपंडावाला स्थानच नाहीं. आपण करतों व बोलतों त्याची आपल्याला भीति वाटत नाहीं. आपला सारा कारभार उघड्यावर व सूर्यप्रकाशांत चालू आहे."

**स्वराज्य-अहिंसा यांचा दुहेरी भार?** कांहीं लोकांचें म्हणणें पडतें कीं "स्वराज्य व अहिंसा, हिंदुस्थानाची ब्रिटिशांच्या पकडींतून सुटका व जगाची युद्धांच्या शापापासून सुटका, राजकारण व धर्म, यांची आपण गल्लत करूं नये. स्वराज्य संपादन व अहिंसेचा प्रचार हीं कामें एकाच वेळीं अंगावर घेतल्यानें कोणतेंच साधणार नाहीं. यापेक्षां आपण प्रथम साधेल त्या मार्गानें स्वराज्य संपादूं या व हें एक काम आटपल्यानंतर युद्धबंदी व जागतिक शांतता यांसाठीं प्रयत्न करण्याचें दुसरें कार्य इतर राष्ट्रांच्या सहकार्यानें करूं; एकदम दोन कामें हिंदुस्थानासारख्या दुर्बल राष्ट्राला झेपणार नाहींत" इत्यादि. स्वराज्य व अहिंसा यांमध्यें विरोध असेल तर हा युक्तिवाद विचारार्ह ठरेल परंतु वस्तुतः स्वराज्य संपादन म्हणजे जुलमाचें अर्थात् हिंसेचें, निवारणच आहे. जागतिक शांतता व ब्रिटिशांकडून आमच्यावर चाललेल्या जुलमाचें निवारण हीं परस्परांस विरोधी नसून पोषकच आहेत. मुंबईहून कल्याणला जाणें हे पुण्यास जाण्याशीं विरोधी नाहीं व पुण्याचा रस्ता पकडल्यानें कल्याणला पोंचण्यास अडचण येत नाहीं.

किंवा स्वराज्य व अहिंसा हीं एकाच कावडीचीं दोन पारडीं समजा. दोन्ही पारडीं भरलेलीं असतील" तरच कावड सुखानें वहातां येईल. अहिंसेचें पारडें रिकामें केलें, तर तोल संभाळणें व कावड वहाणें अवघड होऊन जाईल.

**हिंसा-अहिंसा एकाच वेळीं ?**—आणखी कित्येकांचें म्हणणें असतें कीं "अहिंसापूर्ण त्याग सर्वांसच झेपत नाहीं. लढत लढत मरणें पुष्कळांना शक्य होईल परंतु शांतपणें, प्रसन्नचित्तानें व प्रतिपक्षाचें भलें चिंतीत मृत्युमुखीं पडणें फार दुष्कर आहे. ज्यांची अहिंसेवर जिवंत श्रद्धा आहे त्यांसच तें शक्य होईल. त्यांनीं अहिंसेच्या मार्गानें जाण्यास आमची हरकत नाहीं. परंतु बहुसंख्य मंडळींची श्रद्धा इतकी प्रखर नसते. अशी मंडळी स्वतःला पटणाऱ्या व मानवणाऱ्या, अर्थात् हिंसेच्या, मार्गानें प्रयत्न करीत राहिली, अहिंसक व हिंसक प्रयत्न एकाच वेळीं चालू राहिले, तर काय हरकत आहे ? ज्याला त्याला आपापल्या आवडीनुसार काम करूं दिल्यानें स्वराज्याच्या चळवळीला अधिक रंग चढणार नाहीं का ?

नाहीं. अहिंसेची कार्यपद्धति ही एक किमया आहे. जग व इंग्रज आमच्या निरुपद्रवीपणाविषयीं जितके अधिक निर्धास्त असतील तितका आमचा असहकार व प्रतिकार अधिक परिणामकारक होईल. हिंसक कार्यक्रमाला अहिंसेचें वावडें नसलें, तरी अहिंसक प्रतिकाराला मात्र हिंसेचें वावडें असतें. विषाला दुधाचें साहचर्य चाललें तरी दुधाला विषाचें साहचर्य मुळींच परवडणार नाहीं. म्हणून अत्याचारांमुळें अहिंसक लढ्याला मदत होणार नाहीं, अडथळाच होईल; किंबहुना अहिंसक क्लेशसहन हिंसेच्या भेसळीनें सर्वथैव फुकट जाईल. ज्यांना अहिंसा मान्य नाहीं त्यांचा आपल्या मार्गानें जाण्याचा हक्क अर्थातच अबाधित आहे, परंतु अहिंसक लढ्याला

आपल्याकडून दुजोराच मिळेल असें मात्र त्यांनीं समजूं नये. हिंसक व अहिंसक असे दोन्ही प्रयत्न एकत्र चालू असतील तेथें हिंसक प्रयत्नांचें मिळावयाचें तेवढें बरें वाईट फळ मिळूं शकेल, परंतु अहिंसक प्रयत्न बऱ्याच अंशीं निष्फळ जाईल.

मग उलट बाजूनें असा प्रश्न उपस्थित होईल कीं देशांतील सर्व स्वराज्याकांक्षी पक्षांना किंवा गटांना जोंपर्यंत अहिंसेची श्रेष्ठता किंवा युपयुक्तता पटलेली नाहीं, किंवा आणी-बाणीच्या व मनःक्षोभाच्या प्रसंगींही अहिंसेचें उल्लंघन न करण्याइतकें आत्मसंयमन जोपर्यंत सामान्य लोकांमध्यें बाणलें नाहीं, तोंपर्यंत अहिंसक प्रतिकाराची चळवळ चालवायलाच नको. आणि ज्या अर्थी अहिंसेबाबत सर्वच लोकांचें एकमत होणें किंवा इतका आत्मसंयम सर्व सामान्य लोकांमध्यें येणें दुष्कर आहे, त्याअर्थी अहिंसक चळवळ सुरु करण्यास अनुकूल अशी संधि कधींच मिळणार नाहीं. अर्थात् आपल्या कार्यक्रमामध्यें अहिंसक प्रतिकाराला जागाच रहात नाहीं.

परंतु ही दृष्टि एक तर्फीच आहे. उलटपक्षीं अहिंसक प्रतिकाराचा मार्ग कुंठित झाल्यानेंच अत्याचारांना जोर चढतो. लोकांच्या क्षोभाला व वीरश्रीला वहाण्यास योग्य पन्हळ पाहिजे असतो. लोकांची शक्ति व उत्साह यांस कांहीं कार्यक्रमही पाहिजे. विधायक कार्यक्रम हें लोकांचा उत्साही फलदायीरीत्या गुंतविण्याचें साधन आहे, परंतु तेंही सतत दीर्घकालपर्यंत आकर्षूं शकत नाहीं. लोकांना परसत्तेच्या प्रत्यक्ष प्रतिकाराचा अहिंसक मार्ग न मिळाल्यास त्यांचे उत्साहाचा लोंढा भलत्याच बाजूनें मार्ग काढील. म्हणून लोकांच्या भावनांची नाडी ओळखून योग्य प्रसंगीं कायदेभंगासारखी प्रतिकारात्मक चळवळ सुरू करणें आवश्यक बनतें. अत्याचारी प्रचार व कार्यक्रम चालू असतांनासुद्धां—किंबहुना ते चालू आहेत म्हणूनच—अहिंसा-

निष्ठांनीं स्वतःही रंगभूमीवर प्रवेश करणें आवश्यक होतें. सभेंतील श्रोते गोंगाट करीत असतील तर वक्त्याचें वक्तृत्व व्यर्थ जातें हें खरें, परंतु उलटपक्षीं श्रोते गप्प होण्यासाठीं वक्ता खोळंबूनच राहिला तरीही त्याला तोंड उघडण्याची संधीच मिळणार नाहीं. गोंगाटांतच त्यानें भाषणास सुरवात करावी म्हणजे कांहीं वेळानें श्रोते स्तब्ध होऊन भाषण ऐकूं लागतील.

अत्याचारांचा तात्कालिक संभव नसला तरीही जनतेमध्यें निराशा, दुर्बल संताप, द्वेष व कुढेपणा यांचें प्राबल्य असेल तर त्या कोंडलेल्या भावनांचा आरोग्यमय व सक्रिय, अर्थात् अहिंसक प्रतिकाराचा, मार्ग लावून देणें उचित ठरेल. एरवीं त्या कोंडलेल्या भावनांचा आत्मघातकी प्रकारानें केव्हां स्फोट होईल त्याचा नेम नसतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... दि: ....................
ग्रंथांक .................... नों: दि: ....................

## अहिंसेच्या मर्यादा

आपल्या देशाचें स्वातंत्र्य आपल्याला शुद्ध म्हणजे सत्य-अहिंसा-मय मार्गानींच मिळवायचें आहे असा एकदां बुद्धीचा ठाम निश्चय झाला म्हणजेच विकल्परहित व एकाग्र मनानें प्रयत्नाला लागणें आपल्याला शक्य होईल. कुटिल कारस्थानें व हिंसा यांचा मार्ग कितीही सोपा व जवळचा वाटला तरी परिणामीं तापदायक व दूरचाच नव्हे तर भलतीकडे नेणारा आहे, हें मनांत बिंबल्यानंतर हिंसेच्या ऐवजीं दुसरे कोणते कसकसे उपाय योजतां येण्यासारखे आहेत याचें मनन-चिंतन चालू होतें, व हळुहळू नवीन उपाय सुचूं लागतात. सुचतील तेवढे उपाय करूं लागलें म्हणजे त्यांतूनच अधिकाधिक गोष्टी कळतात व सुचतात.

**नकली अहिंसाः**— केवळ अहिंसेनें, म्हणजे हिंसा न करतां हात जोडून बसल्यानें, स्वराज्य आमच्या पायापाशीं लोटांगणें घालीत येईल असें कोणीच समजत नाहीं. अहिंसा म्हणजे हिंसेचा अभाव एवढेंच नव्हे; अहिंसा ही कमालीची क्रियाशील व उद्यमशील असली पाहिजे. अहिंसेचे नकली प्रकार अनेक आहेत.

(१) नाठाळ मुलाला शेंकडोंवेळां रागें भरलें व मारलें तरी तो सुधारत नाहींसें पाहून त्याची गोष्ट बोलण्याचें सोडून देणारी दमली भागलेली अहिंसा; (२) ईश्वर अवतार घेऊन दुष्टांचें पारिपत्य करील व हिंदुस्थानाला स्वराज्य मिळवून देईल. स्वराज्यप्राप्ति ही मनुष्य-साध्य गोष्ट नव्हे असें म्हणून स्वस्थ बसणारी अंगचुकार अहिंसा; (३) आपल्याला

प्रतिपक्षाचें सीधे पारिपत्य करण्याचें सामर्थ्य नाहीं, तरीही त्याच्या जुलमाच्या निषेधार्थ कांगावा करणें, धरणें धरणें, डोकें आपटून घेणें, उपास करणें, या ना त्याप्रकारें त्याची बदनामी करण्याचा प्रयत्न करणें, तशी बदनामी करण्यास सोयीचें साधन मिळावें म्हणून त्यानें आपल्याला मारहाण करावी किंवा आपल्या बायकामाणसांवर हात टाकावा अशी मनांतून इच्छा धरणें, ही भाग्याची ढोंगी अहिंसा; (४) शत्रूला भिऊन पळ काढणारी किंवा शरण जाणारी व मागाहून खरे खोटे पुरावे करून त्याला कोर्टात खेचण्याचा प्रयत्न करणारी भ्याड अहिंसा; (५) मनांतून जळफळणारी व अभद्र चिंतिणारी परंतु केवळ बाह्यतः पारिपत्यहीन अशी दुबळी नेभळी अहिंसा; (६) "अहिंसेनें कितपत कार्यभाग होतो पाहूं या, न जुळल्यास पुढचें पाहूं" म्हणणारी प्रायोगिक अहिंसा; (७) "काँग्रेसच्या शिस्तीसाठीं" पाळलेली कष्टी अहिंसा—नकली अहिंसेचें आणखीही अनेक दाखले वाचकांना सुचतील किंवा व्यवहारांत भेटतील.

**आदर्श अहिंसाः**—आदर्श अहिंसा याहून निराळी आहे. अहिंसा म्हणजे आत्मियता किंवा प्रेम—मात्र डोळस व अनासक्त प्रेम. अहिंसा कोणाबद्दल वैर धरीत नाहीं, कोणाचें अभद्र चिंतीत नाहीं, प्रतिपक्षासुद्धां सर्वांना आपले समजते, सर्वांचें हित इच्छिते, आणि सर्वांच्या हितार्थ जगण्यांत, व मरण्यांत, धन्यता मानते. ती फक्त पापाला भिते, अन्य कशाचीच भीति धरीत नाहीं. सर्व अनिष्टांचें मूळ व तीं निवारण्याचें साधन ती स्वतःच्या ठायीं शोधते. मरण तिला माहीत नाहीं, मृत्यु म्हणजे जीवनाची नव्या जोमानें सुरवात असें तिला वाटतें. दिव्याला जसा अंधार दिसूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें तिला क्लेश व अपयश हीं कळत नाहींत, अर्थात् तिला कधीं निराशेचाही प्रसंग येत नाहीं. अहिंसा ही जगांतलि

सर्वांत मोठी जनयित्री शक्ति आहे. जगाचें धारण अहिंसेमुळेंच होत आहे. मातेला आपल्या बाळाबद्दल जें प्रेम वाटतें तेंच विश्वव्यापी झाल्यानें ही अहिंसा सिद्ध होते.

ही आदर्शभूत अहिंसा मानवी वर्तनांत सर्वस्वी उतरलेली कोठेंच आढळणार नाहीं हें खरें असलें तरी तो आपल्या प्रयत्नांची दिशा दाखविणारा ध्रुव तारा आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत आपल्याला अस्सल व नकली अहिंसांची निरनिराळ्या प्रमाणांत भेसळच आढळणार, परंतु अस्सल धातु जेवढी अधिक असेल तेवढें फळ अधिक चांगलें व लवकर मिळेल. स्वातंत्र्य प्राप्तीच्या प्रयत्नालाही हीच गोष्ट लागू आहे. आपली अहिंसा परिणामकारक व त्वरितफलदायीं व्हावी यासाठीं आपण तिच्यांतील किल्मिषें ( वरील नकली प्रकारांत दर्शविलेलीं ) काढून टाकून ती अधिकांत अधिक शुद्ध करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांसाठीं शस्त्रबलचा आश्रय न घेण्याच्या निर्धारांतून निष्पन्न होणारे कित्येक उपसिद्धांत लक्षांत घेणें आपल्याला आवश्यक आहे.

**नैतिक बळाचा आधारः**—पहिला उपसिद्धांत असा कीं आपलें यश शस्त्रबलाच्या अभावीं नैतिक बलावर अवलंबून आहे. जो बलवान् तोच यशस्वी होणार. शस्त्र-बल हें हीन दर्जाचें बल आहे व सुदैवानें आमचे-पाशीं तें नाहींही. म्हणून आपल्याला अन्य प्रकारच्या बलाची जोपासना केली पाहिजे. सत्य, न्याय, निष्ठा, त्याग, चारित्र्य, सेवा नम्रता इत्यादींपासून प्राप्त होणाऱ्या बलाचीच आपल्याला कास धरली पाहिजे. यासच नैतिक-बल किंवा आत्मबल म्हणावयाचें. प्रतिपक्षास आपल्या तरवारीचा वचक बसणार नसेल तर आपल्या सच्चेपणाची तरी त्याचेवर छाप बसली पाहिजे. कॉंग्रेसच्या उद्देशांमधील "लेजिटिमेट व पीसफुल" यांपैकीं लेजिटिमेटचें या दृष्टीनेंच अत्यंत महत्त्व आहे. 'लेजिटिमेटचें' भाषांतर 'न्याय्य' असें

करण्याची वहिवाट आहे पण शुद्ध, निर्मळ, सरळ, निष्कपट, सत्यमय, नितिमय इत्यादि शब्दांनीं मिळूनच त्या शब्दाचा आशय योग्य तऱ्हेनें व्यक्त होईल. निर्मलतेच्या अभावीं आपली शांतता ही केवळ दुर्बलता व भ्याडपणाच ठरेल. आणि दुर्बलांसाठीं हें जग नाहीं. शिवाय मलीन साधनांनीं सिद्ध होणारें स्वराज्य आम्हांला नकोही आहे.

इंग्रजांची सामाजिक दानत उच्च दर्जाची आहे. परंतु कल्पना करूं कीं व्हाईसरॉय, स्टेट सेक्रेटरी, ब्रिटिश मुख्य मंत्री व पार्लमेंटचें प्रमुख सभासद यांस लांच देऊन त्यांचेंकडून हिंदुस्थानाला स्वातंत्र्य देऊन टाकणारा कायदा पार्लमेंटांत पास करविणें शक्य होईल. पांच पंचवीस कोट रुपये खर्च करून जर अशा तऱ्हेनें स्वातंत्र्य खरीदतां आलें तर तो सौदा तोट्याचा ठरणार नाहीं. परंतु तें शक्य असलें तरी आपल्याला कर्तव्य नाहीं याविषयीं कोणाचा मतभेद होणार नाहीं.

परंतु स्वातंत्र्य अशा तऱ्हेनें एका सौद्यांत खरीदतां येतही नाहीं. त्यासाठीं आपल्याला हजारों अखाड्यांवर हजार प्रकारांनीं झटलें पाहिजे. तसें करतांना प्रतिपक्षाशीं आपली जथें जथें भेट होईल तेथें तेथें आपल्या सच्चे पणाविषयीं त्यांची खात्री पटणें अत्यंत महत्त्वाचें आहे. अशीं भेट प्रतिपक्षाशीं हरघडी पडत रहाणार. कारण हा प्रतिपक्ष केवळ गोऱ्या इंग्रजांचाच बनलेला नसून आपले लक्षावधि, कोट्यवधि, देशबांधव, व भगिनी, पोटासाठीं, चैनीसाठीं, मानासाठीं किंवा आमच्यावरील रागामुळेंही, प्रतिपक्षाला सामील झालेले आहेत. जे आज सामील नाहींत तेही उद्यां सामील होणार नाहींत असा नेम नाहीं. अशा तऱ्हेनें आपण प्रतिपक्षाकडून चारी बाजूंनीं घेरलेले आहों. "रात्रंदिन आम्हां। युद्धाचा प्रसंग" ॥ म्हणून स्वराज्य सैनिकांच्या सार्वत्रिक व्यवहारांत, त्यांच्या नित्याच्या वर्तनांतच,

त्याचा सच्चेपणा, त्याची हार्दिक कळकळ हीं प्रतिबिंबित झालीं पाहिजेत. शस्त्रयुद्धामध्येंसुद्धां निष्कपट, सरळ व्यवहाराला महत्त्व व उच्च स्थान देण्यांत येतें. पूर्वकालीं आपल्या क्षत्रियांचे व यूरोपांतील मध्य युगीन शिलेदारांचे (नाइट) धर्मयुद्धाचे नियम फार उदात्त व स्पृहणीय स्वरूपाचे असत. "यतो धर्मस्ततोजयः" हें आपल्या शास्त्रकारांचें अभिवचन आहे, तसेंच "थ्राइस आर्म्ड इज ही, हू हॅथ हिज कॉरल जस्ट" अर्थात्, सत्पक्षार्थ लढणाराला तिप्पट बळ असतें—हा पाश्चात्यांचाहीं सिद्धांत आहे. शस्त्रसंन्यासी योध्यांनीं तर धर्मयुद्धाचे नियम अधिकच कशोशीनें पाळले पाहिजेत. प्रतिपक्षाला पराभूत किंवा फजित करण्याचा त्याचा हेतु नसून वळविण्याचा किंवा सुधारण्याचाच हेतु असल्यामुळें जेणेंकरून प्रतिपक्षीयाचा द्रोह घडेल असें कांहीं त्यानें करतां कामा नये. प्रतिपक्षाबद्दल त्यानें आदराची भावना बाळगली पाहिजे. प्रतिपक्षाची त्याला आराधनाच करावयाची आहे. प्रतिपक्षीयाच्या त्याला स्वतःला अज्ञान असलेल्या उच्चतर स्वरूपाचा तो उपासक आहे, त्याउच्च स्वरूपाचा स्वतः साक्षात्कार करणें व प्रतिपक्षालाही करून देणें हा त्याचा प्रयत्न आहे.

म्हणून आपण आपल्या स्वराज्याच्या लढ्यामध्यें कपट, फसवणूक, फितुरी, लांचलुचपत हीं सर्वथा वर्ज्य मानलीं पाहिजेत. व्हाइसरॉयला फितूर करणें सुदैवानें अशक्यच आहे, परंतु आपलेच जे भाईबंद सरकारी नोकरींत आहेत त्यांना फितूर करणें अगदींच सुलभ असतें. त्यामुळें किरकोळ किंवा अनावश्यक गोष्टींसाठीं सुद्धां—केवळ दुसऱ्यांना चकविण्यांत, लपंडावाचा खेळ खेळण्यांतच, जी मौज वाटते तिजसाठीं—सरकारच्या कनिष्ठ नोकरांची चोरटी मदत घेण्याचा मोह थोर थोर व धुरंधर सत्याग्रह्यांना सुद्धां आवरत नाहीं. पोलिसचा शिपाई, तुरुंगांतील कैदी वार्डर यांसारखे तळचे नोकरच

नव्हेत तर जेलर, कलेक्टर, मॅजिस्ट्रेट यांसारखे वरिष्ठ सरकारी अधिकारी सुद्धां सत्याग्रह्यांना चोरटी मदत देण्यास उत्सुक असतात; आणि अशी मदत मिळविणें किंवा स्वीकारणें निषिद्ध आहे हें लक्षांत येण्यापूर्वींच कार्यकर्ता त्यामध्यें गुरफटूनही जातो. परंतु ही गोष्ट कितीही किरकोळ, सुलभ व सार्वत्रिक असली तरी ती फितुरीच आहे. ती मुळांतच अनुचित व आपल्याला खालीं पहाण्यास लावणारी आहे, व सत्याग्रहाच्या लढ्याला मारक आहे. फितुरीचा प्रयोग करणें म्हणजे विषबीजें पेरणें आहे. त्या बीजांचीं फळें भावी स्वराज्यांत आपल्यालाच चाखावीं लागणार आहेत. सारी जीवन गंगाच त्यामुळें कलुषित होणार आहे.

**किरकोळ गोष्टींचेंच महत्त्वः—** अहिंसक लढ्याचें हें एक वैशिष्टयच आहे कीं त्यामध्यें असामान्य, नवलपूर्ण किंवा रोमांचकारी असे प्रसंग शस्त्रयुद्धापेक्षां फारच कमी प्रमाणांत येणार. स्वतःची सर्व कर्तबगारी, सर्व नीति धैर्य, सर्व पावित्र्य असल्या विशेष प्रसंगीं दाखविण्याची, व असल्या प्रसंगांसाठीं राखून ठेवण्याची, आपली मनीषा असते. परंतु अहिंसेच्या लढ्यामध्यें या मनीषेचा विरस होण्याचाच अधिक संभव आहे. सत्याग्रहाच्या लढ्यामध्यें वीरोचित अचाट कृत्यांना विशेष अवकाश नसतो. त्यांत रक्त सांडण्याचे प्रसंग कमी, घाम सांडण्याचेच अधिक. सत्याग्रह युद्धांत उड्डाणें व भराऱ्या नाहींत, पायांनींच रस्ता कापायचा आहे, त्यांत स्फोट नाहीं, निःशब्द मंद वाढ मात्र आहे. गांधीजी म्हणतातः "वुइ शुड ग्रो इंटु स्वराज्य"—गर्भाची वाढ होतां होतां बालक जन्मास येतें किंवा अंड्यांत पिलाची वाढ होतांच तें अंडें फोडून बाहेर पडतें त्याप्रमाणें स्वराज्याचा उदय व्हावा. अहिंसेचा मार्ग हा सतत, अखंड, दीर्घ, संथ, निरलस, जागरूक उद्यमाचा मार्ग आहे. म्हणून सत्याग्रही

स्वराज्य सैनिकानें बारीक सारीक, क्षुल्लक बाबींकडे पूर्ण लक्ष पुरविणें व त्यांतच आपलें सारें कर्तृत्व व तत्त्वनिष्ठा दाखविणें आवश्यक आहे.

**सत्ता काबीज करणें?**— अहिंसेची आणखी एक स्पष्ट मर्यादा लक्षांत बाळगणें आवश्यक आहे, नाहींपेक्षां आणीबाणीच्या प्रसंगीं कार्यकर्त्यांचा तोल जाण्याचा फार संभव असतो. अहिंसेच्या मार्गानें प्रतिपक्षाकडून सत्ता हिसकून घेणें, त्याची खुषी नसतां बलात्कारानें छिनवून घेणें, हें शक्य नाहीं. अहिंसेचा मार्ग हा प्रतिपक्षाच्या हृदयस्थ दयाघन प्रभूला भक्तीनें आकळिण्याचा मार्ग आहे.

"आत्मारामा सर्वांतःस्था ! तूं अमुचा आधार।
विपक्षरूपें सत्त्व परीक्षुनि अंतीं कळवळणार। दयाळा॥"

ही अहिंसक प्रतिकाराची श्रद्धा व आशा असते. अहिंसेच्या मार्गानें आम्ही सरकारी नोकऱ्या सोडून स्वतःची व मुलांमाणसांची उपासमार करून घेऊं, करबंदी करून घरवाडीला पारखे होऊं, कायदेभंग करून तुरुंगांत खितपत पडूं, मिरवणुका काढून पोलिसांच्या लाठ्या खाऊं, गोळ्या खाऊन माशांप्रमाणें पटापट मरूं, प्राणांतिक उपोषणें करूं. या सर्व प्रकारांनीं इंग्रजांचा राज्य-कारभार अडचणीचा होईल, पदोपदीं अडथळे उत्पन्न होतील, सरकारला स्वतःचेच कायदे बाजूला ठेवावे लागतील, नवे नवे वट हुकूम काढावे लागतील, लष्करी कायदा सुद्धां पुकारावा लागेल. सरकार कावरें बावरें झालें, आपलीं सत्ता नष्ट होण्याची त्याला धास्ती वाटूं लागली, तर तें अधि-काधिक क्रूर बनेल, आमची अमानुष कत्तल करील, त्यामुळें त्याचें जगभर हंसें होईल. या सर्व गोष्टी मान्य केल्या तरी अखेरीस इंग्रजांचें हृदय द्रवल्या खेरीज आपल्याला स्वराज्य प्राप्त होण्याची आशा नाहीं. ते जर पाषाण हृदयीच असतील व रहातील तर आपल्या साऱ्या बलिदानानें आपला

स्वाभिमान शाबूत राहील, जगभर आपली वाहवा होईल, धर्मयुद्धांतील मृत्यूमुळें कदाचित् स्वर्गातील इंद्रपद मिळेल, पण इहलोकींचें वास्तविक स्वराज्य लाभणार नाहीं. त्यासाठीं स्वतः इंग्रजच प्रसन्न झाला पाहिजे.

रासायनिक संयुक्त द्रव्यांची अशी रीत असते कीं दहा निरनिराळ्या मूलद्रव्यांपासून तें संयुक्त द्रव्य बनत असेल व त्यांपैकीं नऊ मूलद्रव्यें मिळून त्या संयुक्त द्रव्याचे शेंभरात ९९॥। अंश भरत असतील तरीही त्यांच्या जोडीला त्या दहाव्या द्रव्याचा पावटक्का मिळाल्याखेरीज तें रसायन सिद्ध होऊं शकत नाहीं. त्या पावटक्क्याचे अभावीं सारे ९९॥। टक्के खोळंबून पडतात, किंवा निष्फळ जातात. तोच न्याय आपल्या स्वराज्याच्या अहिंसक मोहिमेला लागू आहे. आमच्या स्वतःच्या साऱ्या प्रयत्नांना इंग्रज 'पावेल' तरच स्वराज्यप्राप्ति होणार. आपण स्वराज्याची कितीही त्वेषानें याचना केली तरी त्याचें दान करणें न करणें हें अखेरीस त्यांच्याच हातीं रहाणार. अहिंसेनें 'सीझर ऑफ पॉवर'—सत्ता हिसकणें—शक्य नाहीं, "ट्रॅन्सफर ऑफ पॉवर"—सत्ताप्रदान—किंवा फारच तर सत्तात्याग शक्य होणार.

प्रतिपक्षी स्वखुषीनें 'पावेल' असें नव्हे, नाइलाज होईल व अगदीं कंटाळून जाईल तेव्हांच पावेल. त्याचें एक मन चरफडतच राहील, परंतु दुसरें श्रेष्ठ मन आमची मागणी व कृति न्याय्य व उचित असल्याचें मान्य करील. आमच्या सद्वर्तनानें व बलिदानानें त्याचें हें श्रेष्ठ मन जागृत व प्रभावी होईल तेव्हांच त्याचा-आमचा विजय होणार.

समजा कीं साऱ्या प्रजाजनांनीं सरकारशीं संपूर्ण असहकार करून प्रतिसरकार निर्माण केलें स्वतःची पोस्टें, कोर्टें, पोलिस, करवसुली इत्यादी खातीं उभीं केलीं, तरीही सरकार त्या शस्त्रहीन प्रतिसरकाराच्या कारभारांत प्रतिक्षणीं अडथळे आणूं शकेलच. हा विघ्नसंतोषीपणाही तें सोडून देईल

तेव्हांच क्रांति यशस्वी झाली असें म्हणतां येईल.

इंग्रज पावेल तेव्हां च आपल्याला स्वराज्य मिळणार असें म्हणून आम्ही अहिंसेच्या पदरीं निष्कारण कमीपणा बांधून घेतों असें मानण्याचें कारण नाहीं. शस्त्रयुद्धांतील विजय सुद्धां निर्बल पक्षाच्या पराभव 'कबुल' करण्यावरच अवलंबून असतो. शत्रूचा निःपात करणें व शत्रूवर विजय मिळविणें या दोन्ही गोष्टींमध्यें महत्त्वाचा भेद आहे. शत्रूचे कांहीं लोक मेल्यानंतर बाकीचे लोक जिवाच्या धास्तीनें शरण येतात तेव्हांच सशस्त्र आक्रामकाला विजय प्राप्त होत असतो. शत्रु पराभव स्वीकारण्यास अखेर-पर्यंत "नाकबूल" रहाला तर बलिष्ठांतील बलिष्ठ आक्रामकालाही विजय मिळवितां येणार नाहीं. "शत्रु कितीही बढाया मारो, परंतु त्याचेमध्यें भ्याडपणाचा थोडा तरी अंश आहेच आहे. त्यामुळें मृत्यूपेक्षां तो परतंत्र जिणेंच पसंत करील" ही सशस्त्र आक्रामकाची दृढ श्रद्धा (?) असते व शत्रूचीही भ्याड वृत्ति जागृत करण्याचाच तो कसून प्रयत्न करीत असतो. याचे उलट सत्याग्रहीची श्रद्धा असते कीं "प्रतिपक्षी कितीही दुष्ट व पाषाण हृदयी असला तरी त्याचेमध्यें न्याय, सौजन्य, दया, प्रेम इत्यादींचा थोडा तरी अंश आहेच आहे," म्हणून अहिंसेची चळवळ ही अखेरीस ईश्वराच्या भरंवशावरच चालवावी लागते. ईश्वर आहे, तो न्यायी व न्यायाची प्रेरणा देणारा आहे, तो आमच्या हृदयांत आहे तसाच इंग्रजांच्या हृदयांतही आहे आम्हांला तो न्याय व स्वाभिमान यांसाठीं झगडण्याची व आत्मबलिदान करण्याची प्रेरणा देतो; तशींच तो आत्मबलिदानार्थ लागणारें धैर्य व सहनशक्ति हीं सुद्धां पुरवील. दुसऱ्या बाजूनें तो इंग्रजांचे हृदयांतील न्यायबुद्धिही जागृत करील. आमचें बलिदानही त्या न्यायदेवतेला जागृत करणारी भूपाळी आहे.

अहिंसेनें मिळणारा विजय हा शस्त्रयुद्धांतील विजयाहून फारच भिन्न असतो. त्या विजयानें अहिंसक प्रतिकारक चढून जात नाहीं व मूळचा आक्रामक खजिलही होत नाहीं. त्या विजयानें सत्याग्रही नम्र बनतो व आक्रामक उन्नत बनतो. तो कोणत्याही एका पक्षाचा विजय नसतो तर उभयपक्षांचे अंतर्यामीं वसणाऱ्या न्यायप्रियतेचा, सत्याचा किंवा ईश्वराचा विजय असतो.

१९३० सालीं धारासनाच्या मिठागराचा 'कब्जा घेण्याचा' प्रयत्न सत्याग्रहींनीं केला. या कब्जा घेण्याचा शब्दशः अर्थ घ्यावयाचा नाहीं. आगाऊ सूचना देऊन किंवा जाहीर करून शस्त्रसज्ज सरकारकडून अशा तऱ्हेनें कब्जा मिळविणें व टिकविणें अहिंसक योद्धांना शक्यच नाहीं. अनपेक्षित हल्ला करून कब्जा घेणें तत्काळ शक्य झालें तरी तो टिकाविणें अगदींच अशक्य आहे. अर्थात् त्या कब्जा घेण्याचा अर्थ घेण्याचा प्रयत्न करणें व त्या प्रयत्नांत प्रतिपक्षाचे सर्व आघात निर्धारानें सहन करणें, पळता पाय न घेणें, एवढाच होता.

सत्याग्रहाच्या चळवळी सुरू करतांना गांधीजी अनेक प्रसंगीं म्हणाले आहेत कीं "मी ही चळवळ ईश्वराच्या भरंवशावर सुरू करीत आहें, माझ्या स्वतःच्या बळावर नव्हे" त्यांच्या म्हणण्याचा अर्थ आतां आपल्या लक्षांत येईल.

**दडपणही पाहिजेः**— परंतु ईश्वर झाला तरी कोणाला फुकटची देणगी देत नाहीं. त्याचें बजेट फार कंजूसपणाचें असतें. आपल्या खर्चाचे ८०।९० टक्के द्रव्य स्वतंत्रपणें उभारणाऱ्या संस्थेलाच तो १०।२० टक्के ग्रँट मंजूर करतो. "हिंमते मर्दा तो मददे खुदा" किंवा "नऋते श्रांतस्य सख्याय देवा":- स्वतः दमल्या भागल्या खेरीज ईश्वरी साह्य मिळत नसतें."

म्हणून इंग्रजाचे हृदयांतील न्यायदेवता किंवा स्वतंत्रतादेवी प्रसन्न होण्यासाठीं आपण प्रथम आत्मशुद्धि व बलिदान केलें पाहिजेच; परंतु तेवढ्यानें भागेल असें मात्र नाहीं. इंग्रजाकडून न्याय मिळवायचा तो केवळ युक्तिवादानें मिळणार नाहीं. आम्हांला स्वातंत्र्य मिळणें न्यायप्राप्त आहे व तें देण्यांत आमच्याप्रमाणें खुद्द इंग्रजांचें व जगाचें हितच आहे इत्यादि गोष्टी केवळ बुद्धीला पटवून देण्यानें कार्यभाग साधणार नाहीं. त्यासाठीं त्यांच्या हृदयाला जाऊन भिनेल असा कसलातरी कार्यक्रम पाहिजे.

त्यासाठीं त्याचेवर दडपण आणण्याचे, त्याच्या मार्गांत अडथळे आणण्याचे, त्याला पेचांत धरण्याचे उपायही योजावे का ? कारण मनुष्याची सद्बुद्धि जागृत होण्यास अडचणी व संकटें, पेंच इत्यादींची मदत होते हें खोटें नाहीं. आपल्याला या प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार केला पाहिजे.

**हृदय-परिवर्तन कीं दडपण ?**—हृदयपरिवर्तन करणें हाच श्रेष्ठ मार्ग आहे व दडपणामध्यें हिंसेचा अंश येतो हें खरें. तथापि व्यवहारांत निर्भेळ हृदयपरिवर्तनाचा दाखला मिळणें कांहींसें दुरापास्त आहे. प्रतिपक्षी हा मनुष्यच, म्हणजे समाजप्रिय व लोकमताच्या अनुकूलतेचा आशिक असल्यानें साध्या विनंतीमध्यें किंवा मतप्रदर्शनामध्येंसुद्धां दडपणाचा अंश येऊनच जातो. पुढील उदाहरणावरून हें नीट लक्षांत येईल.

तुरुंगांतील आमच्या एका सत्याग्रही मित्रानें सुटून जातेवेळीं तुरुंगाची एक सतरंजी विकत घेऊन जाण्याचा विचार केला. बाहेर देशभर असहकाराची व ब्रिटिश बहिष्काराची चळवळ चालू असतां त्याच चळवळींत भाग घेऊन तुरुंगांत आलेल्या एका सत्याग्रहीनें तुरुंगाचा माल खरेदी करावा हें मला कसेंसें च वाटलें म्हणून मी त्या मित्राला भेटून तसें न

करण्याबद्दल त्याचेशीं युक्तिवाद केला. परंतु त्यानें माझें म्हणणें एकदम धुडकावूनच लावलें. मी त्यावेळीं तो विषय सोडून दिला परंतु पुन्हां दोनतीन दिवसांनीं त्या मित्राकडे त्याची समजूत घालण्याचा फिरून यत्न करण्याच्या इराद्यानें गेलों. यावेळीं मी तो विषय काढला तोंच तो मित्र म्हणाला, "परंतु मी सतरंजी खरीदण्याचा विचार रद्द केला आहे."

मला या परिवर्तनाचें आश्चर्य वाटलें. परंतु मागाहून मला समजलें कीं माझ्या पहिल्या अयशस्वी प्रयत्नाची हकीकत मी दुसऱ्या एका मित्राला सांगितली होती, त्यावरून त्या दुसऱ्या मित्रानेंही त्या सुटणाऱ्या मित्राकडे जाऊन त्यास सतरंजी न घेण्याची विनंती केली होती. पहिल्याच्या युक्तिवादानें जें काम होऊं शकलें नाहीं तें दुसऱ्याच्या विनंतीनें झालें. याचें कारण तो दुसरा होता, एकाकी नव्हता. दुसरा मित्र विनंति करण्यास गेला तेव्हां त्या पहिल्या मित्राला वाटलें असावें "आणखी किती जणांशीं माझ्या बेताचा बोभाटा झाला असेल न कळे!" म्हणूनच तो विरघळला. परंतु हें केवळ मतपरिवर्तन नव्हतें, दडपणही होतें.

आपल्या सर्व सामान्य अहिंसामय कार्यांमध्यें अशा तऱ्हेचें दडपण किंवा सूक्ष्म धमकी कमी अधिक प्रमाणांत येतेच. फंडाला देणग्या मिळविण्यासाठीं एकट्यानें जाण्यापेक्षां बरेच जणांनीं मिळून गेल्यानें देणग्या अधिक घाऊक मिळूं शकतात हें सर्व फंड गोळा करणारांना माहीत असतें. पुष्कळांनीं जाण्यानें दात्याला त्या कार्याचें अगत्य व महत्त्व अधिक जाणवतें, "या फंडाला सर्व सामान्य लोक मदत करीत आहेत, मला एकट्यालाच भुर्दंड नाहीं आहे" असें आश्वासनही मिळतें व त्यामुळें स्वतः देणगी देण्यास तो अधिक उत्साहपूर्वक तयार होतो ही या पद्धतीची अहिंसक बाजू आहे, परंतु संख्या बलामध्यें सूक्ष्म दटावणीही असते. "इतक्या मंडळीला नकार

कसा द्यावा? नाखुष कसें करावें?" असा पेंचही त्या दात्याला पडतो; तसा पेंच घालण्याचा स्वयंसेवकांचा इरादा नसतोच असें तरी कोणी सांगावें?

मोठमोठ्या जाहीर सभांतून निषेधाचें ठराव करणें, अधिकाऱ्यांकडे मोर्चे घेऊन जाणें इत्यादि निदर्शनांचा हेतु दडपण आणण्याचाच असतो. निदर्शकांची तशी इच्छा नसतांही जगाच्या सामान्य रीतीवरून "हीं निदर्शनें म्हणजे भावी अत्याचारांची प्रस्तावना तर नसेल?" अशी धास्ती प्रतिपक्षाला वाटल्यानेंही निदर्शनाची दडपणशक्ति वाढते.

सारांश, आपल्या कौटुंबिक किंवा घरोब्याच्या संबंधांतही आपण दडपणाचा थोडा बहुत उपयोग करीत असतों व तेवढा अंश आपण पचवूं शकतों. कौटुंबिक व्यवहारांत किंवा मित्रामित्रांमध्यें जितपत दडपण चालतें तितकें दडपण आपल्या स्वराज्याच्या प्रयत्नांमध्येंही वापरण्यास हरकत नाहीं. कारण, आपली राजकीय अहिंसा ही आदर्श किंवा आत्यंतिक अहिंसा नसून व्यावहारिक अहिंसा च आहे. हिंसा-अहिंसेचा प्रश्न हा आत्यंतिक स्वरूपाचा—एकजात हिंसा व संपूर्ण अहिंसा यांमधील नसून अहिंसेच्या सर्वमान्य ध्येयाचे मार्गावर तुर्त केवढा टप्पा चालून जावें, याविषयींचाच असतों हें मागें आपण पाहिलेंच आहे. लोकशाही स्वराज्य म्हणजे तरी आदर्श स्वराज्य थोडेंच आहे कीं त्यासाठीं आदर्श अहिंसेचें साधन आवश्यक व्हावें? आदर्श स्वराज्य म्हणजे अ-राज्य किंवा व्यक्तिमात्राचें आत्मराज्य होय. स्वराज्याचें व अवाढव्य विस्ताराचें मुळांतच वांकडें आहे. खरीखुरी लोकशाही नांदण्यासाठीं पंचक्रोशींचीं किंवा गांवागांवांचींच स्वतंत्र (साव्हरिन्) राज्यें हवींत. आणि इतक्या उपरही लोकशाही ही स्व-शाहीपेक्षां उतरतीच असणार.

दडपण हें मनवळणीला बाधक आहे; परंतु अहिंसक लढ्यामध्यें आपली अखेरची भिस्त मनवळणीवरच असली पाहिजे. म्हणून दडपण

वापरायचें तें योग्य मर्यादेंतच वापरलें पाहिजे. ती मर्यादा ठरविण्याचें काम विशेष कौशल्याचें आहे. आपली कळकळ, सचाई व निरुपद्रवी वृत्ति हीं जसजशीं अधिकाधिक शाबीत होतील तसतशी दडपणाची मात्रा वाढवीत जाण्यास हरकत नाहीं. आईनें कान धरलेला चालतो किंवा शोभतो, पण शेजारणीनें किंवा परक्या बाईनें धरलेला शोभणार नाहीं. गांधीजी १९२१ सालापर्यंत विलायती कापडाची होळी अहिंसेच्या दृष्टीनें वर्ज्य मानीत; परंतु त्यासाठीं स्वतःच होळ्या पेटवूं लागले. ब्रिटिश मालाचा बहिष्कार हिंसामय म्हणून गांधीजी व काँग्रेस यांना निषिद्ध वाटत असे तो प्रथम १९३० सालीं मान्य झाला. बहिष्कार हा दडपण आणण्याचाच उपाय आहे. १९१८ पर्यंत ज्या गांधींनीं ब्रिटिश सरकारला युद्ध कार्यांत मदत करणें कर्तव्य मानलें व युद्ध मूलतः नापसंत असलें तरी त्याचा निषेध करण्याचा आपल्याला अधिकार नाहीं असें जे मानीत होते तेच गांधी १९४० सालीं युद्ध-निषेधक प्रचार करूं लागले. या बदलत्या धोरणाच्या मुळाशीं आमच्या मतें गांधीजींचा व राष्ट्राचा अहिंसेबाबतचा वाढता आत्मविश्वासच होता.

सारांश, स्वराज्याच्या आपल्या अहिंसक लढ्यामध्यें सरकारवर लोकमताचें दडपणच नव्हे तर राज्यकारभार जेणें करून अडचणीचा होईल असे अडथळे आणण्यासही हरकत नाहीं. अशा तऱ्हेचा सक्रिय प्रतिकार यशप्राप्तीचे दृष्टीनें इष्टही आहे. मात्र हा प्रतिकार जेवढा तीव्र तेवढी आपण आपली ब्रिटिशांविषयींची अद्रोहवृत्ति अधिक संशयातीत करण्याची खबरदारी घेतली पाहिजे. विध्वंसनासारख्या कार्यक्रमांचा विचार आपल्याला पुढील प्रकरणांत करावयाचा आहे. येथें एवढेंच सांगावयाचें आहे कीं तीव्र स्वरूपाच्या कार्यक्रमांमध्यें सत्य व अहिंसेचीं बंधनें आपण विशेषच दक्षतेनें पाळली पाहिजेत.

**अपेशी प्रयत्न कीं यशस्वी कार्य ?**—यावर कोणी म्हणेल: “परंतु उघड्या पद्धतीनें विध्वंसन कसें साधणार ? आम्ही अमुक वेळीं अमुक ठिकाणीं तारा तोडणार आहों किंवा अमुक वेळीं आम्ही इतकी मंडळी येऊन अमुक स्टेशन जाळणार आहों असें सरकारला आगाऊ कळविणें म्हणजे आम्हांला पकडायला किंवा ठोकायला सशस्त्र पार्टी धाडा असें निमंत्रण देण्याप्रमाणें च आहे. कदाचित् असल्या भयंकर गुन्ह्याचे परिणाम भोगण्याची तयारी नाहीं, तें कृत्य करण्याची खरी-खुरी इच्छाच नाहीं, याचें तें द्योतक असावें.”

“स्टेशन जाळण्यास गेल्यावर आपल्याला तेथील रखवालदारानें अडथळा केल्यास आपण त्याच्या केसासही धक्का लावणार नाहीं अशी रेल्वेच्या नोकरवर्गाची खात्री असेल, तर असला कार्यक्रम हातीं घेण्यांतच अर्थ नाहीं. कारण मग दोघे चौघे लाठीबंद शिपाई किंवा पोर्टरही आमच्या टोळीचा समाचार घेण्यास पुरेसे आहेत. अशानें स्टेशनला कसलाच धोका येणार नाहीं व आम्ही मात्र मार खाऊं किंवा गिरफ्तार होऊं. स्टेशन जाळण्याचा खरोखर हेतु असेल तर गुप्तता व धमकी यांचा उपयोग केलाच पाहिजे.”

हा आक्षेप अगदीं यथार्थ आहे. अहिंसेची विध्वंसन-शक्ति फार मर्यादित असणें स्वाभाविकच आहे. तसेंच सत्य-अहिंसेच्या मार्गानें फांशीवर चढणें किंवा जन्मठेप शिक्षा मिळविणेंही दुष्करच आहे. शौर्याचें प्रदर्शन करण्यास अहिंसेच्या मार्गामध्यें तितकासा वाव नाहीं. साहसाला त्यांत कमी जागा आहे. अहिंसक वीराला स्वतःचें शौर्य व साहस बऱ्याच अंशीं स्वतःचे ठिकाणीं जिरवून घ्यावें लागतें. सशस्त्र क्रांतिकारकासारखा नजरेंत भरणारा त्याग अहिंसक सैन्याला क्वचित् प्रसंगीच दाखवितां येईल. तो उठल्या

सुटल्या मृत्यूला कवटाळूं शकत नाहीं, पाठलाग करून गांठूं शकत नाहीं. अहिंसा तंत्रामध्यें आत्महत्त्येला स्थान असलेंच तर अपवादात्मक राहील. मृत्यु आपण होऊन त्याला गांठील तेव्हां त्याचें सानंद स्वागत करणें एवढेंच अहिंसक सैनिकाला करतां येईल. अहिंसेची ही मर्यादा आहे, परंतु त्यांतच अहिंसेची शक्तिही आहे. अहिंसेमध्यें त्यागाला स्थान आहे, त्यागाची आवश्यकता आहे; परंतु तो संथ त्याग आहे. योजकता, परिश्रम व धीरही अहिंसेचीं त्यागाइतकींच किंवा अधिक महत्त्वाचीं लक्षणें आहेत व तीं क्रांति घडवून आणण्यास समर्थ आहेत.

शिवाय अहिंसा मार्गाची ही खुबी आहे कीं त्या मार्गानें केलेला अपेशी प्रयत्नही हिंसा-कपट वापरून केलेल्या यशस्वी कार्यापेक्षां किती तरी पटींनीं अधिक परिणामकारक असतो.

उदाहरणार्थ, १८७० च्या सुमारास मिठाच्या पैदाशीची मक्तेदारी सरकारनें स्वतःकडे घेतल्यापासून सरकारी मिठागरांतून मिठाच्या भुरट्या चोऱ्या सतत होत आलेल्या आहेत. पहारेकऱ्यांना लांच देऊन किंवा त्यांची नजर चुकवून रात्रीचेवेळीं मिठागरांतून मीठ पळविणें व तें बाहेर विकणें हा कित्येक लोकांचा धंदा बनला असून त्यावर त्यांनीं इस्टेटी कमाविल्या आहेत. परंतु या चोरट्या भुरट्या हल्ल्यांनीं मिठाच्या कायद्याला यत्किंचित्‌ही धक्का बसलेला नाहीं व ब्रिटिश सत्तेला त्याहूनही नाहीं. परंतु १९३० सालीं साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमांतील म्हाताऱ्यानें दोनशें मैल काठी टेकीत चालत जाऊन दांडी मुक्कामीं खाडी कांठच्या चिखलांतून चिमटीभर मीठ उचललें तेव्हां "यानें सरकारचें काय वाकडें झालें?" अशी वरकरणी बेपर्वाई सरकारपक्षीय वर्तमानपत्रांनीं दाखविली, तथापि त्यांनीं अंतर्यामीं ओळखलें होतें कीं ती मिठाची चिमटी नसून साम्राज्यशाहीच्या

काळजाला घेतलेला चिमटा आहे! १९३० सालीं सत्याग्रही मिरवणुका काढून जयघोष करीत मिठाचा कायदा मोडण्यास जात. त्यामुळें मिठाची प्राप्ति अत्यल्पच झाली; परंतु सरकारच्या दराऱ्याला अगणित हानि पोचली व लोक-शक्तीची प्रचंड संघटना झाली. रात्रीच्या अंधारांत चार दोन मिठागरें उध्वस्त केल्यानें यापैकीं कांहींच साधलें नसतें.

**उघडा कार्यक्रमः—**उघडया निधड्या कार्याचा मुख्य फायदा हाच असतो कीं त्यामुळें प्रचार होतो, कार्यकर्त्यांचा आत्मप्रत्यय वाढतो; व जगाच्या दृष्टीनें त्या कार्याची नैतिक प्रतिष्ठा वाढते. चोरटेपणामुळें ही नैतिक प्रतिष्ठा नष्ट होते. शस्त्रांनीं लढणारांस सुद्धां आपल्या बाजूचें नैतिक समर्थन जगापुढें करण्याचें फार महत्त्व वाटतें, मग अहिंसेच्या लढ्याचा तर प्रश्नच नाहीं. अहिंसक योद्ध्याच्या मनामध्यें अंगीकृत कार्याच्या पावित्र्यतेबद्दल यत्किंचित्‌ही धाकधुक वाटत असेल, त्याचेंच मन त्याला खात असेल, तर तो इतरांना उत्साहित कसा करूं शकणार? "पाप प्रकाशाला भितें," यावरून "अंधारांत केलेलें ते सर्व पापच" असें अनुमान निघत नसलें तरी तसा संभव उत्पन्न होतो. सार्वजानिक कार्यामध्यें हा धोका लक्षांत घेणें आवश्यक आहे.

'उघड कीं गुप्त' हा प्रश्न केवळ सरकारकडे पाहून ठरवायचा नसून आपल्याच लोकांकडे, म्हणजे ज्या बहुजनसमाजाला आपण उठवूं इच्छितों त्याचेकडे पाहून, गुप्तपणाची लोकांवर व स्वतः कार्यकर्त्यांवर प्रतिक्रिया काय होईल त्याचा विचार करून, ठरविला पाहिजे. उघड्या पद्धतीसाठीं आपण सरकारला बांधलेले आहों असें जरी नसलें तरी लोकांच्या तयारीच्या दृष्टीनेंच उघड्या व निधड्या कारभाराची फार आवश्यकता आहे.

गुप्तकटवाल्या सशस्त्र क्रांतिकारकांनासुद्धां सत्यवचन व निधडेपणा

यांचें मोल कळत असतें. कांहीं वर्षांपूर्वीं एका भावनाशील तरुणानें सरकाऱ्या निर्दय दडपशाहीचें पारिपत्य म्हणून एका प्रमुख अधिकाऱ्यावर गोळया झाडल्या. मॅजिस्ट्रेटपुढें त्यानें आपल्या कृत्याची अभिमानपूर्वक कबुली दिली, परंतु पुढें सेशन कोर्टामध्यें उलट "त्या अधिकाऱ्यावर गोळया झाडूं पहाणाऱ्या खऱ्या गुन्हेगाराचे हातून मी पिस्तुलें हिसकून घेतलीं. खरा गुन्हेगार निसटला व अधिकाऱ्याला वांचविणारा मी पिस्तुलांनिशीं सांपडून नाहक आरोपी झालों." अशी कैफियत दिली. या कैफियतीबद्दल इतर क्रांतिकारकांना त्यावेळीं तीव्र नापसंती वाटली. त्यांच्या मार्गाच्या दृष्टीनेंही ती उचितच होती. रोखठोक कबुलीमुळें त्यांच्या मार्गाचें नैतिक बळ वाढलें असतें. आरोपीनें मुळींच मौन पाळणें हा मध्यम मार्ग झाला असतां पण वरकरणीं कां होईना परंतु स्वतःच्या कृत्याचा स्वतःच निषेध केल्यानें पक्षाची हानि झाली. अशा चलाखीनें विशिष्ट लढाई जिंकणें कदाचित् शक्य असेल पण युद्धांतील पराभव मात्र अटल आहे.

**गुप्ततेचे सोबती अधिकच मारकः**— सत्याग्रहाच्या लढ्यामध्यें उघड प्रतिकारालाच किंमत असते; गुप्त यशस्वी प्रतिकाराला—'प्रतिकाराला' म्हणण्यापेक्षां 'अपकाराला' म्हणणेंच अधिक शोभेल !——कांहींच किंमत नसते. आपण केलेल्या प्रतिकाराची सरकारनें दखलगिरी घ्यावी याची तर आपल्याला चिंता लागून राहिलेली असते. सरकारला आमचा विरोध जाणविणें, किंबहुना सरकारला डिवचणें हाच जेथें हेतु असतो तेथें गुप्तपणा काय कामाचा ? उलट आमच्या कायदेभंगाकडे किंवा अन्य कार्यक्रमांकडे डोळेझांक करणेंच विशिष्ट मर्यादेपर्यंत सरकारला सोयीचें वाटण्याचा संभव आहे. १९३० सालीं मीठ सत्याग्रहाच्या सुरवातीला सरकारनें तसें केलेंही. अर्थात् अशा प्रसंगीं आपले कार्यक्रम शक्य तितक्या

उघडपणानें--किंबहुना गाजावाजानिशीं--करणें, आपल्या कार्यक्रमांची अधिकाऱ्यांना आगाऊ नोटीस देणें, फायद्याचेंच असते.

आपण जे जें कांहीं करतों, किंवा करण्याचे योजतों त्याची आगाऊ किंवा मागाहून पोलिसांना खबर देण्याबद्दल आपण सरकारला बांधलेले आहों असें मुळींच नाहीं. गुप्तता मुळांत निंद्य आहे असें नव्हे, परंतु आपल्याला लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठीं व लोकांच्या वतीनेंच जें कार्य करावयाचें आहे तें लोकांना विश्वासांत घेऊन व त्यांच्या माहितीनिशीं केलें जाणें क्रमप्राप्त आहे. शिवाय गुप्तपणांतून लपंडाव, खोडसाळपणा, व फितुरी इत्यादि एकाहून एक अनिष्ट प्रकार उद्भवतात ते सत्याग्रहाच्या लढ्याला बाधक आहेत. एकादें काम खासगी तऱ्हेनें करणें, बिनबोभाट करणें, गुपचुप करणें--येथपर्यंत चालण्याजोगें असलें तरी केलेलें लपविणें, त्यासाठीं खोटें बोलणें, नांव बदलणें, वेष पालटणें, कोर्टापुढें नाकबूल होणें, खोटें पुरावे करणें, तसेंच सरकारी नोकरांची गुप्त म्हणजे फितुरीची मदद स्वीकारणें व मिळविणें इत्यादि प्रकार शस्त्रसंग्रामांत खपले--तेथेंही ते गौणच मानले जातात--तरी सत्याग्रहाचीं मुळेंच उखडून टाकणारे आहेत. नांव बदलणें म्हणजे बोलून चालून असत्य भाषण आहे. वेष बदलणें म्हणजे तोंडानें खोटें बोलणें नसलें तरी कृतीनें किंवा हावभावांनीं खोटें बोलण्यासारखेंच आहे. असल्या कृत्यांनीं कार्यकर्त्याचा आत्मादरच खचतो व त्याची प्रतिक्रिया म्हणून लोकांची धमकही खचते.

सत्याग्रहाचा अवतारच दुटप्पीपणाला—आंत एक बाहेर एक, एकाशीं एक दुसऱ्याशीं दुसरें, मनांतून शिव्याशाप व बाहेरून मुजरा, या प्रकारांना--आळा घालण्यासाठीं आहे. गुप्तपणामुळें नेमका त्याच प्रवृत्तींना जोर मिळतो. गुप्त राजद्रोह व उघड राजनिष्ठा यांचें अगोदरच आपल्याकडे

मनस्वी पीक आलेलें आहे. या दुटप्पीपणामुळेंच आपलें पारतंत्र्य दृढमूल झालें आहे. परदेशी पोशाख करणाऱ्या एका मित्रांनीं एकदां मला सांगितलें, "परंतु आंतील माझें हृदय पूर्ण स्वदेशी आहे." मी त्यांना म्हटलें "त्याऐवजीं तुम्ही पोशाख शुभ्र खादीचा करा, मग आंतील तुमचें हृदय अस्सल विलायती राहिलें तरी मला चालेल." झाडाची पारख त्याच्या फळांवरून करायची असते. लॉर्ड विलिंग्डन मुंबईचे गव्हर्नर असतांना एकदां म्हणाले होते कीं "हिंदी लोकांमध्यें 'नाहीं' म्हणण्याचें धैर्य नाहीं." असहकार व सत्याग्रह हे राष्ट्राला 'नाहीं' म्हणण्यास शिकविणारें धडेच आहेत. म्हणून उघडेपणांतच, त्यांची सारी शक्ति आहे.

म्हणूनच अहिंसक क्रांतिशास्त्राचे प्रणेते गांधीजी गुप्ततेचा वारंवार स्पष्ट निषेध करीत आले आहेत. ८।५।१९३३ रोजीं येरवडा तुरुंगांतून सुटका होतांच गांधीजी त्या वेळच्या सत्याग्रहाच्या चळवळीला आलेल्या मंदीविषयीं म्हणाले होतेः—"या खेपेस सत्याग्रहामध्यें लोक फार मोठ्या संख्येनें सामील झाले. त्यांच्या शौर्याची व त्यागाची स्तुति करावी तेवढी थोडी; परंतु एवढें बोलल्यानंतर मला त्याचबरोबर हेंही सांगितलें पाहिजे कीं चळवळीमध्यें जी गुप्तता आली आहे ती यशाला मारक आहे, म्हणून जर ही चळवळ पुढें चालवायची असेल तर देशाच्या निरनिराळ्या भागांत जे या चळवळीचें मार्गदर्शन करीत आहेत त्यांस गुप्ततेला अजीबात फांटा देण्याबद्दल माझें आग्रहाचें सांगणें आहे. त्यामुळें एकही सत्याग्रही मिळणें अशक्य होणार असेल तरी त्याची मला पर्वा नाहीं. सामान्य जनता भीतीनें पछाडलेली आहे याबद्दल शंकाच नाहीं. वटहुकुमांनीं जनतेला नरम आणलें आहे, आणि मला असेंही वाटतें कीं गुप्त कार्यपद्धतिही त्याबद्दल बऱ्याच अंशीं जबाबदार आहे."

पुन्हां २७।७।३३ रोजीं वैयक्तिक स्वरूपांत सत्याग्रह पुन्हां चालू करण्याच्या तर्फेचीं कारणें देतांना गांधीजी गुप्त कार्यपद्धतीविषयीं लिहितातः— "त्यांत मुळांत कांहीं दोष आहे असें नव्हे. सरकारच्या दडपशाहीमुळें उद्भवलेल्या परिस्थितीवर तोड म्हणूनच गुप्तता अवलंबिण्यांत आली. गुप्त मार्गांनीं लढा चालविणारांच्या सद्धेतूंबद्दल व चातुर्याबद्दल मला शंका नाहीं. परंतु गुप्तता सत्याग्रहाला मारक व त्यांची प्रगति अटकावणारी आहे. सध्यां जनतेची जी उमेद खचली आहे त्यालाही गुप्तता पुष्कळ अंशानें कारणीभूत झाली आहे यांत संशय नाहीं. कॉंग्रेसला लोकांच्या नजरेसमोर जीवती जागती ठेवण्यास ज्या गोष्टींचा सध्यां उपयोग होतोसें वाटतें त्यापैकीं कित्येक गोष्टी गुप्तता वर्ज्य केल्यास बंद पडतील हें मला समजतें. परंतु गुप्तताही सत्याग्रहाच्या सिद्धांताशीं विसंगत व त्याच्या परिणामकारकतेला बाधक असल्यामुळें तिचा लोप झाल्यानें होणारा फायदा हा वरील कार्यक्रमांपासून होणाऱ्या संशयित फायद्याहून अधिक भरेल." *

८।८।४२ रोजीं ऑ. इं. कॉं. क. पुढील शेवटच्या भाषणांत गांधीजी म्हणाले होतेः—"गुप्तता हें पाप आहे. माझ्याच देशांत मी चोरटेपणानें कां वागावें ?" आणखीही ते म्हणाले होतेः—"कित्येक बडे सरकारी व लष्करी अधिकारी जवाहरलाल व मौलाना आझाद यांस भेटून सांगत आहेत कीं "आम्ही तुमच्या इशाऱ्याची वाट पहात आहों. तुमचेकडून इशारा मिळतांच आमचे राजिनामे तयार आहेत." परंतु मी त्यांना सांगूं इच्छितों कीं राजिनाम्यांची तुर्त जरूरी नाहीं. परंतु तुम्ही फक्त सरकारला लिहून कळवावें कीं कॉंग्रेसची (क्विट इंडिया) मागणी आम्हांला योग्य वाटते." °

* वरील दोन्ही अवतरणें रिचर्ड ग्रेगच्या "पॉवर ऑफ नॉन्व्हायोलन्स्" पुस्तकाच्या पान ३३६ वरून घेतलीं आहेत.

° हीं दोन्ही अवतरणें स्मरणांतून दिलीं आहेत.

परंतु अंमलदारांनीं पत्र लिहिण्याचा भोळेपणा न करतां चळवळीला "आंतून मदत" करणेंच पसंत केलें. चळवळ मारण्याचा याहून अधिक परिणामकारक उपाय आणखी कोणता असणार ?

पुन्हां आगाखान प्रासादांतून आजारानिमित्त मुक्तता झाल्यानंतर एका कार्यकर्त्याला लिहिलेल्या खासगी पत्रांत गांधीजींनीं लिहिले, "माझ्या मतें गुप्तता हें पाप आहे व हिंसेचें दर्शक आहे. गुप्तता वर्ज्य करण्याची खास आवश्यकता आहे. कोट्यावधि मूक जनतेचें स्वातंत्र्य आपल्यास पाहिजे असेल तर विशेषच अर्थात् सर्व प्रकारचें अंडर ग्राउंड—भुईखालचें—कार्य निषिद्ध आहे."

असो. येथवर अहिंसा स्वीकारांतून उद्भवणाऱ्या कित्येक निर्बंधांचें विवेचन केलें. आतां आणखी एका मुद्याचा उल्लेख करून हें प्रकरण संपवूं.

**देह-मन-वाणींत अहिंसाः**—अहिंसेच्या मार्गानेंच ध्येय गांठण्याचा निर्धार झाला कीं मग आपण आपली अहिंसा पक्की करण्याच्या प्रयत्नाला लागणें आवश्यक आहे. अहिंसा ही नैतिक शक्ति आहे, ती जड वस्तु नव्हे. नैतिक शक्तींचे व्यापार जडपदार्थाप्रमाणें होत नाहींत. कपभर चहांत दोन चमचे साखर घातली म्हणजे चहाला योग्य गोडी येते, मग ती साखर उसनी आणलेली असो किंवा चोरून आणलेली असो. तसें स्थूल मेजमाप अहिंसेला लावतां येणार नाहीं.

अहिंसा परिणामकारक होण्यासाठीं ती निखालस पाहिजे, म्हणजे मनापासूनची पाहिजे. माणसाची लायकी, कुलीनता किंवा थोरवी त्याच्या विशिष्ट कृत्यांवरून ठरते असें नाहीं;—दुसऱ्या कोणी हुबेहुब तसलीच कृत्यें केलीं तर तोही थोर ठरेल असें नाहीं—तर ती त्याच्या एकंदर वर्तनावरून, त्याच्या चर्येवरून, नजरेवरून, बोलण्याचालण्यावरून; बसण्यावरून

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत-
अनुक्रमांक ........ वि........
क्रमांक ........ ता. दि.

जेवणाखाणावरून, अनेक क्षुल्लक हालचालींवरून ओळखतां येते. त्याचप्रमाणें अहिंसा दुसऱ्याला न मारण्यानेंच सिद्ध होते असें नाहीं. दमावणें, धमकावणें मोठ्यामोठ्यानें बोलणें, डोळें वटारणें, भुंवया चढविणें, कपाळाला आंठ्या घालणें, तोंड फिरविणें हे सुद्धां हिंसेचेच प्रकार आहेत. दुसऱ्याकडून संतोषानें किंवा प्रसन्नतेनें नव्हे, तर त्याच्या अडचणीचा फायदा घेऊन त्याचें कडून काम करून घेणें ही हिंसाच आहे. दुसऱ्याची नालस्ती करणें, अपमान करणें, त्याला शिव्या देणें, तोडून बोलणें ही तर त्याला ठोकण्यापेक्षांही अधिक तीव्र प्रकारची हिंसा आहे. तरवारीची जखम कांहीं आठवड्यांत बरी होईल परंतु जिभेनें केलेली जखम जन्मभर पुरेल. "देवीं वाच मजनयंत देवाः"— वाणी ही देवांनीं निर्मिलेली देवी, म्हणजे लोकोत्तर शक्ति आहे. जशी वाणीनें तशीच मनानेंही हिंसा घडते. वैर, शाप, दुसऱ्याचें अनिष्ट चिंतिणें किंवा अनिष्ट झाल्यास आनंद मानणें हे हिंसेचेच प्रकार आहेत.

कृति अहिंसक व्हायला पाहिजे असेल तर मति सुद्धां तशीच पाहिजे. मति म्हणजे कृतीची गर्भावस्था, किंवा कृतीचें बीज. मति हें फूल, तर कृति हें फळ, कृति म्हणजे मतीचेंच विशदीकरण. "वुइ थिंक वुइथ् अवर बॉडीज् ॲज वेल ॲज वुइथ अवर माइंड्स्"—मनुष्य मनानें विचार करतो तसाच हातापायांनींही करतो. कृति म्हणजे हातानें केलेला विचार. विचारामध्यें सुद्धां बाह्यकृत्यासारखीच स्नायु व ज्ञानतंतु यांची आंतल्या आंत सूक्ष्म हालचाल घडत असते. "विचार अनेकदां घोळला कीं त्याचीच कृति बनते, कृतींतून संवय बनते, संवयींचेंच चारित्र्य बनतें व चारित्र्यांतूनच जीवनाचें यशापयश ठरत असतें."

आपल्या अहिंसेची शक्ति पुरी लागू होण्यासाठीं प्रतिपक्षाची आमच्या निरुपद्रवीपणाविषयीं बालंबाल खात्री होणें इष्ट आहे. "हिंदुस्थानांत प्रत्येक

इंग्रजाचें जीवित सुरक्षित आहे" अशी जेव्हां इंग्रजाची खात्री पटेल तेंव्हां आमच्या प्रतिकाराची, निषेधाची किंवा आत्मक्लेशाची मात्रा अधिकांत अधिक परिणामकारक होईल. बऱ्याचशा अहिंसेबरोबर थोडीशी हिंसा किंवा बाह्य कृतीच्या अहिंसेबरोबर वृत्तीची हिंसा मिसळलेली असेल तर अहिंसेची शक्ति बऱ्याच अंशानें वायां जाईल. "तुका म्हणे तेथें । पाहिजे जातीचें ॥ येरां गबाळांचें । काम नाहीं" ॥

जो अंतर्बाह्य प्रेममय किंवा अहिंसामय बनला त्याचे विषयीं पातंजलयोग सूत्रांमध्यें सांगितलें आहे कीं "अहिंसा प्रतिष्ठायां तत्सन्निधौ वैरत्यागः"।— अहिंसा परिपूर्ण बाणली असतां तिच्या आसमंतात् वैरें शमतात.

## —: अहिंसेचा कार्यक्रम :—

येथवर अहिंसेची श्रेष्ठता, उपयुक्तता व अहिंसेच्या स्वीकारामागोमाग उद्भवणारीं कांहीं बंधनें यांचा विचार झाला. आतां स्वराज्य प्राप्तीसाठीं करावयाच्या प्रयत्नांतील निरनिराळ्या कार्यक्रमांचा विचार करूं या. अहिंसा निष्क्रिय असून कामाची नाहीं, तिच्यामध्यें अविश्रांत उद्योगिता, कल्पकता व योजकता असली पाहिजे हें पूर्वीं सांगितलेंच आहे.

आपल्या कार्यक्रमाचे चार मुख्य विभाग कल्पितां येतील. प्रचार, सेवा, प्रतिकार व संघटना.

**प्रचारः**— सत्याग्रह किंवा 'डायरेक्ट ॲक्शन' हें सध्यां आपल्या अहिंसक युद्धाचें प्रमुख अंग होऊन राहिलें असलें तरी जुन्या पद्धतीच्या सनदशीर चळवळीलाही आपण आपल्या शस्त्रागारामध्यें आवश्यक स्थान राखून ठेवलें पाहिजे. नुसती सनदशीर चळवळ ही दुबळी व उपहासपात्र आहे हें खरें, परंतु तिला विधायक कार्याची जोड मिळेल व सत्याग्रहाचें पाठबळ असेल तर मात्र समजूत घालणें, वाटाघाटी करणें, लोकमताला चालना देणें इत्यादि गोष्टी शोभून दिसतात एवढेंच नव्हे तर सत्याग्रहालाही त्यांचे मुळें शोभा येते. सत्याग्रह म्हणजे "घे मुरी घाल उरीं" नव्हे. आत्मशुद्धि व प्रतिपक्षाची समजूत. या गोष्टी केल्यानंतरच सत्याग्रहाचें पाऊल टाकावयाचें असतें.

हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य सत्य व न्याय यांस सर्वस्वी धरून आहे. त्यापासून हिंदुस्थान, इंग्लंड व जग यांचें कल्याणच होणार असून अकल्याण कोणाचेंच होणार नाहीं. सत्य स्वयं-प्रेरक व स्वयं-आकर्षक आहे. आम्हांला

हिंदुस्थानचें स्वराज्य आकर्षितें तें केवळ तें आमच्या स्वार्थाला पोषक आहे म्हणूनच का ? त्याचें आकर्षण जर स्वार्थ निरपेक्ष असेल तर जसें तें आम्हांला आकर्षितें व प्रेरणा देतें तसेंच तें इंग्रजांनाही कां पटणार नाहीं ? आपण पटवून देण्याचा प्रयत्न कुशलतापूर्वक केला पाहिजे. स्वराज्याच्या शाश्वत मागणीखेरीजही आपले तात्कालिक कार्यक्रम व मागण्या, सरकारकडून होणारे अन्याय व जुलूम इत्यादींचें यथार्थ स्वरूपही आपण येथील अधिकाऱ्यांना त्याचप्रमाणें त्यांचे वरिष्ठ जे इंग्लंडांतील नागरिक त्यांना समजाऊन देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सध्यांच्या काळीं जागतिक लोकमतालाही फार महत्त्व आलेलें आहे व ब्रिटिशांनाही आपल्या साम्राज्यशाहीचें जगापुढें व विशेषतः अमेरिकेसारख्या आश्रयदात्या दोस्तांपुढें समर्थन करणें आवश्यक वाटतें. सरकार आपल्या बाजूनें प्रचार करतें त्याचप्रमाणें आपण सुद्धां आपल्या मागण्या व आपले कार्यक्रम यांस त्या त्या देशांतील लोकमताची अनुकूलता मिळविणें इष्ट आहे. हें कार्य वर्तमान-पत्रें, व्याख्यानें, पत्रकें, पुस्तकें इत्यादींच्या द्वारा करतां येईल.

मात्र हें कार्य आपल्यापैकीं थोडक्या इसमांनाच करतां येण्यासारखें आहे. आपल्या एकंदर कार्यक्रमामध्यें या कामाला आवश्यक असलें तरी मर्यादित स्थानच रहाणार हेंही ध्यानांत बाळगणें जरूर आहे. त्याहूनही विशेष महत्त्वाचा मुद्दा असा कीं या साऱ्या गोष्टी परकीयांपेक्षांही आपल्याच चाळीस कोटी देशबांधवांना नीट समजावून देण्याची अधिक आवश्यकता आहे. हिंदुस्थानाची ओळख, हिंदुस्थानाचें राज्य सध्यां कसें चालतें, इतर देशांत काय स्थिति आहे, स्वराज्य म्हणजे काय, त्याची आवश्यकता कशी आहे, तें संपादिण्याचे मार्ग कोणते इत्यादि गोष्टी आपल्या समाजाच्या खालच्या थरापर्यंत सुबोध रीतीनें समजावून दिल्याखेरीज आपल्या अहिंसक

प्रतिकाराच्या व इतर विधायक कार्यक्रमांना जो सार्वत्रिक पाठिंबा मिळणें आवश्यक आहे तो मिळणार नाहीं. सशस्त्र-बंडवाल्यांना लोकशिक्षणाची विशेष आवश्यकता नसेल पण आपल्या अहिंसक लढ्याची सारी भिस्तच बहुजन-समाजाच्या सार्वत्रिक पाठिंब्यावर आहे. आपलें स्वराज्य हें बहुजनसमाजाचें स्वराज्य होणार आहे. अर्थात् तें मिळविण्याचें कार्यही बहुजनसमाजानेंच करायला पाहिजे आहे. जो मिळवील तोच भोगील. बहुजनसमाजाच्या हितार्थच आपण अहिंसेचा स्वीकार केला. अर्थात् अहिंसक लढा चालविण्याची जबाबदारीही आपण बहुजनसमाजाच्या माथीं चढविली पाहिजे. आम्ही मूठभर सुशिक्षित लोक स्वपराक्रमानें स्वराज्य मिळवूं व त्याची देणगी बहुजनसमाजाला देऊं, ही प्रौढी आपण सोडून दिली पाहिजे. आपल्या कोट्यवधि अडाणी, दरिद्री, हीन-दीन बांधवांना व भगिनींनाच आपल्याला शरण गेलें पाहिजे. त्यांच्या मंजुरीनें व त्यांच्या बळावरच आपण आपल्या मोहिमा उठवावयाच्या आहेत. अर्थात् त्यासाठीं अद्यापि राजकीय शिक्षणाचें काम मोठ्या प्रमाणावर व्हावयास पाहिजे आहे.

कविवर्य रविंद्रनाथ ठाकूर यांनीं लिहिलें आहे* "इंग्लंडचें हृदय जिंकून घेण्याचे आपण प्रथम पासून प्रयत्न चालविले, तितकेच प्रयत्न जर स्वजनांचें हृदय जिंकण्यासाठीं केले तर ? इंग्लंडचें हृदय जिंकण्यापेक्षां आपल्या स्वदेशाचेंच हृदय जिंकणें हीच गोष्ट अधिक मोलाची व महत्त्वाची आहे.

"सर्व जनतेच्या हृदयाचें ऐक्य करणें हें राजकीय आकांक्षांचें अंतिम ध्येय आहे. परकीयांचें हृदय जिंकून घेण्यासाठीं केलेल्या खटपटींना राजकारण नांव देणें असला प्रकार या आपल्या दुर्दैवी व अभागी देशांतच

---

*"स्वदेशी समाज" अनुवादक—साने गुरुजी. प्र. प्रकाशमाला.

फक्त पहावयास मिळेल! स्वजनांचें हृदय जिंकणें हें पहिलें कर्तव्य आहे. तें खरें राजकारण."

**सेवा अर्थात् विधायक कार्यक्रमः**–रवींद्रनाथ "हृदय जिंकण्यास" सांगत आहेत. स्वजनांची बुद्धि प्रगल्भ करून भागणार नाहीं, तर त्यांचीं हृदयें जिंकलीं पाहिजेत. हृदयें जिंकण्याच्या प्रयत्नाचेंच नांव विधायक कार्यक्रम.

शिक्षण व प्रचार ही आपल्या युद्धाची पिछाडी आहे व प्रतिकार ही आघाडी आहे, परंतु विधायक कार्यक्रम हा आपल्या खऱ्या प्रयत्नांचा गाभा आहे; किंवा प्रतिकार हें आपल्या भाल्याचें पातें आहे, प्रचार ही मूठ आहे परंतु विधायक कार्यक्रम ही काठी आहे. विधायक कार्य एकाग्रतेनें व भरीवपणें केल्यास कदाचित् प्रतिकाराची जरूरी न पडतांही स्वराज्य मिळूं शकेल. विधायक कार्य म्हणजे स्वराज्याची लायकी मिळविणें. लायकी अंगीं आल्यानंतर त्या लायकीचें बक्षिस आपल्याकडे आपणच चालून येईल. विधायक कार्य हें भांडवल आहे, प्रतिकार हा त्या भांडवलावर केलेला व्यापार आहे.

आत्मपरीक्षण व आत्मशुद्धि हा विधायक कार्याचा प्रेरक हेतु आहे. आपलें स्वराज्य गेलें तें परक्यांच्या दुष्टपणामुळें नव्हे, तर आपल्यांतील दोषांमुळें गेलें. ते दोष दूर झाल्याखेरीज तें परत मिळणार नाहीं, मिळालें तरी टिकणार नाहीं. मिळूं नये हेंही योग्यच आहे. जो दुसऱ्याकडून न्याय मागतो त्यानें स्वतः इतरांवर अन्याय करतां कामा नये व केलेल्या अन्यायांचें परिमार्जन केलें पाहिजे. इंग्रजांच्या लाथा खाणें आपल्याला झोंबतें तर आपण इतरांस लाथा मारण्याचें बंद केलें पाहिजे. दक्षिण आफ्रिकेंतील गोरे वसाहतवाले तेथील हिंदी लोकांना अस्पृश्यांप्रमाणें वागवितात याची आपल्याला चीड येते व त्या अपमानाच्या निवारणासाठींही हिंदुस्थानाला

स्वराज्य मिळविण्याचा आपला दृढनिश्चय दृढतर बनतो, हें योग्यच आहे. पण त्यापूर्वी आपणच आपल्या हरिजन बांधवांना किती अपमानानें वागवितों याचा आपण विचार करून त्या पापाचें क्षालन केलें पाहिजे. गोऱ्या लोकांच्या वर्णद्वेषाविरुद्ध झगडणाऱ्या आम्हांला स्वतःच धर्माच्या नांवाखालीं वर्णद्वेष चालविणें शोभत नाहीं.

सामाजिक समता म्हणजे अस्पृश्यता-निवारणाचीच परिपूर्णता होय. सामाजिक विषमता किंवा उच्चनीचता हा अस्पृश्यतेचाच प्रकार आहे; किंवा अस्पृश्यता हें सामाजिक विषमतेचेंच आत्यंतिक स्वरूप आहे. आमची मागणी संपूर्ण स्वातंत्र्याची आहे, त्याचप्रमाणें आपली करणीही पूर्ण सामाजिक समतेची असली पाहिजे.

स्वराज्याचा प्रयत्न हा तरी माणुसकीच्या वाढीचाच प्रयत्न आहे. स्वराज्यामुळें आमचें सुख वाढेल कीं उलट जबाबदारी व चिंताच वाढेल तें सांगणें कठिण आहे. परंतु आपली माणुसकी वाढेल, आत्मविश्वास वाढेल, धमक वाढेल, हाच स्वराज्याचा मुख्य फायदा. स्वराज्य पुरुषार्थासाठीं आवश्यक आहे. परंतु तोच पुरुषार्थ सामाजिक समतेनेंही साधतो. जन्मसिद्ध उच्चतेची प्रौढी व जन्मसिद्ध नीचतेचा हीनगंड हीं पुरुषार्थाला सारखींच विघातक आहेत.

समाजोपयोगी धंद्यांची उच्चनीचता हाही सामाजिक विषमतेचाच प्रकार आहे. भंगीकाम, चर्मकाम इत्यादि घाणीचीं कामें आरोग्य दृष्ट्या कितीही आवश्यक असलीं तरी हीन किंवा निंद्य आहेत व हीन जातींनींच तीं करावयाचीं आहेत ही कल्पना वरच्या वर्गांना अपंग व खालच्या वर्गांना निरुत्साह बनविते. ते तीं कामें करतात, पण नाइलाजास्तव, रडतकढत, शिव्या शाप देत करतात. हौसेनें, प्रेमानें, त्यांत आत्मा ओतून

केलेलीं कामें कर्त्याला उन्नतिकारक होतात व पुरुषार्थाची वृद्धि करतात. याच्या उलट कष्टी मनानें केलेलीं कामें कर्त्याची व समाजाची हानि करतात. लाचारीच्या भावनेनें केलेलें काम म्हणजे गुलामगिरीच आहे. कामांच्या हीनतेसंबंधींच्या आपल्या खुळ्या कल्पनांपायीं असली गुलामगिरी आपल्या समाजामध्यें घर करून राहिली आहे. तेथून आपण ती हुसकून लावली तर राजकीय क्षेत्रांतूनही तिचें उच्चाटण करणें सोपें जाईल. समुद्राला भरती आली म्हणजे ती एकाद दुसऱ्या खाडींतच थांबत नाहीं, सर्व खाड्यांतून पसरते. तशीच ही माणुसकीची भरती सामाजिक व धंद्याच्या क्षेत्रांत आली कीं ती राजकारणाच्या खाडींतही आपोआपच शिरेल. स्वतंत्रता-समता-बंधुता असें आपलें त्रिविध ध्येय आहे. त्यांपैकीं स्वराज्याची स्थापना ही कांहीं अंशीं परक्यावर अवलंबून आहे, परंतु समता व बंधुता सर्वस्वी आपल्याच हातीं आहेत. त्या आपण साधल्या तर स्वातंत्र्य आपोआपच आपल्याकडे चालून येईल. जो इतरांना न्याय देतो त्याची न्याय मिळविण्याची शक्ति सहजींच वाढते.

सामाजिक समता पाहिजे तशीच आर्थिक समताही पाहिजे. शोषित व शोषक हा वर्गभेद नाहींसा झाला पाहिजे. ज्यांना दिवसभर राबूनही पोटभर अन्न मिळत नाहीं, ज्यांचें जीवन नीरस व रुक्ष आहे, त्यांच्या पुढें राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या गोष्टी बोलणें म्हणजे त्यांची विटंबना करण्याप्रमाणें आहे. स्वराज्य मिळाल्यानंतर त्यांची स्थिति सुधारणें सुलभ होईल हे खरें, परंतु स्वराज्यांतही जे सत्ताधारी असतील—व ते साधारणतः श्रमजीवी वर्गाबाहेरचेच असणार—त्यांची अनुकूलता असेल तरच. परंतु त्या न्यायनिष्ठ वृत्तीला स्वराज्यप्राप्तीपर्यंत खोळंबून रहाण्याचेंही कारण नाहीं. स्वराज्य प्राप्तीपूर्वींही जेवढें करतां येण्यासारखें तेवढें करून स्वराज्य हें केवळ श्रीमंत-

सुशिक्षितांसाठींच नसून गरीब-अशिक्षितांसाठींही आहे अशी आपण त्या वर्गाची खात्री पटवून दिली पाहिजे. निरनिराळया वर्गांमध्यें गाढ बंधुभाव निर्माण होईल असे केलें पाहिजे. समतेखेरीज बंधुता नाहीं, बंधुतेखेरीज एकजूट नाहीं, व एकजुटीखेरीज स्वराज्य नाहीं.

हें समता स्थापनाचें कार्य केवळ स्वराज्य प्राप्तीसाठीं करायचें—स्वराज्य मिळाल्यानंतर तें सोडून द्यायचें—असें मात्र नव्हे. तें मुळांतच इष्ट आहे म्हणून करायचें. तशा तऱ्हेनें तें केलें तरच तें स्वराज्याला पोषक व सहायक होईल. तेंच राजकीय हेतुनें केलें तर हेंही नाहीं व तेंही नाहीं अशी स्थिति होण्याचा संभव आहे. फलावर दृष्टि न ठेवतां केलेल्या कर्माला दसपट फळ मिळतें असा कर्म योगाचा सिद्धांत आहे.

सर्व विधायक कार्योना हा न्याय लागू आहे. तीं राष्ट्रसंवर्धक कार्यें आहेत, कॉंग्रेससंवर्धक नव्हेत. त्यामुळें राष्ट्राची शक्ति वाढावी अशी कार्यकर्त्यांची दृष्टि असावी. कॉंग्रेस ही जर राष्ट्राची प्रतिनिधि असेल तर राष्ट्राची शक्ति वाढल्यानें सहजींच कॉंग्रेसचीही शक्ति वाढेल. अन्य कोणत्या संस्था लोकसंमत असतील तर त्यांचीही वाढेल. तथापि या अवांतर परिणामांशीं सेवकाला कांहीं कर्तव्य नाहीं. सत्कृत्यें करणाराला कीर्ति मिळतें हें खरें, पण सत्कृत्यें कीर्तीचे लोभानें करावयाचीं नसतात, तसें हें आहे.

**राष्ट्र कुटुंबी वृत्तिः**—साऱ्या विधायक कार्यक्रमांचीं मूळें राष्ट्र-कुटुंबित्वामध्यें आहेत, स्वराज्याच्या आकांक्षेचा उगमही त्यांतच आहे, व म्हणूनच विधायक कार्यक्रम हें स्वराज्य संपादनाच्या प्रयत्नाचेंच दुसरें नांव आहे.

आपल्याला स्वराज्य पाहिजे तें इंग्रजांविषयींच्या मत्सरासाठीं—त्यांची चलती आमच्यानें बघवत नाहीं म्हणून—नव्हे, तर आपल्या

देशबांधवांची दुर्दशा पहावत नाहीं म्हणून. हिंदी लोक सुखी, संपन्न, सच्छील बनण्यासाठीं स्व-तंत्र, म्हणजे परस्परांच्या तंत्रानें चालणारे, झालें पाहिजेत. स्वराज्याची लालसा परक्यांच्या द्वेषांतून उद्भवूं शकते किंवा शेजाऱ्यांबद्दलच्या प्रेमांतून उद्भवते. अहिंसामार्गीयांची स्वराज्याकांक्षा अर्थात् प्रेममूलकच असणार. प्रेम म्हणजे आपुलकी. देशबांधवांबद्दलची ही आपुलकी आपल्या मनांत जसजशी दृढावत जाईल तसतशी ती हरप्रकारच्या सेवा कार्यांमध्यें प्रकट झाल्याखेरीज रहाणार नाहीं.

आपण प्रथम आपल्या देशावर उत्कटपणें प्रेम करायलाच शिकलें पाहिजे आहे. मनुष्यदेह हा जसा रक्तवाहिन्यांचा, व ज्ञान तंतूंच्या रज्जूंनीं एकत्र बांधलेला असतो तसे आपण हिंदीलोक प्रेमरज्जूंनीं एकमेकांशीं बांधलेले असलें पाहिजे. देहाच्या एका भागाला झालेली इजा जशी साऱ्या देहाला जाणवते, तशीं आपल्या शेजाऱ्याचीं सुखदुःखें, त्याचीं संकटें व अडचणी, त्याचे मानापमान हें मला माझीं सुखदुःखें, माझी संकटें, माझे मानापमान असें वाटलें पाहिजे. हिंदुस्थान हा नकाशांतील एक सलग, ब्रिटिश सत्तेच्या रंगानें रंगलेला, पट्टाच नव्हे तर तो एकजीव समाज आहे या भावनेचेंच नांव राष्ट्रीय वृत्ति.

ही राष्ट्रीय वृत्ति असल्यानंतर हिंदु-मुसलमान, बिहार-बंगाल, सवर्ण-हरिजन इत्यादि भेद व वाद सहजींच शमतात. गरीब-श्रीमंत वादही हलके होतात. एका कुटुंबामध्यें एक भाऊ अधिक कमाई करीत असला तरी दुसऱ्या भावाला वगळून तो जेवन खात नाहीं. घरच्या बायकोला खमंग पदार्थ बनवितां येत नाहींत म्हणून, किंवा घरीं सर्वांना वाटून खावें लागतें म्हणून, होटेलांत जाऊन एकट्यानेंच खाऊन येणारा ज्याप्रमाणें कुटुंबद्रोही समजला जातो, त्याचप्रमाणें माझेपाशीं पैसे आहेत व विलायती छानदार कापड

खरीदण्याचें मला सामर्थ्य आहे, एवढ्यासाठींच माझ्या शेजाऱ्यांनीं कांतलेल्या व विणलेल्या साध्या खादीचा मी अव्हेर करणें, हाही स्वजनद्रोह किंवा देशद्रोह आहे. कुळाला उपाशी मारून जमीनदारानें चैन करणें, हाही देशद्रोह आहे. खादी, ग्रामोद्योग, स्वदेशी, दलित-सेवा हे या देशद्रोहाच्या पापाचें क्षालन करण्याचे प्रकार आहेत.

या साऱ्या कार्यक्रमांमुळें जनतेची कुवत वाढेल व त्यामुळें परक्याच्या प्रतिकार करण्याचें त्राण तिच्यामध्यें येईल. दीन, दरीद्री, व्यसनी प्रजा मनांतून कितीही जळफळत राहिली तरी जुलमाचा प्रतिकार करूं शकत नाहीं. त्या जळफळण्यानें उलट तिचा अधिकच शक्तिपात होतो. लोकशक्तीची वाढ व संघटना हा विधायक सेवाकार्याचा प्रत्यक्ष फायदा आहे, पण त्या खेरीज अशा सेवेमुळें व परस्परांसाठीं केलेल्या त्यागामुळें राष्ट्राच्या भिन्न-वर्गामध्यें जो बंधुभाव व जिव्हाळा निर्माण होईल तो स्वराज्याचा स्थायी आधार बनूं शकेल. ज्या राष्ट्राच्या नागरिकांमध्यें हा जिव्हाळा किंवा राष्ट्र-कुटुंबी भावना अधिक, ज्या राष्ट्राच्या नागरिकांमध्यें सर्वांच्या हितार्थ स्वतःच्या स्वार्थाला मर्यादा घालण्याची व जरूर तर तिलांजलि देण्याची तत्परता विशेष असते त्याच राष्ट्रांचा उत्कर्ष होतो, व ज्या राष्ट्रांतील नागरिकांमध्येंही संघ भावना नसते त्यांनाच दुसऱ्याच्या गुलामगिरींत रहावें लागते. ज्यांना स्वातंत्र्य टिकवायचेंच नव्हे, तर दीडशें वर्षांपासून नष्ट झालेलें स्वातंत्र्य बलवान् प्रतिपक्षाकडून माघारें मिळवायचें आहे त्यांच्यामध्यें तर ही संघ भावना विशेषच उत्कट असावी लागते.

स्वदेशी व्रताच्या पालनाचा राजकीय दृष्ट्या आणखी ही एक प्रत्यक्ष उपयोग आहे. इंग्रजी राज्य हें वैश्यांचें राज्य आहे. साम्राज्य विस्तार करण्यांत इंग्रजांचा प्रमुख हेतु व्यापारविस्तार हा असतो. राष्ट्रांराष्ट्रांमधील ऐच्छिक व

निर्मळ व्यापार हा उभय राष्ट्रांस हितावहच होतो. परंतु इंग्लंड व त्याचे साथीदार व हिंदुस्थान यांचे मधील व्यापार हा दूषित व जुलमावर आधारलेला व्यापार असून त्यापासून हिंदुस्थानाचें बेहद नुकसान झालेलें आहे. स्वराज्यसरकारनें हिंदुस्थानाच्या उद्योगधंद्यांच्या व व्यापाराच्या संरक्षणासाठीं जें केलें असतें तें स्वराज्याच्या अभावीं आपण प्रजेनें जर स्वेच्छेनें व त्याग-संयम-पूर्वक केलें तर इंग्रजी साम्राज्यशाहीचा मुख्य हेतुच विफल होईल. मग इंग्रजांना हिंदुस्थानाला मुठींत घट्ट धरून ठेवण्यापासून विशेष लभ्यांश नाहीं असें दिसून येईल. त्याच बरोबर त्यांच्या जुलमी सत्तेच्या प्रतिकारार्थ हिंदी प्रजेनें ब्रिटिश मालाचा बहिष्कारही चालविल्यास "सत्ता सोडतों पण व्यापार करूं द्या" असें म्हणण्याचा प्रसंग त्यांचेवर येईल.

स्वदेशीचीं व्यापार व उद्योगधंद्याखेरीज अधिक सूक्ष्म परंतु अधिक महत्त्वाची अशी आणखी ही स्वरूपें आहेत. स्वदेशी म्हणजे स्वाभिमान, स्वतःविषयीं व विशेषता स्वकीयांविषयीं अभिमान. आपली भाषा आपले आप्तसंबंधी, आपली जात यांचेबद्दल लाज मानणें व तीं लपवूं पहाणें हा अत्यंत गर्हणीय असा आत्मद्रोह व खोटसाळपणा आहे. असला आत्मद्रोह आपण पदोपदीं करीत असतों. इंग्रजी भाषेबद्दलचा हव्यास, साहेबी पोशाख करून आगगाडीच्या डब्यांत भरमसाट जागा अडविण्याचा कावा, आपल्या साध्याभोळ्या आईबापांना किंवा शेजाऱ्यांना ओळख देण्याची कॉलेज तरुणांना वाटणारी लाज--गुलामगिरीचे हे आपल्या हृदयांवर खोल उमटलेले ठसे साफ घासून काढले म्हणजे स्वराज्याची अर्धी मजल ओलांडली असें निःशंकपणें समजावें. परकी सत्तेचा अंतःकरणांतून बीमोड झाल्यानंतर देशांतूनही तो होण्यास विलंब लागणार नाहीं.

शस्त्रयुद्धांमध्यें मुद्धां अघाडीच्या मागील भागांत केलेल्या तयारीलाच

फार महत्त्व असतें. नऊ दशांश युद्ध प्रयत्न देशांत व घरोघरच व्हावा लागतो व तो खुद्द बिनलढाऊ किंवा विधायक स्वरूपाचाच असतो. अन्न-वस्त्राची पैदास; विमानें, गलबतें, मोटारी, टँक्स् इत्यादींची बांधणी; रस्ते व वहातूक; बंदुका, तोफा व दारूगोळा इत्यादींचें उत्पादन; पेट्रोलचा सांठा; अन्नवस्त्रादिकांची समान वांटणी; औषधपाण्याचा पुरवठा; शुश्रूषापथकांची उभारणी; लढवय्यांचें शिक्षण; अशी नानाप्रकारची तयारी करण्यांत राष्ट्राचें सारें द्रव्यबल, बुद्धिबल व मनुष्यबल गुंतविल्याखेरीज शस्त्रयुद्धांत टिकाव धरतां येत नसतो. आपल्या सत्याग्रह युद्धाला विधायक कार्याची व सर्व शक्तींच्या राष्ट्रार्पणाची आधिकच जरूर असणार.

अलीकडे दहादहा वर्षांनीं उसळणाऱ्या कायदेभंगाच्या चळवळींमध्यें न चुकतां भाग घेऊन तुरुंगाची एकेक—कांहीं अधिकही—वारी करणारे हंगामी सैनिक आपल्याला पुरेसे नाहीं तरी, पुष्कळ मिळतात; परंतु सतत करावयाच्या विधायक कार्यासाठीं प्रथम दर्जाचे कार्यकर्ते थोडे मिळतात, ही खेदाची गोष्ट आहे. क्रांतिकारकांच्याच उत्कटतेनें किंवा त्वेषानें, पण विधायक कार्याच्या आघाडीवर, अविश्रांत काम करणाऱ्या व घामाचे पाट वाहविणाऱ्या खड्या सैनिकांची आपल्या निःशस्त्र लढ्याला अत्यंत जरूरी आहे.

**असहकार :**— अहिंसक शस्त्रागारांतील सर्वांत तीव्र शस्त्र प्रतिकार हेंच आहे. विद्यार्जनाच्या दृष्टीनें अभ्यासालाच महत्त्व असलें तरी लौकिक यशाच्या दृष्टीनें परीक्षेलाच अधिक महत्त्व असतें, त्याचप्रमाणें प्रतिकारही आपल्या विधायक कार्याच्या विद्याभ्यासाची परीक्षा आहे.

प्रतिकारात्मक कार्यक्रमांमध्यें पहिली पायरी असहकार ही आहे. असहकारामध्यें पारिपत्याची भावना नसतेच, परंतु प्रतिकाराचीही असल्यास

अंधुकच असते. आत्मशुद्धीची दृष्टीच त्यामध्यें प्रमुख असते. सरकार आपल्यावर आपल्या सहकार्याखेरीज राज्य करूं शकत नाहीं. हिंदी जनतेची सर्रास कत्तल करून निर्जन हिंदुस्थानावर राज्य करण्याची ब्रिटिशांची इच्छा नाहीं. इंग्लंडच्या किंवा अन्य देशाच्या वसाहत वाल्यांना येथें आणून बसवून त्यांचे मार्फत हिंदुस्थानाचा उपभोग घेणेंही त्यांना मुष्किलीचें होईल. आम्हीच भोळसटपणानें, नाहींपेक्षां लाचारीनें, त्यांचे हुकुमांत वागावें, त्यांचेपुढें शिर झुकवावें, आम्ही संपत्ति निर्माण करावी व तिचा पाहिजे तेवढा अंश त्यांना उचलूं देऊन उरलेल्या हिश्शांत स्वतःचा गुजारा करावा, हेंच त्यांना पाहिजे आहे. मधमाशांना माणसाळवून त्यांचे करवीं मध गोळा करणें माणसाला अधिक पसंत असतें. त्या न माणसाळल्या तरीही त्यांनी पोळीं करून मध सांठवावा व मग आपण माशांना चुडीनें पिटाळून लाऊन मध काबीज करावा अशी त्याची इच्छा असते. परंतु मधमाशांनीं संघ करून रहाण्याचें किंवा मध सांठविण्याचेंच जर सोडून दिलें तर मात्र माणसाची पंचाईत होणार.

इंग्रजानेंही आम्हांला मानसाळूनच घाण्याला जुंपलें आहे. आपण तो घाणा ओढण्याचें साफ नाकारलें पाहिजे. सरकारची नोकरी न करणें हें असहकारांतील पहिलें पाऊल. तेवढेंच जरी आपण टाकलें, सरकारला नोकर मिळतनासे झाले किंवा अपुरे पडले, तरी सरकार कोलमडून पडेल. सरकारची शक्ति अवाढव्य आहे खरी, तरीही तें मरणाला अगदीं हलकें आहे. एका गांवीं सरकारला पोलिस पाटील मिळत नाहीं, किंवा महार मिळत नाहीं असें झालें तरी तेवढ्यानेंही सरकारच्या प्रतिष्ठेला जोराचा धक्का बसेल. तटाची एक वीट गळली कीं मग आणखी-आणखी विटा गळून तटच कोसळणें हा फक्त कालाचा प्रश्न रहातो.

परंतु हें घडावें कसें ? या कामीं पुढें कोण सरणार ? स्वार्थच नव्हे तर हरतऱ्हेचे बुद्धिवादच आडवे येतात.

पोपटांना पकडण्याची माणसानें फार नामी युक्ति शोधून काढली आहे. कपडे सुकविण्यासाठीं बांधतात तशी तार बांधावी. त्या तारेवर ढिली फिरेल अशी पोकळ नळी ओंवून ठेवावी. नळीच्या लगतच कांहीं आमिष ठेवावें. पोपट येऊन त्या नळीवर बसतो व आमिषाकडे चोंच नेतो तोंच ती नळी त्याच्या भारानें कलाटणी घेते. त्यामुळें पोपट वर पाय खालीं डोकें होऊन लटकूं लागतो, व आपला एकमात्र आधार म्हणून त्याच नळीला आपल्या पंजांनीं घट्ट पकडून धरतो. मग पारधी येऊन त्याला अलगत पकडून पिंजऱ्यांत ठेवून देतो. ती घसरडी नळीच त्याच्या बंधनाला कारण होते; परंतु त्याला मात्र वाटतें कीं तीच एक आपला आधार आहे. त्याला जर जवळच्या एकाद्या शहाण्या पोपटानें सल्ला दिला कीं "तूं ही पंज्यांनीं पकडलेली नळी तेवढी सोडून दे कीं लगेच स्वतःच्या पंखांच्या बळानें गगनविहार करूं शकशील, तर तो म्हणेल, "हातचें सोडून पळत्याच्या पाठीमागें लागण्यास मला सांगणारे तुम्ही दीड शहाणे अहां."

"वरील नोकऱ्यांमध्यें हिंदी लोकांना प्रवेश मिळाला" ही परवां-परवांपर्यंत कॉंग्रेसचीही मागणी असे (मज्जाव असतां नये हें आम्हांलाही मान्य आहे) त्यावरून कित्येक शहाण्या सुरत्यांना अद्यापही वाटतें कीं बडी नोकरी पटकाविल्यानें आपण स्वराज्याच्या जवळ जातों. परंतु हा भ्रम आहे. "सोन्याची लोखंडाची। बेडी ती बेडिच साची। बंधनीं ॥" नव्हे, सोन्याची बेडीच अधिक बंधनकारक होते. लोखंडी बेडी दगडानें तोडून कैदी मोकळा होईल; परंतु सोन्याची मूल्यवान् बेडी दगडानें चेंचण्याचें कैद्याला धैर्य होत नाहीं.

कित्येक म्हणतात, "सरकार उलथून पाडायचें असेल तर त्यासाठीं प्रथम आपण सरकारी राज्य-यंत्राचीं सर्व अंग-उपांगें व्यापून टाकलीं पाहिजेत. मामलेदार, कलेक्टर सर्व आमच्यापैकीं, लष्कर-आरमार-विमान दळामध्येंही सगळीकडे आपलेच लोक, आम्हीच पोलीस, आम्हीच जेलर झालों कीं एका इशाऱ्यासरशीं व रक्ताचा थेंब न सांडतां क्रांति करणें सोपें जाईल. शहाजीनें आदिलशहाची सरदारकी केली म्हणूनच पुढें शिवाजीला स्वराज्य संस्थापना करणें शक्य झालें." स्वराज्याचीही तयारी फारच सुखाची व सोयीची आहे! अडचण एवढीच येतें कीं मग शेवटला इशारा देण्यास कोणी शिल्लक रहात नाहीं. आणि कोणी दिलाच तरी कोणी तो मानणार नाहीं. "डॉटर ऑफ दि कार्बोनारी" नांवाच्या इंग्रजी कादंबरीची नायिका आनुवंशिक वैराचा सूड घेण्यासाठीं वैरी नायकाची पट्टराणी होण्याचें ठरविते व मग वैऱ्याऐवजीं वैराचाच नाश होतो. त्या कल्पित कथानका इतकीच ही स्वराज्य प्रातीची योजनासुद्धां नवलपूर्ण व मोहक आहे.

ही भ्रामक योजना सोडून दिली, असहकारच इष्ट आहे असें मान्य केलें, तरी सुद्धां अडचण या गोष्टीची येते कीं (१) मी राजीनामा दिला तरी ती जागा रिकामी थोडीच रहाणार आहे? आणखी दहाजण ती जागा पटकविण्यास टपलेले आहेत. मी तेवढा उघडा पडेन आणि सरकारचें तर कांहीं वांकडें होणार नाहीं. (२) आणि भलत्या सलत्या माणसानें ती जागा पटकविण्यापेक्षां माझ्यासारख्या सद्धेतु प्रेरित व सज्जन माणसानेंच ती भरून काढणें लोकहिताच्या दृष्टीनें अधिक बरें. मी त्या सत्तेचा शक्य तेवढा सदुपयोग करीन, निदान दुरुपयोग करणार नाहीं, कोणाचें नाहक नुकसान करणार नाहीं. (३) शिवाय मी स्वराज्याच्या चळवळीलाही आंतून मदत करूं शकेन.

यांपैकीं तिसरा विचार हा सत्याग्रहाच्या लढ्याला मुळांतच मारक असल्याचें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. दुसऱ्या मुद्यावाबत हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं सज्जनांनीं जुलमी सत्तेची नोकरी पत्करल्यानें त्या सत्तेची प्रतिष्ठा वाढण्यास मदत होते, आणि त्या सत्तेला उंदराप्रमाणें फुंकर मारीत चावे घेणें शक्य होतें. (झोंपलेल्या माणसाच्या पायाची चामडी उंदीर कुरतडून खातो तरी त्या माणसाची झोपमोड होत नाहीं.) माझ्या ऐवजीं दुसरा नोकरी पटकावील हें मीच म्हणतों असें नाहीं. प्रत्येक जण तेंच म्हणत असतो. सर्वजण इतरांच्या भयानेंच नोकरी करतात. हें एक विलक्षण कोडें आहे. इतर करतील म्हणून मी करतों, व मी करीन म्हणून इतर करतात. हा भोंवरा तोडण्यासाठींच निर्धारपूर्ण असहकाराची आवश्यकता आहे. "मला जशी राजिनामा देण्याची सुबुद्धि सुचली तशीच ती इतरांना कां सुचणार नाहीं? मी तसेच ते. माझ्या हृदयांतील ईश्वर जागा झाला तसा त्यांच्या हृदयांतीलही होईल." अशी श्रद्धा बाळगूण आपण 'रामभरोसे' उडी टाकली पाहिजे.

देशामध्यें दारिद्य व बेकारी वाढतात व चरितार्थाचीं स्वतंत्र साधनें दुर्भिळ होतात तसतसे सरकारी नोकऱ्यांवर लोक अधिकाधिक तुटून पडूं लागतात. सरकारची दडपशाही जसजशी उग्र होत जाते तसतसें सरकारशीं फटकून वागणें अधिकाधिक जोखमीचें होतें. स्वराज्य प्राप्ती विषयीं लोक जसजसे निराश बनतात तसतशी सरकारच्या कलानें मिळतील तेवढ्या सवलती पदरांत पाडून घेण्याची प्रवृत्ति वळावते. कनवाळू वृत्तीचे परंतु थकले दमलेले देशभक्तही त्या निराशेच्या सांथीला बळी पडतात. परंतु या सर्व सांथीं विरुद्ध स्वराज्य सैनिकानें घट्ट राहिलें पाहिजे. "मोडेन पण वांकणार नाहीं" हें त्याचें ब्रीद असलें पाहिजे. सत्पक्षाच्या अंतिम विजयाविषयीं

त्यानें खात्री बाळगावी त्या विजयासाठीं पडेल ती किंमत देण्याची त्याची तयारी असावी. नवयुग निर्मात्यानें प्रसव वेदनांना भिऊन कसें चालेल?

तरीही असहकारी सुधारकानें आपल्या सोबत्यांना सोडून भरमसाट पुढें जाण्यांतही हांशील नाहीं. त्याचें अग्रेसरत्व त्याच्या सोबत्यांना प्रेरणादायी व्हावें, निरुत्साह करणारें होऊं नये. पुष्कळांना नाहीं तरी थोड्यांना तरी व त्याचे पाठोपाठच नसलें तरी अंमळशा वेळानें तरी, त्याचे मागून जाणें शक्य होईल अशा बेतानेंच त्यानें पुढें सरावें. सुधारकाला एकांडा शिलेदार होऊन भागत नाहीं. त्यासाठीं तारतम्य बुद्धि व समयज्ञता पाहिजे. प्रचार व लोकशिक्षण यांचे द्वारा पूर्व तयारी करून नंतरच प्रत्यक्ष कार्यक्रमाला हात घातला पाहिजे. असहकार हा केवळ एकट्या दुकट्यानें करून यशस्वी होणार नाहीं, पुष्कळांनींच तो आचरला पाहिजे. अर्थात् पुष्कळांनीं आचरण्यापूर्वीं एकट्या दुकट्यानेंही पुढें सरून इतरांस धडा घालून दिला पाहिजे. तो धडा प्रमाणाबाहेर कठीण असूं नये इतकेंच.

**असहकाराच्या मर्यादा :—** राजसंस्था ही माणसाच्या सामाजिक जीवनाची प्रमुख संस्था आहे. विद्यमान सरकाराशीं या ना त्या प्रकारें सहकार्य केल्याखेरीज माणसाला गत्यंतरच नाहीं. अर्थात् आपला असहकार हा किती केलें तरी मर्यादितच रहाणार. पोष्टांत कार्ड टाकलें तरी आपण सरकारला तीन पैसे देतों. दैनंदिन जीवनाला आवश्यक असणाऱ्या मीठ, साखर, आगकाड्या, घासलेट इत्यादींवर सरकारी कर असतात, त्यामुळें ती वस्तु वापरणारा सरकारला अप्रत्यक्ष कर भरतोच. सरकारी नाण्यांची देवघेव करणारानें सरकारला मान्यता दिली असें होतें. अर्थात् आपला असहकार हा मर्यादित म्हणजे विशिष्ट बाबींपुरताच चालूं शकणार. असहकारामध्यें तारतम्य वापरणें अपरिहार्य आहे व इष्टही आहे. सरकारी नोकरी

करायचीच असली तरी सुद्धां सत्ता चालविणारीं खातीं, उदा० पोलीस, तुरुंग, मॅजिस्ट्रेट, रेव्हिन्यू इत्यादि व लोकसेवा करणारीं खातीं, उदा० वैद्यक खातें, शिक्षण, रस्ते, शेतीसुधारणा इत्यादि, यांमध्यें भेद करतां येईल.

असहकार सरकारी नोकरी पुरताच लागू नसून इतर हरएक बाबतींत ही करणें आवश्यक आहे: उदा० सरकारी कंत्राटें घेणें, सरकारी नियंत्रणाखालीं कामें करणें, सरकारनियुक्त कमिट्यांवर काम करणें, सरकारी किताब स्वीकारणें इत्यादि. सरकारी नियंत्रणाखालीं काम करण्याबाबतही (१) सरकारी कायद्यांच्या मर्यादेंत काम करणें व (२) सरकारी अंमलदारांच्या हुकमांनुसार काम करणें यांत महत्त्वाची तफावत आहे. कायद्याचीं बंधनें उघडीं व रेखीव असतात तर अंमलदारांचे हुकूम लहरी असतात. ते संभाळणें जड व प्रसंगीं अपमानास्पद होत असतें. कंत्राटें घेण्याचे बाबतींतही सरकारच्या खात्यांखात्यांमध्यें विवेक करतां येईल. तात्कालिक किंवा दर्शनी सोयीच्या लोभानें चिरकालिक हिताचा बळी देण्याची चूक शहाण्यासुरत्या मंडळीकडूनही घडत असते. उदा० सत्याग्रही कैद्यांना चांगलें जेवण मिळावें या हेतूनें कांहीं देशाभिमानी व्यापारी तुरुंगाच्या अन्नाचें कंत्राट घेतात. कैद्यांना तुरुंगांत चांगली वागणूक देतां यावी यासाठीं स्वतःच जेलर होऊं पहाण्यासारखेंच हें आहे.

**कायदेमंडळें वगैरे :—** सरकारी कायदेमंडळांत जावें कीं त्यांवर बहिष्कार घालावा? या प्रश्नाचा दोन दृष्टींनीं विचार करतां येईल. एक तत्त्वाच्या म्हणजे ब्रीदाच्या दृष्टीनें व दुसरा व्यवहाराच्या म्हणजे आपल्या मर्यादित शक्तीचा अधिकांत अधिक उपयुक्त कामीं खर्च करण्याच्या दृष्टीनें. तात्त्विक दृष्ट्या असल्या निवडणुका लढविण्यांत असहकाराला मुळींच बाध येत नाहीं. सरकारी नेमणुकीच्या जागा आपण स्वीकारूं नयेत. परंतु प्रजेच्या मतांनीं निवडून जाण्यांत कांहीं वावगें नाहीं. कांहीं फायदेही आहेत. मतदार

हे राष्ट्राचे घटक आहेत. निवडणुकांच्या निमित्तानें प्रचार घडतो, मतदारांची संघटना घडते, त्यांची संघटित शक्ति स्वराज्य प्राप्तीच्या प्रयत्नाला जोडता येते, निवडणुकींतील यशामुळें स्वराज्याकांक्षी पक्षांचा आत्मविश्वास वाढतो व लोकमताचा कौल साऱ्या जगापुढें पुकारला जातो. कायदेमंडळाच्या निवडणुकांचाच न्याय लोकल-बोर्ड, म्युनिसिपालिट्या, ग्रामपंचायती, युनिव्हर्सिटया व इतर अनेक लोकनियुक्तबोर्ड व कमिट्या यांच्या निवडणुकांना लागू आहे. हीं सारीं मोक्याचीं ठाणीं आहेत. सरकारचे, प्रजेचे व जगाचे दृष्टीनें त्यांना सहजींच थोडेंबहुत महत्त्व प्राप्त होतें. तें महत्त्वही काँग्रेसनें आपल्या प्रयत्नाला जोडावें यांत धोरणीपणाच आहे.

असें असलें तरी विशिष्ट परिस्थितींत विशिष्ट निवडणुकींत भाग घ्यावा किंवा नाहीं तें व्यावहारिक विचार करूनच ठरवावें लागतें. त्या संस्थेंतील कार्याचें महत्त्व, स्वतःचें बल, यशाचा संभव, आपल्याला करावयाचीं अन्य कामें इत्यादींचा तारतम्यपूर्वक विचार केला पाहिजे. निवडणुकांमुळें काँग्रेस व इतर पक्ष यांमध्यें उत्पन्न होणारी चुरस, व त्यामुळें होणारी मुख्य कार्याची हानि, विचारांत घेतली पाहिजे. आपल्या प्रतिनिधींमध्यें ध्येयनिष्ठा, निःस्पृहता व शिस्त किती अंशानें टिकवितां येईल त्याचाही विचार केला पाहिजे. निवडून आल्यानंतर ही सत्ता हातीं घ्यावी कीं विरोधी पक्षांतच रहावें, इतर पक्षांशीं कोणत्या बाबतींत व किती अंशीं सहकार्य करावें इत्यादि प्रश्न नाजुक व विवादास्पद असतात. त्याविषयीं ठोकळ नियम घालून देणेंही कठीण आहे. राजकारण ही कला आहे. म्हणूनच त्यामध्यें नेतृत्वाला एवढें महत्त्व असतें.

असहकार प्रभावी होण्यासाठीं राष्ट्रामध्यें संघटना व एकमुखी नेतृत्व यांची विशेष आवश्यकता आहे. "सर्वे यत्र विनेतारः। सर्वे पंडित

मानिनः। सर्वे महत्त्वमिच्छन्ति। कुलंतदवसदिति ॥ ”— जेथें प्रत्येक जण पुढारी आहे, सारेच आपापल्याला पंडित समजतात, सर्वांनाच मोठेपणाची हांव असते, त्या कुळाचा नाश होतो. परक्याशीं असहकार म्हणजे परस्परांशीं गाढ सहकार. परस्पर दृढविश्वास व गाढ सहकार्य यांचे खेरीज परक्याशीं असहकार करणें झेपणार नाहीं व यशस्वी होणार नाहीं.

**बहिष्कार**: – बहिष्कार हें असहकारांच्या पुढचें पाऊल आहे. ब्रिटिश मालाचा बहिष्कार हें त्याचें प्रमुख अंग होय. इंग्लंड–हिंदुस्थानांमधील परस्पर व्यापार हा सध्यां ऐच्छिक नसून तो हिंदुस्थानावर लादलेला आहे. तसेंच त्या व्यापाराच्या कांहीं बाबींमध्यें आपला ऐदीपणा व अविवेकच दिसून येतो. स्वतंत्र हिंदुस्थान सत्तामोहापासून व जुलमी वृत्तीपासून मुक्त झालेल्या इंग्लंडबरोबर निर्मळ व्यापारी संबंध अवश्य जोडील. परंतु सध्यांचा दूषित व्यापार तोडणें हें सध्यांचे दूषित राजकीय संबंध तोडण्याइतकेंच, व तोडण्यासाठीं, आवश्यक आहे. बहिष्कार दोहीं दिशांनीं चालवितां येतोः इंग्लंडचा माल न घेणें, तसेंच इंग्लंडला माल न देणें. इंग्लंड हिंदुस्थानाच्या व्यापारापैकीं कांहीं बाबी, उदा० विलायती कापडाची आयात गुरांच्या कातड्यांची निर्यात, स्वदेशी पालनाचे दृष्टीनें कायमचींच बंद व्हायला पाहिजेत. त्यांचा बहिष्कार प्रतिकाराच्या स्वरूपाचा नसून स्वदेशीच्या पालनांतच अंतर्भूत आहे. इतर कांहीं बाबी चालू स्वरूपांत आपल्याला जाचक आहेत, त्या स्वराज्य प्राप्तीनंतर सुधारलेल्या स्वरूपांत चालूं शकतील. कांहीं स्वतः निर्दोष असल्या तरी एकंदरींत दूषित असलेल्या पद्धतीच्या अवयवभूत व पोषक म्हणून सध्यांही वर्ज्य कराव्या लागतात. तथापि पुस्तकें, नियतकालिकें, विशिष्ट औषधें यांसारख्या कांहीं वस्तूंची देवघेव दोन्ही राष्ट्रांतील लढा कितीही तीव्र झाला तरी बंद पडणें इष्ट नाहीं.

परतंत्र प्रजेला ब्रिटिश बहिष्कार यशस्वी करणें फारच अवघड आहे. परदेशी व्यापारावर निर्बंध घालणें किंवा कर लादणें आपल्या हातीं नाहीं, म्हणजेच देशाच्या गेटांशींच बंदोबस्त करणें आपल्या हातीं नाहीं. आयात झालेला माल कोणीसुद्धां खरीदूं नये अशासाठीं ग्राहकांमध्यें पृथक् पृथक् प्रचार करणें म्हणजे आकाशाला ठिगळें लावण्याप्रमाणें होतें. म्हणून त्यांतल्यात्यांत जीं नाक्याचीं ठिकाणें आहेत त्यांवर हल्ला चढविणें अधिक सोयीचें ठरतें. ज्या दुकानीं ब्रिटिश माल विक्रीस ठेविला असेल अशा दुकानांवर पिकेटिंग करणें हाच तो उपाय होय.

दुकानावर पिकेटिंग करणें याचा अर्थ गिऱ्हाइकांना त्यांचे घरोघर भेटून उपदेश करणें अशक्य असल्यानें बरेच गिऱ्हाइक एका ठिकाणीं भेटतलि अशा सोयीच्या ठिकाणीं राहून उपदेश करणें एवढाच असला पाहिजे. पिकेटिंग करणाऱ्या स्वयंसेवकाचें काम उपदेश करणें किंवा विनंति करणें एवढेंच आहे; रस्ता अडविणें, अडथळा करणें, धमकी देणें किंवा टर उडविणें या गोष्टी अतिक्रमणांत मोडतात, तरी त्यांपासून स्वयंसेवकानें अलिप्त रहावें. एका ठिकाणीं दोन तीन पेक्षां अधिक स्वयंसेवकांनीं रहाण्याचें कारण नाहीं. तसे ते राहिल्यानें इरादा नसतांही रस्ता अडविल्याप्रमाणें होतें आणि संख्याधिक्यामुळें टर उडविण्याकडेही प्रवृत्ति होते. असल्या प्रकारांमुळें दुकानदाराचें व ग्राहकांचें निष्कारण शत्रुत्व संपादिलें जातें, व कार्यविनाश होतो.

**सामाजिक बहिष्कारः**—प्रतिपक्षाशीं सहकार्य करणारांवर, असहकाराच्या संपांत सामील न होणारांवर, सामाजिक बहिष्कार घालणें हा अधिक भानगडीचा प्रकार आहे. स्वार्थासाठीं किंवा प्रतिष्ठेसाठीं प्रतिपक्षाला सामील होऊन देशहिताचा बळी देणारांची समाजांतलि प्रतिष्ठा नष्ट व्हावी, उभयपक्षी

प्रतिष्ठा त्यांना मिळतां नये, हें वाजवी आहे. बहिष्कार हाच ती प्रतिष्ठा नष्ट करण्याचा मार्ग आहे हेंही खरें. परंतु प्रतिपक्षावरील बहिष्कार स्वकीयांवरच उलटवून चालविल्यास आपल्यांतील फाटाफूट कोणत्या थरापर्यंत जाईल तें सांगतां येत नाहीं. प्रथम प्रतिपक्षावरील अव्वल बहिष्कारांत सामील न होणारांवर दुय्यम बहिष्कार, नंतर त्या दुय्यम बहिष्कारांत सामील न होणाऱ्या इतर स्वकीयांवर तिसऱ्या दर्जाचा बहिष्कार, हा क्रम कोठपर्यंत चालवावयाचा ? शिवाय सत्याग्रहीनें प्रतिपक्षाशीं किंवा भिन्न पक्षांशीं गांठीभेटीच्या व बोलण्याचालण्याच्या मिळतील तेवढ्या संधि घ्याव्या व त्याचें मतपरिवर्तन करण्याची उमेद धरावी हें उचित आहे. परंतु सामाजिक बहिष्कारामुळें ती संधि गमावते, व प्रतिपक्षी अधिक ताठर बनतात. बहिष्कार परिणामकारक झाल्यास त्यामुळें होणारा कोंडमारा शस्त्रहल्ल्याहूनही अधिक जाचक होतो. सामाजिक बहिष्कार हें फार तीक्ष्ण शस्त्र आहे, म्हणून कुशल कारागिराच्या देखरेखी खालींच तें चालविलें जावें, एवढें म्हणण्यापलीकडे या मुद्याचें अधिक तपशीलवार विवेचन आम्ही करूं शकत नाहीं.

या तत्त्वमूलक बहिष्काराची खासगी वैरांशीं गल्लत होऊं नये व उलटपक्षीं खासगी प्रेमसंबंधांपुरती त्याच्यामध्यें ढिलाई येऊं नये, यासाठीं जपलें पाहिजे. तसें झाल्यास तत्त्वनिष्ठेला बाध येतो व सत्याग्रहाची सारी शक्तिच लटकी पडते; एवढेंच नव्हे तर सत्याग्रहाचें शस्त्र आपल्यावरच उलटतें.

**हरताळ** :—लोकांच्या उचंबळणाऱ्या भावनांचें निदर्शन म्हणूनच बहुधा मिरवणुका व हरताळ यांचा उपयोग करण्यांत येतो. परंतु निदर्शना-खेरीज शिक्षण व जागृति यांचे दृष्टीनेंही त्यांचें महत्त्व आहे. हे हेतु एकेक दिवसाच्या हरताळांनीं—शिक्षणसंस्था, बाजार, गिरण्या-कारखाने, वहातूक

इत्यादींच्या—साधतात. हरताळ हा संवशः करावयाचा कार्यक्रम आहे, त्यामुळें तो यशस्वी करण्याचे दृष्टीनें स्वबांधवांवर दडपण आणण्याचा मोह पुष्कळदां अनिवार होतो तथापि तो अखेरीस कार्यनाशालाच कारण होतो एवढी सावधगिरीची सूचना आवश्यक आहे.

एका दिवसाहून अधिक मुदतीच्या संपांनीं सरकारवर दडपणही आणतां येतें. हरताळ हा असहकाराचाच प्रकार आहे. तो सार्वत्रिक व तीव्र झाल्यास सरकारला कारभार चालविणें कठीण होईल. उद्योग-धंदे, बाजार व वाहतूक यांचा सार्वत्रिक संप हा सरकारला शरण आणण्याचा जलदांत जलद इलाज आहे, परंतु अहिंसक हरताळ सार्वत्रिक होणें तितकेंच कठीणही आहे. विशिष्ट उद्योगांचा संपही दीर्घकाळ टिकूं शकल्यास त्याचा सरकारवर परिणाम झाल्याखेरीज रहाणार नाहीं. अर्थात् तो किती पूर्ण वा दीर्घ होऊं शकेल तें संपवाल्यांच्या उत्कटतेवर, एकोप्यावर, टिकाव धरण्याच्या शक्तीवर व राष्ट्राकडून त्यांना मिळणाऱ्या पाठिंब्यावर अवलंबून राहील.

**कायदेभंग**:—हरताळाच्या पुढें कायदेभंग. हुकूमभंगाचा त्यांतच समावेश होतो. त्याला 'सविनय' विशेषण जोडण्यांत येत असतें. नम्रता ही अहिंसेमध्यें अंतर्भूतच आहे. तथापि 'सविनय कायदेभंग' हा शब्द वापरला जातो तो इंग्रजींतील 'सिव्हिल डिसोबिडियन्स्'चा समानार्थी म्हणून. सिव्हिल म्हणजे नागरी. नागरिक या नात्यानें, नागरिकत्वाच्या कर्तव्यांचे व अधिकारांचे निमित्तानें, अर्थात् राजकीय हेतूनें केलेला कायदेभंग तो नागरी कायदेभंग. म्हणून 'नागरी कायदेभंग' हें "सिव्हिल डिसोबिडियन्स" चें अधिक समर्पक भाषांतर होईल अशी आमची कल्पना आहे.

कायदेभंग हा सरकारला विरोध करण्याचा सक्रिय किंवा चढाऊ मार्ग आहे. सनदशीर मार्गांमध्यें फक्त शाब्दिक विरोध दर्शविला जातो.

परंतु "क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे." एवढेंच नव्हे तर निष्क्रिय वाचाळता उच्छृंखल व बेजबाबदारही असूं शकेल. केवळ शाब्दिक विरोधानें सरकार वळत नाहीं हें ठीकही आहे. विरोधकाची कळकळ, उत्कटता किंवा तत्त्वनिष्ठा प्रत्ययास येणें जरूर आहे. तें सविनय कायदेभंगानें—अर्थात् त्याचे परिणाम नम्रपणें स्वीकारण्यानें—साधतें. कायदेभंग करून तन्निमित्त मिळेल ती शिक्षा तत्त्वासाठीं सहर्ष स्वीकारण्याची सत्याग्रहीची तयारी असते. त्याच्या कठोर तत्त्वनिष्ठेची प्रतिपक्षावर व तिऱ्हाइतांवर छाप पडते व त्यांना आपल्या मार्गाचा फेरविचार करणें भाग पडतें.

**कोणते कायदे मोडावे?** सत्याग्रहानिमित्त मोडावयाचे कायदे किंवा हुकूम यांची निवड विचारपूर्वक केली पाहिजे. कांहीं कायदे नैतिक असतात ( उदा० चोरी करूं नये ) ते सत्याग्रहाच्या निमित्तानें मोडतां येणारच नाहींत. कांहीं मुळांत स्वयंसिद्ध नसले तरी सामुदायिक संकेतामुळें त्यांना नीतिनियमांइतकेंच साधित महत्त्व येतें : उदा० गाड्या डाव्या बाजूनें हांकणें, रात्रीं गाडीला दिवा लावणें इत्यादि. असले नियमही सत्याग्रहीनें पाळले पाहिजेत, इतरांहूनही अधिक कसोशीनें पाळले पाहिजेत. निव्वळ राजकीय स्वरूपाचे जे कायदे तेवढ्यांचाच भंग करतां येईल. या कायदेभंगांतही दोन प्रकार असूं शकतील : (१) प्रत्यक्ष जुलमी कायदे किंवा हुकूम यांचा भंग : उदा० सभाबंदीचा हुकूम किंवा परवानगीखेरीज वर्तमानपत्र प्रसिद्ध करतां नये, हा कायदा. (२) परंतु कांहीं जुलमी कायदे असे असतात कीं त्यांचा भंग करणें प्रजाजनांच्या हातीं नसतें : उदा० कोणालाही केवळ संशयावरून अटकेंत ठेवण्याचा अधिकार पोलिसांना देणारा कायदा. असल्या कायद्यामध्यें अधिकाऱ्यांना अनियंत्रित सत्ता दिलेली असते; परंतु प्रजाजनांना "अमुककरा" किंवा "तमुक करूं नका" असें बंधन नसल्यामुळें त्या

कायद्याला डिंवचणें प्रजाजनांच्या हातीं नसतें. असल्या जुलमी कायद्यांच्या विरोधासाठीं अन्य कायद्यांचा भंग करणें हाच उपाय असतो. हे दुसरे कायदेही जुलमी असतील असेच शोधावे; परंतु तसे न मिळाले तरी साध्या कायद्यांवरही ते जुलमी सरकारच्या शस्त्रागारांतील शस्त्रें आहेत एवढ्यासाठींच हल्ला चढविण्यांतही नीतिदृष्ट्या वावगें असें कांहीं नाहीं. १९१९ सालीं गांधीजींनीं रौलॅट कायद्यांविरुद्ध कायदेभंग पुकारला तेव्हां त्यांनीं त्या कायद्यांवर असा अप्रत्यक्ष हल्ला करण्याचेंच योजिलें होतें.

आपला लढा विशिष्ट कायद्याविरुद्ध नव्हे, तर मुळांत परकी सत्तेविरुद्धच असला तरी कायदेभंगाची मोहीम अखंड व सततच चालेल किंवा चालविली पाहिजे असें नाहीं. तसेंच प्रत्येक कायदेभंग स्वराज्यासाठींच केला पाहिजे असेंही नाहीं. कसल्याही एकाद्या किरकोळ मागणीसाठीं कायदेभंग केला तरी तो स्वराज्यालाच जाऊन मिळणार. परकी सरकारशीं कोणत्याही मुद्यावर लढा देऊन प्रजेनें फत्ते मिळविली तर ती स्वराज्याच्या मार्गावरील प्रगतिच आहे.

**वैयक्तिक, सामुदायिक व निदर्शनात्मक :—** सविनय कायदेभंगाचे वैयक्तिक, सामुदायिक, निदर्शनात्मक इत्यादि प्रकार बोलले जातात, परंतु त्यांचे अर्थ पुष्कळदां संदिग्ध, भिन्न भिन्न व चुकीचेही असतात. राष्ट्राच्या मागणीसाठीं व राष्ट्राच्या वतीनें करावयाचा कायदेभंग हा शिस्तीनें व निवडक लायक इसमांनिशीं चालावा हें उचित व आवश्यक आहे. सविनय म्हणजे सत्याग्रही कायदेभंग व चोरी मारामारीसारखा गुन्हेगारी कायदेभंग यांचेमध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे. जो नित्य मुलखाचे किंवा सरकारचे कायदे मनोभावानें व प्रामाणिकपणें पाळतो त्यालाच विशेष प्रसंगीं सविनय कायदेभंग करण्याचा अधिकार पोचतो, व त्याच्याच कायदेभंगाला किंमत

व महत्त्व आहे. राष्ट्राच्या वतीनें कायदेभंग करण्याचा अधिकारही त्यालाच पोचतो कीं जो राष्ट्रीय वृत्तीचा व राष्ट्राचा सच्चा सेवक आहे. सच्छील, तत्त्वनिष्ठ व राष्ट्रीय वृत्तीच्या इसमाच्या कायदेभंगाला व त्यानिमित्त त्याला भोगाव्या लागणाऱ्या क्लेशांनाच नैतिक महत्त्व आहे. केवळ कौतुकानें, साहसानें, पोटासाठीं किंवा घरांतून पळून जाण्याचें साधन म्हणून केलेल्या कायदेभंगाला व भोगलेल्या तुरुंगवासाला नैतिक लढ्यांत विशेष महत्त्व नाहीं. तसेंच भाडोत्री इसमाच्या कायदेभंगाला स्वयंप्रेरणेच्या सत्याग्रहाचें मोल येऊं शकणार नाहीं.

म्हणून वाटेल त्यानें उठावें व कायदेभंग करून तुरुंगांत जावें या पद्धतीऐवजीं अधिकृत पुढाऱ्यानें किंवा समितीनें पसंत केलेल्या प्रतिज्ञाबद्ध स्वयंसेवकांनींच कायदेभंग करावा हें उचित व फलदायी आहे. अर्थात् कायदेभंग हा मुळांत वैयक्तिकच रहाणार. सत्याग्रहाच्या शर्ती, नियम व धोरण मान्य करून लक्षावधि किंवा कोट्यवधि स्त्री, पुरुष व तरुण त्यामध्यें सामील झाले तरी त्यामुळें त्याच्या मुळांतील वैयक्तिक स्वरूपाला बाध येत नाहीं. शिस्तीचा कायदेभंग हा उघडाच असणार. आगाऊ अधिकाऱ्यांना नोटीस दिलेली नसली तरीही कायद्याचा भंग कोणाकडून घडला तें लपविण्याचा इरादाही नसणार व लपून रहाणारही नाहीं.

परंतु ज्यांना कायदेभंग पसंत असतो, व्हावा असें वाटतें, त्यांना स्वतः भाग घेण्याची सुद्धां तयारी असते पण त्याचे परिणाम चुकवितां येतील तर चुकवावे असेंही वाटतें, ते 'गर्दी–कायदेभंग' किंवा 'बेदाद-कायदेभंग' पसंत करतात. गर्दी-मारामारीमध्यें ज्याप्रमाणें प्रत्यक्ष कोणी किती प्रहार केले त्याची दाद लागत नाहीं, त्याचप्रमाणें मोठ्या जमावानिशीं मिरवणूक-बंदीचा हुकूम मोडणें किंवा मिठागराची लूट, जंगलाची तोड यांसारखे कार्यक्रम करणें, व पुढें शेकेल त्याचेवर शेकूं देणें, ही पद्धति कित्येकांना सोयीची

वाटते. त्यांत प्रत्येकाला स्वतः निसटून जाण्याची थोडी तरी आशा असते. 'सामुदायिक सत्याग्रह' म्हणजे असलाच बेदादसत्याग्रह असा अर्थ केला जातो. परंतु तो सत्याग्रह नव्हे. तो स्वरूपतः बेजबाबदार व भ्याड व त्याअर्थानें हिंसक आहे. जमावामध्यें मनुष्य अशा गोष्टी करून जातो कीं ज्यांची जबाबदारी स्वीकारण्याची त्याची तयारी नसते. दंग्यांचे प्रसंगीं हिंदु-मुसलमानांचे जमाव असेच एकमेकांवर हल्ले करतात व परिणामीं निरपराधी माणसें प्राणास मुकतात.

समजा, कीं कायदेभंगाच्या चळवळीला जनतेकडून अपेक्षे पलीकडे पाठिंबा मिळाला व विशिष्ट टापूंतील बहुसंख्य लोक सत्याग्रहांत सामील झाले. अशा स्थितींत संभव आहे कीं सत्याग्रहाला विराट स्वरूप प्राप्त होईल व परिणाम चुकविण्याची यत्किंचित् इच्छा नसतांही सत्याग्रहींची निवड, नोंद व नेमणूक अशक्य होऊन जाईल. असें झाल्यास त्यांत वावगें कांहीं नाहीं, उलट ती अभिमानास्पद गोष्ट आहे. विराट कायदेभंग व गर्दी-कायदेभंग हे दोन्ही सामुदायिक कायदेभंगच असले तरी त्यांचेमध्यें जमीन अस्मानाचें अंतर आहे.

सरकार जेव्हां दडपशाही सुरू करून व संघ-स्वातंत्र्य नष्ट करून सत्याग्रहाची उघड संघटना अशक्य करून सोडतें तेव्हां सत्याग्रहींची निवड, नोंद व नियमन हीं अशक्य होतात, व ज्यांची ज्यांची सत्याग्रहाच्या तत्त्वांस अनुसरून कायदेभंग करण्याची व त्याचे परिणाम भोगण्याची तयारी असेल अशा सर्वांनीं कायदेभंग करावा अशी अपेक्षा केली जाते. अशा तऱ्हेचा जो सर्वांना मोकळा कायदेभंग त्यासच कोणी सामुदायिक कायदेभंग म्हणतात. परंतु १९३३ सालीं त्यावेळचे सर्वाधिकारी श्री. अणे यांनीं "सामुदायिक कायदेभंग" बंद करून "वैयक्तिक कायदेभंग" चालू

टेविण्याचा आदेश दिला तेव्हां तो वैयक्तिक कायदेभंगही सर्वांस मोकळाच होता; नेमलेल्या किंवा प्रतिज्ञाबद्ध इसमांनींच तेवढा सत्याग्रह करावा असें बंधन नव्हतें. त्यावेळीं सामुदायिक कायदेभंग बंद करण्याचा अर्थ काँग्रेस कमिटयांचे नांवानें—अध्यक्ष, चिटणीस, सर्वाधिकारी इत्यादि पदव्या धारण करुन किंवा अशा कोणा अधिकाऱ्याच्या हुकमावरुन—कायदेभंग न करतां ज्यानें त्यानें स्वतःच्याच नांवानें व स्वतःच्या वैयक्तिक जबाबदारीवर कायदेभंग करावा असा होता.

त्यावेळीं आणखी एका प्रकारच्या सामुदायिक कायदेभंगाचा नव्हे परंतु विशिष्ट टापूंत सर्वांनीं शेतसारा न देणें, विशिष्ट पेठेंत सर्वांनीं ब्रिटिश बहिष्कार करणें यांसारख्या सामुदायिक कार्यक्रमांचा निषेधही उद्देशिलेला असावा. अशा तऱ्हेच्या सांघिक कार्यक्रमांत स्वकीयांवर सक्ती करण्याचे व त्यांतून फाटाफूट व परस्पर-द्वेष माजण्याचे प्रसंग कसे येतात तें आपण पूर्वीं बहिष्काराचा विचार करतांना पाहिलेंच आहे व पुढें करबंदीचा विचार करतांनाही पाहूं.

**निदर्शनात्मकः**--१९४०।४१ सालचा कायदेभंग हा 'निदर्शनात्मक (टोकन्) कायदेभंग' म्हणून गांधीजींकडून नाहींतरी सरकारकडून व तिऱ्हाइतांकडून उल्लेखिला जात असे. 'निदर्शनात्मक' शब्दानें (१) स्वतःचा विरोध व्यक्त करणारा व (२) तेवढ्यांतच समाधान मानणारा, अशा दोन गोष्टी सुचविल्या जातात. कायदेमंडळांत अंदाजपत्रकांतील खर्चाला मंजुरी देतांना 'टोकन कट्' म्हणजे 'खूण म्हणून' एकाद्या रुपयाची कपात सुचविली जाते; त्या कपातीचा हेतु मंजुरी अडवून धरण्याचा नसतो. १९४०।४१ च्या सत्याग्रहाचा हेतु ब्रिटिश सत्ता नष्ट करण्याचा नव्हता, तर युद्धाला व तन्मूलक दडपशाहीला हिंदी प्रजेचा

विरोध जाहीर करण्याचा व प्रचार-स्वातंत्र्य स्थापित करण्याचा होता. तो शांत, सौम्य स्वरूपाचा होता व सत्याग्रहींची निवड विशेष करून केली जात होती हें खरें; परंतु तेवढ्यावरून तो कमी तीक्ष्ण, कमी निर्धाराचा, किंवा कमी निकराचा योजिलेला होता, तो राष्ट्राच्या सर्व-शक्तीनिशीं चालविण्यास मनाई होती असें मात्र मुळींच नाहीं. शांतपणा व सौम्यपणा हें सत्याग्रहाचें न्यून नसून भूषणच आहे. तसेंच सत्याग्रहींची विशिष्ट लायकी साधण्यासाठीं त्यांची संख्या घटली तर त्याला निरुपाय होता, परंतु त्यापासून चळवळीचें नुकसान नव्हतें. जाडजूड परंतु बोथट तरवारीपेक्षां पातळ व हलकी परंतु तीक्ष्ण धारेची तरवारच कामाची, त्याप्रमाणें सत्याग्रहाच्या लढ्यांत संख्येपेक्षां (जाडीपेक्षां) गुणाला (धारेलाच) अधिक महत्त्व असतें. गांधीजी किंवा जवाहरलाल तुरुंगांत गेल्यानें जी खळबळ उडते, जो बोभाटा होतो, जो परिणाम घडतो तो आमच्यासारखे लक्षावधि जाऊन ही घडत नाहीं हा आपला नेहमींचा अनुभव नाहीं का? गांधी-नेहरूंच्या तोडीचे हजारों लाखों सत्याग्रही मिळतील तर अधिकच चांगलें, परंतु तसे मिळत नाहीं म्हणून मिळेल तसलें संख्याबल शत्रूवर पाठविल्यानें शत्रु चीत होईल असें नाहीं.

केवळ तुरुंग तुडुंब भरून काढल्यानें आपली मागणी पूर्ण होईल असें नाहीं. अखिल जनतेच्या सामुदायिक प्रयत्नानेंच तें मिळणार आहे. सत्याग्रहीच्या तुरुंगवासानें सरकारी अधिकारी विचारांत पडतील व जनता खळबळून स्वकर्तव्यतत्पर बनेल तरच उपयोग. हा परिणाम ज्यांनीं शील, सचोटी व दीर्घ लोकसेवा यांनीं अधिकारी व जनता यांचीं मतें आकर्षिलीं आहेत अशांच्या कायदेभंगानेंच घडूं शकेल. साहस, ईर्ष्या, किंवा आणखी उतरत्या प्रेरणांनीं उद्युक्त झालेल्या फलटणींनीं साधणार नाहीं.

**सत्याग्रहाची सांगता :—** कायदेभंगाचा अधिकार जसा पूर्व-सेवेनें प्राप्त होतो त्याचप्रमाणें त्याची पूर्तता पुढील एकंदर वागणुकीवर अवलंबून असते. सत्याग्रहीनें जाहीर कायदेभंग केला म्हणजे त्याचें कार्य संपलें नव्हे तर सुरू झालें. त्याच्या सत्याग्रहाचें सार्थक किंवा सांगता त्याच्या पुढील, म्हणजे कोर्टातील व तुरुंगांतील, वर्तनानें व्हावयाची आहे.

**कोर्टांत :—** कायदेभंग करीपर्यंत कार्यकर्त्यांचा संबंध जनतेशीं म्हणजे स्वकीयांशींच होता, तो येथून पुढें पोलीस, मॅजिस्ट्रेट व तुरुंगाधिकारी यांचेशीं म्हणजे प्रतिपक्षीयांशीं येतो. प्रत्यक्ष सामना त्याच्या अटके-पासूनच सुरू होतो. त्या सामन्यांत तो कसा वर्तेल त्यावर यश अवलंबून आहे. प्रतिपक्षाशीं येणाऱ्या प्रत्यक्ष संबंधावरूनच सत्याग्रहाची कसोटी व्हावयाची असते. तेथेंच त्यानें आपली लायकी, पुण्याई किंवा सत्त्व हीं दाखविलीं पाहिजेत.

सत्याग्रहीचें अधिकाऱ्यांशीं वर्तन निःस्पृह व स्वाभिमानी परंतु त्याच बरोबर सौजन्य व नम्रता यांनीं युक्त असें असावें. सौजन्य म्हणजे प्रतिपक्षाचे बाजूसही सत्याचा कांहीं अंश—मला कळत नसला तरी–असलाच पाहिजे या जिवंत श्रद्धेनुसार केलेलें वर्तन. अधिकाऱ्यांशीं वागतांना सत्याग्रहीनें दोषैक दृष्टि होऊं नये, तसेंच मनाचा तोल व प्रसन्नता हीं ढळूं देऊं नये. तुसडेपणा कामाचा नाहीं तसेंच लांगूल चालनही शोभणार नाहीं. अधिकाऱ्यांना सत्याग्रहीबद्दल आदर वाटेल असेंच सत्याग्रहीचें त्यांच्याशीं सरळ, निर्मळ व निःस्पृह वर्तन असलें पाहिजे.

अधिकाऱ्यांकडून आपण फक्त प्रामाणिक सवलतींचीच अपेक्षा करावी. अधिकारी आपल्याच रक्तामांसाचे व पोटासाठींच परसेवा करीत असल्यानें सत्याग्रहींना चोरट्या सवलती देऊन स्वतःच्या मनाचें समाधान,

सदसद्विवेक बुद्धीची मुस्कटदाबी किंवा स्वतःच्या नोकरीचें समर्थन करूं पहातील तर तसलें सवंग समाधान आपण त्यांस लाभूं देऊं नये. नळाची खालच्या मजल्यावरील चावी बंद ठेवल्यानें पाणी वरच्या मजल्यावर चढण्यास मदत होते, त्याच न्यायानें आपण अधिकाऱ्यांची चोरटी अप्रामाणिक मदत घेण्याचें बंद केलें तरच त्यांना उघड मदतीकडे किंवा राजिनाम्याकडे आपण चढवूं शकूं.

कोर्टांत सत्याग्रहीनें स्वतःची भूमिका स्पष्ट करणारी कैफियत सादर करावी, किंवा तसें करावयाचें नसल्यास "मला कांहीं सांगावयाचें नाहीं" म्हणून स्वस्थ रहावें. "मी हें कोर्ट मानीत नाहीं, सरकारला ओळखीत नाहीं" यासारखी चढेल भाषा बोलण्यांत किंवा अन्य हास्योत्पादक प्रकार करण्यांत शोभा नाहीं. कायदेभंग जेथें मुद्दाम व सांगूनसवरून केलेला आहे तेथें खऱ्या आरोपाविरुद्ध बचाव करण्याचा प्रश्नच येत नाहीं. खोटा आरोपही जर राजकीय स्वरूपाचाच असेल तरीही त्याचा इनकार करण्या उपरांत विरुद्ध साक्षीदारांची उलटतपासणी व स्वतःचे साक्षीदार देणें इत्यादि त्रास व खर्च करण्यांत हांशील नाहीं. कायद्याच्या किचकट बारकायांचा फायदा घेण्याचीही सत्याग्रहीची वृत्ति नसते. त्यांत शिरल्यानें कायदा व कोर्ट यांचें स्तोम वाढविल्या प्रमाणें होतें तथापि असभ्य, अनुचित किंवा अनैतिक कृत्यांचा आरोप आल्यास मात्र बचाव देणें कांहींसें आवश्यक आहे. परंतु सत्याग्रहीचें वर्तन प्रथम पासून जर उघडें प्रामाणिक व अहिंसक असेल तर त्याचेवर आकसानें खोडसाळ आरोप आणण्याचा मोह अधिकाऱ्यांनाही पडणार नाहीं, असें मानण्यास हरकत नाहीं. इतक्याही उपर त्यांनीं मुद्दाम खुनशीपणानें खोटा पुरावा उभा केला असेल तर त्या कुटिलतेचा मुकाबला करणें सत्याग्रहीला जडच जाईल. म्हणून तत्त्वासाठीं

नसलें तरी सोयीसाठीं कैफियतीउपरांत बचाव देणें निरर्थक ठरतें.

स्वराज्याच्या लढ्यामध्यें तरी सत्याग्रहीनें कोर्टामध्यें प्रजाजनाची भूमिका स्वीकारण्याऐवजीं युद्धकैद्याची भूमिका स्वीकारणें शोभून दिसेल.

तरीही कोर्टाचें काम यथायोग्य पद्धतीनें चालावें व अज्ञानामुळें किंवा अननुभवामुळें आपली फसगत होऊं नये एवढ्यासाठीं सत्याग्रहीनें वकिलाची मदत घेण्यांत कांहीं वावगें नाहीं. ही मदत फक्त कायदा, क्रम किंवा पद्धति यांपुरतीच असावी; खऱ्याचें खोटें करण्यासाठीं किंवा रदबदलीसाठीं नव्हे. सत्याग्रहीनें असत्याचा आश्रय केल्यास परकी सरकारला धक्का बसण्याऐवजीं सत्याग्रहाच्या चळवळीलाच धक्का बसेल.

**दंड भरणें**—सत्याग्रह फक्त श्रीमंतांसाठींच नसून गरिबांसाठींही आहे. सत्याग्रही सैनिकांमध्यें परस्परांविषयीं बंधुभाव असला पाहिजे. दंड व तो न भरल्यास तुरुंग अशी शिक्षा मिळेल तेव्हां श्रीमंतानें दंड भरून मोकळें व्हावें व गरिबाला तुरुंगांत अडकून पडावें लागावें असा फरक पडणें अनुचित आहे. म्हणून सत्याग्रहीनें ऐपत असली तरीही आपण होऊन दंड न भरतां त्याऐवजीं तुरुंगवासच पत्करावा. मात्र यांत दंड चुकविण्याचा हेतु असूं नये; जप्तींत कांहीं मिळूं नये यासाठीं मिळकतीची लपवाछपवी, किंवा मिळकत दुसऱ्याचे नांवावर चढविणें, असले प्रकार बिलकुल करूं नये. उलट दंड स्वेच्छेनें न भरल्यामुळें सत्याग्रहीला कितीतरी पटींनीं दंड भरावा लागेल. कारण दंडासाठीं जप्ती येईल, जप्त मालाचें लिलांव होईल; परंतु सत्याग्रहाबद्दल सहानुभूति बाळगणारांनीं तर लिलांव मागतां नये, त्यामुळें सरकारचे बगलबच्चेच लिलांव मागणार, आणि त्यांना कोणी प्रतिस्पर्धी नसल्यानें माल मातीमोलानें जाणार, रुपया दंड वसूल करण्यासाठीं सरकारला हजार रुपयांचा माल जप्त करावा लागणार.

अशा तऱ्हेनें थोडक्याशा दंडासाठीं घरांतील सारी चीज परत लुटाविणें ज्यांना झेपणार नाहीं, त्यांनीं दंड भरून मोकळें व्हावें, किंवा जप्तीचे प्रसंगीं रोख रक्कम किंवा सोनें चांदीसारख्या निश्चित किंमतीच्या वस्तु जप्त होऊं द्याव्या. परंतु लपवाछपवी किंवा स्वतःच्या हस्तकांकरवींच लिलांव मागाविणें इत्यादि मिथ्याचार करूं नये. सत्याग्रहाला मिथ्याचार घातुक आहे, अपुरें बळ तितकें विघातक नाहीं.

**तुरुंगवास :**—कायदेभंग करणाराला तुरुंगवास मिळणार हें जवळ जवळ ठरलेलेंच आहे. तुरुंगांतील जीवन हें कडक संयमानें व कठोर निर्बंधांनीं व्यापलेलें असतें. बाहेर ज्याला संयमी व नियमबद्ध जीवनाची संवय नाहीं त्याला तुरुंगवास फार दुःसह होतो. एवढेंच नव्हे तर त्याला स्वतःच्या ब्रीदापासून ढळण्याचे मोह पडतात. म्हणून कायदेभंगांत भाग घेऊं इच्छिणारांनीं अगोदरपासून स्वतःच्या जीवनांत संयम व शिस्त बाणवून घ्यावी. विडी ओढणाराला, चहाची संवय जडलेल्याला, नानाप्रकारचे स्वादिष्ट पदार्थ खाण्याची आवड असलेल्याला, तुरुंग जड जातो. म्हणून सत्याग्रहीनें आगाऊ बाहेरही तुरुंगाच्या रहाणीचा सराव पाडून घेणें इष्ट आहे.

सत्याग्रहीनें तुरुंगवासाची मुदत हा आयुष्यांतील काळोख्या रात्री-प्रमाणें शून्य, व्यर्थ, निरुद्योगी किंवा कसातरी ढकलण्याचा काळ समजायाचा नसून देशाच्या सेवेच्या व स्वतःच्या उन्नतीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा काळ मानावा. सत्याग्रही तुरुंगांत अडकल्यानें बाहेरील जनता जशी अधिक कर्तव्यजागृत बनते, त्याचप्रमाणें आंत सत्याग्रहीनेंही अधिकाधिक जागरूक व उद्यमशील बनलें पाहिजे. नियमित रहाणी, निवांतपणा, माफक उद्योग, सत्संगति, वाचन-मननास फुरसत, निश्चिंतता इत्यादि गोष्टी तुरुंगांत लाभतात तशा इतरत्र लाभणें दुर्घट असतें. सत्याग्रहीनें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत. अनुक्रम ........ वि: ........ क्रमांक ........

तुरुंगाचा आश्रम बनवून साधक वृत्तीनें रहावें.

तुरुंगांत सत्याग्रहीला अधिकाऱ्यांशीं सतत प्रसंग येतो, बिनराजकीय कैद्यांशीं येतो व आपापसांतही गाढ संबंध येतो. तुरुंगाचें जीवनच कोंडलेलें असल्यानें घनिष्ठ असतें, सारेच संबंध गाढ असतात.

**अधिकाऱ्यांशीं**:—त्याचें वर्तन नम्र, सभ्य व सौजन्यपूर्ण परंतु निःस्पृह व स्वाभिमानाचें असावें हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तुरुंग हें एक नवीन जग असतें; तेथें नवीन समाज, नव्या चालीरीति असतात, त्यामुळें बाहेरचें नीतिशास्त्र व आंतील नीतिशास्त्र यांतही एकदम फरक पडण्याचा धोका सत्याग्रही कैद्याच्या बाबतींतही असतो. बाहेर ब्रिटिश-कोर्ट न ओळखणारा सत्याग्रहीवीर तुरुंगांत अधिकाऱ्यांची मनधरनी करतो, बाहेरील कट्टा असहकारी व बहिष्कारवादी आंत निर्वेतन कारकून बनतो, व अधिकाऱ्यांस मेजवान्या देण्यास तत्पर असतो. बाहेर लांचलुचपती विरुद्ध बोभाटा करणारे आंत स्वतःच त्या गोष्टी करूं लागतात. हा गाफिलपणा शोचनीय आहे. सत्याग्रहीला बिडीतंबाकूचें व्यसन असलें किंवा जिभेचे चोचले अनावर असले म्हणजे तर "हा नारायण अडला। पायीं गाढ्याच्या पडला ॥" अशापैकीं स्थिति बनते.

बाहेर जुलमी सत्तेखालीं फार काळ राहिल्यानें आपल्या लोकांमध्यें जो दुटप्पीपणा, तोंडपुजेपणा व अप्रामाणिकपणा आलेला आढळतो तोच तुरुंगाच्या अधिक, तीव्र जुलमाच्या व दराऱ्याच्या वातावरणांत फार अधिक प्रमाणांत आढळून येतो. अशा वातावरणांत स्वतःचें ब्रीद संभाळण्यासाठीं सत्याग्रहीला विशेषच जागरूक रहावें लागतें. प्रजा व सत्ताधारी यांच्या मधील भेददर्शक हद्दी बाहेरच्यापेक्षांही तुरुंगांत अधिकच पुसट असतात. बाहेर गावांत जसे पोलिसपाटील व महार हे किंचित्शी प्रतिष्ठा, सवलत व

देणगी यांसाठीं सरकारला सामील असतात तसेच तुरुंगांतही कैद्यांतीलच 'वॉर्डर' व 'वॉचमन्' असतात. तुरुंगांतील सरकारी शिपाई हे सुद्धां कांहीं अंशीं कैदीच असतात. त्यांच्याही हालचालींवर कडक निर्बंध असतात. त्यांचीही तुरुंगाच्या दरवाजावर जातांयेतां 'झडती' होत असते; तेही कैद्यांप्रमाणें वरिष्ठ अधिकाऱ्यांना शिव्याशाप देत असतात व "नाइलाजास्तव" कैद्यांना प्रसंगीं झोडपतातही ! वरचे अधिकारी सुद्धां त्यांचेच वडील बंधु. सारेच कैदी व सारेच अंमलदार. सारेच गांजलेले व सारेच चरफडणारे. त्यांचा हात ओला केल्यास व गौप्यस्फोट होणार नाहीं अशी खात्री दिल्यास ते कैद्यांना लागेल तेवढी गुप्त मदत करण्यास तत्पर असतात. परंतु सत्याग्रहीनें लांच तर देऊं नयेच पण लांचाखेरीज केवळ भलाईसाठींही त्यांनीं देऊं केलेली अप्रामाणिक सवलत स्वीकारूं नये.

कारण "इंद्र बदलला तरी इंद्राणी बदलत नसते." चालू इंद्राला खालीं ओढून जो कोणी इंद्रपद बळकावील त्याची इंद्राणी पतिव्रता स्त्री बनते. नोकरवर्ग इंद्राणीप्रमाणें आहे. सध्यांचा इंद्र इंग्रज आहे, व त्याच्या पदावर चढण्याचा आम्हां प्रजाजनांचा प्रयत्न चालू आहे. तो अद्याप यशस्वी व्हावयाचा आहे. एव्हां जर आपण नोकरवर्गाच्या फितुरी प्रवृत्तीला उत्तेजन दिलें तर ती फितुरीची प्रवृत्ति भावी स्वराज्यांत आम्हांलाच नडेल. भावी स्वराज्यांत आपण सध्यांच्या तुरुंगाधिकाऱ्यांना बडतर्फच करणार असलों तर गोष्ट निराळी, पण जर त्यांना राहूं द्यायचें असेल तर त्यावेळीं जेव्हां आपण कोणी तुरुंगखात्याचे दिवाण म्हणून तुरुंगाच्या तपासणासाठीं येऊं तेव्हां आपल्या पूर्वींच्या मित्रांच्या नजरेला नजर भिडविणें आम्हांला अशक्य होईल!

यावर कोणी विचारतील:- "सत्याग्रहींनीं फितुरी करतां कामा नये.

व म्हणून लहान थोर कोणत्याही नोकराची किंवा अधिकाऱ्याची चोरटी मदत घेऊं नये हे कबूल. परंतु सत्याग्रहीनें स्वतःच्या चलाखीनें नोकरांना व अधिकाऱ्यांना चकविण्यास काय हरकत आहे ? मी शिपायामार्फत बाहेरील मित्रांशीं किंवा तुरुंगाच्या अन्य विभागांतील मित्रांशीं चोरटा पत्र-व्यवहार करूं नये. पण त्यांची नजर चुकवून माझा मीच केला, किंवा बेमालूमपणें बिड्या मिळवून ओढल्या, तर त्यांत काय दोष आहे ? वार्डर वॉचमन हे सरकारशीं इमानानें वागण्यास बांधलेले आहेत तसे आम्ही कैदी व विशेषतः राजकीय कैदी, थोडेच बांधलेले आहों ?

"त्यांतून तुरुंगाची शिस्त तर इतकी बेसुमार कडक असते कीं जरा इकडून तिकडे जातां कामा नये, शेजारच्या कैद्याशीं सुद्धां बोलतां कामा नये, आपल्याला ज्यास्त झालेलें अन्न फेकून द्यावें परंतु दुसऱ्या गरजू कैद्याला देतां कामा नये. असले निर्बंध आम्ही आपण होऊन पाळायचे कीं काय ? शिपाई आमच्यावर नजर तरी किती ठेवणार ? तुरुंगाचे भलते कडक नियम आम्ही आपण होऊन पाळायचे असतील तर हजार कैद्यांना संभाळायला एक शिपाई पुरेल, किंवा त्या एका शिपायाचीही जरूरी नाहीं. आम्ही स्वतःवरच शिस्त चालवून घेणें म्हणजे सरकारचा राज्यकारभार व दडपशाही चालविण्यास मदत करणेंच नव्हे काय ?"

तुरुंगाचे नियम कागदावर कितीही कडक असले, व नाठाळ कैद्यांसाठीं तसले नियम आवश्यक ही असले, तरी त्यांची अंमलबजावणी अधिकारी तारतम्यानेंच करतात व आपणही तारतम्यानेंच करावी. उदा० समोर भेटणाऱ्या कैद्याशीं, तो भिन्नवर्गाचा असला व म्हणून नियमाप्रमाणें बोलण्यास मनाई असली तरी, गोंगाट होणार नाहीं अशा बेतानें उघडपणें बोलावें. अधिकारी तेवढें चालूं देतात; त्यांनीं मनाई केली तरी ते आमचें

तोंड धरूं शकत नाहींत.

इतर कांहीं प्रश्न तितके धोपट नसतात. पहारेकरी सत्याग्रही कैद्यांना इतर कैद्यांहून विशेष आदरानें, सभ्यपणें किंवा विश्वासानें वागवीत असतील, त्यांची कसून, किंवा मुळींच, झडती घेत नसतील तर ती त्यांची ढिलाई नसून त्यांचें सौजन्य समजावें, व त्या सौजन्याला साजेसेंच वर्तन सत्याग्रहीनें आपण होऊन ठेवावें. सत्याग्रही कैद्यांवर राजनिष्ठेचें किंवा इमानानें वागण्याच्या शपथेच्चें बंधन नसलें तरी सामान्य सभ्यतेचें, सौजन्याचें व स्वाभिमानाचें बंधन सत्याग्रहीनें स्वतःवर लादून घेतलेंच पाहिजे.

सत्याग्रह जेव्हां विशिष्ट अन्यायाविरुद्धच असतो तेव्हां जो कायदा किंवा हुकूम राजरोस मोडण्याचें ठरलें असेल त्याखेरीजच्या कायद्यांचें किंवा नागरिकत्वाच्या कर्तव्यांचें विशेषच कसोशीनें पालन करण्याची जबाबदारी सत्याग्रहीवर येऊन पडते. अर्थात् तुरुंगांतील शिस्तीचेंही आदर्शकैदी या नात्यानें पालन करणें व जेलचें नेमलेलें काम मनोभावानें करणें सत्याग्रहीचें कर्तव्य आहे. तुरुंगसंस्थेविरुद्ध त्याची तक्रार नव्हती, म्हणून त्यानें अन्य कायद्यांविषयींचा आपला राग तुरुंगाच्या शिस्तीवर काढूं नये. त्यानें तुरुंगवास एक प्रकारें मागूनच घेतलेला असतो म्हणून त्यानें जेलचे सर्व सामान्य कष्ट व त्रास आनंदानें झेलले पाहिजेत. जेलची शिस्त विशिष्ट प्रसंगीं किंवा विशिष्ट बाबतींत अन्यायाची किंवा अपमानकारक असेल तर तेवढ्या पुरता शिस्तभंग किंवा सविनय प्रतिकार करण्यास मात्र हरकत नसावी.

परंतु सत्याग्रह जर क्रांतीसाठीं म्हणजे सरकारचा मूलतः विरोध करण्यासाठीं असेल तर मात्र सत्याग्रही जेलचें काम करण्यास किंवा जेलची इतर शिस्त मानण्यास बांधलेला आहे असें नाहीं. मग तो तत्त्वाचा प्रश्न रहात

नसून सत्याग्रहीच्या कष्टसहनाच्या शक्तीचा प्रश्न रहातो. शिस्तभंगाचे परिणाम भोगण्याची तयारी असेल त्यानेंच शिस्तभंग करावा. परंतु तो करतांनाही त्यानें सत्य, सौजन्य, नम्रता इत्यादींचें पालन करावयाचेंच आहे. तसेंच जेलखात्यानें कैद्यांच्या सुखसोयींसाठीं पुरविलेल्या साधनांची, म्हणजे त्यांना वापरण्यास दिलेल्या वस्तूंची, बुद्धया किंवा निष्काळजीपणानें, नासधूस करणें सत्याग्रहीला कोणत्याही स्थितींत शोभणार नाहीं. हीं बंधनें मान्य केल्यानंतर कैद्याला सरकारच्या कोंडवाड्यामध्यें सरकारच्या सत्तेचा प्रतिकार करण्याचे फारच थोडे मार्ग मोकळे रहातात.

**परस्परांशीं वर्तन :—** स्वातंत्र्य-साधनेसाठीं देशभरही समता व बंधुता यांचा परिपोष होणें आवश्यक आहे हें आम्हीं पूर्वी सांगितलेंच आहे. स्वराज्य सैनिकांमध्यें परस्परांविषयीं तर समता व बंधुता विशेष उत्कटपणें वागत असली पाहिजे. तुरुंगांतील एकत्र सहवासानें दृढावणारी बंधुता व संघटना बाहेर गेल्यानंतर करावयाच्या कामांना फार उपयोगी पडते.

ए. बी. सी हा कैद्यांतील वर्गभेद या संघटनेला बाधक बनतो, तथापि तो सरकारनें दुष्टबुद्धीनेंच केलेला आहे असें म्हणतां येणार नाहीं. बाहेर साऱ्या सत्याग्रहींच्या रहाणीचा दर्जा सारखा नसतो, म्हणून बाहेरील रहाणी व दर्जा यांस अनुसरून सरकारनें तुरुंगांतही कैद्यांना कमीअधिक सुखसोयी पुरविण्याचें ठरविल्यास तें न्यायास धरूनच होईल. यांतील कांहीं भेद तुरुंगांतील डॉक्टरांना कैद्याचें प्रकृतिमान पाहून करतां येण्याजोगे असले तरी इतर कांहीं भेद प्रकृतीचे दृष्टीनें आवश्यक नसतांही मनावरील परिणामाचे दृष्टीनें उचित ठरतील. या वर्गभेदामुळें पुढारी व सैनिक तसेंच प्रौढ व तरुण कैदी तुरुंगांत एकमेकांपासून वेगवेगळे पडतात व एकमेकांच्या सत्संगाला मुकतात. अधिकारीही उच्चवर्गीय कैद्यांशीं विशेष आदरानें व

कनिष्ठ वर्गीयांशीं प्रमाणांत तुच्छतेनें व कठोरपणें वागतात. परिणामीं बाहेर जातिभेदांमुळें जशी परस्पर अविश्वासाची व मत्सराची भावना आढळते तशीच ती वर्गभेदामुळें तुरुंगांतही दृष्टोत्पत्तीस येते. हा परिणाम शोचनीय आहे. खरोखर पहातां कनिष्ठ वर्गीयांनीं आपल्या कांहीं जोडीदारांना तरी अधिक चांगली वागणूक मिळते याबद्दल आनंदच मानावा. तसेंच उच्च वर्गीयांपैकींही ज्यांना झेपण्याजोगें असेल त्यांनीं स्वखुषीनें कनिष्ठ वर्ग मागून घ्यावा. सर्वच राजकीय कैद्यांचा एकच, व अन्य कैद्यांहून अधिक सुखसोयीचा व निराळा वर्ग असावा अशी मागणी करणें मात्र सत्याग्रहींना शोभणार नाहीं.

या वर्गभेदाहूनही एकाच वर्गाच्या, अर्थात् एकत्र रहाणाऱ्या, कैद्यांच्या रहाणींतील फरक नजरेंत अधिक भरतो व बंधुभावनेला बाधक होतो. दूर दूर रहाणाऱ्या लोकांतील भेद तितका जाणवत नाहीं. एकत्र रहाणाऱ्या सत्याग्रही कैद्यांनीं होतां होईल तों एकमेकांस एका कुटुंबांतील समजून वागावें. साबण, दंतमंजन, तेलें, फराळाचे जिन्नस इत्यादि उपलभ्य पदार्थ इतरांस वगळून वापरूं नये. प्रकृतीचे दृष्टीनें आवश्यक म्हणून मंजूर झालेल्या विशेष सोयींना व आहारांना हा नियम लागू नाहीं.

**सामान्य कैद्यांशीं :**—सत्याग्रही कैद्यांनीं इतर कैद्यांहून स्वतः उच्च लेखिले जाण्याची व निराळे राखले जाण्याची मुळींच इच्छा करूं नये. 'क्रिमिनल' म्हटल्या जाणाऱ्या कैद्यांमध्येंही पुष्कळ सज्जन असतात. दोष मनुष्यमात्रामध्यें आहेत, परंतु दोषमय मनुष्यांतील हि सत्-अंश बाहेर काढणें ही आपल्या हातची गोष्ट आहे. दोन पापी इसमांमध्येंही सत्संग घडूं शकतो. ते एकमेकांना आदरपूर्वक सामोरे येतील तर त्यांची संगत उभयतांस उन्नतिकर होईल. अशा संगतीचेंच नांव सत्संग. अशा तऱ्हेचा

सत्संग सत्याग्रही कैदी इतर कैद्यांना देऊं शकतील व त्यांचेकडून मिळवूंही शकतील. तुरुंगाचें वातावरण व पद्धति सुधारण्याचे इतर उपाय असतील, परंतु हा स्वाधीनचा मार्ग आहे. त्यासाठीं सत्याग्रहींनीं इतर कैद्यांशीं समभावानें व प्रेमळपणें परंतु गंभीरपणें वागावें.

तुरुंगांतील जीवनाविषयीं वर दर्शित केलेले विचार लेखकानें १९३२ सालीं रत्नागिरीच्या तुरुंगांत असतांना पद्यांत ग्रथित केले होते, तें पद्यच येथें देण्याची इच्छा होत आहे:—

## तुरुंग कीं आश्रम ?

( चाल – भला जन्म हा तुला लाभला. )

तुरुंग कैंचा ? उद्यममंदिर गांधींचें शोभलें ।
कीं हें अभिनव गुरुकुल भलें ॥१॥
[1]मोक्षार्थी जन-सेवक सारे संमीलित जाहले ।
सत्संगाचें सुख लाभलें ॥२॥
[2]हत्याऱ्यां तस्करां दूषिती, अंतरिं तेही भले ।
[3]ईशावास्य तत्त्व उमजलें ॥३॥
शूद्र ब्राम्हण मुस्लिम ख्रिस्ती कुटुंबीय भावनीं ।
नांदती भेदभाव विसरुनी ॥४॥
नाना उद्यम नाना विद्या साक्षेपें शिकुनियां ।
जाऊं जनांस सेवावया ॥५॥

---

१ स्वराज्यार्थी. २ खुनी. ३ ईश्वरानें व्यापलेलें. ईशावास्य उपनिषदाची सुरवात "भूतमात्राचे ठायीं ईश्वर व्यापून राहिला आहे" अशा अर्थाच्या मंत्रानें होते.

ब्रह्मचर्य अपरिग्रह समता देशीव्रत पालनें ।
साधूं स्वहित सत्य वर्तनें ॥६॥
अस्वाद-व्रत हित मित भोजन करुं जिह्वा-नियमनें ।
साधना व्यर्थ सर्व त्याविणें ॥७॥
निढळाच्या घामाच्या रोटीसाठीं कामें करूं ।
[4]भंगी बनूं शास्त्र-मळ हरूं ॥८॥
अंगिं नम्रता सदा असावी संतीं उपदेशिलें ।
वर्तण्या स्थळ सुयोग्य येथिलें ॥९॥
या सन्नियमांतें स्वमनें स्वीकारितां ।
कारापति पावे गृहॅपति पद तत्त्वतां ।
कुलॅपति तो अमुचा गांधि महात्मा स्वतां ।
साधक-जीवें करूं तपस्या जेणें किल्मिष झडे ।
कुसत्ता-मोहपाश उलगडे ॥१०॥

**माफी व पॅरोलः—** सत्याग्रहाच्या लढ्याची खुबीच ही आहे कीं ज्याची जेवढ्या त्यागाची तयारी असेल तेवढाच त्याग त्यानें करावा; अधिक त्याग करण्याची त्याचेवर सक्ती नाहीं. स्वेच्छेनें पत्करलेला त्याग व क्लेश हे जनतेची शक्ति वाढवितात, तर निरुपायास्तव भोगाव्या लागलेल्या क्लेशांनीं जनतेची उमेद खच्ची होते. परंतु सत्याग्रहीनें कायदेभंग स्वखुषीनें केला तरी त्याबद्दल त्यानें तुरुंगवास किंवा दंड किती भोगावा तें ठरविणें सरकारच्या हातीं असतें. तें प्रमाण सत्याग्रहीच्या अपेक्षेहून किंवा तयारीहून अधिक असूं शकेल. तसेंच परिस्थितीच्या व मनःस्थितीच्या फेऱ्यामुळेंही नवखा सत्याग्रही

४ त्यावेळीं हरिजन कैद्यांना साथ देण्याच्या इराद्यानें सत्याग्रही कैदी स्वखुषीनें भंगी काम करीत होते. ५ गृह-व्यवस्थापक. ६ आचार्य. ]

मध्यंतरीं च कच खाईल, व माफी मागून तुरुंगांतून सुटका मिळवूं पाहील. तसा प्रसंग आल्यास त्याच्या सोबत्यांनीं त्याला धीर द्यावा, परंतु धमकी देऊं नये. कमकुवत इसम माफी मागून सुटल्यानें सत्याग्रहाच्या चळवळीला मुळींच बट्टा लागत नाहीं. सत्याग्रह ही त्यागाची व आत्म-क्लेशाची चळवळ आहे. जेवढा त्याग घडेल तेवढा त्या चळवळीच्या खातीं जमा होतो. जमा रकमेपैकीं एकादें नाणें हिणकस निघालें तर तेवढी रकम जमेंतून कमी होईल, परंतु त्यामुळें खातेदाराच्या पतीला धक्का लागण्याचें कारण नाहीं. तसें पाहिलें तर लाखभर लोकांनीं कायदेभंगांत भाग घेतला असला तरी त्यांच्या शेंकडोंपट इतर लोकांनीं कायदेभंग केला नाहीं हें उघड दिसतें, परंतु त्याचा अर्थ राष्ट्रानें प्रचंड बहुमतानें सत्याग्रहाची चळवळ नापसंत केली असा कोणीच करीत नाहीं. त्या कांहींच न करणाऱ्या कोट्यवधि लोकांपेक्षां या माफी-वीरानें कांहीं काळ तरी तग धरली तेवढी त्याची चळवळीला मदतच झाली असें समजावें. शस्त्रसैनिक मरेपर्यंत न लढतां युद्ध-कैदी म्हणून शत्रूच्या हातीं सांपडल्यानें जर इतर लढवय्यांना कमीपणा येत नाहीं तर कांहीं इसमांनीं माफी मागितल्यानें इतर भक्कम राहिलेल्या सत्याग्रहींना कमीपणा कां यावा ! म्हणून माफी मागण्याचा एकाद्याचा निर्धारच झाला आणि समजुतीनें किंवा उत्तेजनानें तो वळण्या-सारखा नाहीं असें दिसलें तर त्याच्या सोबत्यांनीं त्याला मनःपूर्वक व आशीर्वादपूर्वक रजा द्यावी.

डागळलेला आंबा करंडींतून काढून टाकल्यानें उरलेल्या आंब्यांची किंमत वाढण्यासच मदत होते, त्याप्रमाणें कांहीं कैदी माफी मागून सुटल्यानें बाकीच्यांची इभ्रत उतरण्याऐवजीं उलट वाढते. ते सारे स्वेच्छेनें व हिंमतपूर्वक तुरुंगांत राहिले यावरून त्यांचें धैर्य, त्याग व तत्त्वनिष्ठा हींच प्रत्ययास येतात.

परंतु खरी अडचण हीच असते कीं सत्याग्रही हे चलनी नाण्यांइतके खंबीर किंवा आत्मनिष्ठ नसतात. एक नाणें खोटें निघालें म्हणून त्याच्या शेजारच्या नाण्यावर कसलाच परिणाम होत नाहीं. एका दलांतील सैनिक बंधूंची तशी स्थिति नसते. त्यांचेंमध्यें संघभावना किंवा कळपाची भावना असते. कळपांतील एक मेंढरूं वळतें तिकडे बाकीचीं सारीं वळतात. एका सत्याग्रहीची माफी इतरांच्या मनामध्येंही चलबिचल उत्पन्न करते. या चलबिचलीच्या धास्तीनेंच माफी मागणारावर इतर सारे कैदी तुटून पडतात, त्याचा उपहास करतात, धमकी देतात, अपमान करतात. तो दुबळा तसेच हेही दुबळे. म्हणूनच झगडे व मत्सर उद्भवतात.

साऱ्या मत्सरांच्या मुळाशीं हाच मनाचा दुबळेपणा व आत्मविश्वासाचा अभाव असतो. जो मनाचा पक्का आहे, जो पूर्ण स्वेच्छेनें किंवा स्वतःच्याच प्रेरणेनें सत्याग्रहांत पडला आहे, इतरांच्या ओढीनें किंवा इतरही पडतील या अपेक्षेनें किंवा या भरंवशावर नव्हे, तो इतरांच्या दुर्बलतेनें फारतर हळहळेल, परंतु घाबरणार, चिडणार किंवा चरफडणार नाहीं. कोणी बी क्लास मिळविला, सुटून गेलेल्या कोणीं परत सत्याग्रह केला नाहीं, कोणी दंड भरून मोकळा झाला, कोणी पुढारी असून सत्याग्रहांत पडलाच नाहीं, किंवा "गांधीजींनीं हरिजनसेवेला भलतेंच महत्त्व दिलें" असें म्हणून तो कष्टी होणार नाहीं. तो मुळींच म्हणतो "ही माझी चळवळ; गांधींची नव्हे किंवा नेहरूंची पण नव्हे. परतंत्र राष्ट्रांत मला गुदमरल्यासारखें होत होतें म्हणून मी स्वराज्य-प्राप्तीच्या प्रयत्नाला लागलों. कॉंग्रेससारख्या मोठ्या संस्थेची व गांधींसारख्या लोकोत्तर पुढाऱ्याची मला आयती मदत मिळाल्यानें माझ्या चळवळीला रंग चढला. पण या गांधीचा किंवा कॉंग्रेसचा विश्वास काय सांगावा ? ते उद्यां चळवळी-

तून फुटून गेले तरी मला धडपडत राहिल्याखेरीज गत्यंतर नाहीं, कारण स्वराज्य हा माझा श्वास आहे." अशा निग्रही सत्याग्रहीला इतर मदत करूं शकतील, पण त्याचें वांकडें कोणीच करूं शकत नाहीं.

स्वतः पुरताच विचार करायचा तर मात्र सत्याग्रहीनें कसलाही प्रसंग आला तरी माफी मागूं नये, तसेंच जाभिनावर किंवा पॅरोलवरही सुटका मिळवूं नये. जो न्याय स्वतःला तोच स्वकीयांना, अर्थात् जो कोणी त्याचा सल्ला विचारतील त्यांना, लागू आहे. म्हणून तो सोबत्यांनाही माफी किंवा पॅरोल मागण्यास उत्तेजन देणार नाहीं.

येथें एवढें मात्र लक्षांत घेतलें पाहिजे कीं आपण विचार करीत आहों तो ज्यानें परिणाम भोगण्याच्या तयारीनें मुद्दाम कायदेभंग केला आहे अशा सत्याग्रहीचा होय. ज्यानें विचार-पूर्वक कायदेभंग केला त्यानें माफी मागणें किंवा जामिनावर वा पॅरोलवर, म्हणजे कांहीं काळ तरी "मी कायदेभंग करणार नाहीं" असें लिहून देऊन, मोकळें होणें हें त्याच्या भूमिकेशींच विसंगत आहे. परंतु ज्याचेवर त्याचा इरादा कायदेभंगाचा नसतां आरोप आणला गेला आहे, किंवा ज्याला नाहक संशयावरून अटकेंत ठेविला आहे, त्याचा प्रश्न वेगळा आहे. त्यानें "माझा कायदेभंग करण्याचा इरादा नव्हता व नाहीं" असें लिहून दिल्यास त्यांत सत्यापलाप, व्रतभंग किंवा ब्रीदभंग होत नाहीं.

ज्यानें कायदेभंगाचें व्रत घेतलें असेल—कायम नव्हे तरी काँग्रेसचा फेरहुकूम निघेपर्यंत कायदेभंग करीत रहाण्याचें ठरविलें असेल—त्यानें एक शिक्षा भोगून तुरुंगांतून बाहेर पडतांच शक्य तेवढ्या लवकर परत कायदेभंग करावा हेंच योग्य आहे. 'शक्य तेवढ्या' ही संदिग्ध शब्दयोजना मुद्दामच केली. सत्याग्रहीच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या, सार्वजनिक कार्या-

बाबतचे प्रश्न, स्वतःची खालावलेली प्रकृति इत्यादींमुळें सुटलेल्या सत्याग्रहीला लगेच तुरुंगाकडे परत जाणें (तुरुंगाची शिक्षा मिळेल असें कांहीं करणें) शक्य होत नाहीं. तो प्रश्न ज्याचा त्यानेंच सोडविला पाहिजे. कायदेभंग हा प्रकृति संभाळून करावयाचा कार्यक्रम आहे असें मात्र नाहीं. शस्त्रयुद्धापेक्षां सत्याग्रहयुद्ध अधिक सुरक्षित किंवा बिनधोक असावें असें नाहीं. शस्त्रयुद्धांत आजाऱ्याला भाग घेणें शक्य नसतें, तसें सत्याग्रहलढ्याचें नाहीं. त्यांत वृद्ध, दुबळे, आजारी सारे भाग घेऊं शकतात. प्रसंग आल्यास तुरुंगांत मरण्याचीही त्यांची तयारी असावी म्हणजे झालें. जाणूनबुजून अशा तयारीनें तुरुंगांत जाणाऱ्या सत्याग्रहीचा तेथें मृत्यु झाल्यास सहानुभूति धरणाऱ्या तिऱ्हाइतांनींही सरकारच्या निर्दयतेविषयीं कांगावा करणें उचित होणार नाहीं.

**सेनापति आघाडीवरः—** "आधीं केलें मग सांगितलें" हा सर्वच अहिंसक प्रचाराचा मूळ नियम आहे. उदा० खादी प्रचार करण्याची अहिंसक रीत प्रथम स्वतः खादी वापरणें ही आहे. हिंसक युद्धाचा सेनापति स्वतः छावणींत राहून सैनिकांना अघाडीवर पाठवितो. सैनिक जाया झाले तरी चिंता नाहीं, पण सेनापतीनें स्वतःला शाबूत राखणें आवश्यक असतें. तसें करण्यांत भ्याडपणा नसून शहाणपणाच असतो. शस्त्र-सैन्याची कवायत किंवा कूच चालतो तेव्हां सुद्धां अंमलदारानें आपल्या तुकडीच्या मागेंच रहावयाचें असतें परंतु अहिंसक लढ्याचें सारें तंत्रच उलट आहे. त्यांत सेनापतीची सैनिकांवरील सत्ता केवळ प्रेमाचीच असणार. इतरांमध्यें स्फूर्ति उत्पन्न करण्याचें अहिंसक सेनापतीच्या हातीं असलेलें साधन स्वतः पुढाकार घेणें हेंच आहे. म्हणून कायदेभंगाच्या चळवळीमध्यें सेनापतीनें म्हणजे पुढाऱ्यानें प्रथम कायदेभंग करून त्याचे परीणाम—तुरुंग, लाठीमार, गोळीबार इत्यादि—भोगावे हें उचित आहे. त्यामुळें

इतरांना ओढ लागते व स्फूर्ति येते. आणखीही कांहीं गोष्टी साधतात. बेजबाबदारपणा शस्त्र-सेनापतीमध्येंही शोभत नाहींच परंतु सत्याग्रह-सेनापतीमध्यें तो विशेषच विशोभित दिसेल. पुढाऱ्यानें कायदेभंगांत स्वतः पुढाकार घेतल्यानें नकळतही बेजबाबदारपणा घडण्याचा धोका टळेल. अहिंसक कायदेभंग ही अद्याप नवीन व अपरिचित युद्धरीति आहे. लोक मोठ्या संख्येनिशीं त्यांत भाग घेत असतां त्या मोहिमेमध्यें अनेक प्रमाद व किल्मिषें शिरण्याची धास्ती असते. यासाठीं त्याची सुरवात आस्ते आस्ते व्हावी व तीही लायक व मुरलेल्या योद्धयांनिशीं व्हावी व मागून येणारांसाठीं योग्य आदर्श घालून दिला जावा हें इष्ट आहे. पुढाऱ्यांच्या कायदेभंगानें बहुजन. समाजाच्या स्फूर्ति–पूराला वहाण्यासाठीं योग्य पन्हळ बनून रहातो. शिवाय कायदेभंगाची शक्ति केवळ संख्येवर अवलंबून नसते तर कायदेभंग करणारांच्या चारित्र्यावर व लोकप्रियतेवर अवलंबून असते. त्यासाठींही श्रेष्ठांनीं प्रथम कायदेभंग करणें इष्ट आहे.एक वचन आहे : "धर्मासाठीं मरावें। मरोनि अवघ्यांसि मारावें। मारतां मारतां साधावें। राज्य आपुलें। —धर्मवीरानें धर्मरक्षणासाठीं प्रथम स्वतः मरावें. तो स्वतः मेला तरच इतर मरण्यास सिद्ध होतील. म्हणजे तो स्वतः मरून अवघ्या स्वकीयांसही मारील म्हणजे मरण्याची स्फूर्ति देईल, आणि त्यांस अशातऱ्हेनें मारतां-मारतां धर्माचा विजय साधील.

सत्याग्रहाचा पुढारीच इतरांना तयार करण्यासाठीं स्वतः थबकून राहिला कीं लोकांना उलटें नेतृत्व मिळतें. मग दुय्यम पुढारीही अव्वल पुढाऱ्याचा कित्ता गिरवून आपल्या मागील लोकांना पुढें घालण्यासाठीं स्वतःथबकून मागें वळतात व हाच क्रम पुढें चालून सारी सेनाच माघारी वळते. अशानें सत्याग्रहांतील स्फूर्ति नष्ट होते व चळवळीचा देखावा टिकवून धरण्यासाठीं विशिष्ट 'दिनां'

निमित्त कायदेभंगाला माणसें "पाठविण्यांत" येतात. सत्याग्रही सैनिकांना सेनापतीनें मागून ढकलणें ही सत्याग्रहाची विडंबना आहे. सेनापति सैनिकांस मागें वळून न पहातां पुढें जात राहूनच खेचूं शकेल. पुढाऱ्यानें कायदेभंगाचा प्रचार, तयारी व संघटना करावी, त्याखेरीज एकट्यानें व मुकाट्यानें कायदेभंग करण्यांत हांशील नाहीं हें खरें, परंतु ही सारी तयारी कायदेभंग पुकारण्यापूर्वीं करायची असते. विधायक लोकसेवा ही अशी तयारीच आहे. परंतु प्रत्यक्ष लढाईला तोंड लागल्यानंतरच जे शिलेदार जागे होतात तेच "मागें राहून" चळवळीला जोर आणूं पहातात, व अशानें असलेला जोरही मारून टाकतात. ते स्वतःच लाटेवर तरंगत व वहावत असतात, परंतु त्यांना वाटतें आपणच ही लाट उठविली व चालवीत आहों. ते स्वतःला "ब्रेन बिहाइंड दि मुव्हमेंट"– चळवळी मागील बुद्धि-बळ– म्हणावितात व तुरुंगांत जाणारांना "जेल फॉडर"– तुरुंगरूपी म्हशीला –दिलेला चारा-म्हणतात.

परंतु या प्रश्नाला दुसरी बाजूही आहे. कायदेभंगामुळें बहुजनसमाजामध्यें उसळणारा उत्साह ही एक अद्भुत शक्ति आहे. त्या शक्तीचें नीट नियंत्रण होईल व तिला योग्य दिशा मिळेल तरच ती हितकारक होईल; नाहींपेक्षां ती विध्वंसकही होईल. त्यासाठीं आवश्यक तें लोकशिक्षण आगाऊ द्यावयाचें असतें व प्रसंगानुसार जनता स्वतःचे पुढारी निर्माण करते, हे खरें असलें तरीही नवीन नवीन उसळणाऱ्या शक्तींचें योग्य नियमन करणारा एंजिनीयर, अर्थात् लोकमान्य पुढारी, जाग्यावर उपलभ्य असल्यानेंही फायदा होईल. त्यासाठीं तुरळक पुढारी तुरुंगांत न जातां मागें रहाणें इष्ट दिसतें. तरीपण हे मागें रहाणारे पुढारी संशयातीत सच्चाईचेच असले पाहिजेत व असें मागें रहाणें हा अपवादच समजला गेला पाहिजे

शिवाय त्यांच्या कारभारांत चोरटेपणा असूं नये. अर्थात् हें उघड मार्गदर्शन सरकार चालूं देईल तर व तोंपर्यंतच चालणार.

**करबंदी :—** सरकारला कर देणें म्हणजे पोसणें होय. तें सहकार्याचें स्पष्ट स्वरूप आहे. करबंदी हा असहकाराचाच प्रकार असला तरी तो नोकरी-कंत्राटें न करण्यासारखा सरकारपासून दूर रहाणारा प्रकार नसून दंड थोपटून सरकारशीं भिडणारा प्रकार आहे. करांचे दोन प्रकार असतात : प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष. शेतसारा व इन्कमटॅक्स् हेच मुख्य व नित्याचे प्रत्यक्ष कर होत. धंद्यावरील कर, आगमन-निर्गमनावरील कर, सुपरटॅक्स् या यांसारखे कित्येक प्रत्यक्ष कर कांहीं ठिकाणीं किंवा कांहीं वेळां लादले जातात. उपयोगाच्या वस्तूंवरील उदा० मीठ, मद्यें, घासलेट, पेट्रोल, साखर इत्यादींवरील कर, कीं जे उत्पादकांना व व्यापाऱ्यांना भरावे लागतात व गिऱ्हाइकांकडून न-कळत किंमत-वाढीच्या रूपानेंच वसूल केले जातात, ते अप्रत्यक्ष-कर. नाटक, सिनेमा इत्यादि करमणुकींवरील करही प्रत्यक्ष सरकारी नोकर वसूल करीत नाहींत तर नाटक-सिनेमांचे चालकच वसूल करून सरकारकडे भरतात. अप्रत्यक्ष कर चुकविल्यानें सरकारशीं विरोधाचा प्रसंग उद्भवत नसला तरी स्वतःची उपासमार करून घ्यावी लागते; त्यामुळें अप्रत्यक्ष-कर-बंदी विशिष्ट मर्यादेपर्यंतच शक्य होणार. प्रत्यक्ष कर न दिले तर मात्र सरकार जप्ती, लिलांव इत्यादि कडक उपाय योजून वसूली करील. त्यांपैकीं इन्कमटॅक्स् न देण्याची हिंमत व्यापाऱ्यांना होणें कठीणच. शेतसारा-बंदी हाच झेपण्याजोगा प्रकार आहे व त्याचा गेल्या पंचवीस वर्षांमध्यें अनेक ठिकाणीं अवलंब करण्यांत आलेला आहे. कारण कोणत्याही चळवळीला जोर चढायचा असेल तर त्यामध्यें सामील होणारा वर्ग मोठा व सलग असावा लागतो. शहरें सोडून बाकीच्या विभागांत जेथें रयतवारी पद्धति

अमलांत आहे तेथें बहुतेक मध्यम दर्जाचे गांवकरी शेतसारा भरणारे असतात, त्यामुळें शेतसारा बंदीला घाऊक पाठिंबा मिळून ती प्रभावी होऊं शकते. अन्यायाची चीड, प्रतिकार-बुद्धि व एकोपा हीं गांवकऱ्यांमध्येंच विशेष प्रमाणांत असतात. कांहीं अंशानें भोळेपणा व भाविकपणाही असतो. त्यामुळें त्यांना वळविणें प्रचारकांना अधिक शक्य होतें.

१. गांवकऱ्यांमध्यें एकांडेपणा नसतो. "गांवाबरोबर आपण," "दहांत मरण सुखाचें" ही दरेकाची प्रवृत्ति असते. त्यांचा व्यक्तिशः अग्रसेर होण्याकडे कल नसतो. व्यक्तिशः करबंदी करण्यास गांवकऱ्यांना तयार करणें दुर्घट असतें. वैयक्तिक करबंदीचे परिणाम अधिक जाचक होतील हेंही त्यांना कळत असतें.

२. शिवाय गांवकरी शेतकऱ्यांना अखिल भारतीय राजकारणाविषयीं आस्था कमी असते. सारावाढीविरुद्ध सत्याग्रह करण्यास ते जसे स्वयं-प्रेरणेनें सरसावतील तसे स्वराज्यार्थ करबंदी करण्यास केवल स्वयंप्रेरणेनें पुढें येणें असंभवनीय आहे. करबंदीच्या चळवळीला प्रसिद्धि देणें व तिला सार्वत्रिक सहानुभूति संपादिणें हीं कामेंही गांवकऱ्यांना जुळणारीं नसतात. त्यामुळें करबंदीच्या चळवळीचे प्रणेते व संघटनाकार बहुधा शहरवासीच असतात. या पुढाऱ्यांचा करबंदीशीं साक्षात् संबंध नसतो; म्हणजे ते वस्तुतः बेजबाबदार असतात. परिणामीं ते वृत्तीनेंही बेजबाबदार होण्याचा धोका असतो. "पाहुण्याकडून साप मारावा" तसें शेतकऱ्यांना परभारें सरकार-बरोबर लढविलें जाण्याचा संभव असतो.

३. करबंदी हा कायदेभंगाप्रमाणें तात्कालिक किंवा चटकन करून मोकळें होण्याचा कार्यक्रम नव्हे. तो ज्यास्त धिमा व चिकाटीचा कार्यक्रम आहे. त्यामुळें त्याचेमध्यें बेदादपणाला स्थान नाहीं. परंतु करबंदी

परिणामकारक करण्याचे दृष्टीनें, तसेंच वर वर्णिलेली खेडवळ मनोरचना लक्षांत घेऊन, पुढारी करबंदीला सामुदायिकच नव्हे तर विशिष्ट टापूपुरतें सार्वत्रिक स्वरूप देण्याचा प्रयत्न करतात. परंतु धारेकऱ्यांमध्येंसुद्धां नाना कारणांनीं सरकारचें अंकित, ओशाळे किंवा मिंधे असे अनेक लोक असतात. अशांना त्या चळवळींत सामील होणें जड असतें. परंतु "त्यांना मोकळें सोडून कसें चालेल?" त्यांनाही संपांत सामील करून घ्यावें लागतें; व त्यासाठीं आग्रह, दडपण इत्यादि वापरावीं लागतात.

परंतु बाकीचे लोकही सत्याग्रह करतील आणि शेवटपर्यंत दृढ रहातील या अपेक्षेनें, किंवा या अटीवर, केलेला सत्याग्रह हा गौण दर्जाचा सत्याग्रह आहे. अशा चळवळीची चढती कमान असेपर्यंत सर्व ठीक असतें. त्याच स्थितींत तिची फत्ते झाली तर मग प्रश्नच नाहीं. (त्यावेळींही यशाचा वांटा कोणाला किती मिळावा याविषयीं वाद उद्भवतील, परंतु तूर्त आपण त्याचा विचार करण्याचें कारण नाहीं.) परंतु चळवळीला उतरती कळा लागली, कांहीं व्यक्ति दुर्बलता दाखवूं लागल्या, म्हणजे चळवळ ढांसळूं नये यासाठीं दुर्बळ जोडीदारांवर जबरदस्ती करावी लागते, व त्याही उपर चळवळ ढांसळली म्हणजे जनतेची उमेद व परस्परांबद्दलचा विश्वास यांना मोठा धक्का बसतो.

(४) सार्वत्रिक करबंदीमध्यें मारून मुटकून सामील करून घेतलेल्या लोकांना सत्याग्रहाचे जे परिणाम भोगावे लागणार ते शक्य तों हलके करण्याची जबाबदारी पुढाऱ्यावर येऊन पडते, व त्या दृष्टीनें ते प्रयत्नाला लागतात. सरकारच्या वसूलीच्या प्रयत्नांत अधिकांत अधिक अडथळे आणणें जरूर असतें. त्यासाठीं सरकारला हस्तक मिळूं नयेत अशी खबरदारी घ्यावी लागतें. गांवचे पोलीस पाटील व तलाठी यांजकडून राजिनामे देववावे

लागतात. जप्तीच्या प्रसंगीं कोणी पंच मिळूं नये असें करावें लागतें. जप्त करण्यासारखा माल सरकारच्या हातींच मिळूं नये अशासाठीं लपवाछपवी केली जाते. सरकारला वाहनें व हमाल मिळूं नयेत असाही बंदोबस्त करावा लागतो. अशातऱ्हेनें सामुदायिक साराबंदीमध्यें आत्मयज्ञापेक्षां लपवाछपवी, अडवणूक, दडपण इत्यादि डावपेंचांनाच प्राधान्य मिळतें. अशानें तात्पुरतें यश मिळेलही परंतु परिणामीं हे प्रकार अंगलट आल्याखेरीज रहाणार नाहींत.

साराबंदींतील हे धोके दाखविण्याचा हेतु साराबंदीचा कधीं अवलंबच करूं नये असें म्हणण्याचा नाहीं, तर हे धोके टाळण्याचे जागरूकतेनें प्रयत्न व्हावेत एवढेंच सांगण्याचा आहे. साराबंदीचे पुढारी परस्थ शहरवासी असल्यास ते संशयातीत कळकळीचे असावे. त्यांची स्वतःची इतरत्र जमीन असेल तर तेथें स्वतः व्यक्तिशः अगोदर करबंदी करून नंतरच त्यांनीं या टापूंतील नेतृत्व स्वीकारावें. चळवळीला सार्वत्रिक स्वरूप देण्याची घाई करूं नये. कायदेभंगाप्रमाणेंच करबंदी हीसुद्धां वैयक्तिक बाब असावी. इतरांकडून साथ मिळण्याची अपेक्षा न ठेवितां स्वतःचे हिमतीवर व्यक्तींनीं ती सुरू करावी व व्यक्तींकडून व्यक्तींकडे पसरतां पसरतां क्रमाक्रमानें तिला सार्वत्रिक स्वरूप यावें हीच सर्वोत्तम रीत होय.

इतरांची मदत मिळविण्यासाठीं किंवा विरोध निवारण्यासाठीं विनंती, आग्रह किंबहुना मित्रत्वाचें दडपण यांचा उपयोग करण्यास हरकत नाहीं, परंतु धमकी किंवा पारिपत्य यांचा कसल्याही प्रसंगीं उपयोग करूं नये.

आणखी एका बाबतींत जपलें पाहिजे. अवर्षण किंवा पिकांचे रोग यांमुळें शेतीचें नुकसान झालें असतां शेतकऱ्यांस साऱ्याची सूट किंवा तहकुबी मिळणें रास्त असतें. ती न मिळाल्यानें किंवा साऱ्याची फेर

आकारणी होऊन वाढ झाल्यानें शेतकरी असंतुष्ट असतात. परंतु हीं गाऱ्हाणीं राजकीय स्वरूपाचीं नसून प्रजाकीय किंवा शेतकीविषयकच असतात. असल्या गाऱ्हाण्यांचा उपयोग स्वराज्याच्या, म्हणजे क्रांतीच्या, चळवळीसाठीं करून घेणें वाजवी नाहीं. तसें केल्यानें शेतकऱ्यांचा द्रोह केल्याप्रमाणें होईल. त्या गाऱ्हाण्यांची दाद सनदशीर भूमिकेला धरून मागतां व मिळवितां येते. सनदशीर भूमिकेवरून सारावंदी करतां येते व करावीही. याच्या उलट सारा-सवलतीची मागणी व स्वराज्याची मागणी यांची गल्लत केल्यानें सवलत मिळण्यास अडचण पडेल, व शेतकऱ्यांना बेभरंवशानें खोलपाण्यांत नेल्याप्रमाणें होईल. अशानें सवलतही जाईल व स्वराज्यही दुरावेल. याच्या उलट, सनदशीर मार्गानें म्हणजे तात्कालिक गाऱ्हाण्यांच्या निराकरणाची दृष्टि ठेवून शेतकऱ्यांस न्याय मिळवून दिल्यानें त्यांचें हित होईल व तेणें करून त्यांच्यामध्यें जी आत्मविश्वासाची वृद्धि होईल ती क्रमाक्रमानें स्वराज्य-संपादनालाही उपकारक होईल.

एवढ्या खबरदारीनिशीं सारा-बंदी हातीं घेतली व तिचा प्रसार झाला तर त्याच्या इतकें सरकारला नमण्यास लावणारें दुसरें तीव्र शस्त्र क्वचित्‌च असेल. सारा-बंदी हें बैठें बंडच आहे.

जेथें सरकार-दस्त भरण्याची जबाबदारी बड्या जमीनदारांवर असते तेथें ते स्वराज्यार्थ सारावंदी करतील ही आशा दुराशा आहे. अपवादादाखल एखाद दुसरा जमीनदार देश-भक्तीनें प्रेरित होऊन सारावंदीसत्याग्रहांत सामील होऊं शकेल किंवा सत्याग्रहाची चळवळ फार प्रभावी होऊन विद्यमान सरकार ढांसळणार अशीं चिह्नें दिसूं लागल्यास बहुसंख्य जमीनदारही सत्याग्रहांत सामील होऊं शकतील. परंतु त्यांच्या भरंवशावर आपण चळवळीची उभारणी करूं शकत नाहीं. जमीनदारांवर सारावंदी करण्याचें

दडपण आणण्याचा उपाय म्हणून त्यांचे कुळांनीं त्यांस खंड देतांना सरकार-दस्ताइतकी कपात करूनच द्यावा असें सुचवितां येईल. तथापि तोही अंतःस्थ वितुष्टाचा व तेवढ्या अंशीं अडचणींचा मार्ग आहे.

**शस्त्रविनाशः** — असहकार, कायदेभंग व करबंदी यांपेक्षांही सरकारच्या जुलमी सत्तेचीं साधनें ताब्यांत घेणें हा अधिक चढाईचा व प्रतिकारमय कार्यक्रम आहे. याचीं कांहीं निर्दोष रूपें कल्पितां येतील. उदा० लाठीहल्ला करणाऱ्या पोलिसांच्या हातांतील लाठ्या हिरावून घेणें. कसलाही प्रतिकार न करतां व पाठही न दाखवितां धैर्यानें लाठ्या खाणें हा श्रेष्ठ प्रकार आहे, पण त्याऐवजीं आपल्या डोक्यावर उतरणारी लाठी वरचेवर झेलून हिसकून घेण्यानें अहिंसेचा भंग होतो असेंही नाहीं. अहिंसानिष्ठ इसमानें प्रतिपक्षाच्या शस्त्राघातांची हौस मानण्याचें कारण नाहीं. निरुपद्रवी जमावावर गोळ्या चालवूं पहाणाऱ्या शिपायाच्या हातचीं बंदूक किंवा दंगेखोर गुंडाच्या हातचा सुरा काढून घेणें यांत कांहींच गैर नाहीं. खून चढलेल्या गुंडाला त्याचा आवेश ओसरेपर्यंत पकडून आवरून धरणेंही उचित आहे.

परंतु हेच प्रकार अधिकाधिक ताणीत गेल्यास त्यांचें मूळ स्वरूपच पालटून जाईल. आक्रामकाच्या शस्त्रास्त्रांचा विनाश उचित आहे किंवा चालूं शकेल असें मानलें तरी निर्दोष इसमावर उगारलेलें किंवा उगारण्याच्या तयारींत असलेलें शस्त्र व तेंच शस्त्र आपल्या नित्याच्या जागीं असलेलें यांमध्यें फरक केला पाहिजे. पोलिसाची माझे डोक्यावर आदळणारी लाठी हिसकून घेणें ठीक असलें तरी पोलीस-कचेरींत सांठवून ठेविलेल्या लाठ्यांचा नाश करण्याचा अधिकार मला पोंचत नाहीं; आणि सामान्य बांबूचा, त्यांच्या लाठ्या बनवितां येतात म्हणून, नाश करणें अधिकच अनुचित ठरेल.

**शस्त्रावरून साधनावरः**—शस्त्र-नाशाचा न्याय साधन-नाशाला लावणें हा दूरान्वय होईल. ज्या मोटर लॉरींत बसून पोलिसांची किंवा लष्कराची तुकडी आमच्चेवर चालून येते त्या लॉरीचा विध्वंस, ज्या रेल्वेमुळें सरकार आपल्याला कह्यांत ठेवूं शकते त्या रेल्वेचे रूळ उखडणें, स्टेशनें जाळणें किंवा पूल पाडणें, पोस्ट-ऑफिसें जाळणें, तारेच्या व टेलिफोनच्या तारा तोडणें, हें सर्व प्रतिपक्षाच्या साधनांच्या विनाशामध्यें येईल हें खरें, परंतु त्याच दिशेनें विचार करीत पुढें गेल्यास सरकारी नोकर रहातात, उतरतात किंवा उतरूं शकतील अशीं घरें किंवा ज्या रस्त्यांनीं ते जातात ते रस्ते, हीं देखील आक्रमणाचीं किंवा जुलमाचीं प्रत्यक्ष किंवा निदान संभाव्य साधनें आहेत.

परंतु साधनें हीं मुळांत निरुपद्रवी असून त्यांचा उपयोग जुलमी अमलासाठीं तसाच जनतेच्या रास्त सुख-सोयींसाठींही होत असतो. त्यांच्या विध्वंसनामुळें जनतेच्या रास्त व्यवहारालाही मोठा व्यत्यय येतो व असा अनिच्छित व्यत्यय आणणें म्हणजे हिंसाच आहे. उदा० एकादें पोस्ट-ऑफिस जाळण्यांत आलें कीं हजारों नागरिकांची नानाप्रकारें अडचण होते. त्यांतील कांहीं लोक आपापली अडचण आनंदानें सहन करतील असें मानलें तरी शेकडों लोक नाराजही होतील.

आणि ज्या नागरिकांना तें विध्वंसन पसंत असेल त्यांनीं मुळांतच पोस्ट-ऑफिसावर बहिष्कार कां घालूं नये? मी पोस्टाचा फायदा घेऊं इच्छितों व त्याबरोबरच त्याचें विध्वंसनही इच्छितों या परस्पर-विरुद्ध गोष्टी आहेत. मी स्वतः दारूही प्यावी व गुत्त्यालाही आग घालावी, हें निरर्थक आहे.

अशा अनिच्छित व्यत्ययामुळें सत्याग्रहाविषयींची जनतेची सहानुभूति नष्ट होते व तिचे जागीं विरोध उद्भवतो हें लक्ष्यांत घेतलें पाहिजे. अश

विध्वंसनाला दहशतवादाचें रूप येणें अपरिहार्य आहे.

हें विध्वंसनकार्य गुप्तपणें केल्यानें तर त्याचें दहशतवादी स्वरूप अधिकच तीव्र होतें. खरा गुन्हेगार न सांपडल्यानें भलत्याच लोकांना, किंवा सामुदायिक दंडाच्या रूपानें साऱ्याच लोकांना, शिक्षा भोगावी लागते. ध्येयासाठीं स्वेच्छेनें भोगलेले, छातीवर झेललेले, क्लेश उन्नतिकर होतात. परंतु इच्छा किंवा तयारी नसतां भोगावे लागलेले, पळत्या पाठीवर लादले गेलेले, क्लेश आत्म्याच्या अवनतीला कारणीभूत होतात. सत्याग्रहाच्या लढ्याची मूळ खुबीच ही आहे कीं ज्याची तयारी असेल त्यानेंच, जितकी तयारी असेल तितकेच, क्लेश ध्येयसिद्धीसाठीं सोसावे. अशानें सर्वांची क्रमशः उन्नतिच होत रहाते, व कोणाचाही अवसानघात होत नाहीं. परंतु गुप्त विध्वंसनामुळें ज्यांची तयारी नाहीं असे लोकही सरकारच्या दडपशाहीला बळि पडतात, किंवा अडचणींत पकडले जातात. त्यापासून जनतेची धमक व एकोपा यांस बाध येतो.

सार्वजनिक मालमत्तेचा सर्वांच्या संमतीखेरीज केलेला विनाश हिंसक ठरतो हा मुद्दा बाजूला ठेवला तरीही सत्य व व्यक्तिगत अहिंसा पाळून, म्हणजे हत्या, दुखापत, धमकी, अपमान इत्यादि हिंसक प्रकार व गुप्तता हीं टाळून सरकारी मालमत्तेचा कब्जा घेणें किंवा विनाश करणें फारसें शक्य रहात नाहीं. जाहीरपणें किंवा अधिकाऱ्यांना नोटीस देऊन विध्वंसन करूं पहाणें याचा अर्थ विध्वंसनाच्या निमित्तानें स्वतःला अटक करून घेणें किंवा लाठ्या-गोळ्या खाणें, म्हणजे आत्मबलिदानासाठीं विध्वंसनाचें निमित्त पुढें करणें, एवढाच होतो. १९३० सालीं आगाऊ जाहीर करून मिठागरांचा कब्जा घेण्याच्या निमित्तानें शेंकडों, हजारों सत्याग्रहींनीं मार व तुरुंगवास सहन केला. १९३२ सालीं सरकारनें जप्त केलेल्या काँग्रेसच्या

किंवा कॉंग्रेसजनांच्या घरांचा परत कब्जा मिळविण्याच्या निमित्तानें अनेक सत्याग्रही तुरुंगांत गेले. यांत 'कब्जा घेणें' ही तोंडची वढाईच होती, प्रत्यक्ष फळ मार किंवा तुरुंगवास हेंच होतें.

कब्जा घेणें व विनाश करणें हे दोन्ही चढाऊ कार्यक्रम आहेत एवढ्यापुरतें दोहोंमध्यें साम्य असलें तरी दोहोंच्या दृष्टीमध्यें महत्त्वाचा फरक आहे. दुसऱ्यांत एक प्रकारचा विघ्न-संतोषीपणा आहे, तो पहिल्यांत नाहीं.

ऑगस्ट १९४२ च्या चळवळीमध्यें विध्वंसन-कार्याचा मोठ्या प्रमाणांत प्रयोग झाला. त्यामध्यें गुप्तपणा तर सांगून-सवरूनच होता व अहिंसेची व्याख्या "हत्त्या, इजा किंवा खासगी मालमत्तेचें अपहरण न केलें म्हणजे झालें" एवढीच मानण्यांत आली होती. धमकी व बलप्रयोग यांस सूट होती. परंतु धमकी व अपमान ही शारीरिक दुखापतीपेक्षांही अधिक तीव्र प्रकारची हिंसा आहे. "हत्त्या, दुखापत इत्यादि टाळण्याची पूर्ण खबरदारी घेतल्यास तारा तोडणें, रूळ उखडणें इत्यादि कार्यक्रम अहिंसेंत बसूं शकतील" अशी त्यावेळीं अनेकांची समजूत झाली होती. त्या स्थितींत सुद्धां गुप्तता व धमकी हीं वर्ज्य समजलीं जातीं तर तेवढ्यानेंही विध्वंसनाला सहजींच पुष्कळ आळा बसला असता. पुढें गांधीजी तुरुंगांतून सुटून आल्यानंतर तर त्यांनीं सार्वजनिक मालमत्तेचा नाश हीच हिंसा आहे हा मुद्दा स्पष्ट केला.

**विध्वंसन व विश्वासघात :—** विध्वंसनाचे कार्यक्रमांमध्यें चोरटेपणाबरोबर एक प्रकारचा विश्वासघातही येऊन जातो. तलाठ्याला किंवा पोष्टाच्या रनरला लुटणें, तसेंच पोस्टऑफिस किंवा रेल्वे स्टेशन जाळून टाकणें असले प्रकार अनपेक्षित रीत्या—असें कांहीं होईल याची कोणाला

आशंकाही नसेल तरच—पार पाडतां येणार. पोलीस बंदोबस्त अमुक हद्दीपर्यंत ठिकठिकाणीं ठेवण्यांत येत असला तरीही समाजाचा व्यवहार बहुतांशीं विश्वासानेंच चाललेला असतो. विध्वंसनानें त्या विश्वासाला धक्का बसतो. जातीय दंग्यांत रस्त्यांतील निःशंक वाटसरूंवर होणारे भोसकाभोसकीचे प्रकार ज्याप्रमाणें विश्वासघातकी असतात, त्याचप्रमाणें निःशंक रनरची लूट सुद्धां विश्वासघातकी आहे.

असले प्रकार स्वराज्याच्या चळवळीच्या नांवाखालीं घडतील अशी सरकारची कल्पनाही नव्हती म्हणूनच ते इतक्या सुलभतेनें घडूं शकले. आमच्या स्वराज्याच्या चळवळीचें मोडतोड-जाळपोळ-लूटफाट हें स्थायी अंग आहे असें जर ठरलें तर ते प्रकार इतके सोपे रहाणार नाहींत. मग त्यांतील विश्वासघातकीपणा अधिकाधिक विस्तृत व खोल करीत जावा लागेल. सरकारच्या हेरागिरीला पुरून उरण्याकरतां आपल्याला हेरगिरी व फंदफितुरी, गुप्तता व लबाडी फार मोठ्या प्रमाणांत व दीर्घकाळपर्यंत करावी लागेल. आपल्याच साथीदारांपैकीं कोणीं लोभानें किंवा दुबळेपणानें गौप्यस्फोट करूं नये यासाठीं आपल्याच साथीदारांना जरब दाखवावी लागेल. एकादा साथीदार पोलिसांच्या हातीं लागला व पोलिसांच्या यातनांना भिऊन तो गौप्यस्फोट करील असा संभव वाटला तर इतर अनेकांच्या रक्षणासाठीं त्याला एकट्याला यमसदनाला पाठविण्याचाही मोह अनावर होईल. हे अनुभव यापूर्वी आलेले आहेत व यापुढेंही येतील.

विध्वंसन व त्यासाठीं गुप्तकट या प्रकारांमध्यें असे निकराचे प्रसंग येण्याचा संभव असतो कीं त्या प्रसंगीं एवढ्याशा गफलतीमुळें किंवा अपयशामुळें संपूर्ण कार्याचा नाश होणार असें स्पष्ट दिसत असतें. एकादी चिठी, एवढीशी खबर किंवा एकादा मनुष्य पोलिसांच्या हातीं लागला,

किंवा विशिष्ट निरोप विशिष्ट मुदतींत पोंचला नाहीं, तर भलताच अनर्थ ओढवण्याचा संभव असतो. मग तो मोठा अनर्थ टाळण्यासाठीं छोटेंसें पण घोर कृत्य करणें कर्तव्य-प्राप्तसें वाटतें. अशा तऱ्हेनें कार्यकर्त्यांनीं स्वतःवर घालून घेतलेल्या मर्यादा हळुहळू सुटून चळवळीचा क्रमाक्रमानें अधःपात होत जातो. तो अधःपात टाळायचा असेल तर मुळांतच विध्वंसन व त्यासाठीं गुप्तता हीं वर्ज्य केलीं पाहिजेत.

**दूरगामी परिणामः**—भूमिगत चळवळीचे दूरगामी परिणाम अधिकच अनर्थकारक व सारें सार्वजनिक जीवन कलुषित करणारे होण्याचा दृढसंभव आहे. भूमिगत पुढाऱ्याला जनतेशीं संबंध राखणें आवश्यकच आहे. त्यासाठीं त्याला अशा हस्तकांची जरूरी असते कीं जे स्वतः उघडपणें वावरूं शकतील. या हस्तकांनीं फिरायचें असतें उघडपणें, पण काम करायचें असतें भूमिगत संघटनेचें. तें त्यांना बेमालूमपणें करतां यावें, पोलिसांना संशय न येतां प्रवास करतां यावा, म्हणून त्यांना एखादी एजन्सी किंवा तसलेंच कसलें तरी 'आच्छादन' वापरावें लागतें. त्यासाठीं त्यांना काँग्रेसच्या विविध कार्यांतच प्रवेश मिळेल तर पाहिजे असतो. परंतु अशा अवांतर हेतूनें येणाऱ्या कार्यकर्त्याला काँग्रेसच्या अधिकाऱ्यांनीं आश्रय न दिल्यास मग त्यांचेशीं सुद्धां प्रतारणा करणें त्या हस्तकाला अपरिहार्य बनतें. अर्थात् सरकारशीं सुरू केलेला लपंडाव स्वकीयांवरही चालवावा लागतो, व 'इच्छी-परा तें येई घरा' या म्हणीचें प्रत्यंतर येतें. राजकारणांतील लबाडी अशा तऱ्हेनें साऱ्या राष्ट्रीय जीवनालाही बाधते. सार्वजनिक जीवनांत शत्रु व मित्र यांमधील फरक ओळखणें अवघड बनतें व सारें सार्वजानिक जीवनच संशयाकुल बनून जातें.

असो. होऊन गेलेल्या चुकांबद्दल कोण किती जबाबदार आहे, त्याची

छाननी करण्यापासून आतां कांहींच लाभ नाहीं. एकमेकांस दूषण देणें म्हणजे हिंसाच होय. परंतु अनुभवानें शहाणे होण्याची व चुका सुधारण्याची दक्षता मात्र आपण घेतली पाहिजे.

अहिंसक प्रतिकार हें आपलें साधन. अहिंसा व प्रतिकार यांची सांगड घातली पाहिजे. प्रतिकारावर भर देतांना अहिंसेचा विसर पडतां कामा नये; तसेंच अहिंसेचा जप करीत निष्क्रिय राहून ही चालणार नाहीं. अहिंसेच्या असल्या तोंडी पूजेंतून हिंसा बळावते.

**नेतृत्व व संघटना:**—स्वराज्य-प्राप्तीसाठीं करावयाच्या नानाविध प्रयत्नांचें तात्त्विक विवेचन आपण येथवर केलें. परंतु तें केवळ पुस्तकी पांडित्य झालें. मुत्सद्दी व नेता होण्यास पांडित्य पुरेसें नाहीं. त्यासाठीं तारतम्य व समयज्ञता पाहिजेत. प्रचार, सेवा व प्रतिकार आणि त्यांचीं उपांगें यांस कोणत्या वेळीं, कोणत्या प्रसंगीं, किती महत्त्व द्यावयाचें याचें पंडिती शास्त्र बनवितां येणार नाहीं. ती कला आहे. आम्ही सामान्य सिद्धांत एवढाच सांगूं शकतों कीं यांतील कोणतेंही एकेकटें कार्यसिद्धि घडवून आणूं शकणार नाहीं. तिहींची योग्य प्रमाणांत सांगड घातली पाहिजे. त्यासाठींच राजकारणांत अचूक नेतृत्वाला इतकें महत्त्व आहे.

नेतृत्वाइतकेंच महत्त्व संघटना, एकजूट व शिस्त यांसही आहे. स्वराज्याचा लढा ही एकप्रकारची रस्सीखेंच आहे. रस्सीखेंचच्या सामन्या-मध्यें इशारा मिळतांच एकाच क्षणीं सर्वांनीं आपापल्या शक्तीची पराकाष्ठा करण्यावर विजय अवलंबून असतो; कांहींजण जोरजोरानें खेंचीत असतां इतर दम टाकूं लागले तर सारे श्रम वायां जातात.

राष्ट्राची संघशक्ति वाढण्यासाठीं कॉंग्रेसची संघटना देशभर पसरली पाहिजे व प्रभावी झाली पाहिजे. नुसते चार आणे देणारे नव्हेत तर कॉंग्रेसचे

बहुमतानें ठरणारे आदेश मनोभावानें पाळणारे लक्षावधि आणि कोट्यवधि सभासद झाले पाहिजेत. काँग्रेस हें एक प्रतिसरकार बनलें पाहिजे. केवळ काँग्रेस कार्यालाच वाहिलेल्या सेवकांची प्रचंड सेना काँग्रेसपाशीं जय्यत तयार पाहिजे. या काँग्रेस ( रूपी )–सरकारला लोकांनीं स्वेच्छेचा करभार व स्वेच्छेचा आज्ञामान दिला पाहिजे. काँग्रेसच्या अधिकाऱ्यांमध्यें व खऱ्या सेवकांमध्यें निष्ठा, कळकळ, त्याग, शिस्त, नम्रता, भ्रातृभाव यांचा जसजसा प्रकर्ष होईल तसतशीच ही संघटना अधिकाधिक व्यापक व खोल होऊं शकेल.

आणि पूर्वी विधायक कार्यक्रमाचा विचार करतांना म्हटल्याप्रमाणें राष्ट्रांतील निरनिराळया वर्गांमध्यें परस्परांविषयीं विश्वास व स्नेहभावना हीं दृढ झालीं पाहिजेत. जातीय ऐक्य, अस्पृश्यतेचें म्हणजे सामाजिक विषमतेचें निवारण, जमीनदारांचें कुळांविषयीं व भांडवलदारांचें मजुरांविषयीं जिव्हाळ्याचें, बंधुत्वाचें व समतेचें वर्तन, दलितसेवा, व्यसन–निवृत्ति, सार्वत्रिक म्हणजेच ग्रामीण उद्योगांची वाढ, लोकशिक्षण इत्यादि गोष्टी सिद्ध होतील तर व तसतसेंच हें संघटनेचें कार्य यशस्वी होऊं शकेल, एरवीं होणार नाहीं.

तथापि विधायक सेवा-कार्याखेरीज संघटनेलाही स्वतंत्र महत्त्व आहे हें विसरून चालतां येणार नाहीं. काँग्रेसचें 'यंत्र' समर्थ व घर्षण-मुक्त असें बनलें पाहिजे. त्याचेमध्यें शिस्त व सुरळीतपणा आला पाहिजे. तें व्यक्तिनिरपेक्ष असलें पाहिजे. पुढारी तुरुंगांत गेला, हद्दपार झाला किंवा मृत्युमुखीं पडला तरी मागें गोंधळ माजणार नाहीं अशी व्यवस्था योजलेली असली पाहिजे. या दृष्टीनेंही आपल्याला अद्याप पुष्कळ मजल चालून जावयास पाहिजे आहे.

**ध्येयवादित्व व देहासक्तिजय :**— या साऱ्या प्रयत्नांचें व चळवळींचें सार ध्येयवादित्व व देहासक्तिजय यांमध्यें आहे. स्वातंत्र्य हें आपलें उदात्त व पवित्र ध्येय आहे. त्या ध्येयाच्या प्राप्तीसाठीं सर्वस्व पणाला

लावण्याची आपली तयारी असली पाहिजे. त्या ध्येयासाठीं जन्मोजन्म वाटेल तेवढे देह–स्वतःचे व स्वकीयांचे–होमिण्यांत आपण धन्यता मानली पाहिजे. "मरेन पण स्वतंत्र होईन" हा आपला मंत्र. अशा ध्येयवादी माणसाला व राष्ट्राला कोणतीच शक्ति बंधनांत ठेवूं शकणार नाहीं.

शिकंदर बादशहा हिंदुस्थान जिंकून परत स्वदेशीं चालला तेव्हां इकडून हिरे, माणकें, दास-दासी, तसेंच हत्ती, घोडे, रथ व तऱ्हेतऱ्हेच्या कलाकृति घेऊन निघाला. परंतु त्याच्या मनांत आलें कीं हिंदुस्थानचे तपस्वी प्रसिद्ध आहेत, तरी अशा एकाद्या जटाधारी हिमालयीन तपस्व्याला आपण एक प्रेक्षणीय चीज म्हणून आपल्या राजधानींत घेऊन जाऊं या. म्हणून तो एका तपस्व्याकडे गेला व त्याला प्रणाम करून आदरपूर्वक आपल्या बरोबर ग्रीसला चालण्याचा आग्रह करूं लागला. आपण तुम्हाला अंबारींत बसवून नेऊं व राजधानींत तुमची उत्तम बरदास्त ठेवूं इत्यादि प्रलोभनें दाखवूनही जेव्हां तो तपस्वी कबूल होईना तेव्हां मात्र शिकंदरनें त्याला पकडून मुसक्या बांधून नेण्याची धमकी दाखविली. त्यावर तो तपस्वी खदखदां हसून म्हणाला "हा रे वेड्या! मला रे तूं कसा पकडून नेणार? हां, तूं माझें मढें खुशाल उचलून नेऊं शकशील पण मी व माझें मढें यांतील फरक का रे तुला कळूं नये?"

शिकंदर बिचारा ओशाळा होऊन परतला! त्या तपस्व्यानें आपल्याला मुक्तीचा अमर संदेश दिलेला आहे. अमर आयरिश देशभक्त टेरेन्स मॅकस्विनी याला ब्रिटिशांच्या बंधनांत व तुरुंगांत रहाणें कबूल नव्हतें. त्यानें तुरुंगाच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना सांगितलें: "दोन महिन्यांच्या आंत मी तुमच्या बंदींतून निसटून जाईनच जाईन; जिवंत नाहीं तर मरून". आणि त्यानें आपला शब्द खरा केला.

आपणामध्यें सुद्धां "अळणी खाईन पण मिठाचा कर देणार नाहीं, चहा सोडीन पण साखरेवरील कर सरकारला लाभूं देणार नाहीं, उघडा फिरेन पण विलायती कपडा शरीराला स्पर्शूं देणार नाहीं, उपाशी मरेन पण सरकारची नोकरी करणार नाहीं" असें म्हणणारे स्वातंत्र्य-वीर कमी आहेत असें नाहीं.

**प्राणयज्ञ ?**:—मात्र या ध्येयनिष्ठेबरोबरच आपल्यामध्यें धीर व उद्यमशीलताही पाहिजेत. अहिंसेची ती अनिवार्य शर्त आहे. उतावळ ही हिंसेची निशाणी आहे. "स्वराज्यासाठीं प्रतिपक्षाला मारायचें नसेल तर स्वतः मेलें पाहिजे" असें म्हणून क्वचित् कोणी प्रतिपादतात कीं "स्वराज्यासाठीं आपण एकेका वेळीं हजारांनीं प्राणयज्ञ करूं या. स्वतंत्रता-देवीला अशा तऱ्हेनें एक लाख शिरकमलें वाहूं या म्हणजे ती प्रसन्न होईल." त्यासाठीं सामुदायिक आत्महत्त्येचा कार्यक्रम सुचविण्यांत आला होता.

या सूचनेमध्यें निःसीम उत्कटता आहे परंतु अहिंसा नाहीं. अहिंसेची व्यर्थता सिद्ध करण्याचाच तो मार्ग आहे. हेतु-पुरःसर नसली तरी अजाणतां त्यामध्यें अशी अपेक्षा आहे कीं एवढ्या घोर प्राणयज्ञानेंही स्वातंत्र्य मिळालें नाहीं म्हणजे राष्ट्र अहिंसेचा मार्ग निर्धारपूर्वक सोडून देईल व चवताळून हिंसेच्या मार्गाला लागेल.

अहिंसेचा मार्ग हा असा उतावळा मार्ग नाहीं. तो धीराचा, दृढ प्रयत्नाचा, दीर्घोद्योगाचा व योजकतेचा मार्ग आहे. एका वर्षांत स्वराज्य न मिळालें तर हजार वर्षें झटून आपण तें मिळवूंच मिळवूं अशा शांत व दृढ निश्चयानें आपण उद्योगाला लागूं; माणसें जोडीत जाऊं.

अहिंसेचा धोपट रस्ता हाच कितीही चढणीचा वाटला तरी जवळचा मार्ग आहे. आम्हांला स्वराज्याची उतावळ लागलेली आहे, म्हणूनच आपल्याला आडवाटा धरून पुन्हां पुन्हां ठेचा खाण्यास फुरसत नाहीं.

# अहिंसेचीं इतर क्षेत्रें

आपण आतांपर्यंत परकी सरकारशीं करावयाच्या अहिंसक लढ्यांतील निरनिराळ्या पवित्र्यांचा विचार केला. अहिंसावृत्ति प्रजेच्या अंतर्गत व्यवहारांत विविध सेवाकार्यांमध्यें परिणत होत असते, ती तशी कार्यान्वित झाल्यानें अधिक दृढही होते व तिच्यांतून स्वराज्यसंपादनार्थ आवश्यक असलेल्या अहिंसक शक्तीचीही वृद्धि होते. या प्रकरणांत प्रजेच्या अंतर्गत व्यवहाराच्या दोन मुख्य क्षेत्रांत सुद्धां अहिंसा कशी युक्त व उपयुक्त आहे त्याचा विचार करावयाचा आहे. तीं दोन क्षेत्रें जाती-जातींतील संबंध व वर्गावर्गांमधील संबंध हीं होत.

हिंदुस्थान व ब्रिटेन यांचेमधील आंतर्राष्ट्रीय संबंधांची न्यायशुद्ध जुळणी अहिंसेनें करण्याची जर आपण उमेद बाळगतों तर हिंदु-मुसलमान व मालक-मजूर किंवा जमीनदार-कुळें यांचे मधील संबंधांची जुळणी अहिंसेनें करणें आपल्याला शक्य झालें पाहिजे. आणि तें शक्य झाल्यास आंतर्राष्ट्रीय क्षेत्रांत अहिंसेचा यशस्वी प्रयोग करण्याच्या आपल्या शक्तीमध्यें महत्त्वाची भर पडेल.

**हिंदु-मुसलमानः**—प्रथम जातीय प्रश्न घेऊं. हिंदु-मुसलमानांचा प्रश्न प्रामुख्यानें आपल्या नजरेसमोर उभा रहातो. परंतु सीख, पारसी, ख्रिश्चन इत्यादींच्या संबंधांचा प्रश्न त्याच प्रश्नांत अंतर्भूत आहे. तसेंच हिंदु-मुसलमानांचा प्रश्न व ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचा किंवा स्पृश्य-अस्पृश्यांचा प्रश्न हे तत्त्वतः एकच आहेत. हे सारे प्रश्न मूलतः एकाच स्वरूपाचे आहेत;

निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या प्रश्नांना कमी-अधिक तीव्र स्वरूप येतें एवढेंच. ब्राह्मण-ब्राह्मणेतर-वादांतून उद्भवणाऱ्या कटकटींचासुद्धां महाराष्ट्राला तरी अनुभव मिळून चुकलेला आहे. स्पृश्यांकडून अस्पृश्यांवर होणाऱ्या नाना प्रकारच्या अत्याचारांच्या हकीकती वेळोवेळीं ऐकूं येतातच. हा वैरवह्नि बहुतेक वेळ आंतल्या आंत धुमसत असतो; क्वचित् त्याच्या ज्वाला बाहेर भडकतात तेव्हां आपलें त्याचेकडे विशेष तीव्रतेनें लक्ष्य वेधतें.

कित्येकांना वाटतें कीं हिंदु-मुसलमानांतील द्वैत शमविण्याचा सर्वांत टिकाऊ व परिणामकारक मार्ग उभयतांनीं तुल्यबल होणें हाच आहे. प्रत्येक पक्ष म्हणतो कीं आमच्या शक्तीचा प्रतिपक्षाला वचक बसला पाहिजे, तरच तो आमच्याशीं सरळपणें वागेल. "मी त्याच्या इतकाच किंवा किंचित् अधिक तिढा बनलों कीं तो माझ्या इतकाच सरळ बनेल" असा याचा अर्थ होतो. राष्ट्रांराष्ट्रांमध्यें बॅलेन्स ऑफ पॉवर — बलिष्ठपणाचा समतोल — साधण्यासाठीं शस्त्रास्त्रें वाढविणें व तद्द्वारा शांतता टिकवूं पहाणें यापैकींच हा प्रकार आहे. शस्त्रास्त्रांनीं शांतता साधत नाहीं, युद्धांनीं युद्धाचा अंत होत नाहीं, याचा जगाला पुरेपूर अनुभव आलेलाच आहे. "तुल्यबलतेच्या" ताजव्याचा कांटा कधींच स्थिर राहूं शकत नाहीं. एकानें आपलें बळ पांच टक्यांनीं वाढविलें तर दुसरा आपलें दहा टक्यांनीं वाढवूं पहातो व या बलवृद्धीच्या स्पर्धेचें पर्यवसान युद्धांतच होतें. 'तुल्यबलता' पाहिजे तर ती साधण्याचा अचूक मार्ग निर्बल बनणें हाच आहे. हिंदु-मुसलमानांनीं परस्परांविषयीं निर्बल बनलें पाहिजे. तो प्रश्न सोडविण्याचा हाच एक मार्ग आहे. निर्बल हे तंतोतंत तुल्य-बल असतातच.

परस्परांविषयीं निर्बल बनणें हाच एकत्र नांदण्याचा सोनेरी नियम आहे. पतिपत्नी, पिता-पुत्र हे परस्परांविषयीं निर्बल असतात. भाऊ-भाऊ

किंवा शेजारी-शेजारी परस्परांविषयीं निर्बल असतात तोंपर्यंतच एकत्र नांदूं शकतात.

हें निर्बल बनणें म्हणजे नेभळें बनणें नव्हे तर सोशीक, जागरूक व योजक बनणें; प्रेम, आपुलकी व न्याय यांची कास धरणें; आत्मसंशोधन करणें व दुसऱ्याबद्दल सबुरी धरणें; दुसऱ्याच्या व्यक्तित्वाबद्दल आदर बाळगणें. अहिंसेला हाच एक मार्ग मोकळा आहे.

अहिंसा ही "यूयं वयं, वयं यूयं"(तुम्ही तेच आम्ही, आम्हीं म्हणजेच तुम्ही) या वृत्तीनें चालते. हिंसा "यूयं यूयं, वयं वयं" (तुमचे तुम्ही, आमचे आम्ही) या ताटातुटीवर म्हणजेच दुहीवर आधारलेली असते. ताटातुटींतून अविश्वास व भय, व भयांतून हिंसावृत्ति निर्माण होते.

हिंदु-मुसलमानांना परस्परांबद्दल वाटणारा परकेपणा व अविश्वास हाच साऱ्या अनर्थाचें मूळ आहे. प्रत्येकाला भीति वाटते, "दुसरा मला चिरडून टाकील." हिंदूला वाटतें मुसलमान पुन्हां हिंदूंवर सल्तनत गाजवूं पहातील. मुसलमानांना वाटतें बहुसंख्य हिंदूंपुढें आम्हां अल्पसंख्यांचा टिकाव लागणार नाहीं. अविश्वासाच्या नजरेनें पाहूं लागलें म्हणजे साऱ्याच वस्तु उलट्या दिसूं लागतात. द्वैत कल्पिलें म्हणजे द्वैत घडून येतें. सृष्टि हा एक कल्पवृक्षच आहे. मनांत कल्पना आणावी तसें घडतें. मुसलमानांना मी आपले शत्रु कल्पितों व कल्पून बनवितोंही.

हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांच्या प्रसंगीं अविश्वास व भीति कशीं काम करतात त्याचा उल्लेख आपण पूर्वी एकदा केलाच आहे. केवळ दुसऱ्याबद्दलच्या भयानें व "मी चांगला आहें, पण तो तिढाच आहे" या भावनेनें प्रत्येक समाज दंग्यास प्रवृत्त होतो, व दंग्यापायीं नानातऱ्हेचीं दुःखें भोगतो.

दंग्यांमध्यें सर्वांत गर्हणीय गोष्टी कोणत्या असतील तर त्या दगलबाजी व निरपराध्यांना सोसावा लागणारा छळ या होत. ज्यांना लढण्याची हौस असेल असे हिंदु व मुसलमान योद्धे आझाद मैदानावर समोरासमोर येऊन मारामारी करतील तर त्यांत विशेष खेद मानण्यासारखें कांहीं नाहीं. ज्यांची तयारी आहे ते जिंकले तर गाझी बनतील व मेले तर पीर बनतील ! परंतु शरमेची गोष्ट ही कीं अशा तऱ्हेचें धर्मयुद्ध या धार्मिक दंग्यांत कोठेंच चालत नाहीं. केवळ स्वतःच्या वस्तींत निःशंक, असहाय व पूर्णपणें निरपराधी अशा एकटया दुकटया परधर्मीयाला गांठून सुरा भोसकून पळून जाणें व दडून बसणें असलेच विश्वासघातकी, नामर्दपणाचें व अन्यायाचे प्रकार चालतात. एक पक्ष दुष्कृत्यें करतो म्हणून दुसराही करतो. एक आपल्या धर्माला कालिमा लावतो म्हणून दुसरा आपल्या धर्मालाही लावतो. ही अधःपतनाची चढाओढ थांबली तरी खूप मिळविली !

**नित्याचे संबंधः**—दंग्यांचे प्रसंग सोडून दिले तरी इतर सर्व काळ हिंदु-मुसलमान न्यायानें, एकोप्यानें व परस्पर-विश्वासानें नांदूं शकतील तरच आपण स्वराज्य संपादनाला लायक बनूं. स्वराज्यनिष्ठा म्हणजे परस्परनिष्ठाच होय. आपल्याला स्वराज्य मिळवायचें तर मिळविलेलें स्वराज्य नांदेल असा विश्वास आपल्याला असला पाहिजे. स्वराज्य नांदणें म्हणजे निरनिराळ्या जातींनीं व वर्गांनीं सलोख्यानें वागणें. आपण हिंदू, मुसलमान, सीख, पारसी-सर्व एक आहों असा दृढविश्वास असेल तरच आपण स्वराज्याची आकांक्षा धरूं शकतों. आपण एक नसूं तर स्वराज्याचा अर्थ कोणत्या तरी एका जमातीचें इतर जमातीवर साम्राज्य असाच होणार. अर्थात् स्वराज्याकांक्षी व अहिंसावादी हिंदी राष्ट्राचा हिंदु-मुस्लिम एकतेवर दृढविश्वास असलाच पाहिजे.

आणि तो विश्वास त्याच्या नित्याच्या जीवनांत प्रतिबिंबित झाला पाहिजे. हिंदुस्थानच्या रहिवाशांमध्यें सर्व धर्मांबद्दल समभाव नांदला पाहिजे. त्यांना परस्परांच्या धार्मिक समजुतींबद्दल व आचारांबद्दल सहिष्णुताच नव्हे तर आदर वाटला पाहिजे. परधर्मीयांना भ्रष्ट व कांहीं अंशीं हीन लेखण्याची पद्धत नष्ट झाली पाहिजे. विधर्मी देशबांधवांची संस्कृति, परंपरा, भाषा इत्यादींची गुणग्राही माहिती सार्वत्रिक झाली पाहिजे. परस्पर-परिचय वाढला पाहिजे. संकटकालीं परस्परांनीं परस्परांची जाति-धर्म-निरपेक्ष सेवा केली पाहिजे. प्रत्येक जमातीच्या विकासाला– धर्म, संस्कृति, कला, भाषा इत्यादींच्या विकासाला– सारखाच वाव मिळेल अशी व्यवस्था झाली पाहिजे. देशबांधव हे विधर्मी असले तरी परक्यापेक्षां तेच आपल्याला जवळचे आहेत एवढी भावना सर्वांच्या मनांत ठसली पाहिजे.

खादी, ग्रामोद्योग, किसान व मजूर संघटना, राष्ट्रभाषाप्रचार इत्यादि राष्ट्रसंवर्धक कार्यक्रम भिन्नधर्मीयांना एकत्र आणणारे व एकाच प्रेमसूत्रांत गोंवणारे आहेत. कोणतेंही विधायक कार्य सहकार्यानें केल्यानें ऐक्यभावना दृढावते. स्वराज्यासारख्या सर्वसंमत ध्येयासाठीं एकत्र भोगलेल्या क्लेशांनी तर ती विशेषच दृढावते.

**वर्ग-कलहः**— जी गोष्ट जातींजातींतील प्रश्नांची तीच वर्गावर्गांमधील कलहाची. जातिविषमता जशी नष्ट झाली पाहिजे तशीच वर्ग-विषमताही नष्ट झाली पाहिजे. कसलेंही उत्पादन करावयाचें तर त्यासाठीं मजूर पाहिजेत, त्याचप्रमाणें मुकादम व संयोजक किंवा व्यवस्थापकही पाहिजे असतात; उपकरणें व सामान-सामुग्रीही पाहिजे असतात. यंत्रांच्या साह्यानें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याची पद्धत वाढली तसतसें उपकरणें व सामान-सामुग्री यांना मजुरांच्या श्रमाच्या प्रमाणांत अतोनात महत्त्व प्राप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थापना

झालें आणि उपकरणेंवाले ते धनी व श्रमशक्तीवाले ते त्यांचे दास बनून गेले. ही नव्या युगाची गुलामगिरी नष्ट झाली पाहिजे. मजूर, व्यवस्थापक व मालक यांमध्यें मूलतः भेद किंवा विषमता असतां नये. किंबहुना यांत्रिक ठोकळ्यांच्या मालकांना केवळ त्या मालकी हक्काच्या बळावर विनाश्रम मजुराच्या उत्पादनाचा अधिकांश हिस्सा बळकावतां यावा हें उचित नाहीं. तो अन्याय आहे. हा अन्याय आज जगभर मोठ्या प्रमाणांत चालला आहे.

अन्यायामुळें परस्परांबद्दल असंतोष निर्माण होतो व सहकार्याची भावना नष्ट होते. दुही स्वराज्यसंपादनाला बाधक आहेच; पण त्या खेरीज दारिद्र्यानें गांजलेले मजूर तसेंच ऐषआरामांत मग्न असलेले लक्ष्मीदास या दोघांनाही स्वराज्यसंपादनाची उत्सुकता रहात नाहीं. म्हणून अन्यायाच्या निराकरणासाठीं, श्रमजीवी वर्गाचें जीवन सुखी व समृद्ध व्हावें म्हणून व स्वराज्याच्या चळवळीसाठीं आवश्यक असलेली एकजूट व उत्साह निर्माण होण्यासाठींही आपण किसान व मजूर यांचे प्रश्न हातीं घेऊन सोडविलें पाहिजेत.

जे जमीनदार व कारखानदार राष्ट्रीय वृत्तीचे व स्वराज्याकांक्षी आहेत त्यांनीं केवळ न्यायबुद्धीनें व बंधुप्रेमानें प्रेरित होऊन श्रमिकांनीं मागण्यापूर्वींच त्यांना न्याय द्यावा. स्वार्थ हाच केवळ मनुष्याचा प्रेरक हेतु नसून न्याय, प्रेम व बंधुभाव हेही प्रेरक हेतु आहेत. हें आपल्या नित्याच्या प्रापंचिक व्यवहारामध्यें निदर्शित झालें पाहिजे. स्वार्थनिष्ठेमुळें आपली फाटाफूट व ताटातूट होते कीं जी स्वराज्य संपादनालाच काय पण सर्वच प्रकारच्या सुखी, संतुष्ट व समृद्ध जीवनाला मारक आहे. न्यायनिष्ठेमुळें व बंधुप्रेमानें आपण सांधले जातों व आपलें सामर्थ्य वाढतें.

परंतु माणसामध्यें न्याय व प्रेम आहेत त्याचप्रमाणें स्वार्थ व लोभही आहेत व त्यांचेपायीं मनुष्य निष्ठुर व अन्यायी बनतो हेंही खोटें नाहीं.

म्हणून केवळ जमीनदार-कारखानदारांच्या कृपेवर अवलंबून राहिल्यानें श्रमिकांना न्याय मिळणार नाहीं. नाखूष मालकांकडून श्रमिकांनीं न्याय कसा मिळवावा? आम्ही तो त्यांस कसा मिळवून द्यावा?

त्यासाठीं श्रमिकांची—किसानांची व मजुरांची—संघटना करणें आवश्यक आहे. मालकांची न्याय-बुद्धि जागृत व कार्यान्वित होण्यासाटीं किसान-मजुरांमध्येंसुद्धां स्वतःच्या हक्कांची व परस्परांविषयींच्या कर्तव्याची जाणीव उत्पन्न झाली पाहिजे व स्वतःचे न्याय्य हक्क मिळविण्यासाठीं झगडण्याची व जरूर तो त्याग करण्याची त्यांची तयारी असली पाहिजे. संघाची शिस्त मजुरांनीं मान्य केली पाहिजे. एकेकटा मजूर मालकाशीं सौदा करूं शकत नाहीं, परंतु सगळे मजूर एकवटल्यास ते मालकाला भारी होऊं शकतात. यासाठीं किसान-मजुरांचे संघ स्थापले पाहिजेत व त्या संघांचें संयोगीकरण केलें पाहिजे.

या संघटनेमध्यें प्रतिपक्षाबद्दल यत्किंचित्‌ही द्वेषभावना असण्याचें कारण नाहीं. जमीनदार जबर खंड मागतो तो दुष्ट म्हणून नव्हे, तर कुळेंही आपापसांत स्पर्धा करून त्यास जबर खंड देण्यास तयार होतात म्हणूनच जबर खंड घेण्याची त्याला संवय पडते. जमीनदार व कुळें, घरमालक व भाडेकरी, कारखानदार व मजूर, सावकार व ऋणको या जन्मसिद्ध योनि नसून त्या तात्पुरत्या भूमिका आहेत. मुंबईतील भाडेकरी हा कोंकणांतील खोतही असतो, किंवा गिरणींतील मजूर सुद्धां क्वचित् सावकारी करतो. भिन्न भिन्न भूमिकांवरून एकच मनुष्य भिन्न-भिन्न दिशांनीं खेंचाखेंच करूं पहातो. आपल्याला या भूमिकांमधील संबंध सुधारायचे आहेत. त्यासाठीं मालक तेवढे निर्दय, किंवा मजूर तेवढे लबाड, असें ठरवून चालण्याचें कारण नाहीं; आणि तें सत्यही नाहीं.

एका बाजूनें किसान-मजुरांना संघटित, जागरूक व जाणते करावें व दुसऱ्या बाजूनें जमीनदार, कारखानदार, सावकार यांची न्यायबुद्धि जागृत करण्याचे सुद्धां प्रयत्न व्हावे. संघटनेच्या व मतप्रचाराच्या जोरावर श्रमिकांना छोटे छोटे विजय मिळवून देत जावे. त्यानें त्यांचा आत्मविश्वास व संघटना हीं वाढीस लागतील व प्रतिपक्षही एकदमच बिथरून जाणार नाहीं. मालकांना खालीं उतरण्यास व श्रमिकांना वर चढण्यास सुसाध्य पायऱ्या करून देणेंच श्रेयस्कर. आत्यंतिक भूमिका तत्त्वतः कितीही न्यायसंगत असल्या तरी त्या स्वीकारण्यानें व त्यांवरच अडून बसल्यानें पेंचप्रसंग निर्माण होतो व उभयपक्षीं त्वेष वाढतो, पण आधींच निस्त्राण असलेल्या श्रमिकांच्या हातीं कांहींच लागत नाहीं. साऱ्या समाजाचीही गैरसोय होते.

श्रमिकांच्या न्याय्य हक्कांची संपादणी जशी क्रमाक्रमानें होणें इष्ट तशीच ती अहिंसेच्याच मार्गानें होणें आवश्यक आहे. किसान-मजूर हे सामान्यपणें निर्बल, गांजलेले व अडाणी असल्यानें त्यांना त्यांच्या दुःखांच्या निराकरणार्थ दंगधोपे किंवा नासधूस करण्यास चिथावणें फार सोपें असतें. परंतु दंग्याधोप्यांनीं त्यांची बाजू बळकट न होतां अधिकच खालावते. मजुरांचें नांव बद्द करण्यास मालकांना दंग्याधोप्यांचें आयतेंच निमित्त मिळतें. दंग्यापायीं मजूर समाजाच्या सहानुभूतीला पारखे होतात व सरकारी अधिकाऱ्यांनाही दडपशाही करण्यास वाव मिळतो.

धमकी, मारामारी इत्यादि हिंसक प्रयोग जसे मालकांविरुद्ध करूं नयेत तसेच ते आपसांत संपफोड्यांविरुद्धही करूं नयेत. आपसांतील बलप्रयोगामुळें दुफळी वाढून आपला शक्तिपातच होतो.

मालक व मजूर यांचे हितसंबंध कांहीं अंशीं परस्पर-विरुद्ध असले तरी परस्परावलंबी सुद्धां आहेत. धंदा सुरळीतपणें चालण्यांत उभयतांचेंही हित

आहे. संप हें निर्वाणीचें शस्त्र असून तें उभयपक्षांना हानिकारकच असतें. म्हणून इतर उपाय हरल्यावरच व स्वपर-बलाबल अजमावूनच मजूरांनीं त्या शस्त्राचा उपयोग करावा. निःपक्षपाती लवादापुढें आपली बाजू मांडून त्याचा निर्णय मान्य करण्याची त्यांची सदैव तयारी असावी.

मराठी ग्रंथ [illegible] ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम
क्रमांक
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.

# सत्याग्रह आणि स्वराज्य

## शुद्धि–पत्रक

टीपः—ज्यांमुळें अर्थ लक्षांत येण्यास अडचण पडते तेवढींच अशुद्धें दुरुस्त केलीं आहेत. पुढील दुरुस्त्या करून नंतरच पुस्तक वाचण्यास प्रारंभ करणें सोयीचें होईल. मथळा 'अहिंसा आणि स्वराज्य' ऐवजीं 'सत्याग्रह आणि स्वराज्य' ही दुरुस्ती पान ३, ५, ते ७९ पर्यंत विषम अंकाच्या पृष्ठांच्या शिरोभागीं केली पाहिजे. पृष्ठ २० ते ३० पर्यंत सम अंकाच्या पृष्ठांच्या शिरोभागीं 'काँग्रेस व अहिंसा' ऐवजीं 'अहिंसा परमो धर्मः' वाचावें आणि पृष्ठ १९ वरील शेवटला मथळा 'अहिंसा परमो धर्मः' हें स्वतंत्र (२ रें) प्रकरण समजावें.

| पृष्ठ | परिच्छेद | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ६ | १ | २० | व अनुचित | उचित वा अनुचित |
| २० | | शेवट | तरी | (गाळावें) |
| २७ | २ | २ | क्ररण्याच्या | करण्याच्या |
| २८ | २ | १० | हें मान्य आहे | हें त्यांना मान्य आहे. |
| २९ | १ | ७ | नर | नट |
| ३४ | २ | ५-६ | निवारणार्थ | निवारणार्थच |
| ३८ | १ | १० | आपल्याला | (गाळावें) |
| ४० | १ | ६ | पोक | पोके |

| पृष्ठ | परिच्छेद | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ४० | १ | ८ | खुंटली, | खुंटली. |
| ४१ | १ | ७ | कड्यावर | कठड्यावर |
| ,, | २ | १ | कसे होतात. | कसे होतात ? |
| ४३ | १ | ३ | बुजनें | बुजतें |
| ४८ | २ | १ व २ | मद्दितर | मदितर |
| ५१ | २ | ३ | हिंसा–बलिष्ठाला | हिंसा-बलिष्ठाला |
| ५३ | २ | ६ | घुमसत | धुमसत |
| ५५ | २ | १ | जित | चित्त |
| ७२ | २ | ९ | -व्यक्तींचें किंवा समाजांचें- | –व्यक्तींचें किंवा समाजांचें– |
| ८१ | १ | ८ | जुने | जून |
| ८४ | ३ | ३ | थम | प्रथम |
| ९० | २ | ३ | वाल्यांना ही | वाल्यांनींही |
| १०४ | १ | २ | हक्क आहे | हक्क आहे" |
| १०७ | २ | ३ | मागें | मार्गें |
| १०९ | १ | ८ | धडाडीत | धडधडीत |
| १११ | २ | ३ | यांमधील | यांमध्यें |
| ११५ | १ | १ | मार | ( गाळावें ) |
| १२० | २ | ४-५ | असते | असते— |
| १३० | २ | ७ | काटे | कोट |
| १३१ | | शेवटली | blustes | blushes |
| १३२ | १ | ४ | has | had |

| पृष्ठ | परिच्छेद | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १३५ | २ | शेवटली | ही | ( गाळावें ) |
| १४० | २ | ९ | हाच | हाही |
| १४८ | २ | ८ | पुरणाऱ्या | उरणाऱ्या |
| १४९ | २ | ६ | संघटना ही | संघटना हीं |
| १५३ | ३ | ४ | उत्साही | उत्साह |
| १५४ | २ | ३ | भावनांचा | भावनांना |
| १५६ | १ | ६ | भाग्याची | (गाळावें ) |
| १५९ | १ | १३ | अज्ञान | अज्ञात |
| १६३ | २ | १२ | शत्रूचीही | शत्रूची ही |
| ,, | ,, | २१ | बलिदानही | बलिदान ही |
| १६५ | १ | २ | पाहिजेच | पाहिजे |
| १६७ | ३ | ७ | यांमधील | यांमधील– |
| १६८ | १ | ७ | त्यासाठीं | त्या सालीं |
| १६९ | १ | ८ | असावें ". | असावें. |
| १७० | १ | ६ | धीरही | धीर हीं |
| १७५ | १ | ११ | गुप्तताही | गुप्तता ही |
| १७६ | २ | ५ | विशेषच | विशेषच. |
| १८२ | २ | ५ | खऱ्या | साऱ्या |
| १८६ | २ | २ | रक्तवाहिन्यांचा | रक्तवाहिन्यांच्या |
| १८७ | २ | १२ | नागरिकांमध्येंही | नागरिकांमध्यें ही |
| १८९ | ३ | ३ | प्रतिकारही | प्रतिकार ही |
| १९० | १ | ५ | बसवून | वसवून |

| पृष्ठ | परिच्छेद | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ,, | २ | १ | मानसालूनच | माणसाळवूनच |
| १९२ | १ | ७ | स्वराज्याचीही | स्वराज्याची ही |
| २०३ | ३ | १ | त्यांना | त्यांत |
| २०६ | २ | ५ | मतें | मनें |
| ,, | २ | ७ | उधुक्त | उद्युक्त |
| २१० | १ | १ | परत | ( गाळावें ) |
| २१३ | १ | ६ | विड्या | विड्या |
| २२३ | १ | १० | बहुजन समाजाच्या | बहुजन-समाजाच्या |
| २२९ | १ | १० | म्हणजे | ( गाळावें ) |
| २३७ | १ | ४ | ( रूपी ) | ( गाळावें ) |
| २४५ | ३ | ४ | आहेत. | आहेत |

REFBK-0006835
REFBK-0006835

# स्थितप्रज्ञ–दर्शन

**विनोबा**

मूल्य १॥ रु. ट. ख. २ आणे

गीतेच्या दुसऱ्या अध्यायाच्या शेंवटीं अठरा श्लोकांत स्थितप्रज्ञाचें गंभीर आणि उदात्त चरित्र वर्णिलें आहे। ह्या अठरा श्लोकांत गीतेच्या अठरा अध्यायांचें जणूं सार च सांठविलें आहे। स्थितप्रज्ञ गीतेची आदर्श-मूर्ति आहे। ग्रंथकारानें प्रस्तुत पुस्तकांत ह्या च मूर्तीचें सर्वांगीण दर्शन करून दिलें आहे।

पुस्तकासंबंधी निवेदनांत म्हटलें आहे—" स्थितप्रज्ञाच्या लक्षणांवरील हीं व्याख्यानें आहेत। हीं लक्षणें आज सबंध हिंदुस्थानभर हजारों सत्याग्रही स्त्रीपुरुष रोज संध्याकाळच्या प्रार्थनेंत भक्तिपूर्वक म्हणत असतात। त्यांच्यासाठीं सदर व्याख्यानें पुस्तकाकारांत येथें मांडलीं आहेत।

स्थित-प्रज्ञाच्या लक्षणांत एक समग्र दर्शन च भरलेलें आहे। तें उलगडून दाखविण्याचा ह्यांत प्रयत्न आहे।

तीस वर्षांच्या निदिध्यासानें जो अर्थ स्थिर झाला तो येथें विवरला आहे "।

## लेखकाचें अन्य लिखाण

सेवा-धर्म

सत्याचे प्रयोग—अनुवाद

मंगल-प्रभात ,,

गांधीजींचीं पत्रें ,,

★

## आमचें आगामी प्रकाशन

* **विचार-पोथी** (आ. २ री)
  विचारांची वर्णानुक्रमणी,
  सूचि, प्रस्तावना इत्यादींसह
* **ज्ञानदेवाचीं भजनें** (आ. २ री)
  चिंतनिका, शब्दार्थ-कोश
  इत्यादींसह
  विनोबांची ही चिंतनिका म्हणजे
  गद्य गीतांजलि च होय
* **गांधीजींचीं पत्रें** (आ. २ री)

★

ग्राम-सेवा-मंडळ, नालवाडी, वरधा